मनुष्याणाम् वृत्तीरर्थः।


ISSN 0973-8452

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

भारतीय सौर पौष-फाल्गुन १९३५
जानेवारी-मार्च २०१४ / खंड ३७ अंक ४


- महात्मा गांधी राष्ट्रीय [illegible]
- पुणे शहरातील घरेलू कामगार - अभ्यास
- ब्रिक्स संघटना व भारताचा विकास
- वित्तीय समावेशन:अधिकोषण क्षेत्र
- अर्थव्यवस्थेतील घटक: काळा पैसा
- महाराष्ट्रातील नागरीकरण
- शिराळा तालुक्यातील मका प्रक्रिया उद्योग
- उर्जा संसाधन स्थितीचे अध्ययन
- डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक तत्त्वज्ञान
- सी. पं. खेर यांना विनम्र श्रध्दांजली
- अर्थ शब्दांची वाट पाहे

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिध्दये। शोधचर्चाविवादार्थ संवादोऽयं प्रवर्तितः।।

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

जानेवारी-मार्च २०१४ / खंड ३७ अंक ४

International Research Journal

ISSN 0973-8452

Reg. No. 31918/77

मनुष्याणाम् वृत्तीरर्थः।

www.marthpari.org

**प्रमुख संपादक**

अविनाश रामलाल निकम

**सहाय्यक संपादक**

शंकर सुदामराव पवार

**सल्लागार मंडळ**

(२०१२-१५)

प्रशांत काटोले

अशोक खाचणे

राहुल म्होपरे

अशोक हळ्ळी

**संपादकीय पत्रव्यवहार**

डॉ.अविनाश निकम

मातृपितृ कृपा,प्लॉट नं.३०,

परिमल कॉलनी,

यशवंत क्लासेसच्या मागे,

शहादा-४२५४०९

जिल्हा नंदुरबार.

मोबा: ९८२२६६५१४१

**लेखातील मते लेखकांचीच**

**अनुक्रमणिका**

अविनाश निकम, शहादा
संपादकीय संवाद: अस्मानी संकट ........ ३३८

जगन्नाथ शामराव पाटील, कराड
महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ........ ३४०

उत्तम वाकोडकर, अंबाजोगाई
पुणे शहरातील घरेलू कामगार - अभ्यास ........ ३६०

सुषमा उध्दव मंडले, लातूर
ब्रिक्स् संघटना व भारताचा विकास ........ ३७१

विजय रोटे, छिंदवाडा, करमसिंग राजपूत, वणी
वित्तीय समावेशन:अधिकोषण क्षेत्राची भूमिका ........ ३७६

वंदना कटारे, औरंगाबाद
अर्थव्यवस्थेतील परिणामकारक घटक: काळापैसा ........ ३८५

सुभाष पाटील, पुणे
महाराष्ट्रातील नागरीकरण ........ ३९३

रमजान मुजावर, कोल्हापूर
शिराळा तालुक्यातील मका प्रक्रिया उद्योग ........ ४००

शिवाजी ग. यादव, पैठण
उर्जा संसाधन स्थितीचे अध्ययन ........ ४०५

आर.एम.सोळुंके, औरंगाबाद, एस.बी.करंडे, बोरावली
ठाणे जिल्ह्यातील वारली जमातीची व्यावसायीक रचना... ४१०

सुरेश गोलाईत, शिरपूर
डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे भारताच्या-
विकासासासाठी आर्थिक तत्त्वज्ञान ........ ४१९

सूत्रसंचालकांचा अहवाल
दि.व्यं.जहागिरदार, श्रीराम जोशी, लालासाहेब घाटगे...... ४२६

कार्यवाहांचा अहवाल
अनिल बाबुराव सूर्यवंशी ........ ४३२

प्रमुख संपादकांचा अहवाल
अविनाश रामलाल निकम ........ ४३७

दि.व्यं.जहागिरदार, अमरावती
सी.पं.खेर यांना विनम्र श्रध्दांजली ........ ४४२

ज. फा. पाटील, कोल्हापूर
अर्थ शब्दांची वाट पाहे: हरित विपणन ........ ४४४

## मराठी अर्थशास्त्र परिषद


**कार्यकारी मंडळ २०१३-१४**

**अध्यक्ष**

जगन्नाथ शामराव पाटील (सातारा)

**कार्याध्यक्ष**

चारुदत्त श्रीधर गोखले (जळगाव)

**कार्यवाह खजिनदार**

अनिल बाबुराव सूर्यवंशी (बार्शी)

**प्रमुख संपादक-अर्थसंवाद**

अविनाश रामलाल निकम (शहादा)

**विश्वस्त**

मधुकर शिंदे (इस्लामपूर)
सूर्यकांत जगदाळे (उस्मानाबाद)
मुक्ता जहागिरदार (अमरावती)

**सदस्य**

श्रीराम जोशी (जळगाव)
सुरेश ढाके (डोंगरकठोरे)
हरिहर तिवारी (वाशीम)
रामकृष्ण टाले (नागपूर)
तुकाराम मुंडे (मानवत)
तुकाराम बारबोले (उस्मानाबाद)
राहुल म्होपरे (कोल्हापूर)
संजय तुपे (नाशिक)
बालाजी सुरवसे (फोंडा)
बालाजी शिंदे (परभणी)
वामन सावंत (रत्नागिरी)
वनिता चौरे (चांदूरबाजार)



**अक्षर रचना-** सुनिल मुरलीधर भांडारकर, शहादा.
**मुद्रणालय-** सातपुडा ऑफसेट, जळगाव.


**कार्यालयीन पत्रव्यवहार:**

(आजीव सदस्य नोंदणी, जाहिरात पाठविणे)


मुद्रक-प्रकाशक: अनिल बाबुराव सूर्यवंशी
कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,
गोदाई, शिवशक्ती मैदानाजवळ, शिवाजीनगर,
बार्शी - ४१३ ४११, जि. सोलापूर.
दूरध्वनी: ०२१८४-२२४२९४,
भ्रमणध्वनी: ८८०५६९१४०६


**वर्गणी:**

- परिषदेचे सदस्य:
  आजीव सदस्य: रु.३०००/- (एकरकमी)
- संस्था सदस्य व अर्थसंवाद वर्गणीदार:
  शैक्षणिक संस्था: रु.१०००/-(त्रैवार्षिक)
  व्यावसायिक संस्था:रु.१०००/-(त्रैवार्षिक)
  ग्रंथालये: रु.१५००/-(पंचवार्षिक)
- वर्षगणना: १ एप्रिल ते ३१ मार्च
- संस्थांना आजीव सभासद होता येत नाही.
- कृपया आजीव सदस्य वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच कार्यवाहांकडे पाठवावी.
- अर्थसंवादची वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच प्रमुख संपादकाकडे पाठवावी.
- **मनीऑर्डर व वार्षिक वर्गणी स्वीकारली जात नाही.**


**अर्थसंवादसाठी अनुदानाबद्दल आभार:**

१) भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, दिल्ली यांच्याकडून रु.१,५०,०००/- रक्कम २०१२-१३ या वर्षासाठी मिळाली.

२) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

टिप: म.रा.सा.सं.मंडळाने अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील [illegible] विचारांशी मंडळ आणि राज्य शासन [illegible] असे नाही.

# संपादकीय संवाद...

## अस्मानी संकट...

तो अनुभव खरंच अविस्मरणीय आहे.... दिवस होता २४ फेब्रुवारी २०१४.... मुंबईहून शहाद्याकडे मित्रांसह प्रवास सुरू होता.... कार नाशिक ते मालेगाव दरम्यान चांदवड घाट परिसरात होती.... सायंकाळ होण्यास अद्याप अवकाश होता.... त्याच वेळी निसर्गानं रंग बदलण्यास सुरुवात केली.... वारा-वादळ सुरू होऊन अचानकपणे ढग दाटून आले.... अवकाळी पावसाला सुरुवात झाली म्हणून मित्राने कार पुढे एका ढाब्यावर थांबविली.... त्यानंतर दोन-तीन मिनिटातच वादळी पावसाचा वेग वाढला अन् अल्पावधित गारांचा पाऊस सुरू झाला.... त्या ढाब्याच्या मालकाची २० एकर द्राक्ष बाग ढाब्याच्या मागेच होती.... अवघ्या १२ ते १५ मिनिटांच्या गारपिटीत द्राक्ष बागेतील द्राक्षांचे घड गारांच्या माऱ्याने वेलीवरून गळून पडत होते.... तर काही द्राक्ष फुटून जमिनीवर पडत होते.... ढाब्याच्या मालकाशी झालेल्या चर्चेत त्यांनी सांगितले की, आमच्या शेतातील द्राक्ष माल नंबर वन क्वालिटीचा असतो त्यामुळे बाहेर मार्केटला कोणताही भाव असला तरी व्यापारी बेणं देऊन या शेतातूनच १०० रुपये किलो भावाने स्वखर्चानं माल घेऊन जातो.... हा माल एक्स्पोर्ट केला जातो.... पण या वर्षी पूर्ण मेहनत मातीमोल झाली. आता हा माल पाच रुपये किलो भावानेही व्यापारी घेणार नाहीत. मशागतीचा खर्च देखील या वेळी निघणार नाही असं तो हतबल होऊन म्हणत होता. शेतकऱ्याचं निसर्गापुढं काहीच चालत नसतं हेच खरं.... मोठ्या शेतकऱ्याची ही व्यथा असेल तर सामान्य शेतकऱ्याचं काय होत असेल याचा विचार केलेलाच बरा....

कधी मोठ्या दुष्काळाशी सामना करावा लागतो..... कधी अतिवृष्टीनं पूर येतो.... कधी चक्रीवादळ घोंघावतं..... तर कधी शेतमाल बऱ्यापैकी येऊनही शेतमालाच्या किमतींना अवकळा येते.... मात्र या वेळी थोडं वेगळं घडलं आहे. फेब्रुवारी-मार्च महिन्यात महाराष्ट्रात गारपिटीसह वादळी पाऊस झाला. एक-दोनदा नव्हे तर तीन-चारदा गारपिटीचा भडिमार झाला. रब्बी पिके भुईसपाट झाली. अशा आपत्तीजनक परिस्थितीला सामोरं जावं लागत आहे. या सर्व परिस्थितीमधून पीकहानी, वित्तहानी मोठ्या प्रमाणावर झाल्याचं दिसून येत आहे. काही शेतकऱ्यांचा तयार शेतमाल शेतात होता तर काही शेतांमध्ये काढणी सुरू होण्याअगोदर अवघ्या दोन-तीन मिनिटात करोडो रुपयांचा चुराडा झाला आहे. द्राक्षांच्या बागांना तडाखा बसून बागा जमिनीवर लोळू लागल्या आहेत. संत्री-डाळिंबाच्या बागा उध्वस्त झाल्या आहेत. पश्चिम महाराष्ट्रापासून खानदेश, मराठवाडा-विदर्भापर्यंत एरवी हिरवीगार असलेल्या शेतीतील पिके आडवी झाली आहेत. मोठमोठी झाडेदेखील कोसळली आहेत. पपई-केळी तर केव्हाच जमीनदोस्त झाली आहे. गहू भुईसपाट झाला आहे. तर भुईमुगाच्या पिकात पाणी साचल्याने मोठं नुकसान झालं आहे. महाराष्ट्रातील २८ जिल्ह्यांना कमी-अधिक प्रमाणात गारपिटीचा तडाखा बसला आहे. सर्वाधिक फटका सोलापूर, धुळे, जळगाव, नाशिक, अहमदनगर, औरंगाबाद, जालना, परभणी, उस्मानाबाद, नांदेड, वाशीम, बुलढाणा, अकोला व नागपूर या जिल्ह्यांना बसला आहे. या जल्ह्यांतील बहुतांश गावे वादळी वाऱ्यासह गारपिटीने आर्थिकदृष्ट्या कोलमडून गेली आहेत. याशिवाय ७-८ जिल्ह्यात हानी झाली आहे. गारपीट व

अवकाळी पावसामुळे राज्यात मार्चमधील दहा दिवसात ८ लाख ७२ हजार हेक्टर क्षेत्रातील पिकांचे नुकसान झाले आहे. फेब्रुवारीपासून राज्यात तब्बल ११ लाख १६ हजार ६२३ हेक्टरवरील शेती पीक व फळबागा बाधित झाल्या आहेत. केवळ बारामती व इंदापूर या दोन तालुक्यात शेतीचे ५०० कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. त्यामुळे शेतकरीराजा हतबल होऊन खचला आहे. गेल्या वर्षात राज्यातील दुष्काळानं शेतीचं अतोनात नुकसान झालं. अतिवृष्टीनं खरीप हंगाम बुडाला, गारपिटीनं रब्बीला तडाखा बसला. पण सातत्यानं होणाऱ्या शेती क्षेत्रातील आपत्तीमुळे देशातील अन्नाची गरज भागवणाऱ्या शेतकऱ्याच्या हाती काहीच लागणार नसेल तर त्याला नुकसान भरपाई देण्यासाठी स्वतंत्र धोरण आखण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. असे असतानाही शासन-प्रशासन स्तरावर त्याबाबत उदासीनता दिसते. गारपीटग्रस्तांच्या पंचनाम्याची कामे गतीनं अन् सत्यतेच्या आधारे झाली नाहीत असा आरोप केला जात आहे. झाल्या प्रकारानं शेतकरी संतप्त आहे.

महाराष्ट्रतील गारपीटग्रस्तांच्या मदतीसाठी केन्द्रानं ८५६ कोटी रुपयांची मदत जाहीर केली आहे. गारपीटग्रस्त शेतकऱ्यांचे जानेवारी ते जून २०१४ कालावधीतील वीज बील माफ करण्यात आले आहे. त्यासाठीचा २०० कोटी रुपयांचा भार राज्य सरकार उचलेल. कर्जाच्या वसुलीला डिसेंबर २०१४ पर्यंत स्थगिती देण्यात आली आहे. सन २०१३-१४ मधील शेतकऱ्यांच्या पीक कर्जावरील व्याज माफ करण्यात आलं आहे. मार्चमध्ये ही मदत जाहीर झाल्यानंतर लगेचच केन्द्रीय मंत्रीगटानं आणखी मदतीचा हात देण्याचा निर्णय घेतला. प्रामुख्यानं फळबागांच्या पुनरुज्जीवनासाठी ३५२ कोटी रुपयांची मदत जाहीर झाली आहे.

नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान होणं महाराष्ट्रासाठी नवीन नाही. यापूर्वी महाराष्ट्राला दुष्काळ, वादळी पाऊस, अतिवृष्टीचा तडाखा बसलेला आहे. आपत्ती आल्यास आपल्याकडे तात्पुरते उपाय केले जातात. परंतु भविष्यात अशी आपत्ती कोसळल्यास त्या संदर्भात नवीन ठोस धोरण आखण्याची नितांत आवश्यकता आहे. हवामान विभागानं धोक्याची सूचना दिल्यानंतर सरकारी यंत्रणेनं हालचाल करणे देखील जरुरी आहे. शेतकऱ्यांनी हवामान विभागाचा धोक्याचा इशारा दृष्टीआड न केल्यास होणारं नुकसान काही प्रमाणात टळू शकेल. शेती अल्पावधीत उभी राहत नाही. त्यासाठी प्रचंड कष्टाची, शेतीत घाम गाळण्याची गरज असते. मोठ्या मेहनतीनं उभ्या केलेल्या बागा, डोलदार पिकं, कोसळल्यानं ते सगळं हिरवं ऐश्वर्य पुन्हा उभं करण्याचं आव्हान शेतकऱ्यांपुढे आहे. आणि हो, आता हे पहायचंय् की सरकारी यंत्रणा आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना किती 'अर्थ'पूर्ण पध्दतीनं मदतीचा हात देते.

## मराठी अर्थशास्त्र परिषद व अर्थसंवादविषयी....

मराठी अर्थशास्त्र परिषदेचं ३८ वं अधिवेशन ठाणे शहरात ऑक्टोबर/नोव्हेंबर २०१४ मध्ये डॉ.श्रीराम जोशी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केले जाणार आहे. अर्थसंवादचा पुढचा अंक आर्थिक महाराष्ट्र विशेषांक येणार आहे. आपले लेखक नेहमी उत्तम लेखन पाठवित असतात. नवीन लेखकांनी शोधनिबंधाच्या गुणवत्तेकडे अधिक लक्ष देण्याची आवश्यकता आहे. मराठी अर्थशास्त्र परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा.चारुदत्त गोखले यांनी सलग सात अंकांना जाहिरात देऊन सहकार्य केलं, त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार! अर्थसंवाद अंकास वाचक स्वीकारतील अशी अपेक्षा आहे.

अविनाश रामलाल निकम

(प्रमुख संपादक, 'अर्थसंवाद')

# महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना : एक चिकित्सा

**जगन्नाथ शामराव पाटील, कराड,**
प्राचार्य, शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे महाविद्यालय,
जिल्हा: सातारा.
अधिष्ठाता, सामाजिक शास्त्रे,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर,
भ्रमणध्वनी: ९४२३२६१७९६
ई-मेल: jspatil1957@gmail.com

*(मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ३७ वे राष्ट्रीय वार्षिक अधिवेशन कै.नारायणराव अमृतराव देशमुख महाविद्यालय चांदूरबाजार यांच्या विद्यमाने अमरावती शहरात नोव्हेंबर २०१३ मध्ये संपन्न झाले. या अधिवेशनातील अध्यक्षीय भाषण....)*

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ३७ व्या राष्ट्रीय वार्षिक अधिवेशनाच्या अध्यक्षपदी बहुमताने माझी निवड करून परिषदेने माझा सन्मान केला, त्याबद्दल मी आपणा सर्वांचा अत्यंत आभारी आहे. राष्ट्रसंत श्री गाडगे महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या अमरावती शहरात, पीपल्स वेलफेअर सोसायटी संचलित, कै. नारायणराव अमृतराव देशमुख महाविद्यालय चांदूरबाजारने शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्थेच्या परिसरात हे अधिवेशन आयोजित केले, त्याबद्दल आपल्या सर्वांच्या वतीने त्यांना धन्यवाद देतो. या महाविद्यालयाच्या उज्वल भावी वाटचालीसाठी माझ्या मन:पूर्वक शुभेच्छा. अमरावती नगरीत या अधिवेशनास उपस्थित असणाऱ्या परिषदेच्या सर्व सदस्यांचे व नागरिकांचे मन:पूर्वक स्वागत करतो.

अर्थशास्त्रीय प्रश्नांची सैद्धांतिक व व्यावहारिक दृष्टिकोनावर चर्चा घडवून आणणे, अर्थशास्त्र विषय शास्त्रीय दृष्टिकोन व विचार मराठीतून प्रसिद्ध

करणे, यासाठी परिषदेची वार्षिक अधिवेशने, विविध उपक्रम व व्याख्यानमाला, मान्यता प्राप्त राष्ट्रीय पातळीवरील ÷अर्थसंवाद'च्या माध्यमातून विविध आर्थिक विषयावर दर्जेदार विचारमंथन करणे हे परिषदेचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य आहे. देशातील बेरोजगारीचा प्रश्न सोडविण्यासाठी राष्ट्रीय पातळीवरील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण हमी रोजगार योजनेचे वास्तव स्वरूप आपणासमोर सादर करीत आहे.

### विषयाची पार्श्वभूमी :

भारत हा विकसनशील देश असून शेती हा देशातील प्रधान व्यवसाय आहे. १५ ऑगस्ट १९४७ रोजी देशाला स्वातंत्र्य मिळाले. त्यावेळी देशाची लोकसंख्या सुमारे ३५ कोटी इतकी होती. भारताचे पहिले पंतप्रधान स्व. पंडित जवाहरलाल नेहरू यांनी रशियाच्या धर्तीवर आर्थिक नियोजनाच्या माध्यमातून देशाचा विकास करण्याचे धोरण अवलंबिले. स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळी भारतासमोर दारिद्र्य, बेरोजगारी, अन्नधान्य टंचाई व वाढती लोकसंख्या अशा अनेक समस्या होत्या. देशाच्या ग्रामीण भागाचा विकास घडवून आणल्याशिवाय सर्वंकष आर्थिक विकासाचे स्वप्न पूर्ण होणार नव्हते. म्हणून राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांचे विचार डोळ्यासमोर ठेवून नियोजनकारांनी आर्थिक विकासाबाबतचे विविध उपक्रम राबविण्यावर भर देण्याचे ठरविले होते. भारतीय स्वातंत्र्याच्या ६६ वर्षांचा आढावा घेतला असता, आजही देशासमोर वाढत्या लोकसंख्येमुळे विविध प्रश्न निर्माण झाले आहेत. त्यामधील सार्वत्रिक दारिद्र्य व बेरोजगारीचे वाढते प्रमाण हे प्रमुख दोन प्रश्न मानता येतील. १९५०-५१ मध्ये देशाची लोकसंख्या ३६.१ कोटी होती ती २०११ मध्ये १२१.२ कोटी पर्यंत वाढली. या लोकसंख्येमध्ये प्राथमिक क्षेत्रात काम करणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण १९५१ ते २०११ या काळात ७२.१% वरून ५२.५% पर्यंत घटले. तर सेवाक्षेत्रात गुंतलेल्या लोकसंख्येचे प्रमाण याच काळात १७.२% वरून २७.३% पर्यंत वाढले. याच कालावधीत वाढत्या लोकसंख्येबरोबर कर्त्या लोकसंख्येचे प्रमाण सुद्धा वाढत गेले. परिणामी पुरेशा प्रमाणात रोजगार संधी उपलब्ध न झाल्यामुळे बेरोजगार व्यक्तींच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली. आजही देशाच्या ग्रामीण व शहरी भागात पुरेशा प्रमाणात'रोजगार संधी उपलब्ध न झाल्याने बेरोजगारांचे तांडे वाढलेले दिसून येतात. वाढत्या बेरोजगारीचा परिणाम म्हणून भारतीय अर्थव्यवस्थेसमोर अनेक आर्थिक व सामाजिक प्रश्न निर्माण झालेले दिसून येतात. १९९१ नंतरच्या आर्थिक सुधारणा काळात बेरोजगारांच्या वाढत्या संख्येने देशाचे आर्थिक पर्यावरण अधिकच समस्याग्रस्त बनविले आहे. त्यामुळे भारतासारख्या विकसनशील देशात बेरोजगारीच्या प्रश्नाचे गांभीर्य विचारात घेऊन व्यापक व व्यवहारवादी उपाययोजना करणे गरजेचे आहे.

### राज्यघटना व रोजगार विषयक धोरण :

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९४७ ते १९४९ या तीन वर्षाच्या काळात भारतीय अर्थव्यवस्थेचा समग्र अभ्यास करून देशाला दीर्घकाळापर्यंत मार्गदर्शन करेल अशी राज्यघटना तयार केली. भारतीय राज्यघटनेच्या ३९, ४१ व ४३ व्या कलमांनुसार देशातील प्रत्येक नागरिकांना रोजगाराची हमी देण्याची तरतूद केली असून त्याची

कार्यवाही राज्य शासनाने करावयाची आहे. इतकेच नव्हे तर प्रत्येक व्यक्तीच्या काम करण्याच्या हक्कास राजमान्यता देण्यात आली आहे. यादृष्टीने येथे उल्लेख करण्यास अतिशय आनंद वाटतो की, महाराष्ट्र हे देशातील असे पहिले घटकराज्य की, ज्या घटकराज्याने अकुशल कामगारांना कायद्यान्वये रोजगाराची हमी दिली आहे. १९७२ साली महाराष्ट्र शासनाने ही योजना स्वीकारल्यानंतर केंद्र सरकारने जवाहर रोजगार योजना, पंतप्रधान रोजगार योजना, सुशिक्षित बेरोजगारांसाठी योजना, एकात्मिक ग्रामीण विकास योजना व राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजना यासारख्या विविध योजना संपूर्ण देशभरात अमलात आणल्या. भारतात वाढत्या बेरोजगारीच्या संख्येबरोबर रोजगार संधी वाढविण्याच्या दृष्टीने ग्रामीण व शहरी भागात कायदेशीर मार्गाने या योजना कार्यान्वित करण्यात आल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यघटनेत नमूद केलेल्या कलमांनुसार रोजगाराचा हक्क रोजगाराची मागणी करणाऱ्या १००% लोकांना आजही प्राप्त झालेला नाही. म्हणून देशाची राज्यघटना व रोजगार मिळविण्याचा हक्क याबाबत विचारमंथन होणे गरजेचे आहे. देशातील विविध क्षेत्रात कुशल व अकुशल रोजगाराची मागणी करणाऱ्या समाजाचा विचार करणे आवश्यक आहे.

### महाराष्ट्रातील रोजगार हमी योजना:

देशात अकुशल कामगारांना रोजगाराची हमी देणारा कायदा २० डिसेंबर १९७४ रोजी सर्वप्रथम महाराष्ट्र राज्याने संमत केला. तत्पूर्वी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध विचारवंत स्व. वि. स. पागे यांनी सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यातील विसापूर या खेड्यात १९६५ साली प्रायोगिक तत्वावर ही योजना राबवली व त्यानंतर राज्यातील सर्व राजकीय कार्यकर्त्यांसमोर ही योजना सविस्तर मांडली. या योजनेच्या निर्मितीमध्ये महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्व. एस. एम. जोशी, कॉम्रेड दत्ता देशमुख व डॉ. एन. डी. पाटील यांचे योगदान आपणास नाकारता येणार नाही. महाराष्ट्रात सुरू झालेल्या या योजनेला २६ जानेवारी, १९७९ रोजी कायदेशीर अधिष्ठान प्राप्त झाले. तेव्हापासून आजअखेर महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातही योजना अकुशल कामगारांसाठी सुरू आहे. केंद्र सरकारने या योजनेची फलश्रुती विचारात घेऊन १९८९ मध्ये जवाहर रोजगार योजनेया माध्यमातून ही योजना संपूर्ण देशभर राबविण्याचा निर्णय घेतला. यातच महाराष्ट्र रोजगार हमी योजनेचे सामर्थ्य दिसून येते.

महाराष्ट्रातील ग्रामीण भूमीहीन व अल्प-भूधारक लोकांना कामे देण्याची हमी या योजनेत आहे. या योजनेद्वारे राज्यातील अकुशल श्रमिकांच्या सहाय्याने शेती व ग्रामीण विकासाशी संबंधित विविध कामे केली जात आहेत. १८ वर्षांवरील प्रत्येक स्त्री-पुरुषास या योजनेअंतर्गत काम दिले जाते. त्यासाठी कामाची गरज असलेल्या व्यक्तीने ग्रामीण स्तरावर तलाठी किंवा ग्रामसेवकाकडे आपली नोंदणी करावी लागते. या योजनेवर दरवर्षी करण्यात येणाऱ्या एकूण खर्चापैकी ६०% खर्च अकुशल कामगारांसाठी व ४०% खर्च कुशल कामगारांसाठी केला जातो. जिल्हाधिकारी या योजनेचे प्रमुख म्हणून काम पाहतात. या योजनेत काम करणाऱ्या सर्वच स्त्री-पुरुषांना एकाच प्रकारच्या कामासाठी समान वेतन

दिले जाते. रोजगार हमी योजनेत काम करणाऱ्या व्यक्तिस त्याने किमान ७ तास काम केल्याचा मोबदला रोख स्वरूपात व काही अंशी धान्याच्या स्वरूपात दिला जातो. इतकेच नव्हे तर या योजनेत काम करणाऱ्या व्यक्तींना अवजारे, अत्यावश्यक सेवा, स्वच्छतागृहे, विश्रांतीगृहे इत्यादी सुविधा पुरविण्याची तरतूद या योजनेत आहे. अशारितीने ग्रामीण भागात रोजगार निर्मितीस चालना देऊन कुशल व अकुशल श्रमिकांना किमान उत्पन्नाची हमी मिळवून दिली जाते. १९७२-७३ मध्ये या योजनेसाठी महाराष्ट्र सरकारने २.२३ कोटी रुपयांची तरतूद केली होती. ती २०११-१२ मध्ये ३२२.२० कोटी रुपयांपर्यंत वाढली. आतापर्यंत या योजनेअंतर्गत लघू व मध्यम सिंचन प्रकल्प, नाला बंडिंग, बंधारे, खड्डे खोदणे व रस्त्याची कामे करण्यात आली आहेत. या विविध प्रकारच्या कामांची संख्या व त्यावर करण्यात आलेला खर्च आपल्या समोर तक्ता क्र. १ वरून स्पष्ट होईल.

तक्ता क्र. १ मध्ये दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्रात रोजगार हमी योजनेने लाखो कुशल व अकुशल लोकांना आत्तापर्यंत उपजीविकेचे साधन प्राप्त करून दिले. या योजनेत अभिप्रेत असलेली उद्दिष्ट्ये, कामाचे स्वरूप व फलश्रुति विचारात घेता केंद्र सरकारने महाराष्ट्र शासनाचा रोजगार हमी योजना कायदा विचारात घेऊन २००५ पासून राष्ट्रीय स्तरावर राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा संमत केला. त्यामुळे महाराष्ट्राच्या रोजगार हमी योजनेची व्याप्ती ही आता एका राज्यापुरती मर्यादित राहिली नसून ती संपूर्ण देशात विस्तारली आहे.

### राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजना स्वरूप व ध्येये :

देशात केंद्र सरकारने ४ सप्टेंबर २००५ रोजी सरकारने आदेश पत्रान्वये राष्ट्रीय स्तरावर ग्रामीण रोजगार हमी कायदा पास केला.

तक्ता क्र. १

महाराष्ट्रातील रोजगार हमी योजनेची प्रगती

| क्र. | वर्ष | खर्च (कोटी रु.) | रोजगार मनुष्य दिवस (कोटी) |
|---|---|---|---|
| १. | १९७२-७३ | २.२३ | ०.४५ लाख म. दि. |
| २. | १९९०-९१ | २३८.९ | ८.९८ कोटी म. दि. |
| ३. | २००४-०५ | १२५९ | २२.०२ |
| ४. | २००५-०६ | ९८३ | १६.०९ |
| ५. | २००६-०७ | ३५.०९ | ०१.०६ |
| ६. | २००७-०८ | ३८.०० | ०१.०९ |
| ७. | २००८-०९ | १४४.०४ | ०४.१९ |
| ८. | २००९-१० | ३२१.०९ | ०२.७४ |
| ९. | २०१०-११ | २४२.०९ | ०१.२५ |
| १०. | २०११-१२ | ३२२.२० | १३.६६ |

*संदर्भ-महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१२-१३*

हा कायदा जम्मू-काश्मीर या घटक राज्याला वगळून देशातील इतर सर्व घटकराज्यांना लागू करण्यात आला. सुरुवातीला या कायद्याचे स्वरूप ग्रामीण भागातील अकुशल श्रमिकांना शेतीपूरक कामांसाठी शासकीय स्तरावर वर्षातील १०० दिवस रोजगाराची हमी होती. त्यासाठी खेड्यातील ग्रामपंचायत हा घटक आधारभूत मानून ग्रामपंचायतीच्या शिफारसीनुसार रोजगार देण्याची हमी होती. देशाच्या ग्रामीण भागातील विविध जाती-जमातीतील स्त्री-पुरुष अशा प्रकारचा रोजगार मिळविण्यास पात्र होते. २ ऑक्टोबर २००९ पासून या योजनेचे नामकरण ÷÷महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना'' (मनरेगा) असे करण्यात आले. राष्ट्रीय स्तरावर रोजगार पुरविणारी ही जगातील सर्वात मोठी योजना मानली जाते.

## उद्दिष्टे :

२००५ पासून देशात सुरू झालेल्या या राष्ट्रीय रोजगार हमी योजनेची प्रमुख उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

१. देशाच्या ग्रामीण भागात सर्वसमावेशक वृद्धिचे एक महत्त्वपूर्ण साधन म्हणून काम करणे.

२. ग्रामीण भागातील लोकांना स्वेच्छेने रोजगार मिळविण्यासाठी सहभागी करून घेणे.

३. ग्रामीण भारताच्या अवर्षणप्रवण क्षेत्राचा विकास करून पूरनियंत्रणाच्या दृष्टीने योग्य व्यवस्थापन करणे.

४. देशातील सामाजिक दृष्ट्या रोजगारापासून वंचित असलेल्या दुर्बल घटक, अनुसूचित जाती व जमातीतील पुरुष व स्त्रियांना रोजगाराच्या माध्यमातून विकासाची संधी मिळवून देणे.

५. देशात विकेंद्रित नियोजन पद्धतीच्या माध्यमातून दारिद्र्य निवारण व राहणीमानाचा दर्जा सुधारण्याच्या हेतूने ग्रामीण भागातील सक्षम मनुष्यबळ विकसित करणे.

६. पंचायत राज संस्थांच्या माध्यमातून देशाच्या ग्रामीण भागातील, तळागाळातील गरीब व्यक्तींना लोकशाही माध्यमातून सक्षम बनविणे.

७. रोजगाराच्या माध्यमातून शासनाच्या आर्थिक व्यवहारात अधिकाधिक पारदर्शीपणा आणणे.

## योजनेची ठळक वैशिष्ट्ये:

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ही भारतातील ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांना रोजगार मिळवून देणारी महत्त्वपूर्ण योजना आहे. या योजनेची खास वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. ग्रामपंचायतीमध्ये तोंडी किंवा लेखी नोंद करून कामाची मागणी करणाऱ्या अकुशल श्रमिकांना या योजनेत रोजगार देणेची हमी आहे.

२. ग्रामस्तरावर रोजगाराची मागणी केलेल्या व्यक्तीस त्याच्या अर्जाचा विचार करून नोंदणी केल्यानंतर १५ दिवसात विनामूल्य जॉबकार्ड दिले जाते.

३. या योजनेनुसार रोजगार मागणाऱ्या व्यक्तीने रोजगाराचा कालावधी व कामाच्या स्वरूपाची माहिती देणे आवश्यक आहे.

त्यानंतर ग्रामपंचायत संबंधित व्यक्तीस १५ दिवसांच्या आत रोजगार मिळवून देण्याची हमी देते.

४. जर ग्रामपंचायत किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेस संबंधित व्यक्तिला १५ दिवसांच्या आत रोजगार देता आला नाही तर ती व्यक्ती दैनिक बेरोजगार भत्ता मिळविण्यास पात्र ठरते. असा बेरोजगार भत्ता देण्याची जबाबदारी संबंधित घटकराज्यातील राज्य सरकारवर पडते.

५. या योजनेअंतर्गत कामाची मागणी करणाऱ्या व्यक्तिस तो राहात असलेल्या खेड्यापासून ५ कि.मी.च्या आत रोजगार पुरवावा लागतो. ५ कि.मी.पेक्षा जादा अंतर असल्यास वाहतूक व इतर खर्चासाठी १०% जादा वेतन देण्याची तरतूद आहे.

६. १९४८ च्या किमान वेतन कायद्यानुसार या योजनेत काम करणाऱ्या शेतमजुराला किमान ६० रुपये दर दिवशी वेतन देणे आवश्यक आहे असे ठरविण्यात आले आहे. या योजनेनुसार देण्यात येणारे वेतन स्त्री-पुरुषांना समान असून ते दर आठवड्याला देणे बंधनकारक आहे.

७. महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी ग्रामपंचायती, पंचायत समित्या व जिल्हा परिषदा या संस्थांची जबाबदारी महत्त्वपूर्ण मानली जाते.

८. या योजनेत एकूण लाभार्थींपैकी १/३ लाभार्थी स्त्रिया असाव्यात असे नमूद करण्यात आले आहे.

९. योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी देशातील प्रत्येक जिल्ह्यात स्वतंत्रपणे नियोजन करावे. जिल्ह्याच्या गरजा विचारात घेऊन शेती व पायाभूत सुविधा व शेतीपूरक व्यवसाय विविध प्रकारची कामे जिल्हा स्तरावरील समितीने निश्चित करावीत.

१०. या योजनेत अकुशल श्रमिकांना वर्षातून १०० दिवस रोजगार पुरविण्याची हमी सरकारने दिली आहे.

११. देशातील ग्रामीण दारिद्र्य व बेरोजगारी कमी करण्यासाठी ही अत्यंत महत्वाची योजना आहे.

१२. या योजनेतून निर्माण होणाऱ्या कामापैकी ५०% कामाची जबाबदारी ग्रामपंचायत स्तरावर टाकण्यात आली आहे.

१३. मनरेगा योजनेनुसार केलेल्या खर्चाची विभागणी ६०% मजुरीवर व ४०% यंत्रसामग्री व अवजारे यांच्यासाठी करण्यात यावी. योजनेसाठी केल्या जाणाऱ्या अकुशल मजुरांच्यावेतनावरील १००%खर्च केंद्र सरकार मार्फत देण्यात येतो. तर ७५% यंत्रसामग्री व अवजारावरील खर्च केंद्र सरकारकडून केला जातो.

१४. या योजनेचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ग्रामपंचायतीने योजनेद्वारा झालेल्या कामाचे सामाजिक ऑडिट करणे बंधनकारक आहे. त्याचप्रमाणे या योजनेअंतर्गत केलेल्या कामाबाबत अथवा यंत्रणेच्या कार्यवाहीबाबत येणाऱ्या

तक्रारींचे निवारण करावे असे ठरविण्यात आले आहे.

## मनरेगा अंतर्गत करावयाची कामे:

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कायद्यातील तरतुदींनुसार देशाच्या ग्रामीण भागात शेती क्षेत्रात पायाभूत सुविधा व शेतीपूरक उद्योगाशी संबंधित कामांचा समावेश होतो. ही कामे निश्चित करण्याचे अधिकार राज्य सरकार व स्थानिक स्वराज्य संस्थांना देण्यात आले आहेत. योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेने अकुशल श्रमिकांसाठी पुढील कामे सुचविली आहेत.

१. पिण्याच्या पाण्याची सुविधा निर्माण करणे
२. वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन
३. जलसिंचन सुविधा व कालवे निर्मिती
४. जमिनीची धूप थांबविण्यासाठी करावयाची कामे
५. घनकचरा व्यवस्थापनाची कामे
६. गृहबांधणी व्यवस्थापन व बांधकाम साहित्याशी संबंधित कामे
७. विहीर खुदाई
८. खाणकाम व्यवसाय
९. शेती बंधारे व जमीन सपाटीकरण
१०. जलसिंचनाची अत्याधुनिक साधने
११. रस्ते विकास व दुरुस्ती
१२. वीटभट्टी उद्योग.
१३. पाणलोट क्षेत्र विकास.

वरील सर्व कामे ही वैयक्तिक व सार्वजनिक स्वरूपाची असून ही कामे पूर्ण करण्यासाठी प्रत्येक घटकराज्याच्या संबंधित विभागाचे सहकार्य घेवन पर्ण करण्याची तरतद या कायद्यात करण्यात आली आहे.

## मनरेगाची प्रशासन यंत्रणा कार्यवाही:

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची कार्यवाही प्रभावीपणे होण्यासाठी विविध स्तर विचारात घेतले जातात. देशाच्या ग्रामीण भागामधील अकुशल श्रमिकांना रोजगार पुरविणाऱ्या या योजनेची कार्यवाही पुढील टप्प्यानुसार होते.

### १. ग्रामपंचायत स्तर:

राष्ट्रीय स्तरावर रोजगार निर्मिती करण्यासाठी या योजनेच्या ग्रामपंचायत स्तर हा महत्त्वाचा घटक होय. शिवाय या योजनेचे यश हे ग्रामीण स्तरावर योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर अवलंबून आहे. त्यानुसार प्रत्येक ग्रामपंचायतीने ग्रामसभा अथवा प्रभागनिहाय सभा घेऊन योजनेची माहिती जनतेला देऊन कामाची गरज असलेल्या व्यक्तींना संघटित करावे लागते. या योजनेअंतर्गत करावयाच्या एकूण कामांपैकी ५०% कामांची जबाबदारी ग्रामपंचायतीवर सोपविण्यात आली आहे. त्यानुसार खेड्यातील ग्रामपंचायतीने अकुशल श्रमिकांचा रोजगार मागणीचा अर्ज लिहून घेण्यापासून त्याला जॉबकार्ड देऊन रोजगार व वेतन देण्यापर्यंतची सर्व कामे करावी लागतात. सर्वात महत्वाचे म्हणजे ग्रामपंचायत स्तरावर केले जाणारे हे काम व त्याचे रेकॉर्ड व्यवस्थित ठेवणे ही ग्रामपंचायतीची महत्वाची जबाबदारी ठरविण्यात आली आहे. म्हणजेच ग्रामस्तरावर अथवा स्थानिक पातळीवरील रोजगार निर्मितीच्या कार्यात ग्रामसेवक, सरपंच व ग्रामपंचायत सदस्य यांचा सक्रिय सहभाग अत्यावश्यक ठरविण्यात आला आहे.

२. तालुका स्तरः

ग्रामपंचायत व जिल्हा स्तर यांच्यामध्ये समन्वय साधण्यासाठी तालुका स्तर हा अत्यंत महत्त्वाचा घटक मानला जातो. जिल्हा स्तरावरून ग्रामीण रोजगाराच्या विविध कामांची माहिती घेऊन ती ग्रामस्तरापर्यंत पोहोचविणे व तिच्यावर देखरेख ठेवणे हे महत्त्वाचे कार्य या स्तरावर पार पाडले जाते. हे कार्य अधिक प्रभावी व्हावे यांसाठी तालुका स्तरावर स्वतंत्र कार्यक्रम अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात यावी व त्याचे वेतन राज्य सरकारच्या निधीतून देण्यात यावे. तालुका स्तरावर काम करणाऱ्या या अधिकाऱ्याने ग्रामपंचायत पातळीवर कामाची मागणी करणाऱ्या लोकांना १५ दिवसाच्या आत रोजगार पुरविण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी लागते. तालुका स्तरावर तयार केलेल्या कामाचा आराखडा जिल्हा नियोजन समितीसमोर ठेवावा लागतो. तालुक्यात प्रतीवर्षी केल्या जाणाऱ्या कामावर नियंत्रण ठेवणे, कामाची पाहणी करणे आणि श्रमिकांच्या नियमित वेतनाची व्यवस्था करणे ही कामे तालुका स्तरावरील कार्यक्रम अधिकाऱ्यास करावी लागतात. इतकेच नव्हे तर या योजनेच्या अंमलबजावणीमध्ये येणाऱ्या तक्रारींचे निवारण तक्रारदाराने तक्रार केल्यापासून सात दिवसाच्या आत करणे गरजेचे असते. तालुका स्तरावरील कार्यक्रम अधिकारी हा जिल्हा स्तरावरील समन्वयकाच्या कामकाज व नियोजनास जबाबदार असतो. मनरेगा कायद्यातील कलम २५ अन्वये तालुका स्तरावरील कार्यक्रम अधिकाऱ्याची भूमिका महत्वाची मानली जाते.

३. जिल्हा स्तर :

जिल्हा स्तरावरील यंत्रणा ही तालुका स्तरावरील कार्यक्रम अधिकाऱ्याकडून आलेल्या वार्षिक योजनेची अंमलबजावणी करणारी प्रभावी यंत्रणा असते. या कायद्यातील २५ व्या कलमानुसार पूर्ण वेळ जिल्हा कार्यक्रम समन्वयकाची नियुक्ती करण्याची जबाबदारी राज्य सरकारवर टाकण्यात आलेली आहे. हे काम जिल्ह्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा जिल्हाधिकारी आपल्या जबाबदारीवर करू शकतात. तथापि, योजनेची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी जिल्हा नियोजन समितीतील प्रमुख घटकावर टाकण्यात आलेली आहे. म्हणजेच जिल्हाधिकारी व पुरवठा कार्यकारी अधिकारी आपल्या कार्यालयावरील या यंत्रणेने तालुका व ग्रामस्तराकडून आलेल्या विविध प्रकारच्या कामांचे परीक्षण करून प्राधान्यक्रमाने कामे निश्चित करावयाची असतात. ही कामे नियोजित वेळेत होण्यासाठी सातत्याने नियंत्रण व पर्यवेक्षण करावे लागते. जिल्हा यंत्रणेने या योजनेअंतर्गत दरमहा झालेल्या कामाचा अहवाल राज्य सरकारला कळवावा लागतो. योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी या योजनेशी संबंधित सर्व घटकांमध्ये समन्वय साधून काम करावे लागते. जिल्हा स्तरावर योजनेद्वारे पूर्ण करण्यात येणाऱ्या प्रकल्पांवर देखरेख ठेवण्यासाठी प्रकल्प अधिकाऱ्याची नियुक्ती करून ग्रामपंचायतीशी संबंधित कामाचा पाठपुरावा करावा लागतो. जिल्हा स्तरावरील यंत्रणेला योजनेची अंमलबजावणी करताना येणाऱ्या तक्रारींचे निवारण देखील करावे लागते.

४. राज्यस्तर :

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण हमी योजनेची अंमलबजावणी प्रत्येक घटक राज्यावर

टाकण्यात आली आहे. त्यासाठी देशातील प्रत्येक घटकराज्यात राज्य रोजगार हमी मंडळ (SEGC) निर्माण करण्यात आले असून हे मंडळ राज्य सरकारांना योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मार्गदर्शन करते. त्याचप्रमाणे राज्यात योजनेच्या अंमलबजावणीचे मूल्यमापन व देखरेख करण्याबाबत सूचना देते. याशिवाय केंद्र सरकारला राज्यातील विविध कामांचा अहवाल सादर करण्याबाबत सूचना देते.

राज्य पातळीवर राज्य सरकारांना कायद्यातील ३२ (१) नुसार कार्यप्रणाली ठरविण्याचे अधिकार आहेत. त्यानुसार राज्य सरकारवर ÷राज्य रोजगार हमी मंडळ' स्थापन करून त्यामध्ये उच्च गुणवत्तेच्या सभासदांची नियुक्ती करते. राज्यात योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी रोजगार हमी निधीची स्थापना करून त्यातून प्रत्येक जिल्ह्याला निधी वाटप करण्याचे कार्य राज्य सरकारला करावे लागते. त्यासाठी सरकारला जिल्हास्तरावर निस्वार्थी (Dedicated) सेवकांची नियुक्ती करणे गरजेचे असते. राज्यात या योजनेअंतर्गत कामे पूर्ण करताना राज्य सरकार प्रसंगी जिल्हा स्तरावरील समन्वयकास व कार्यक्रम अधिकाऱ्यास वित्तीय व प्रशासकीय अधिकार प्रदान करते. शिवाय राज्यात करण्यात येणाऱ्या विविध कामांमध्ये तांत्रिक मदत पुरवून गुणवत्तापूर्ण कामे होण्यासाठी मदत करते. थोडक्यात, देशातील प्रत्येक राज्य सरकारला आपापल्या घटक राज्यात ही योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी पारदर्शी दृष्टिकोनातून विविध टप्प्यांवर काम करावे लागते. या दृष्टीने महाराष्ट्रात मनरेगा योजनेची कार्यवाही व प्रशासन व्यवस्था सरकारने चांगल्या पद्धतीने केली आहे.

५. राष्ट्रीय स्तरावरील यंत्रणा :

भारत सरकारच्या केंद्रीय ग्रामीण विकास यंत्रणेच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय स्तरावर ÷÷केंद्रीय रोजगार हमी मंडळ'' कार्य करते. हे मंडळ राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायद्यातील सर्व तरतुदींचे पालन करून राज्यस्तरावरील यंत्रणांच्या कामावर नियंत्रण ठेवून रोजगार संधीच्या कामांचे मूल्यमापन करते. त्याचप्रमाणे या योजनेच्या कार्यवाहीत येणाऱ्या अडचणी व तक्रारींचे निवारण वेळोवेळी करण्याचे बंधन मंडळावर आहे. या योजनेच्या अंमलबजावणीतून प्राप्त होणारे निष्कर्ष वार्षिक अहवालाच्या स्वरुपात केंद्र सरकारला लोकसभेत सादर करण्यासंबंधी कार्यवाही करावी लागते.

केंद्रीय पातळीवर कार्य करणाऱ्या या मंडळाला ग्रामीण विकास मंत्रालयाचे सहकार्य घेता येते. अलिकडच्या काळात ग्रामीण विकास मंत्रालय मनरेगा योजनेअंतर्गत देशभर सुरू असलेल्या वेगवेगळ्या कामांचा सातत्याने आढावा घेत असते. त्यासाठी ग्रामीण विकास मंत्रालयामार्फत राष्ट्रीय स्तरावर रोजगार हमी मंडळ व रोजगार हमी निधी निर्माण करण्यात आला असून त्यावर राष्ट्रीय व्यवस्थापन मंडळ कार्यरत आहे. केंद्रीय पातळीवरील मनरेगा योजनेसाठी अंदाजपत्रकीय तरतूद करून वेळोवेळी ती राज्यामध्ये वाटण्याचे काम केंद्रीय मंडळांना करावे लागते. योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी माहिती तंत्रज्ञानाच्या साधनांचा वापर करण्याची मुभा कायद्याने मंडळाला देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे ही योजना अधिकाधिक प्रगती पथावर नेण्यासाठी तिच्यात नाविन्यपूर्ण बदल करून

वेळोवेळी योजनेचे मूल्यमापन करावे अशी ÷मनरेगा' कायद्यातील तरतूद केंद्रीय रोजगार हमी मंडळावर टाकण्यात आली आहे.

अशा प्रकारे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना संपूर्ण देशभर राबविण्यासाठी ग्रामस्तरापासून राष्ट्रीय स्तरापर्यंत विविध प्रकारच्या यंत्रणेद्वारा कार्यरत आहेत. ही योजना अधिकाधिक पारदर्शी व रोजगारभिमुख होण्यासाठी योजनेशी येतो घटकांना त्या-त्या स्तरावर स्वातंत्र्य देऊन त्यांचा सहभाग वाढविण्यात येतो. थोडक्यात, या योजनेची अंमलबजावणी करणारी यंत्रणा सक्षम बनविण्याचा केंद्राचा दृष्टिकोन नेहमीच आढळून येतो.

मनरेगाची प्रगती:

भारतात २००५ मध्ये मनरेगा कायदा पास करण्यात आला. २००६-०७ पासून या योजनेची कार्यवाही प्रभावीपणे सुरू झाली. देशाच्या ग्रामीण भागातील अकुशल श्रमिकांच्या सहाय्याने शेती व ग्रामीण विकासाशी संबंधित विविध प्रकारची कामे हाती घेऊन या योजनेमार्फत पूर्ण करण्यात आली. २००६-०७ पासून या योजनेची झालेली प्रगती पुढील प्रमाणे दर्शविता येईल.

१. सन २००६-०७ ते २०१२-१३ या काळात योजनेचा अंतर्भाव झालेल्या जिल्ह्यांची संख्या ३२१ वरून ६२६ पर्यंत वाढली. याच काळात या योजनेच्या लाभार्थींना वाटप केलेल्या जॉब कार्डची संख्या ३.७९ कोटी वरून १७.३८ कोटीपर्यंत वाढली.

२. सन २००६-०७ ते २०१२-१३ या कालावधीत मनरेगा योजनेअंतर्गत निर्माण झालेली रोजगारनिर्मिती ९०.५० कोटी मनुष्य दिवसावरून १५५.६० कोटी मनुष्य दिवसापर्यंत वाढली. म्हणजेच ही योजना रोजगार निर्मितीच्या दृष्टीने ग्रामीण भागात फलदायी ठरली आहे.

३. या योजनेचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे या योजनेअंतर्गत निर्माण झालेल्या विविध कामातून अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीतील व्यक्तींना मिळालेल्या रोजगारात वाढ दिसून आली. विशेषत: स्त्रियांना मिळालेल्या रोजगाराचे प्रमाण एकूण रोजगारामध्ये महत्त्वपूर्ण ठरले.

४. सन २००६-०७ ते २०१२-१३ या काळात मनरेगा योजनेअंतर्गत उपलब्ध केलेल्या विविध प्रकारच्या कामावरील खर्चात ८८२३ कोटी रुपयांवरून ३३६७५ कोटी रुपयांपर्यंत वाढ झाली. या खर्चापैकी श्रमिकांच्या वेतनावर होणारा खर्च ५० ते ६०% इतका राहिल्याचा दिसून येतो. तर साधनसामग्रीवर झालेला खर्च सुमारे ४०% इतका झाल्याचा दिसून येतो. थोडक्यात, भारतासारख्या विकसनशील देशात ग्रामीण भागात रोजगारनिर्मिती करताना अनेक चांगल्या बाबी स्पष्ट झाल्या आहेत.

## रोजगार संधीचे राज्यनिहाय स्वरूप:

भारत हा एक खंडप्राय देश आहे. देशाच्या वाढत्या लोकसंख्येबरोबर ग्रामीण व शहरी भागातील बेरोजगारीचे प्रमाण नियोजन काळात सातत्याने वाढत गेले. त्यामुळे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती करण्याची गरज स्वातंत्र्योत्तर काळात निर्माण झाली. मनरेगा योजनेने सन २००६-०७ पासून देशातील प्रत्येक

तक्ता क्र. २

मनरेगा योजनेअंतर्गत निर्माण झालेल्या रोजगार संधीचे राज्यनिहाय स्वरूप

| क्र. | घटक राज्ये | कौटुंबिक सरासरी एकूण रोजगार दिवस |
|---|---|---|
| १. | आंध्रप्रदेश | ३६२ |
| २. | अरुणाचल प्रदेश | २२७ |
| ३. | आसाम | २७२ |
| ४. | बिहार | २४२ |
| ५. | छत्तीसगड | ३५७ |
| ६. | गुजरात | २६१ |
| ७. | हरियाणा | २९४ |
| ८. | हिमाचल प्रदेश | ३२६ |
| ९. | जम्मू आणि काश्मीर | २७२ |
| १०. | झारखंड | ३०३ |
| ११. | कर्नाटक | २९० |
| १२. | केरळ | २३९ |
| १३. | मध्य प्रदेश | ३७९ |
| १४. | महाराष्ट्र | ३१९ |
| १५. | मणिपूर | ४५९ |
| १६. | मेघालय | ३०४ |
| १७. | मिझोराम | ४५७ |
| १८. | नागालँड | ४४५ |
| १९. | ओरिसा | २९२ |
| २०. | पंजाब | २२४ |
| २१. | राजस्थान | ४५० |
| २२. | सिक्कीम | ४२३ |
| २३. | तामिळनाडू | ३२८ |
| २४. | त्रिपुरा | ४८१ |
| २५. | उत्तर प्रदेश | ३०२ |
| २६. | उत्तराखंड | २६५ |
| २७. | पश्चिम बंगाल | २०० |
| २८. | गोवा | १०२ |

*Source: 42nd Govt. of India Report of Standing Committee 2013*

घटक राज्यात प्रतिवर्षी सरासरीने कौटुंबिक रोजगार निर्मिती दिवसांमध्ये वाढ केलेली आहे. २००६-०७ ते २०१२-१३ या कालावधीत भारतातील वेगवेगळ्या घटकराज्यात मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती झाली हे तक्ता क्र.२ वरून स्पष्ट होते. भारतात मनरेगा योजनेची अंमलबजावणी सुरू झाल्यापासून एकमेव मणिपूर घटक राज्य वगळता कोणत्याही घटक राज्याने वर्षातील १०० दिवस रोजगार पुरविलेला नाही. या योजनेची अंमलबजावणी मणिपूर, मिझोराम, नागालँड, राजस्थान, सिक्कीम व त्रिपुरा या घटकराज्यांमध्ये तुलनेने जास्त आहे. मात्र उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, मध्यप्रदेश, कर्नाटक, बिहार, झारखंड, आसाम या घटक राज्यातील न्युनतम स्तरावर जीवन जगणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण मोठे असूनही मनरेगा योजनेमार्फत त्यांना पुरेसा रोजगार मिळू शकलेला नाही. वरील घटक राज्यांखेरीज केंद्रशासित प्रदेशातसुद्धा अंमलबजावणी प्रभावीपणे करणे गरजेचे आहे.

**मनरेगा योजनेअंतर्गत निधीचे वाटप व प्रत्यक्ष वापराची स्थिती :**

महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत २००६-०७ पासून केंद्रसरकार मार्फत मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्यात आला. या निधीचे वाटपही विविध राज्यांमध्ये करण्यात आले. देशातील ग्रामीण भागातील गरजू कुटुंबांना वर्षातील १०० दिवस रोजगार मिळवून देणारी ही योजना केंद्रीयस्तरापासून जिल्हा स्तरापर्यंत विकसित झाली. 'केंद्राने या योजनेसाठी उपलब्ध निधी, योजनेवर झालेला खर्च व खर्ची न पडलेला निधी या बाबतची स्थिती तक्ता क्रमांक ३ वरून स्पष्ट केले.

तक्ता क्रमांक ३ वरून पुढील बाबी स्पष्ट होतात.

अ) केंद्राने या योजनेकरिता राज्यासाठी मंजूर

तक्ता क्र. ३

निधी वाटप व प्रत्यक्ष वापर

| वर्ष | केंद्राने मंजूर केलेला निधी (कोटी रु.) | एकण उपलब्ध झालेला निधी (कोटी रु.) | एकूण खर्च (कोटी रु.) | खर्च न झालेला निधी (कोटी रु.) | खर्च न झालेल्या निधीचे एकूण उपलब्ध निधीशी प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| २००६-०७ | ८२६४ | १२०७४ | ८८२३ | ३२५० | २७% |
| २००७-०८ | १२६१० | १९३४० | १५८५७ | ३४८३ | १८% |
| २००८-०९ | २९९४० | ३७३९७ | २७२५० | १०१४७ | २७% |
| २००९-१० | ३३५०७ | ४५५१९ | ३७९०५ | ११६७४ | २४% |
| २०१०-११ | ३५७६८ | ५४१७२ | ३९३७७ | १४७९५ | २७% |
| २०११-१२ | २९११० | ४८८३२ | ३८०३५ | १०७९८ | २२% |
| २०१२-१३ | ३१०७३ | ५०१४७ | ३३६८९ | १६४५८ | ३३% |
| एकूण | १८०३५२ | २७१४८१ | २००१३६ | ७०६०५ | २६% |

*Source-42nd Govt. of India Report of Standing Committee 2013*

केलेल्या निधीत २०११-१२ हे वर्ष वगळता सातत्याने वाढ झाली आहे. हिच स्थिती एकूण उपलब्ध निधीच्या बाबतीत आढळते. मनरेगा योजनेवर सन २००६-०७ पासून २०१०-११ पर्यंत ८८२३ कोटी रुपयांवरून ३९३७७ कोटी रुपयांपर्यंत वाढला व नंतर २०१२-१३ मध्ये ३३६८९ कोटी रुपयांपर्यंत कमी झाला.

ब) या योजनेसाठी उपलब्ध झालेल्या निधीपैकी खर्च न झालेल्या निधीमध्ये ३२५० कोटी रुपयांवरून १६४५८ कोटी रुपयांपर्यंत वाढ झालेली दिसून येते. म्हणजेच खर्च न झालेल्या निधीचे एकूण उपलब्ध निधीशी असलेले शेकडा प्रमाण गेल्या सात वर्षात सरासरी २६% इतके होते.

क) या योजनेसाठी उपलब्ध झालेल्या निधीचा देशातील सर्व घटकराज्यांनी पुरेपूर वापर केला तर देशातील आणखी शेकडो कुटुंबांना रोजगार संधी उपलब्ध होतील असे वाटते.

## मनरेगा योजनेअंतर्गत स्त्रियांना मिळालेला रोजगार:

मनरेगा योजनेच्या मसुद्यात स्त्रियांसाठी १/३ रोजगार प्राधान्यक्रमाने उपलब्ध करून द्यावा व त्यानुसार कार्यवाही करावी. भारत सरकारच्या स्थायी समितीने २०१२-१३ मध्ये प्रसिद्ध केलेल्या अहवालानुसार या योजनेतून स्त्रियांना देण्यात येणारा रोजगार २००६-०७ मध्ये ३६.४० कोटी मनुष्य दिवस इतका होता. तो ३१-०३-२०१३ रोजी ७७. ७३ कोटी मनुष्य दिवस इतका होता. तो ३१-०३-२०१३ रोजी ७७. ७३ कोटी मनुष्य दिवसांपर्यंत वाढला म्हणजेच योजनेच्या कायद्यात स्त्रियांसाठी निश्चित केलेला प्रमाण २००६-०७ पासूनच शासनाने पूर्ण केलेला दिसून येते.सध्या या योजनेतून उपलब्ध होणाऱ्या एकूण रोजारापैकी सुमारे ५०% रोजगार स्त्रियांना उपलब्ध करून दिला जातो.

## मनरेगा योजनेसमोरील आव्हाने :

मनरेगा ही भारतातील ग्रामीण रोजगार पुरविणारी सर्वात मोठी योजना आहे. देशात २००५ पासून या योजनेची अंमलबजावणी सुरू झाली.गेल्या सात वर्षातील या योजनेच्या कामाचा आढावा घेतला असता खंडप्राय असलेल्या आपल्या देशात ही योजना राबवीत असताना अनेक समस्या निर्माण झाल्याचे दिसून येते. या समस्यांचा विचार करून त्या आव्हाने म्हणून स्वीकारणे आवश्यक आहे.ही योजना अधिक प्रभावीपणे देशात राबविण्यासाठी या योजनेसमोरील विविध आव्हाने विचारात घेणे आवश्यक ठरते. येथे एका गोष्टीचा प्रकर्षाने उल्लेख करणे आवश्यक ठरते ती म्हणजे मनरेगा योजनेच्या कामकाजाचा आढावा देशातील विविध चार प्रमुख समित्यांनी २०१३ मध्ये घेतला आहे. त्यामध्ये फेब्रुवारी २०१३ मध्ये भारत सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रायलाने तयार केलेला अहवाल, नियोजन मंडळाने तयार केलेला अहवाल, ग्रामीण विकास मंत्रालयाने तयार केलेला योजनेच्या कार्यप्रणालीचा अहवाल व एप्रिल २०१३ या कॅगचा अहवाल (CAG) (Controled and Auditor General of India) यांचा समावेश होतो. या सर्व समित्यांचे अहवाल विचारात घेतले असता मनरेगा योजनेसमोर दोन प्रकारची आव्हाने आहेत.

त्यामध्ये योजनेच्या अंमलबजावणीबाबत शासनासमोर असलेल्या आव्हानांचा समावेश होतो. तर दुसऱ्या प्रकारचे आव्हान या योजनेच्या अंमलबजावणीच्या सार्वत्रिकतेशी संबंधित आहे.

१) सदोष नियोजन व प्रशासन:

भारतातील केंद्र व राज्य सरकारांनी एप्रिल २०११ मध्ये मनरेगा योजनेच्या अंमलबजावणी बाबतच्या कामगिरीचा आढावा घेतला असता असे दिसून येते की, या योजनेच्या अंमलबजावणीत पंचायत राज्य संस्थांचे व्यवस्थापन सदोष आहे. पश्चिम बंगाल व कर्नाटक या राज्यांमध्ये या योजनेची अंमलबजावणी नियोजनबद्धरीत्या करण्यासाठी सुव्यवस्थित असा कार्यक्रम आखलेला नव्हता. असा कॅगने शेरा मारलेला आहे. त्याचप्रमाणे ही योजना संपूर्ण देशभरात व विकेंद्रीत स्वरूपात राबविण्यासाठी प्रशासकीय पातळीवर ग्रामपंचायती असमर्थ ठरल्या आहेत. त्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत गरीब लोकांना जास्तीत जास्त रोजगार मिळवून देण्यासाठी राज्य सरकारने प्रभावी यंत्रणा उभारून नियोजन करावे.

२) जाणीव जागृतीचा अभाव:

मनरेगा योजनेची संपूर्ण माहिती भारताच्या ग्रामीण समाजापर्यंत पोहोचलेली नाही. या योजनेअंतर्गत वर्षातील १०० दिवसांच्या रोजगाराची हमी, जॉबकार्डची तांत्रिक पूर्तता, किमान वेतनदर, बेरोजगार भत्ता इत्यादी तरतूदींबाबत पंचायत समित्या, गटविकास अधिकारी व बेरोजगारांना पुरेशी माहिती नाही. इतकेच नव्हे तर सरकारी पातळीवर रोजगार व बेरोजगार भत्ता यांची अंमलबजावणी करताना होणारा भ्रष्टाचार कसा कमी करायचा हे या योजनेसमोरील महत्त्वाचे आव्हान आहे. म्हणजेच मनरेगा योजनेचे खरे सामर्थ्य नियोजनकारांना उमगलेले नाही.

३) योजनेच्या अंमलबजावणीतील भेदनीती:

मनरेगा योजना ही ग्रामीण भागातील लोकांना जात-धर्म किंवा लिंग भेदाचा विचार न करता रोजगार मिळवून देणारी महत्वाची योजना मानली जाते. स्त्री व पुरुष कामगारांना समान वेतन हे या योजनेचे ठळक वैशिष्ट्य आहे. तथापि गेल्या काही वर्षात या योजनेच्या अंमलबजावणीत जात व लिंगभेदाच्या आधारावर रोजगार दिला जातो. अशा घटना देशाच्या काही भागात घडत आहेत. केरळ व आंध्रप्रदेश या राज्यांनी या योजनेत स्त्री कामगारांची मोठ्या प्रमाणात नोंदणी केलेली आहे. इतर राज्यात हे प्रमाण तुलनेने कमी आहे. त्याच बरोबर काही घटकराज्यांनी या योजनेत स्त्री कामगारांची संख्या कमी करण्यासाठी त्यांना जॉबकार्ड उपलब्ध करून दिलेली नाहीत. त्याचबरोबर स्त्री कामगारांना कामाच्या ठिकाणी पिण्याची पाण्याची सोय, पाळणाघरे इत्यादी सुविधा उपलब्ध करून दिलेल्या नाहीत. त्यामुळे स्त्री-पुरुष कामगारांच्या बाबतीत केली जाणारी ही भेदनीती दूर होणे आवश्यक आहे.

४) भांडवली साधनसामग्रीचे निर्मिती आव्हान :

मनरेगा योजनेअंतर्गत विविध कामांची अंमलबजावणी करताना पावसाच्या पाण्याचे संवर्धन, कॅनॉल निर्मिती व शेततळे या

उपक्रमांवर भर दिला जातो. त्याचबरोबर केंद्र व राज्य सरकारने ही योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी जंगल विकास कार्यक्रमांची विविध कामे हाती घेणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे ग्रामीण भागात सांडपाणी व्यवस्थापनाचा कार्यक्रम हाती घेतल्यास ते ग्रामीण आरोग्याच्या दृष्टीने अधिक महत्वाचे ठरेल. मनरेगा योजनेचे यश हे केवळ रोजगार निर्मितीवर अवलूंन नसून ते कायमस्वरूपी भांडवली साधनसामग्रीच्या निर्मितीवर अवलंबून आहे. देशाच्या शाश्वत विकासासाठी या योजनेअंतर्गत राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांत विविधता हवी.

५) वेतन अदा करण्यातील विलंब:

मनरेगा कायद्यातील तरतुदीनुसार काम पूर्ण झाल्यानंतर १४ दिवसांच्या आत कामगारांना वेतन देणे बंधनकारक आहे. तथापि विविध समित्यांनी केलेल्या पहाणीनुसार असे आढळून येते की, काही आठवडे व महिन्यानंतरसुद्धा मजुरांचे वेतन त्यांच्या खात्यात जमा झालेले नव्हते. बऱ्याच वेळा नियोजित प्रकल्पाची अंमलबजावणी वेळेवर न झाल्याने निधीच्या टंचाईतून हा प्रश्न निर्माण झाल्याचे आढळून येते. त्यासाठी राजस्थानसारख्या घटक राज्यात स्वतंत्र तक्रार निवारण व्यवस्था निर्माण करणे आवश्यक आहे.

६)निधीचा सदोष वापर:

सन २००६-०७ मध्ये मनरेगा योजना १२०७४ कोटी रुपयांच्या निधीने सुरू झाली. २०१२-१३ मध्ये हा खर्च ५०१४७ कोटी रुपयांपर्यंत वाढला. या खर्चाची विभागणी वेतन व भांडवली मालमत्ता यावर अनुक्रमे ६०% व ४०% अशी ठरविली असतानाही प्रत्यक्षात वेतनावरील खर्च एकूण खर्चाच्या ७३% पर्यंत वाढला. त्यामुळे चलनवाढीचा प्रश्न निर्माण झालेला दिसून येतो, ही बाब नियोजनकारांनी लक्षात घेणे गरजेचे आहे.

७) वेतनदर व भाववाढीचा प्रश्न:

बहुसंख्य अर्थशास्त्रज्ञांच्या मते भारतातील शेतीक्षेत्रात मजुरांची टंचाई, 'अन्नधान्यांच्या किंमतीचा प्रश्न व सर्वसाधारण भाववाढ इत्यादी प्रश्न मनरेगामुळे निर्माण झालेले आहेत. या योजनेच्या अंमलबजावणीमुळे ग्रामीण भागातील शेतमजुरांचे स्थलांतर कमी झाले असले तरी शेतमजुरांच्या टंचाईमुळे शेतीसाठी लागणाऱ्या आदानांच्या किंमतीत वाढ होवून शेतीचा उत्पादन खर्च व अन्नधान्याच्या किंमतीत वाढ झाली. यावर उपाय म्हणून पंजाब व हरियाणा या घटकराज्यांनी शेतमजुरांचे वेतनदर वाढविले. ही बाब भारतातील सर्वसाधारण भाववाढीस कारणीभूत ठरली आहे. त्यामुळे मनरेगा योजनेची अंमलबजावणी करताना ग्रामीण भागातील शेती व्यवसायात मजुरांची टंचाई निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावयास हवी.

८) भ्रष्टाचार व अनियमितता:

भारतात राबविण्यात येणाऱ्या सर्व शासकीय योजनांप्रमाणे या योजनेतही भ्रष्टाचार

झाल्याची अनेक उदाहरणे समित्यांच्या पाहणीत आली. हा भ्रष्टाचार मुख्यत्वे रोजंदारीच्या मस्टरमध्ये अनधिकृत नावे नोंदवून जॉबकार्डच्या नोंदणीत व वेतन वाटपामध्ये झाल्याचे आढळून येते. बहुसंख्य घटकराज्यात जॉबकार्ड वितरीत केलेल्यांची संख्या व प्रत्यक्षात योजनेअंतर्गत पुरविलेल्या रोजगार यांच्यामध्ये मोठी तफावत आढळून येते. मध्यप्रदेशसारख्या घटकराज्याने राज्यातील कुटुंबाच्या संख्येपेक्षा अधिक संख्येने जॉबकार्ड वितरीत केली. मात्र त्यातील फक्त १/३ ग्रामीण कुटुंबात प्रत्यक्ष रोजगार उपलब्ध झाला. थोडक्यात, या योजनेच्या अंमलबजावणीत अनेक दोष निर्माण झाल्यामुळे व भ्रष्टाचारामुळे योजनेचे अपयश स्पष्ट झाले.

निष्कर्ष :

भारतात महाराष्ट्र घटकराज्याने सन १९७२-७३ पासून ग्रामीण भागातील अकुशल श्रमिकांना रोजगार मिळवून देणारी ÷हमी योजना' सुरू केली. या योजनेने महाराष्ट्रात रोजगार निर्मितीबरोबर ग्रामीण भागात पायाभूत सुविधांची निर्मिती करण्यासाठी कोट्यावधी लोकांना उदरनिर्वाहाचे साधन प्राप्त करून दिले. या योजनेचे यशापयश विचारात घेऊनच २००५ नंतर राष्ट्रीय रोजगार हमी योजनेत तिचे रूपांतर करण्यात आले. भारतासारख्या खंडप्राय देशात विस्तृत प्रमाणात रोजगार संधी उपलब्ध करून देणारी ही योजना सध्या ÷÷महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण हमी रोजगार योजना'' या नावाने कार्यरत आहे. या योजनेचे सुधारित स्वरूप व व्यवस्थापन विचारात घेता आपणास अनेक बाबी लक्षात येतात. निष्कर्षरूपाने त्या पुढीलप्रमाणे मांडता येतील.

१. देशात वाढत्या बेरोजगारीमुळे आर्थिक व सामाजिक पर्यावरण बिघडलेले आहे. ते दुरूस्त करण्यासाठी महात्मा गांधी रोजगार हमी योजनेची आवश्यकता आहे.

२. देशातील कुशल श्रमिकांबरोबर अकुशल श्रमिकांनासुद्धा रोजगाराची संधी उपलब्ध करून देणारी ही अतिशय महत्त्वपूर्ण योजना आहे.

३. महाराष्ट्रातील रोजगार हमी योजनेसाठी सरकारचा होणारा खर्च हा सन २००३-०४ मध्ये १०५१ कोटी रु. होता. त्यापासून १८.५ कोटी रोजगार दिवस निर्माण झाले होते.मात्र हा खर्च २०१०-११ मध्ये केवळ २४२.३४ कोटी इतका होता. त्यापासून १.२५ कोटी रोजगार दिवस निर्माण झाला. याचाच अर्थ या योजनेसाठी सरकारकडून होणारा खर्च सातत्याने कमी होत आहे.

४. सन २००६ पासून भारतात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण हमी योजना या नावाने रोजगारविषयक कार्यक्रम राबविले जातात. या योजनेअंतर्गत ग्रामीण भागात शेती, शेतीपूरक उद्योग, पायाभूत सुविधा इत्यादींचा विकास करून ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास साधला जात आहे.

५. ÷मनरेगा' ही योजना ग्रामीण स्तरापासून ते राष्ट्रीय स्तरापर्यंत यशस्वीपणे राबविण्यासाठी वेगवेगळी यंत्रणा उभारल्यामुळे ही योजना अधिक पारदर्शी व आर्थिक विकासाच्या

दृष्टिकोनातून महत्त्वपूर्ण बनेल.

६. ÷मनरेगा' योजनेत सन २००६-०७ मध्ये ३२१ जिल्हे समाविष्ट होते. मात्र सन २०१२-१३ मध्ये ६२६ जिल्ह्यांमध्ये या योजनेची अंमलबजावणी करण्यात आली. याचाच अर्थ ही योजना सर्वसमावेशक बनत आहे.

७. राष्ट्रीय स्तरावर ÷मनरेगा' योजनेवर सरकारकडून होणारा खर्च सन २००६-०७ मध्ये ८८२३ कोटी रु. होता तो वाढून सन २०१२-१३ मध्ये तो ३३६८९ कोटी रु. इतका झाला. याचाच अर्थ सरकारकडून होणारा खर्च वाढत असल्याचे दिसून येते.

८. महाराष्ट्र, कर्नाटक, मध्यप्रदेश, बिहार, आसाम, झारखंड या राज्यात न्यूनतम स्तरावर जीवन जगणाऱ्या लोकांचे प्रमाण जास्त आहे. मात्र तेथे ÷मनरेगा' योजनेमार्फत पुरेसा रोजगार मिळालेला नाही. तो मिळणे आवश्यक आहे.

९. ÷मनरेगा' योजनेअंतर्गत जलसंधारण व व्यवस्थापनाशी संबंधित कामे मोठ्या प्रमाणात झालेली आहेत. २००६-०७ ते २०१२-१३ या कालावधीत पूर्ण झालेली कामे ३८३९६३४ इतकी होती.

१०. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण हमी रोजगार योजनेस उपलब्ध झालेली निधीचे एकूण खर्चाशी असलेले प्रमाण विचारात घेता असे दिसून येते की, खर्च न झालेल्या निधी सन २००६-०७ पासून २०१२-१३ पर्यंत ३२५० कोटी रुपयांवरून १६४५८ कोटी रुपयांपर्यंत वाढलेला आहे. ही बाब भारतासारख्या ग्रामीण व शहरी भागातील मोठ्या प्रमाणात बेरोजगार असलेल्या देशास भूषणावह नाही.

११. ÷मनरेगा' योजनेअंतर्गत देशातील पुरुषाबरोबर स्त्रियांनासुद्धा रोजगार उपलब्ध करून देण्यास प्राधान्य देण्यात आले आहे. ३१ मार्च २०१३ पर्यंत ७७.७३ कोटी मनुष्य दिवस रोजगार स्त्रियांच्यासाठी उपलब्ध केलेला आहे.

१२. ÷मनरेगा' योजनेची देशात अंमलबजावणी करीत असताना अनेक दोष निर्माण झालेले दिसून येतात. यामध्ये बहुतांशी त्रुटी या शासकीय स्तरावर सदोष नियोजन व प्रशासन व्यवस्था, स्त्री-पुरुष कामगारांच्या बाबतीत केला जाणारा भेद, नियोजित वेळेत व वेतन अदा करण्यास होणारा विलंब व वाढत्या महागाईचा वेतन निश्चितीशी न जोडलेला संबंध आणि भ्रष्टाचार यांचा समावेश करता येईल. महात्मा गांधीजींना अभिप्रेत असणाऱ्या खेड्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी शासकीय स्तरावर या उणीवा दूर होण्याची आवश्यकता आहे.

१३. ÷मनरेगा' योजनेअंतर्गत गेल्या काही वर्षात निर्माण करण्यात आलेली कामे ही प्रामुख्याने शेती व ग्रामीण विकासाशी संबंधित आहेत. त्यामुळे या योजनेचा लाभ ग्रामीण भागातील लाखो लोकांना होत आहे.

१४. ही योजना देशांतील ग्रामीण व शहरी भागातील कुशल व अकुशल लोकांना रोजगार मिळवून देणारी महत्त्वपूर्ण योजना

आहे. त्याचप्रमाणे या योजनेत ग्रामपंचायतींना सहभाग ५०% असल्यामुळे व योजनेची प्रशासनव्यवस्था लोकशाही स्वरूपाची असल्याने तिचे लाभ देशातील दुर्बल घटकांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न केला जात आहे. लोकशाही मार्गाने देशात सर्वसमावेशक आर्थिक विकास साध्य करण्यासाठी ही एक महत्त्वपूर्ण योजना मानता येईल.

१५. ÷मनरेगा' योजनेमध्ये ग्रामपंचायतीबरोबर पंचायत समित्या व जिल्हा परिषदा यांचे सक्षमीकरण होण्यास मदत झाली आहे. परिणामी ११ व्या पंचवार्षिक योजनेत अभिप्रेत असलेला सर्वसमावेशक आर्थिक विकास साध्य होण्यास मदत झाली आहे.

१६. भारतात छत्तीसगड, हरियाना, केरळ, मध्यप्रदेश, मणिपूर, महाराष्ट्र, नागालँड, राजस्थान व उत्तरप्रदेश या घटकराज्यात ÷मनरेगा' योजनेमार्फत कौटुंबिक सरासरी रोजगार पातळी भारतील इतर घटकराज्यांच्या तुलनेने अधिक समाधानकारक आहे. त्यामुळे ही योजना जरी राष्ट्रीय स्तरावर जरी राबविली जात असली तरी तिचे लाभार्थी देशातील काही मोजक्या घटकराज्यांमध्येच दिसून येतात. ही बाब शासनाने लक्षात घेणे आवश्यक आहे.

१७. या योजनेवर कॅगचे पर्यवेक्षण असल्यामुळे योजनेच्या अंमलबजावणीत निर्माण होणारे दोष दूर होण्यास मदत झाली आहे.

## मनरेगा योजनेचे भवितव्य:

भारतासारख्या विकसनशील देशात आर्थिक वृद्धीतील महत्त्वाचा अडथळा हा बेरोजगारीचा आहे. देशाच्या ग्रामीण व शहरी भागातील बेरोजगारी दूर करण्यासाठी केंद्र व राज्यसरकारांनी रोजगार वृद्धीच्या अनेक योजना कार्यान्वित केल्या आहेत. सन २००५ मध्ये महाराष्ट्रातील रोजगार हमी योजनेच्या धर्तीवर संपूर्ण देशात राष्ट्रीय रोजगार हमी योजना सुरू करण्यात आली. २ ऑक्टोबर २००९ पासून ही योजना ÷÷महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना'', या नावाने ओळखली जात आहे. या योजनेमुळे देशातील लाखो बेरोजगार व्यक्तींना रोजगार संधी उपलब्ध झाल्या असून शेती व ग्रामीण विकासाशी संबंधित अनेक प्रकल्प विकसित केले आहेत. देशाचा खंडप्राय विस्तार विचारात घेता या योजनेतील त्रुटी दूर करण्यासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे.

१. देशातील सर्व घटकराज्यामध्ये या योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे करणे गरजेचे आहे.

२. या योजनेद्वारा सध्या १०० दिवसाच्या रोजगाराची हमी दिली जाते. त्यामध्ये बदल करून एका कुटुंबातील एका कुटुंबास किमान ३०० दिवस रोजगारची हमी दिली जावी.

३. या योजनेअंतर्गत मजुरांना दिले जाणारे मजुरीचे दर शेतमजुरांच्या किंमत निर्देशांकाशी निगडीत असावेत म्हणजे वास्तव

वेतन वाजवी होईल.

४. सर्वात महत्त्वाचे म्हणजे भारतातील ग्रामीण भागातील रोजगारांच्या शोधात असलेल्या गरजू लोकांना या योजनेची सविस्तर माहिती ग्रामपंचायतीमार्फत दिली जावी.

५. योजनेची प्रशासन यंत्रणा अधिक कार्यक्षम बनविण्यासाठी देशातील खेडे, तालुका व जिल्हा स्तरावरील यंत्रणा अधिक सक्षम बनविण्याची गरज आहे.

६. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे यश अधिक वृद्धिंगत करण्यासाठी मागासलेल्या घटकराज्यात गरजू लोकांच्या विकासासाठी ही योजना शासनाने पूर्ण कार्यक्षमतेने राबवावी की ज्यायोगे देशाच्या महत्तम सामाजिक कल्याणात भर पडेल.

७. ही योजना विविध प्रकारच्या प्रसार माध्यमाद्वारे गरजू लोकांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेने करावी.

८. या योजनेद्वारे रोजगाराची मागणी करणाऱ्या लोकांची संख्या दर्शविणारे रजिस्टर, पुरविलेला रोजगार, केलेली कामे व वेतन अदापत्रक इत्यादी तपशील असलेले दस्तऐवज निर्दोष ठेवण्यात यावेत.

९. या योजनेच्या कार्यक्षम अंमलबजावणीसाठी दरवर्षी उपलब्ध एकूण निधीचा वापर पुरेपूर केला जावा. त्यामध्ये रोजगारवृद्धी व ग्रामीण विकास या दोन्ही गोष्टी साध्य करता येतील.

१०. या योजनेमध्ये समाविष्ट झालेल्या सर्व प्रशासकीय सेवकांना योजनेची माहिती व प्रशिक्षण दिले जावे. त्यामुळे योजनेची अंमलबजावणी कार्यक्षमतेने होईल.

११. या योजनेअंतर्गत देशाच्या ग्रामीण भागात केलेल्या कामांचे स्थानिक पातळीवर मूल्यमापन करून त्याचा अहवाल जिल्हा व राज्यस्तरावर पाठविला जावा.

१२. भारतातील दारिद्र्य व बेरोजगार निर्मूलनासाठी ग्रामीण भागात शेती व्यवसायाशी संबंधित पाटबंधारे, जलसिंचन, पायाभूत सुविधा इत्यादी उपक्रमावर भर देण्यात यावा.

१३. ‘मनरेगा' योजनेच्या उज्वल भवितव्यासाठी या योजनेअंतर्गत हाती घेण्यात आलेल्या विविध प्रकल्पांचे स्वरूप अधिक विस्तृत बनविण्यात यावे. प्रामुख्याने ग्रामीण भागातील लहान व सीमांत शेतकऱ्यांच्या खासगी जमिनीची उत्पादकता वाढविण्यासाठी मजुरीबरोबरच अत्याधुनिक पद्धतीने शेती करण्याचे तंत्र विकसित केले जावे. अर्थात त्यासाठी ग्रामपंचायतींना पुरेसे आर्थिक पाठबळ मिळणे आवश्यक आहे.

१४. ग्रामीण भागातील शेतीची उत्पादकता वाढीसाठी ग्रामीण भागात जलसिंचन सुविधांचा विकास करण्यास अद्यापही या योजनेस वाव आहे. विशेषतः शेतकऱ्यांमार्फत सध्या खाजगी स्वरूपात केली जाणारी कामे मनरेगा योजनेत समाविष्ट करून ती विकसित केली जावीत. त्यामुळे ग्रामीण भागात शेतीची उत्पादकता वाढून उपलब्ध

झालेला रोजगार खऱ्या अर्थाने फलदायी ठरेल.

आजही आर्थिक वृद्धीदराची, चालू खात्यावरील तुटीची किंवा रूपयाची घसरण यांचीच अधिक चर्चा होते. खरेतर सार्वजनिक खर्चामुळे विकासदर किती वाढला हे पहात असतानाच किती नवा रोजगार निर्माण झाला, किती बेरोजगारी कमी झाली व ही रोजगार निर्मिती सर्व देशभर कशी विकेंद्रित झाली याची अधिक गांभीर्याने चर्चा करण्याची गरज आहे. समाजात एकही सक्षम माणूस बेरोजगार राहू नये हीच तर खरी सामाजिक कल्याणाच्या कमालीकरणाची प्राथमिक मुलभूत व कायमस्वरूपी अट ठरावी. भारतातील अर्थशास्त्राच्या सर्व अभ्यासकांनी यादृष्टीने बेरोजगारीच्या प्रश्नांकडे पाहण्याची व सातत्यपूर्ण चिकित्सा करण्याची गरज आहे.

---


**ANNOUNCEMENT FOR CALL OF ARTICLES**

***DR. RAVINDRA SABNIS MEMORIAL PRIZE***

Marathi Arthashastra Parishad has constituted an Endowment Fund for the award, on an annual basis of Dr. Ravindra Sabnis Memorial Prize of Rupees Four Thousand only for outstanding contribution in form of an article published during the Calender Year 2013 in standard accredited journals on themes belonging to the areas of Banking, Industrial Finance and General Industrial Economics.

Last date for submission of the entries (Two Copies) for this years contest is 31st August 2014. For further details, contact the undersigned at this address:

*Charudatta S. Gokhale, Plot No.10,*
*Professor Colony, Behind D.I.C., Jalgaon-*
*425001.*
*(Mob.9422618410)*

**Charudatta S. Gokhale,**
Executive President,
Marathi Arthashastra Parishad.

# पुणे शहरातील घरेलू कामगारः अनुभवाधिष्ठित अभ्यास

उत्तम दे. वाकोडकर,
अंबाजोगाई,
सेवानिवृत्त प्राध्यापक,
भ्रमणध्वनी ९८८१८५९९९४

श्रीराम ल. पेडगावकर
पुणे,
पाषाण, बाणेर लिंक रस्ता,
भ्रमणध्वनी-९०११७२९३१८

घरेलू स्त्री कामगारांचा समावेश असंघटित क्षेत्रात होत असल्यामुळे या घटकास दोन आघाड्यावर समस्यांना सामोरे जावे लागते व त्यांची झळ त्यांना पोहोचते. एक म्हणजे स्त्री म्हणून तर दुसऱ्या बाजूने असंघटित क्षेत्रात समावेश होण्यामुळे एक कामगार म्हणून संवैधानिक सुरक्षिततेपासून त्यांना दूर रहावे लागते. मानवी हक्क चळवळीच्या विकासाबरोबरच आंतरराष्ट्रीय श्रमिक संघटनेच्या पुढाकारामुळे घरगुती कामगारांना ÷÷सामाजिक सुरक्षा अधिनियम-२००८'' च्या माध्यमातून संवैधानिक संरक्षण व कल्याणकारी उपाययोजनांचा विस्तार करण्याचे प्रयत्न केले गेलेत.

पुणे शहरात १९८५ पासून हे कामगार अखिल भारतीय स्त्री संघाकडून संघटित झालेले आहेत.

प्रस्तुत अभ्यास शहराच्या पाषाण भागातील सोयीस्कर नमुना (Convenience Sampling) पहाणी आधारे निवडलेल्या २० घरेलू स्त्री कामगारांकडून उपलब्ध झालेल्या प्राथमिक आकडेवारीवर आधारलेला आहे.

या अभ्यासाची मूलभूत उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत-

१. घरेलू कामगारांची रोजगार, प्राप्ती व रहाणीमान विषयक स्थिती समजून घेणे.
२. घरेलू कामगारामध्ये त्यांचे हक्क व सामाजिक सुरक्षा कायद्यातील तरतूदींची कितपत जाणीव आहे हे समजून घेणे.
३. नमुना पाहणीवर आधारित तथ्यातून कामगारांच्या भवितव्यात सुधारणा घडवून आणण्यासाठी उपाय सूचविणे.

घरेलू कामगारांच्या संदर्भात अलिकडेच आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय श्रम संघटनच्या (ILO) परिषदेत ज्यात प्रामुख्याने स्त्रीयांचा सहभाग व संघटन

होते त्यात असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या भयावह स्थितीबद्दल विचारविनिमय व्हावा या हेतूने केल्या गेलेल्या दीर्घकालीन मागणीकडे लक्ष वेधण्यात आले. भारतात घरेलू कामगारांच्या नियमनाबाबत अनेक प्रस्ताव समोर आलेले आहेत.

असंघटित क्षेत्रावरील कामगारासाठी (रोजगार, कामाची स्थिती, सामाजिक सुरक्षितता आणि कल्याण विषयक नियमन) नॅशनल कमेटी कॅम्पेनने ÷विधेयक २००८' नुसार घरेलू कामगारांच्या व्याख्येनुसार कोणत्याही घरगुती रोजगारात १५ ते ६० या वयोगटातील व्यक्ती जी प्रत्यक्ष अथवा कंत्राटदारामार्फत एका सेवायोजककाकरीता किंवा समूहासाठी वा अन्य प्रकारे गुंतलेली आहे व नैमित्तिक, हंगामी किंवा स्थलांतरित कामगार म्हणून समावेश झालेला आहे.

भारतीय राज्यघटना समानता आणि हक्कदायित्व तसेच सन्मानाचे जीवन जगण्यासाठी मान्यता देते परंतु असंघटित क्षेत्रातील कामगारांना मूलभूत अधिकाराचा उपभोग घेण्यापासून काही घटक वंचित करतात.

केंद्र सरकार कायद्यांतर्गत आरोग्य, प्रसुती फायदे, वृध्दत्व काळातील संरक्षण व निर्धारित केलेले लाभ या अनुषंगाने योग्य उपाय आखू शकते व त्यात सुधारणा करु शकते. राज्यशासन भविष्यनिर्वाह निधी, अपघाती फायदे, कामगारांच्या पाल्यासाठी कौशल्य विकास कार्यक्रम, वारसदारांना लाभार्थींच्या अंत्यदर्शनासाठी आर्थिक सहाय्य आदी योजना आखू शकते.

किरण मोघे यांच्या मते, पुणे शहरातील प्रामुख्याने मध्यमवर्गीय लोकांचा परिसर असलेल्या कोथरुड भागात सन २००० मध्ये घरेलू कामगारांच्या समुहाने अचानक केलेल्या संपामुळे प्रथमच घरेलू कामगार चळवळीचा मुद्दा समोर आला. पुण्यात अन्य भागात ही चळवळ जशी जोर धरु लागली त्याचा परिणाम म्हणून राज्याच्या अन्य जिल्ह्यातही घरगुती कामगारांनी त्यांच्या न्याय्य हक्कासाठी संघटनात्मक लढे उभे करण्यास सुरुवात केली. परिणामी या संघर्षानी राज्य चळवळीचा आकार धारण केला. या संघटनात्मक चळवळीचा परिणाम असा झाला की घरेलू कामगारासाठी संरक्षणात्मक कायद्याच्या गरजेबद्दल महाराष्ट्र राज्य विधीसभागृहात एकमेव कम्युनिष्ट लोकप्रतिनिधींनी चर्चा उपस्थित करण्यात पुढाकार घेतला. या रेट्यातूनच घरेलू कामगारांच्या कामाच्या परिस्थितीत सुधारणा करण्याबरोबरच त्यांच्या कल्याणासाठी राज्य श्रमिक विभागाला कायद्याचा मसूदा तयार करावा लागला व डिसेंबर २००८ मध्ये ÷महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळ कायदा' पारित करण्यात आला. घरेलू कामगारांसाठी त्रिपक्षीय कल्याण मंडळ स्थापन करण्याबरोबरच त्यांचा लाभासाठी कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी व चौकट निश्चित करण्याविषयीचे अधिकार सोपविण्यात आले. घरेलू कामगारांचे पंजीयन हि या कायद्यातील एक स्वागतार्ह तरतूद आहे. परंतु यात निधीचा स्रोत स्पष्ट नाही.

ऑक्टोबर २०११ पासून मासिक वर्गणी रु.५ व एकरकमी अतिरिक्त स्वरुपात रु.३०/- शुल्काचे शोधन केल्यानंतर कल्याण मंडळाचा सदस्य म्हणून घरेलू कामगाराची नोंद केली जाते.

पुणे शहरात नोंदणीकृत घरेलू कामगारांची संख्या ५०,००० वर पोहचली आहे. परंतु यापैकी

सदस्य स्वीकारलेल्या फक्त ६००० (१२%) घरेलू कामगारांना ओळखपत्रे निर्गमित केली आहेत.

एक कल्याणकारी उपाय म्हणून प्रत्येक नोंदणी झालेल्या घरेलू कामगारांचा ÷जनश्री विमा योजने अंतर्गत प्रतिवार्षिक रु. ५० इतका त्यांचा विमा हप्ता म्हणून राज्य कल्याण मंडळाकडून भरला जातो. दुसरी उपाययोजना म्हणून दोन अपत्यांच्या मर्यादेपर्यंत प्रसूती लाभाच्या स्वरुपात रु.२०,०००/- रक्कम लाभार्थींना दिली जाते. लाभार्थीच्या निधनानंतर त्याच्या अंत्यविधीचा खर्च म्हणून कायदेशीर वारसदाराला रु.२०००/- एवढी रक्कम आर्थिक मदत म्हणून दिली जाते. कामगार कल्याण मंडळ व आयुर्विमा महामंडळ यांच्या संयुक्त सहभागाने रु.१२००/- एवढी प्रतिवार्षिक शिष्यवृत्ती लाभार्थीच्या पाल्यास देण्याची तरतूद आहे. मात्र त्यासाठी लाभार्थीने बँकेत खाते उघडण्याचा आग्रह केला जातो.

प्रस्तुत शोधनिबंधनात घरेलू कामगारांना उपलब्ध होणारा रोजगार व प्राप्ती याचा अभ्यास करण्याबरोबर ÷महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळ कायदा २००८' च्या अंतर्गत कामगारांना उपलब्ध असलेल्या संवैधानिक सामाजिक सुरक्षा उपायांचे लाभ किती मर्यादेपर्यंत द्यावे हे शोधण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**पूर्व अभ्यासाचा आढावा:**

सुजाता घोटसकर (२०१३) यांनी आपल्या संशोधनपर अभ्यासात वर्ग, जात व लिंगभाव या अनुषंगाने घरेलू कामगारांच्या परिस्थितीचा आढावा घेतला आहे व त्यातून खालील मुद्दे समोर आले आहेत-

(१) अनेक देशातील घरेलू कामगारांना जवळपास सारख्याच प्रश्नांना सामोरे जावे लागते. वैधानिक आणि प्रशासकिय चौकटीत घरेलू कामगार म्हणून मान्यता मिळण्याची उणीव अनेक स्थितीत दिसून येते. रोजगाराची आत्यंतिक असुरक्षितता हा घरेलू कामगारांना येणाऱ्या अनुभवाचा महत्त्वाचा भाग आहे.

(२) दुसरी महत्त्वाची समस्या म्हणजे त्यांचा होणारा छळ त्यात लैंगिक शोषणाचाही समावेश होतो.

(३) अत्यल्प मजुरी, मजुरी या वेतनात कपात तसेच मजुरी/वेतनाचा हिशेब करताना होणारी फसवणूक.

(४) घरेलू कामगारांना सोसावा लागणारा कामाचा अतिरिक्त भार. साधारणपणे घरेलू कामगारांना कामाच्या संदर्भात जाचक अटींना सामोरे जावे लागते. घरेलू कामगारांसाठी पगारी रजेची मुभा किंवा तरतूद नाही.

कामाच्या संदर्भात आरोग्य व आरोग्यविषयक काळजीचाही मुद्दा असतो. परंतु कामगारांना व्यावसायिक आजाराचीही समस्या भेडसावते.

एन. वासंती (२०११) यांनी घरेलू कामगारांच्या परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्याच्या अनुषंगाने राज्य शासनाच्या धोरणाचे महत्व अधोरेखित केले आहे. घरेलू कामगारांना ÷कामगार' म्हणून अधिमान्यता व कामाच्या संदर्भात साचेबध्द कल्पना या रुढीवादी दृष्टिकोनात बदल करण्याची आवश्यकता त्यांनी आपल्या अभ्यासात स्पष्ट केली.

एन. विद्या (२०१३) यांनी कर्नाटक, आंध्रप्रदेश, बिहार, राजस्थान व केरळ राज्यातील घरेलू कामगारांसाठी न्यूनतम मजुरी निर्धारण धोरणाचे पुनर्परिक्षण केले आहे. कर्नाटक राज्यात

साफसफाई कामासाठी ८ तासांकरीता रु.१६५/- इतकी दैनंदिन किमान मजुरी आहे तर घरकामासाठी किमान मजुरी रु.१७०/- इतकी आहे. प्रस्तुत लेखिकेने असे नमूद केले की, सर्वच राज्यात घरेलू कामगारांना मिळणारे वेतन अत्यल्प आहे. इतकेच नव्हे तर किमान मजुरी धोरणाची अंमलबजावणी करणे कठीण जाते.

सोनिया जॉर्ज (२०१३) यांनी वेतनमानात सुधारणा व घरेलू कामगारांना व्यावसायिक दर्जा या दृष्टिने घरगुती कामाचे व्यावसायिकरण करण्याचा मार्ग अवलंबविण्याची शिफारससुध्दा आपल्या अभ्यासात केली. या बाबतीत प्रस्तुत लेखिकेने केरळमधील "SEWA' या बिगर शासकिय संघटनेचा (NGO) अनुभव उदाहरण म्हणून नमूद केला आहे. त्यांनी दिलेला संदेश थोडक्यात खालील प्रकारे उद्धृत करता येईल. "The organizing woman worker could only successful through an integerated approach and inclusive approach of addressing their rights, skills and well being"

**पाहणी निष्कर्ष** (Survey Findings):

प्रस्तुत प्रकरणातील विवेचन पुणे शहरातील पाषाण परिसरातील २० घरेलू कामगारांच्या (घरेलू स्त्री कामगार) नमुना पहाणीवर आधारित मिळालेल्या माहितीवर आधारित आहे. नमुना निवड ही ÷सोयिस्कर नमुना निवड' म्हणून आहे. प्रश्नावली व त्याला पूरक म्हणून निवडलेल्या कामगारांशी कांही मुद्यांवर केलेली अनौपचारिक चर्चा या आधारावर प्रस्तुत अभ्यासासाठी प्राथमिक आकडेवारी गोळा केली.

तक्ता-१ मध्ये प्रतिसादकाचे (Respondents) वय, शिक्षण, कुटुंबाचा आकार, स्थलांतरण आदी सामान्य वैशिष्टे स्पष्ट होतात. यावरुन असे स्पष्ट होते की, निवडलेल्या घरेलू कामगारांपैकी बहुसंख्य कामगार (६०%) हे सोमेश्वरवाडी या भागातील असून जी नदीपात्राजवळील जुनी झोपडपट्टी आहे बाकीचे २०% कामगार हे सुस रस्ता व नजीकच्या ग्रामीण परिसरातून आलेले आहेत. ७५% घरेलू कामगार (प्रतिसादक) हे पाषाण-बाणेर लिंक रस्ता व सुस रस्त्यावरील फ्लॅटस्‌मध्ये काम करतात. निवडलेल्यापैकी बहुसंख्य घरेलू कामगार हे माहिती, तंत्रज्ञान क्षेत्रात नोकरी करणाऱ्या मध्यमवर्गीय मालकाकडे कामास आहेत. बहुसंख्य घरेलू कामगारांचे (७५ टक्के) कामाचे ठिकाण हे २.५ कि.मी. परिसरातील आहे. प्रतिसादकाचे वयोमानानुसार वर्गीकरण केले असता असे स्पष्ट होते की, निवडलेल्या घरेलू कामगारांपैकी बहुसंख्य (६०%) कामगार हे २०-४० या वयोगटातील असून ३५% कामगार हे ४० व त्यापेक्षा अधिक वयोगटातील आहेत. उर्वरित कामगार हे २० वर्षाच्या आतील वयोगटातील आहेत.

बहुसंख्य (५५%) कामगार हे ÷अन्य मागासवर्गीय' (OBC) प्रवर्गातील असून त्यात धनगर, हटकर, माळीसाधू आणि बंजारा (लमान) जातीचा समावेश होतो. अन्य २०% हे सामान्य प्रवर्गात अनुसूचित व मागासवर्गीय प्रवर्गातील आहेत तर उर्वरित २५% हे सामान्य प्रवर्गात मोडणारे आहेत, ज्यात ब्राह्मण, मराठा या प्रगत समाजाचा समावेश होतो.

निवडलेले बहुसंख्य घरेलू कामगार (७५%) हे स्थलांतरीत आहेत. नगर आणि सोलापूर या नजिकच्या जिल्ह्यातून झालेले स्थलांतरित

तक्ता -१

प्रतिसादकांची सर्वसाधारण वैशिष्ट्ये

| तपशिल | | | | |
|---|---|---|---|---|
| १. राहण्याचे ठिकाण | सोमेश्वरवाडी<br>१२<br>(६०) | पाषाण<br>४<br>(२०) | इतर<br>४<br>(२०) | एकूण<br>२०<br>(१०) |
| २. वय वर्षात | ८२-० <br>१<br>(५) | २०-४०<br>१२<br>(६०) | ४०+<br>७<br>(७५) | एकूण<br>२०<br>(१००) |
| ३. जात | अनुसूचित<br>४<br>(२०) | मागास<br>११<br>(५५) | सर्वसाधारण<br>५<br>(२५) | एकूण<br>२०<br>(१००) |
| ४.कुटुंबाचा आकार | १<br>०<br>(०) | २-५<br>१३<br>(६५) | ५+<br>७<br>(३५) | एकूण<br>२०<br>(१००) |
| ५. शिक्षण | अशिक्षित<br>११<br>(५५) | प्राथमिक<br>४<br>(२०) | माध्यमिक<br>५<br>(२५) | एकूण<br>२०<br>(१००) |
| ६. कोठून स्थलांतरीत | शेजारचे जिल्हे<br>४<br>(२४.६९) | मरा/विदर्भ<br>९<br>(६०.००) | इतर<br>२<br>(१३.३३) | एकूण<br>१५<br>(१००) |
| ७. केव्हा स्थलांतरीत | ०-५ वर्षे<br>२<br>(१३.३३) | ५-१०<br>४<br>(२६.६४) | १०+ वर्षे<br>९<br>(६०.००) | एकूण<br>१५<br>(१००) |
| ८. कामाचे ठिकाण | लिंक रोड<br>१५<br>(७५) | सुस रोड<br>३<br>(१५) | दोन्ही<br>२<br>(१०) | एकूण<br>२०<br>(१००) |

स्रोतः लेखकांची पाहणी.

तक्ता -२

प्रतिसादकांचा रोजगार व मिळकत विषयक माहिती

| मासिक प्राप्ती (रु) | कामाचे तास (प्रति व्यक्ती) | कामाचे स्वरुप व संख्या | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | सफाई | सफाई व स्वयंपाक | इतर ४ (२०) | एकूण २० (१०) |
| ३०००-५००० | १९ (३.८) | ४ | १ | - | ५ |
| ५०००-८००० | ४३ (५.४) | १ | ५ | २ | ८ |
| ८०००-१०००० | २६ (६.५) | २ | २ | - | ४ |
| १००००+ | २४ (५.४) | - | ३ | - | ३ |
| सर्व गट | ११२ (५.६) | ७ | ११ | २ | २० |

*स्रोत: लेखकांची पाहणी.*

(६०%) आहेत. बहुसंख्य स्थलांतरित हे विदर्भ व मराठवाडा भागातील आहेत तर १३% कामगार अन्य राज्यातून झालेल्या स्थलांतरितांपैकी आहेत. स्थलांतराचा काळ लक्षात घेतला तर असे दिसून येते की, ६०% कामगार हे १० वर्षापूर्वी स्थलांतरित झालेले असून २७% कामगार हे ५-१० वर्षातील स्थलांतर झालेल्यापैकी १३% कामगार ५ वर्षाआधी स्थलांतरीत झालेले आहेत. स्थलांतरीत कामगारांचा प्रवाह प्रामुख्याने बीड, जालना, परभणी, नांदेड, नागपूर, यवतमाळ यासारख्या कृषीप्रधान व दुष्काळप्रवण जिल्ह्यातून दिसून येतो.

नमुना पहाणीसाठी निवडलेल्या घरेलू कामगारांचा शैक्षणिक स्तर लक्षात घेता स्पष्ट होते की, बहुसंख्य कामगार (५५%) हे निरक्षर असून अन्य २५% कामगार हे प्राथमिक शिक्षणाच्या पातळीपर्यंत आहेत तर अन्य १०% कामगार हे माध्यमिक शिक्षणाच्या पातळीपर्यंत आहेत. यावरुन स्पष्ट होते की, शिक्षणाचा अभाव हे घरेलू कामगार म्हणून व्यवसाय स्वीकारण्याचे प्रमुख कारण आहे.

कुटुंबाचा आकार लक्षात घेता बहुसंख्य (६५%) घरेलू कामगाराच्या कुटुंबात ५ सदस्य संख्या आहे. यावरुन या घटकात कुटुंबाचा आकार

मर्यादित ठेवण्याविषयी जागरुकता दिसून येते. या सामान्य वैशिष्ट्यांवरुन असे स्पष्ट होते की, जरी नमुना आकार लहान असला तरी जात, वयोगट, शैक्षणिक स्तर समाविष्ट केलेला हा प्रातिनिधीक नमुना आहे.

तक्ता-२ वरुन नमुना पाहणीतील घरेलू कामगारांची प्राप्ती व रोजगार स्थिती लक्षात घेता येईल.

प्राप्ती, कामाचे तास व कामाचे स्वरुप या आधारावर कामगारांचे वर्गीकरण केलेले असून घरेलू कामगाराची प्राप्ती कामाच्या तासावर आणि रोजगाराच्या प्रकारावर अवलंबून आहे. निवडलेल्या घरेलू कामगाराशी केलेल्या अनौपचारिक चर्चेतून असे लक्षात येते की, कामगारांना स्वच्छता व धुलाई कामासाठी रु.५००/- प्रती महिना तर स्वयंपाक कामासाठी रु.१०००/- प्रती महिना दिला जातो. कुटुंबाच्या आकाराप्रमाणे रु.२५००/- ते रु.३५००/- पर्यंत कामगारांना वेतन दिले जाते.

तक्ता-२ वरुन स्पष्ट होते की, बहुसंख्य कामगार (५५%) स्वयंपाक व स्वच्छता स्वरुपाच्या कामात गुंतलेले आहेत तर ३५% कामगार हे घराच्या साफसफाई स्वरुपाच्या कामात तर अन्य १०% हे कुटुंबातील वृद्ध आणि लहान मुलांच्या शुश्रूषेच्या कामासाठी आहेत.

प्रतिसादकांची सरासरी मासिक रु.६९९०/- इतकी आहे म्हणजे दैनंदिन रु.२३३/- एवढी प्राप्ती आहे, जी कर्नाटक राज्यात मिळणाऱ्या किमान वेतनापेक्षा (रु.१६०-१७०) जास्त आहे आणि ही पातळी केंद्र सरकारने सफाई कामासाठी प्रतिदिन रु.२४६/- वेतन द्यावे या शिफारसीशी तुलना करण्याजोगी आहे.

तक्ता-२ वरुन असे स्पष्ट होते कि, ४०% प्रतिसादकांची दरमहा प्राप्ती रु.५०००-१०,००० इतकी येते. अन्य २५% प्रतिसादकांची मासिक प्राप्ती रु. ५०००/- पेक्षा कमी आहे तर उर्वरित ३५% कामगारांची प्राप्ती दरमहा रु.८०००/- पेक्षा जास्त आहे.

कामाचे तास व कामाचे स्वरुप यानुसार प्रतिसादकाच्या प्राप्तीत तफावत दिसून येते. बहुसंख्य प्रतिसादक (८०%) हे कमी प्राप्ती असलेल्या सफाई स्वरुपाच्या कामात गुंतलेले आहेत. प्रतिसादकापैकी बहुसंख्य कामगार हे प्रतिदिन ५.४ तास काम करतात व त्यापैकी जवळपास १३% हे सफाई कामात आहेत. उपलब्ध माहितीवरुन असे लक्षात येते की प्रतिसादक सरासरी प्रतिदिन ६.५ तास काम करतात व त्यापैकी ५०% प्रतिसादक हे सफाई काम करतात. काही प्रतिसादक सरासरी प्रतिदिन ८ तास काम करुन रु.१०,०००/- पेक्षा जास्त उत्पन्न कमावतात.

तक्ता-३ वरुन स्पष्ट होते कि, प्रतिसादकापैकी बहुसंख्य कामगार (४५%) २-३ कुटुंबाकडे कामे करतात तर ३५% घरेलू कामगार हे ४-६ घरासाठी कामे करतात आणि उर्वरित ७-८ घरासाठी कामे करतात. घरेलू कामगारांना अधिक प्राप्तीसाठी व बेरोजगारीची जोखीम कमी करण्यासाठी अनेक कुटुंबात कामे करावी लागतात.

बहुसंख्य प्रतिसादक हे (७०%) हे सकाळी काम करतात तर फक्त १०% हे पूर्ण दिवस काम पत्करतात आणि उर्वरित हे मध्यंतराची सुटी घेऊन सकाळ व संध्याकाळच्या सत्रातही कामे करतात.

तक्ता क्र.३

| अ.क्र. | बाब | प्रतिसाद | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | दिवसातील कामाचे तास | १-३ | ४-६ | ७-८ | एकूण |
| | | ११ | ९ | ७ | २० |
| २ | कामाच्या वेळा | सकाळी | दुपारी | दोन्ही | एकूण |
| | | १४ | ४ | २ | १८ |
| ३ | कामगार संखटना सभासदत्व | होय | नाही | - | एकूण |
| | | ८ | १२ | - | २० |
| ४ | बोनस मिळतो का? | होय | नाही | - | एकूण |
| | | १६ | ४ | - | २० |
| ५ | २००८च्या कायद्याची माहिती | होय | नाही | - | एकूण |
| | | ७ | १३ | - | २० |

*स्रोतः लेखकांची पाहणी.*

४०% प्रतिसादक हे घरेलू कामगार संघटनेचे सदस्य आहेत. त्याच्याशी संबंधित सन २००८ व २०१० च्या कायद्याविषयी कोणत्याही प्रतिसादकाला माहिती नाही तसेच या कायद्यातील तरतुदींमुळे त्यांना मिळू शकणाऱ्या लाभाविषयी त्याच्यामध्ये अनभिज्ञता व अज्ञान दिसून येते. त्यांच्याशी संबंधित या कायद्याचा लाभ लाभार्थी म्हणून कोणालाही मिळाला नाही असे लक्षात आले. बोनसविषयी अशी माहिती मिळाली की, ८०% प्रतिसादकाना दीपावलीचा बोनस म्हणून एक आगाऊ महिन्याचे अतिरिक्त वेतन दिले जाते. ज्यांना बोनस मिळाला नाही त्यांना याबाबत विचारले असता असे समजले की ज्या मालकाकडे ते काम करतात तेथील कालावधी एक वर्षापेक्षा कमी झालेला होता.

घरेलू कामगारांना मिळणाऱ्या प्राप्तीव्यतिरिक्त इतर अन्य घटकावर कामगारांचे जीवनमान अवलंबून असते. उदा. कुटुंबातील अन्य सदस्यांचे उत्पन्न, कुटुंबाचा आकार आणि सामाजिक घटक. जीवनमानाचे निकष म्हणून खोल्यांची संख्या, स्वच्छतागृहाची सोय, धारण केलेली मत्ता, रोजगार इत्यादी विचारात घेतले आहेत.

तक्ता-३ वरुन असे स्पष्ट होते की सरासरी रु.८९९०/- रु.प्राप्ती असूनसुद्धा प्रतिसादक चांगले जीवनमान उपभोगण्याच्या स्थितीत नाहीत. पाल्याचे शिक्षण, अधिक भाडे, अयोग्य गृहव्यवस्थापन, हंगामी किंवा तात्पुरता रोजगार, कुटुंबातील अन्य सदस्यांची अपुरी प्राप्ती इत्यादीमुळे जीवनमानाचा दर्जा निम्न स्वरुपाचा आहे. बहुसंख्य प्रतिसादक (६०%) हे एका खोलीत तर ३०% लोक हे दोन खोल्यांच्या घरात तर अन्य (१०%) हे तीन खोल्या असणाऱ्या घरात राहतात.

बहुसंख्य प्रतिसादक ([illegible]%) हे कामाच्या ठिकाणी पायीच येतात तर ३०% हे

सार्वजनिक वाहनांचा वापर करतात तर १५% हे सायकल किंवा स्कूटरचा वापर करतात. ६०% कामगारांच्या निवासात स्वच्छतागृहे नाहीत. निरिक्षणातून असे दिसून येते की, दूरदर्शन संच, पलंग, फर्निचर आदी टिकाऊ वस्तू न बाळगणारे २०% घरेलू कामगार आहेत. फक्त ५०% घरेलू कामगाराकडे काही टिकाऊ वस्तू आहेत. उदा. दूरदर्शन फ्रिज इ. फ्रिज असणारे ३०% घरेलू कामगार आहेत. कुटुंबाच्या उत्पन्नावर ज्यामध्ये पती व कुटुंबातील अन्य सदस्याचा समावेश होतो. रहाणीमान स्थिती अवलंबून असते. घरेलू स्त्री कामगारापैकी बहुसंख्य प्रतिसादकाचे (६५%) पती सुरक्षारक्षक, ड्रायव्हर, हेल्पर किंवा अन्य कमी कुटुंबाच्या उत्पन्नावर ज्यामध्ये पती व कुटुंबातील अन्य सदस्यांचा समावेश होतो. रहाणीमानाची स्थिती अवलंबून असते. घरेलू स्त्री कामगारांपैकी बहुसंख्य प्रतिसादकाचे (६५%) पती सुरक्षारक्षक, ड्रायव्हर, हेल्पर किंवा अन्य कमी कौशल्याच्या क्षेत्रातील रोजगारात गुंतलेले आहेत. २०% प्रतिसादक हे जीवनाच्या अस्तित्वासाठी तर ७०% हे त्यांच्या पतीचे उत्पन्न अपुरे आहे, म्हणून आधार देण्यासाठी घरेलू कामगार म्हणून काम करतात. पाल्याचा शिक्षणावरील खर्च भागविण्याच्या हेतूने २०% प्रतिसादक घरेलू कामे करतात व त्यातूनच पाल्यांच्या शिक्षणाबद्दलची जागरुकता व पुढील पिढीचे भवितव्य सुधारण्याची त्याची स्वयंप्रेरणा दिसून येते.

÷अनौपचारिक क्षेत्र कल्याणकारी योजना कायदा-२००८' च्या संदर्भात प्रतिसादकामध्ये कितपत जागरुकता आहे हे जाणून घेण्याकरीता माहिती गोळा केली तर असे स्पष्ट झाले की, संबंधित कायद्यापासून लाभार्थी म्हणून कांही लाभ मिळाले का असा प्रश्न विचारला असता सर्व प्रतिसादकानी नकारात्मक उत्तर दिले व प्रसूती फायदे, आरोग्यविषयक सहाय्य आणि पाल्याचे शिक्षण इ. बाबतीत लाभार्थीपर्यंत फायदे अद्याप पोहोचविण्याचे आहे. कामगार संघटनेच्या सदस्यत्वासंबंधी असे दिसून आले की फक्त ४०% प्रतिसादक हे घरेलू कामगार संघटनेचे रीतसर सदस्य आहेत. सदस्यत्वाची व्याप्ती कमी दिसून येते. कामाच्या ठिकाणी लैंगिक छळाविषयी प्रश्न विचारला असता सर्व प्रतिसादकांनी अशा प्रकारची स्थिती नसल्याची माहिती दिली. संकोच बाळगणारी भावना अथवा किरकोळ स्वरुपाच्या घटनाशी जुळवून किंवा समायोजन करण्याची मानसिकता यामुळेसुद्धा अशा प्रकारचे उत्तर दिले जाऊ शकते. मालकाकडून त्यांना मिळणारी वागणूक सौहार्दपूर्वक व आत्मीयतेची असते असे प्रतिसादकाकडून कळाले. काही निवडक प्रतिसादकाशी अनौपचारिक चर्चा केली असता पुढील निष्कर्ष समोर आहेत.

(१) मालकाने निवासस्थान बदलल्यास १५-२० दिवस रोजगार घटतो किंवा त्या कालावधीत तात्पुरती बेरोजगारी निर्माण होते.

(२) सर्व कामगारांना साप्ताहिक सुटी नसते तर महिन्यातून दोन दिवस वेतनरजा मिळते.

(३) एका प्रतिसादकाने असे नमूद केले की, महिन्यातून त्यांना दोन दिवस पगारी रजा उपभोगता येत असली तरी त्याचा प्रत्यक्ष व्यावहारिक फायदा होत नाही. कारण धुण्यासाठी पाठवलेली कपडे व भांडी धुण्याचा एकदम अतिरिक्त भार पडतो.

(४) एका प्रतिसादकाने अशी तक्रार केली की, नेहमीच्या ठरवून दिलेल्या कामाव्यतिरिक्त

त्यांना स्वच्छतागृहाची सफाई असे जादा काम करावे लागते.

(५) शासनाकडून घरेलू कामगारांच्या काय अपेक्षा आहेत याविषयी विचारले असता काही थोड्या प्रतिसादकांनी फक्त निवारा/घरे उपलब्ध करुन देण्याची गरज स्पष्ट केली.

**पाहणीचे निष्कर्ष व शिफारशीः**

प्रस्तुत सर्वेक्षणातील प्रमुख निष्कर्ष पुढीलप्रमाणेः

(१) घरेलू काम हे मानवी सन्मानाशी सुसंगत नाही कारण हे काम प्रामुख्याने स्त्री कामगार करतात व अनौपचारिक क्षेत्रात या घरेलू कामाचा समावेश होतो.

(२) कामगार कायद्याच्या अंमलबजावणीसाठी शासनस्तरावर योग्य सहकार्य मिळत नाही कारण घरेलू कामगाराच्या बाबतीत निश्चित असा कोणताही एक मालक नसतो.

(३) अत्यल्प उत्पन्न व मालमत्ता, राहण्याची अपुरी जागा व मूलभूत सुविधांच्या अभावामुळे घरेलू कामगाराचे जीवनमान निम्न स्तराचे आहे.

(४) वैधानिक सामाजिक सुरक्षेबाबत फार थोड्या कामगारात जागरुकता आहे व कामगार संघटनेची व्याप्ती कमी आहे.

(५) कामगारांना सफाई स्वरुपाच्या कामासाठी रु.५००/- दरमहा वेतन दिले जाते. दोन वर्षाच्या कालावधीनंतर रु.१००/- वेतनात वाढ केली जाऊ शकते असे सांगण्यात आले. घरेलू कामगारांना बोनसही मिळतो.

(६) घरेलू कामगारांना मिळणाऱ्या प्राप्तीची पातळी कमी असली तरी आंध्र प्रदेश, कर्नाटक इ. राज्यात घरेलू कामासाठी जी न्यूनतम मजूरी निर्धारित केली आहे. त्यापेक्षा त्यांना मिळणारी मजुरी ही कमी पातळीवर नाही.

पुणे शहरातील घरेलू कामगारांच्या जीवनमानाच्या दर्जात सुधारणा घडवून आणण्यासाठी काही सूचना पुढीलप्रमाणे करता येईल. घरेलू कामाच्या कार्यात व्यावसायिकता आणण्याची गरज आहे व सदस्यत्वाची व्याप्ती वाढवून तसेच या संदर्भात कामगार संघटनेच्या सकारात्मक व क्रियाशील दृष्टिकोनातून साध्य करता येईल.

स्वच्छता, कुशलता आणि चांगली व्यक्तीगत प्रतिमा मालक अपेक्षितात. मालकांची ही मागणी वा अपेक्षा पूर्ण करण्याच्या दृष्टीने कामगार संघटना घरेलू कामगारांसाठी कौशल्य विकास कार्यक्रम आखू शकते व सूयोग्य संघटन करु शकतात. कामाचा दर्जा व स्वच्छता जर समाधानकारक नसेल तर व्यक्तिगत स्तरावर संबंधित कामगाराच्या विरोधात तक्रार करता आली पाहिजे. अशा प्रकारची व्यावसायिकता पारिचारिकतेच्या माध्यमातून आरोग्य सेवेत दिसून येते. श्रमिक संघटना तीन तातडीच्या मागणीच्या पूर्ततेसाठी सहाय्यभूत होऊ शकतात. ते म्हणजे (१) शहरी घरेलू कामगारासाठी जीवनमान निर्देशांकावर आधारित दर दोन वर्षाला वेतनदरात सुधारणा घडवून आणणे (२) साप्ताहिक सुटीची सवलत (३)श्रमिक संघटना किंवा कृती समितीने कामगारांना वैद्यकिय लाभ, प्रसूतीलाभ, इ. बाबतीत कल्याणकारी उपायांच्या अंमलबजावणीत अडथळे येत असतील तर ते मुद्दे समोर ठेऊन त्यासाठी कृती-कार्यक्रम आखणे.

कामगारांना मिळणाऱ्या लाभाची कक्षा रुंदावण्यासाठी संबंधित कायद्यात सुधारणा घडवून

आणण्याची आवश्यकता आहे. उदा.कामगारासाठी गृहयोजना, मोफत वाहतूकीची सुविधा, मोफत वैद्यकीय सहाव्य इ. महानगरपालिकेने खासगी घरमालकाकडून अंश योगदान घेऊन घरेलू कामगारांसाठी स्वच्छतागृहे बांधून द्यावीत.

## संदर्भ सूचीः


1. George Sonia(2012): *Towards Recognition through Profe-ssionalization* EPW, Oct. 26, 2013.
2. Ghotoskar Sujata (2013): *The plight of domestic workers: Culture, gender, class, caste, heiracties* EPW, OJune 1, 2013.
3. Moghe Kirah (2013): *Organizing Domestic workers in Pune City.* EPW, 26, 2013.
4. N. Neetha (2013): *Minimum Wages for Domestic Workers* EPW, Oct. 26, 2013.
5. www. nie (2014) : *Minimum wages for Schedule emplanment in centres sphere.*


---

## मराठी अर्थशास्त्र परिषद

### अर्थसंवादसाठी अनुदान


मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या विनंतीला प्रतिसाद देऊन महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांचेकडून २०१३-१४ या वर्षात अर्थसंवादसाठी रु.४५,०००/- अनुदान प्राप्त झालेले आहे. त्याबद्दल मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने मी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांचा ऋणी आहे.

- डॉ. अविनाश निकम,
प्रमुख संपादक, अर्थसंवाद
मराठी अर्थशास्त्र परिषद

# ब्रिक्स् संघटना व भारताचा विकास

**सुषमा उध्दव मंडले (मदने), लातूर,**
अर्थशास्त्र विभाग,
श्रीमती सुशीलादेवी देशमुख महिला महाविद्यालय.
भ्रमणध्वनी : ९५०३२०५१४५.

---

२१ व्या शतकाच्या पूर्वार्धात जगातील विकसित देश आर्थिक आरिष्टांनी ग्रासलेले असताना काही विकसनशील देशांनी आपल्या अर्थव्यवस्थेची प्रगती उल्लेखनीय केली होती. सन २००९ मध्ये ब्राझील, रशिया, भारत व चीन या चार विकसनशील देशाची नवीन अर्थव्यवस्था निर्माण झाली, त्याला ÷ब्रिक संघटना' म्हणतात. सन २०१० मध्ये दक्षिण आफ्रिकेचा यात समावेश करून या संघटनेचे नामकरण ÷ब्रिक्स्' असे करण्यात आले. प्रस्तुत शोधनिबंधात या संघटनेचा उदय व त्यांचे आर्थिक विचार याविषयी मांडणी केली आहे.

**ब्रिक्स् देशांचा उदयः**

सन २००१ मध्ये गोल्डमैन सैच नावाच्या आर्थिक सल्लागार संस्थेचे अर्थशास्त्रज्ञ जिम ओ निल यांनी ब्रिक या देशाची संकल्पना सर्वप्रथम मांडली. यांच्या मते ब्राझील, रशिया, भारत व चीन हे चार देश वेगाने विकासाच्या मार्गावर असून सन २०५० पर्यंत अमेरिका व युरोपियन संघातील देशाच्या पुढे हे देश आपला विकास साध्य करतील. याचे कारण या चार देशाच्या अर्थव्यवस्थेचा आकार मोठा असून जगाच्या एकूण लोकसंख्येपैकी ४० प्रतिशत लोकसंख्या या चार देशात आहे. जगाच्या एकूण क्षेत्रफळापैकी २५ प्रतिशत क्षेत्रफळ या चार देशाचे आहे. या चार देशाचे एकूण घरगुती उत्पादन १५.४ ट्रिलियन डॉलर इतके आहे. या संस्थेच्या सन २००३ च्या अहवालात या चार देशाच्या विकासासंबंधी प्रकाश टाकला. या चार देशाच्या अर्थव्यवस्था एकमेकांना पूरक आहेत. ब्राझील व रशियात कच्चा माल व ऊर्जा संसाधने मोठ्या प्रमाणात निर्माण होतात तर भारत व चीन या देशात विनिर्माण क्षेत्र व ऊर्जा संसाधनाचा उपयोग मोठ्या प्रमाणात आहे. सन २००४ च्या या संस्थेच्या अहवालात ब्रिक देशामध्ये ३००० डॉलर प्रति व्यक्ती उत्पन्न असणाऱ्या लोकांची

संख्या ८०० मिलियन पर्यंत जाईल. यामुळे आर्थिक विकासाला गती मिळेल.

सन २००७ चा अहवाल भारताच्या विकासासंदर्भात होता. भारताचा विकास पूर्व अनुमानापेक्षा अधिक गतीने होईल. कारण भारतात मध्यम वर्गाच्या संख्येत वेगाने वाढ होत आहे. संशोधन व विकासातील वृद्धीत जगातील ३० विकसित शहरापैकी १० शहरे भारतात आहेत. सन २०१० च्या अहवालानुसार २०००-२०१० या दशकात जगाच्या एकूण घरेलू उत्पादनात ब्रिक देशाचा हिस्सा २५ प्रतिशत होता. तर सकल घरेलू उत्पादनातील वृद्धी ४९ प्रतिशत अशी राहील. सन २०२० मध्ये या देशातील मध्यम वर्गाची संख्या १६०० मिलियन अशी होईल. हे चारही देश विकसित देशाच्या पुढे जातील, असे मत या संस्थेने व्यक्त केले.

### ब्रिक्स् देशांची चार शिखर संमेलने:

या संघटनेचे प्रथम शिखर संमेलन सन २००९ मध्ये रशियातील येकेटरिनबर्ग येथे संपन्न झाले. यात या चार देशांनी जागतिक बहुध्रुवीय व्यवस्थेची मागणी केली.

१५ एप्रिल २०१० मध्ये दुसरे शिखर संमेलन ब्राझीलमधील ब्राझेलियात संपन्न झाले. या संमेलनात चार देशांनी बहुध्रुवीय, समतापूर्ण व लोकशाही तत्वावरील विश्व व्यवस्थेची मागणी केली. हे चारही देश 'G-20' या देशाचे सदस्य आहेत. आंतरराष्ट्रीय वित्त संस्थामध्ये सुधारणा करावी व लोकशाही स्वरूपात जागतिक व्यवस्था असावी असे विचार या देशांनी व्यक्त केले. या संघटनेत दक्षिण आफ्रिका या देशाचा समावेश करून तिचे नामकरण ब्रिक्स् असे केले.

१४ एप्रिल २०११ मध्ये तिसरे शिखर संमेलन चीन मधील सान्या शहरात संपन्न झाले. या संमेलनात पाच देशाने प्रथम कार्यवाही योजना तयार केली. यात खाद्य सुरक्षा, तांत्रिक शोध, बँकिंग संस्था व व्यावसायिक संघटनात सहयोग याला महत्व दिले. ब्रिक्स् देशाने अंतर्गत व्यावसायिक मंच तयार करणे, व्यापार व संबंधित क्षेत्रातील संशोधनाला प्राधान्य देणे, आरोग्य विभागाचे संमेलन घेऊन या क्षेत्रातील सहयोग वाढविणे आवश्यक आहे. तसेच या संमेलनात पुढील महत्वाच्या बाबींवर भर दिला.

अ. ब्रिक्स् देशात सहकार्य वाढविणे व जागतिक मुद्यावर समन्वय साधणे.

ब. ब्रिक्स् देशाचा मुख्य उद्देश मानवी विकास, समता व न्यायपूर्ण अर्थव्यवस्थेची स्थापना करणे.

क. ब्रिक्स् देशांनी जागतिक शांतता व आर्थिक स्थिरतेला महत्व दिले.

ड. या देशांनी इतर विकसनशील देशाबरोबर सामान्य हित व आर्थिक सहयोगावर भर दिला.

इ. आंतरराष्ट्रीय वित्त संस्थांमध्ये सुधारणा करून त्यांना लोकशाही प्रणालीत सामावून घेणे. या वित्तसंस्थात विकसनशील देशाचे प्रतिनिधीत्व वाढविणे.

ई. जागतिक आर्थिक विचार प्रवाहात विकसनशील देशांना महत्वपूर्ण स्थान देणे. आंतरराष्ट्रीय संबंध हे लोकशाही तत्वानुसार चालविणे व प्रत्येक देशाचे

सामूहिक निर्णय प्रक्रियेत सहकार्य वाढविणे.

३. ब्रिक्स् देश 'G-20' या देशांचे सभासद असल्यामुळे या देशांच्या अर्थव्यवस्था महत्वपूर्ण आहेत. यामुळे सदस्य देशात व्यापार, गुंतवणूक, विज्ञान व तांत्रिक क्षेत्रात सहकार्याला चालना देणे.

ब्रिक्स् देशाचे चौथे संमेलन २९ मार्च २०१२ मध्ये दिल्ली येथे संपन्न झाले. भारताचे पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी रोजगार, पाणी, इंधन, खाद्यसुरक्षा, पर्यावरण व आतंकवाद अशा १० मुद्यांवर आपले विचार मांडले. हे विचार ब्रिक्स् देशासाठी चिंतेचे होते.

अन्नधान्य सुरक्षा व पाणी समस्या या विषयावर आंतरराष्ट्रीय सहयोगातून मार्ग काढण्यावर भर दिला. पुढच्या दहा वर्षात भारतात एक करोड रोजगार निर्माण करावा लागेल हे भारतापुढचे आव्हान आहे. पर्यावरणाची चिंता, पश्चिम आशियातील राजकीय अनिश्चितता व आतंकवाद इत्यादी बाबींचा धोका त्यांनी व्यक्त केला.

देशाच्या आर्थिक वृद्धीसाठी उर्जावरील भार कमी करणे. विजेची बचत व उर्जाच्या इतर स्त्रोतांचा विकास यावर भर दिला. तसेच विकासातील गुंतवणूक वाढविणे. विशिष्ट मालाची देवाण-घेवाण करणे, प्रौद्योगिक हस्तांतरणाला प्रेरणा देणे गरजेचे आहे. यासाठी जागतिक व्यवस्थेत सुधारणा झाली पाहिजे.

ब्रिक्स् देशांनी संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषद यामध्ये सुधारणा करण्यासाठी एकमताने पुढे आले पाहिजे. जागतिक व्यवस्था सुधारण्यासाठी या देशांनी एकत्र येऊन काम करावे.

ब्रिक्स् बँकेची स्थापना हा या शिखर संमेलनाचा मुख्य उद्देश होता. आपल्या देशातील चलनात व्यापार वाढविण्यासाठी प्रमुख दोन मार्ग सुचविले.

१. स्वतःच्या देशाच्या चलनात कर्ज फेडण्याची सुविधा (Master agreement on extending credit facility in local currency)

२. बहुपक्षीय साखपत्र पुष्टीकरण सुविधा (Multilateral letter of credit confirmation facility)

यामुळे ब्रिक्स् देशांतर्गत व्यापार करताना डॉलरवर अवलंबून राहण्याची गरज नाही. अशा प्रमुख आर्थिक घटकांची या संमेलनात चर्चा झाली.

## ब्रिक्स् देशाची तुलनात्मक विश्व स्थिती:

पुढील पृष्ठावरील तक्त्यावरून असे स्पष्ट होते की, ब्रिक्स्चे चार देश ब्राझील, रशिया, भारत व चीन यांची आर्थिक स्थिती जागतिक दृष्टीने महत्वपूर्ण होती. परंतु दक्षिण आफ्रिकेची आर्थिक स्थिती या देशाच्या तुलनेत अत्यंत नाजूक आहे. ब्रिक्स देशात दक्षिण आफ्रिकेचा सहभाग हा राजनितीकतेमुळे होता. ब्रिक्स्चे सर्वच देश हे आर्थिक विकासाबरोबर मानव विकास निर्देशांकात मागे आहेत. यामुळे या देशाच्या आर्थिक विकासात अडथळे निर्माण होत आहेत. अल्प मनुष्यबळाच्या विकासामुळे या देशात दारिद्र्य व बेकारी मोठ्या प्रमाणात आहे. या सर्व घटकांचा आर्थिक विकासाच्या गतीवर परिणाम होत आहे.

## मूल्यमापन:

## ब्रिक्स् देशांची तुलनात्मक वैश्विक स्थिती

| अ.क्र. | क्षेत्र | देशाचे नाव व विश्वातील क्रमांक | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | ब्राझील | रशिया | भारत | चीन | द.आफ्रिका |
| १. | क्षेत्रफळ | ५ वा | १ ला | ७ वा | ३ रा | २५ वा |
| २. | जनसंख्या | ५ वा | ९ वा | २ रा | १ ला | २५ वा |
| ३. | श्रमशक्ती | ५ वा | ७ वा | २ रा | १ ला | ३४ वा |
| ४. | प्रतिव्यक्ती ए.राष्ट्रीय उत्पादन | ५५ वा | ५४ वा | १३७ वा | ९५ वा | ७१ वा |
| ५. | मानव विकास निर्देशांक | ७३ वा | ६५ वा | ११९ वा | ८९ वा | ११० वा |
| ६. | विदेशी गुंतवणूक | ११ वा | १२ वा | २९ वा | ५ वा | ३१ वा |
| ७. | लष्करावरील खर्च | १२ वा | ५ वा | १० वा | २ रा | ४३ वा |

*आधार : प्रतियोगिता दर्पण २०१२-१३*

ब्रिक्स् देशांच्या अर्थव्यवस्था एकमेकांना पूरक आहेत. या देशाच्या आर्थिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात सहयोग होण्याची संभावना आहे. ब्राझील, रशिया, भारत व चीन हे चार देश 'G-20' या देशाचे सदस्य असल्यामुळे अमेरिकेच्या वर्तमान व्यवस्थेत आपली भूमिका वाढवू इच्छितात. ब्रिक्स् देश हे लोकशाही तंत्र, बहुध्रुवीय व समतापूर्ण विश्वव्यवस्थेवर आधारलेले आहेत. यामुळे जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय मुद्रानिधीची प्रशासकीय व्यवस्था लोकशाही तत्वावर चालावी अशी या देशांनी मागणी केली आहे. ब्रिक्स् देश हे आर्थिक सहकार्याच्या उद्देशाने संघटित झाले असले तरी या देशांनी आपल्या कार्यक्षमतेचा विस्तार हळूहळू केला आहे. आर्थिक घटकाबरोबरच गैरआर्थिक घटक जसे संरक्षण, आतंकवाद व जलवायू परिवर्तन इत्यादी बाबींचा समावेश त्यांनी केला आहे.

ब्रिक्स् देशाचा आकार, लोकसंख्या व अर्थव्यवस्थेवरून असे स्पष्ट होते की, भविष्यात हे देश सामूहिक रुपात नव्या आर्थिक शक्तीने उभे राहतील. यासाठी या देशात योग्य आर्थिक धोरण व समन्वयाची गरज आहे. भारत व चीन या देशात व्यापक प्रमाणात आर्थिक क्षेत्रात सहयोग होऊ शकतो. परंतु या देशाचे राजकीय शत्रुत्व, संरक्षण व राजकीय मतभेद मोठ्या प्रमाणात असल्यामुळे सहयोगावर मर्यादा पडतात.

ब्रिक्स् देश जागतिक व्यवस्थेत निर्माण होणारी आर्थिक शक्ती आहे. जागतिक व्यवस्था लोकतांत्रिक बनविणे अशी त्यांची इच्छा आहे. त्यांच्या आर्थिक धोरणात सहकार्य असेलच असे नाही, परंतु जागतिक व्यवस्थेत ब्रिक्स् देशांचे स्थान महत्वपूर्ण असेल.

संदर्भ :

१. Jose Eduardo Cassiolato, *BRICS and development alternatives: Innovation systems and policies.* - Virginia Vitrorino-2011.
२. प्रतियोगिता दर्पण २०१२-१३.
३. Mukund Mahajan, *Indian Banking System,* 2011, Nirali Publications, Pune.
4. Stephanie Jones, *BRICS and Beyond: Lesson on Emerging Markets, 2012.*
5. Mishra Sukhvindar, *Introduction Law and Practice*, 2012, S.Chand Publications, New Delhi.

## 'अर्थसंवाद' : *आर्थिक महाराष्ट्र विशेषांक*

**त्वरित लेख पाठवा....**

*अर्थसंवाद: एप्रिल-जून २०१४* हा *आर्थिक महाराष्ट्र विशेषांक* प्रकाशित करावयाचा आहे. या विशेषांकासाठी आजीव सदस्यांनी सामान्यपणे ६/७ पृष्ठांचा लेख प्रमुख संपादकाकडे त्वरित पाठवावा. या विश्लेषणात्मक लेखांमध्ये शक्यतो तक्ता घेऊ नये. अगदीच आवश्यक असेल तर लहान आकाराचा तक्ता घ्यावा. या विशेषांकात जास्तीत जास्त संशोधनपर लेख प्रकाशित करता यावेत यासाठीच हे सूचित करण्यात आले आहे.

विशेषांकासाठी लेखांचे विषय याप्रमाणे आहेत-

१) महाराष्ट्राची अर्थव्यवस्था आणि संरचनात्मक बदल, २) महाराष्ट्रातील मानव विकास निर्देशांक, ३) महाराष्ट्रातील उर्जा संसाधन, ४) महाराष्ट्रातील पर्यटन उद्योग, ५) महाराष्ट्रातील शेती क्षेत्रातील वाटचाल, ६) महाराष्ट्राच्या शेती क्षेत्रातील कर्जबाजारीपणा, ७) महाराष्ट्रातील लघु, मध्यम व मोठ्या उद्योगांचा विकास, ८) महाराष्ट्राची आर्थिक वाटचाल, ९) महाराष्ट्रातील बँकिंग क्षेत्र १०) महाराष्ट्रातील बेकारी व दारिद्र्य, ११) महाराष्ट्रातील जलसिंचन व शेतीविकास, १२) नवीन आर्थिक धोरणाचे महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम १३) महाराष्ट्रातील शहरीकरण व विकास, १४) महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल, १५) महाराष्ट्राची अर्थव्यवस्था: विविध पैलू.

शोधनिबंध पाठविताना कृपया लेखकांनी फॉण्ट व इतर बाबींसंबंधी पृष्ठ ४१८ वरील चौकट पहावी.

- प्रमुख संपादक, अर्थसंवाद.

# वित्तीय समावेशन: अधिकोषण क्षेत्राची भूमिका

**विजय रमाकांतराव रोटे**, दिग्रस,
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
बा.बु.कला, ना.भ.वाणिज्य व बा.पा.विज्ञान महाविद्यालय,जि.यवतमाळ,
भ्रमणध्वनी: ९८८१८८२१९४

**करमसिंग राजपूत**, वणी,
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
लोकमान्य टिळक महाविद्यालय, जि. यवतमाळ
भ्रमणध्वनी: ९९२२५४८०८४

अधिकोषण सुविधेचे स्वरुप हे सार्वजनिक वस्तु प्रमाणे आहे. त्यामुळे कोणताही भेदभाव न करता संपूर्ण जनतेपर्यंत अधिकोषण सेवांची उपलब्धता निर्माण करणे हे सार्वजनिक धोरणांचे महत्वपूर्ण व प्रारंभिक उद्दिष्ट आहे. परंपरागत अधिकोषण व्यवस्थेमध्ये जनतेपर्यंत पोहचण्यामध्ये अनेक अडथळे आहेत. उदा. सांस्कृतिक, शैक्षणिक-वित्तीय निरक्षरता, लिंग, उत्पन्न व संपत्ती विषमता, ओळखीचा पुरावा, दुर्गम भौगोलिक स्थिती, तांत्रिक स्थिती इत्यादी. आज या सर्व अडथळयांची नव्याने चर्चा होत आहे.

सर्वसमावेशक वृध्दीच्या प्रक्रियेचे अंतस्थ चक्र हे वित्तीय समावेशन प्रक्रियेचे आहे. त्यामुळे सर्वसमावेशक वृध्दी निर्माण करणे व टिकविणे यासाठी वित्तीय समावेशन प्रक्रिया कार्यक्षम असणे आवश्यक आहे. भारतीय अर्थव्यवस्था जगामध्ये वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे. जागतिक वृध्दीदरापेक्षा (३.५%) भारतीय अर्थव्यवस्थेचा वृध्दी दर हा अधिक (५.८%) आहे. यामध्येही अधिकोषण क्षेत्राचे योगदान हे अधिक (१०%) आहे. त्यामुळे सर्वसमावेशक वृध्दीच्या प्राप्तीसाठी अधिकोषण क्षेत्राची भूमिका महत्वाची आहे. भारतातील अधिकोषण क्षेत्रामध्ये व्यापारी अधिकोष ८४, प्रादेशिक ग्रामीण अधिकोष १३३, गैर अधिकोष वित्तीय संस्था १३,०१४ आणि ११,७७७ सहकारी पतसंस्था आहेत. एवढ्या मोठ्या प्रमाणात अधिकोषण क्षेत्र असूनही भारतामध्ये मोठ्या प्रमाणात वित्तीय अपवर्जन आहे.

अधिकोष सेवांचा विस्तार, उपलब्धता व वापर या आधारावर तयार करण्यात आलेल्या वित्तीय समावेशन निर्देशांक नुसार भारतामध्ये वित्तीय समावेशनाबाबत महाराष्ट्र हा दुसऱ्या स्थानी आहे. महाराष्ट्राचे एकूण गुण हे ०.५३ एवढे आहेत. ९ मार्च २०१२ मध्ये भारतातील अनुसूचित व्यापारी अधिकोषांच्या एकूण कार्यालयापैकी ९% कार्यालये महाराष्ट्रात आहेत. देशातील अनुसूचित अधिकोषातील एकूण ठेवी पैकी २६ % ठेवी तर एकूण कर्ज रक्कमेपैकी २९% कर्ज रक्कम महाराष्ट्रातील अनुसूचित अधिकोषांकडे आहे. वित्तीय समावेशनाबाबत अधिकाषांच्या कार्याचा विचार केला असता मार्च २०१३ मध्ये राज्यातील अधिकोषांव्दारे ७१४४ वित्तीय दृष्ट्या अपवर्जीत गावांमध्ये अधिकोषांनी आपली सेवा सुरु केली आहे.

तसेच मार्च २०१२ पर्यंत अधिकोषांनी २२.५३ लाख प्राथमिक बचत ठेव खाते उघडली आहेत. महाराष्ट्रातील कर्ज ठेव गुणोत्तर हे ८७.१% एवढे आहे. असे असुनही महाराष्ट्रामध्ये २०११ च्या जनगणनेनुसार ३१% कुटुंबांजवळ अधिकोष खाते सुविधा नाही. त्यामुळेच प्रस्तुत लेखामध्ये महाराष्ट्रातील अधिकोष केंद्रीत वित्तीय समावेशनाचे कार्य व अनुसूचित व्यापारी अधिकोषाच्या प्रगतीचे विवेचन वित्तीय समावेशन दृष्टीकोणातून केले आहे.

### अधिकोष केंद्रीत वित्तीय समावेशन योजना:

महाराष्ट्रातील वित्तीय समावेशन योजना ही राष्ट्रीय पातळीवर चालणाऱ्या योजनेचा भाग आहे. रिझर्व्ह बँकेने आपल्या कर्ज धोरण मूल्यांकन मालीका २००६-०७ मध्ये वित्तीय समावेशन कार्याची मांडणी केली. जानेवारी २०१० मध्ये रिझर्व्ह बँकेने देशातील सर्व अधिकोषांसाठी वित्तीय समावेशन कार्याचा विशिष्ट योजना मार्ग तयार केला. त्यानुसार देशातील २००० पेक्षा अधिक लोकसंख्या असणाऱ्या व अधिकोष सुविधेपासून वंचित गावांमध्ये अधिकोष सुविधा उपलब्ध करुन देण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत. या योजनेला स्वाभिमान योजना हे नाव देण्यात आलेले आहे. या योजनेनुसार देशातील ७३ हजार गावांची निवड करण्यात येणार आहे. याशिवाय रिझर्व्ह बँकेद्वारा १६०० ते २००० लोकसंख्या असणाऱ्या व अधिकोष सुविधांपासून वंचित गावांसाठी वित्तीय समावेशनाची विशिष्ट वित्तीय समावेशन योजना आखली आहे. जिल्हा अग्रणी अधिकोषांच्या नेतृत्वाखाली ही योजना राबवली जाणार आहे. वरील दोन्ही योजनांचे महाराष्ट्रासंदर्भात विवेचन करणे गरजेचे आहे.

### राज्यस्तरावरील स्वाभिमान योजना (२००० पेक्षा अधिक लोकसंख्या असणारी गावे):

स्वाभिमान योजनेबाबतचा राष्ट्रीय दृष्टीकोन विचारात घेऊन राज्यस्तरीय बँकर्स समिती महाराष्ट्र राज्याद्वारे अनेक प्रकारची नाविन्यपूर्ण पाऊले वित्तीय समावेशन कार्याबाबत उचलली आहेत. ती कार्य पुढील प्रमाणे सांगता येतील.

१. प्रत्येक जिल्ह्यासाठी वित्तीय समावेशनाची व्यूहरचना तयार करण्यासाठी जिल्हा स्तरावर जिल्हा सल्लागार समितीची उपसमिती करण्याची सुचना सर्व जिल्हा अग्रणी अधिकोष व्यवस्थापकांना करण्यात आली आहे.
२. २००१ च्या जनगणनेनुसार २००० लोकसंख्येपेक्षा अधिक लोकसंख्या

असणाऱ्या गावांची तालुकानिहाय यादी तयार करणे व अशा अधिकोषण सेवा-सुविधेपासून वंचित गावांचे वाटप विविध अधिकोषांमध्ये करणे. हे कार्य जिल्हा सल्लागार समितीच्या-उपसमितीकडे सोपवण्यात आले आहे.

३. गावांचे वाटप हे सेवा क्षेत्र मार्गदर्शक तत्वे, अधिकोषांची शाखा उपलब्धता व अधिकोषांची सोयीस्करता या आधारावर करण्यात आले आहे.

४. २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्र राज्यामध्ये २००० लोकसंख्येपेक्षा अधिक ७३१२ गावे आहेत. त्यापैकी ४२९२ गावे अधिकोषण सेवा-सुविधेपासून वंचित आहेत. यासर्व गावांचे वाटप हे विविध अधिकोषांमध्ये एस.एल. बी.सी. च्या मान्यतेनुसार करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील अधिकोष सुविधेपासून वंचित ४२९२ गावांचे विभाजन खालील प्रमाणे आहे. पश्चिम महाराष्ट्र१६३७ गावे, मराठवाडा-९६८ गावे, विदर्भ-८५८ गावे, कोकण-४६० गावे, खानदेश-३६९ गावे.

५. या योजनेनुसार मार्च, २०१३ पर्यंत ४२९२ गावांमध्ये अधिकोष सेवा -सुविधा उपलब्ध करणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यासाठी नविन शाखा उघडणे. उपग्रह संचालित अधिकोष शाखा, मोबाईल अधिकोषण सेवांचा विस्तार, आय. सी.टी. आधारित व्यावसायिक मध्यस्थ व सुविधाकर्ते प्रारुपाची उभारणी इत्यादी उपायांचा अवलंब करण्यात येणार आहे.

६. भारत सरकारने ह्या योजनेकरीता अधिकोषांना ५०० कोटी रु. मंजुर केले आहेत. या स्वाभिमान योजनेतर्गत राष्ट्रीय स्तरावर ७३००० गावे निश्चित करण्यात आली आहे.

७. महाराष्ट्रामध्ये वित्तीय समावेशनाच्या कार्यामध्ये महाराष्ट्र बँकेची भुमिका ही समन्वयकाची आहे. महाराष्ट्र बँकेच्या नेतृत्वाखाली एस.एल.बी.सी.चे हे नाविन्यपूर्ण काम सुरु आहे.

## महाराष्ट्र राज्यातील वित्तीय समावेशन योजना:

१६०० ते २००० दरम्यान लोकसंख्या असणाऱ्या अपवर्जीत गावांमध्ये अधिकोष सेवा-सुविधेचा विस्तार करण्यासाठी जिल्हा अग्रणी अधिकोषांची भुमिका महत्वाची आहे. देशामध्ये २००० लोकसंख्येपेक्षा अधिक लोकसंख्येच्या गावांमध्ये वित्तीय समावेशनाचे कार्य सूरु असतानाच देशातील २०००पेक्षा कमी लोकसंख्या असणारी ४.९० लाख गावांमध्ये सुध्दा अधिकोष सेवा सुविधा पोहोचवण्याचे निश्चित करण्यात आले.

त्यासाठी माहिती व तंत्रज्ञानावर आधारित व्यावसायिक मध्यस्थ प्रतिमानाचा वापर करण्यात येणार आहे. महाराष्ट्रामध्ये १६०० ते २००० लोकसंख्या असणाऱ्या व अधिकोष सेवा सुविधेपासून वंचित गावांची संख्या ही २८५२ एवढी आहे. त्यागावांचे विभाजन हे पूढील प्रमाणे मांडता येते. पश्चिम महाराष्ट्र-८९७ गावे, मराठवाडा-६६१ गावे, विदर्भ-६७५ गावे, कोकण-४३१ गावे, खानदेश -२७८ गावे.

वरील दोन्ही वित्तीय समावेशन योजनेतंर्गत अधिकोष सुविधेपासून वंचित गावांचे अधिकोष निहाय वितरण हे तक्ता क्रमांक १ मध्ये दर्शावले आहे.

अपवर्जीत गावांचे अधिकोषनिहाय वितरण(स्वाभिमान योजना व अग्रणी अधिकोष योजना)

| अ.क्र. | महाराष्ट्रातील अधिकोषाचे नाव | अपवर्जीत गावांची संख्या |
|---|---|---|
| १. | अलाहाबाद बँक | ४७ |
| २. | आंध्रा बँक | ०२ |
| ३. | बँक ऑफ बडोदा | २६३ |
| ४. | महाराष्ट्र बँक | १४४१ |
| ५. | कॅनरा बँक | ६७ |
| ६. | सेंट्रल बँक ऑफ इंडिया | ७२८ |
| ७. | कॉर्पोरेशन बँक | ०३ |
| ८. | देना बँक | २६७ |
| ९. | इंडियन बँक | २२ |
| १०. | बँक ऑफ इंडिया | ८५९ |
| ११. | इंडियन ओव्हरसिज बँक | २९ |
| १२. | ओरिएंटल बँक ऑफ कॉमर्स | ०७ |
| १३. | पंजाब नॅशनल बँक | ४१ |
| १४. | स्टेट बँक ऑफ हैद्राबाद | ३७९ |
| १५. | स्टेट बँक ऑफ इंडिया | १३९९ |
| १६. | सिंडिकेट बँक | ७४ |
| १७. | युनियन बँक ऑफ इंडिया | ३३६ |
| १८. | युको बँक | ४८ |
| १९. | विजया बँक | ०६ |
| २०. | आय.डी.बी.आय. | १३७ |
| | स्टेट बँक व राष्ट्रीयीकृत अधिकोष एकुण | ६१५५ |
| २१. | महाराष्ट्र ग्रामीण अधिकोष | ५९५ |
| २२. | विदर्भ व कोकण ग्रामीण अधिकोष | ११९ |
| २३. | वैणगंगा क्षेत्रिय ग्रामीण अधिकोष | १५१ |
| | प्रादेशिक ग्रामीण अधिकोष एकूण | ८६५ |
| २४. | आय. सी. आय. सी. आय. अधिकोष | ९७ |
| २५. | रत्नाकर अधिकोष | २५ |
| २६. | एच. डी. एफ. सी. | ०१ |
| २७. | कर्नाटका अधिकोष | ०१ |
| | खाजगी अधिकोष एकूण | १२४ |
| | गावांची एकूण संख्या | ७१४४ |

*Source:Maharashtra Bank convener- State Level Bankar's Committee.*

महाराष्ट्र राज्यातील ७१४४ अधिकोष सुविधा रहीत गावांचे वितरण राज्यातील सर्व अनुसूचित अधिकोषांना कशा प्रकारे केले आहे. याचे विवरण तक्ता क्रमांक १ मध्ये दिलेले आहे. यानुसार ६१६२ गावांचे वितरण हे स्टेट बँक व राष्ट्रीयीकृत अधिकोषांमध्ये करण्यात आलेले आहे. तर ८२९ गावे ही राज्यातील क्षेत्रिय ग्रामीण अधिकोषांमध्ये वितरित करण्यात आली आहेत. १२४ गावे ही खाजगी अधिकोषांकडे देण्यात आली आहेत. सदर गावांमध्ये अधिकोषण सेवा सुविधा उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी सबंधित अधिकोषांची राहणार आहे.

२.महाराष्ट्रातील वित्तीय समावेशन प्रक्रीयेमध्ये अधिकोषण व्यवस्थेच्या भूमिकेचे विश्लेषण:

२००७-०८ ते २०११-१२ या कालावधीमध्ये अधिकोष व्यवस्थेचा विस्तार व अधिकोष सेवा सुविधेचा विस्तार वित्तीय समावेशनाच्या दृष्टीने कशाप्रकारे झाला याचे विवेचन खालील प्रमाणे सांगता येते.

२.१. अधिकोषण व्यवस्थेचा विस्तार:

महाराष्ट्रातील अनुसूचित व्यापारी अधिकोषांचे वित्तीय समावेशन कार्याचे विश्लेषण करण्यासाठी महाराष्ट्रातील अधिकोष व्यवस्थेच्या विस्तारामध्ये त्यांचे योगदान विचारात घेता येते. अधिकोष व्यवस्थेच्या विस्ताराचे स्पष्टीकरण करण्यासाठी महाराष्ट्रातील अधिकोष खाते सुविधा धारक कुटूंब संख्या, अधिकोषांच्या कार्यालयांचा विस्तार, अधिकोषांचा भौगोलिक व लोकसंख्या संदर्भातील शाखा विस्तार या घटकांचा विचार करता येतो.

१. महाराष्ट्रातील अधिकोष खाते धारक कुटूंबसंख्या : २००१ च्या जनगणनेनुसार राज्यातील ४८ प्रतिशत कुटुंबांजवळ अधिकोष खाते सुविधा होती याचा अर्थ ५२ प्रतिशत कुटुंबे ही अधिकोष सुविधेपासून वंचित होती. ग्रामीण भागातील फक्त ३९.४ टक्के कुटुंबाजवळ खाते सुविधा होती. २०११ च्या जनगणनेनूसार महाराष्ट्रात खातेधारक कुटूंबांचे प्रमाण ६८.८ प्रतिशत झाले २.३८३ कोटी एकूण कुटूंबापैकी १.६४१ कोटी कुटूंबांजवळ अधिकोष खाते सुविधा होती. याचा अर्थ मागील दहावर्षामध्ये अधिकोष खाते सुविधा धारक कुटूंबांचे प्रमाण हे २० टक्के वाढले आहे. ग्रामीण भागातील खाते धारक कुटुंबांचे प्रमाणही २०११ मध्ये ६२.९४% एवढे झाले. अनुसूचित अधिकोषांच्या वित्तीय समावेशनाच्या कार्यामुळे खातेधारक कुटूंबांच्या प्रमाणात वाढ होत आहे. परंतु अजूनही महाराष्ट्रात खाते सुबिधेपासून वंचित कुटूंबाचे प्रमाण हे ४१ टक्के एवढे प्रचंड आहे.

२.महाराष्ट्रातील अनुसूचित व्यापारी अधिकोष कार्यालयांचा विस्तार:

मार्च २००७ मध्ये महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित अधिकोष कार्यालयांची संख्या ६९६५ एवढी होती. भारतातील एकूण कार्यालयांच्या ९.४ प्रतिशत अधिकोष कार्यालये महाराष्ट्रात होती. या काळात ७० विदेशी अधिकोष कार्यालये महाराष्ट्रात होती. महाराष्ट्रातील ४७.३३ प्रतिशत अधिकोष कार्यालये ही ग्रामीण व निमशहरी भागामध्ये होती. मार्च २०१२ मध्ये महाराष्ट्रातील एकूण अधिकोष कार्यालयांची संख्या २०८८ एवढी वाढली. ही वाढ २९.९ प्रतिशत आहे. परंतु ग्रामीण भागातील अधिकोष कार्यालयांची संख्या ही फक्त २७४ एवढी वाढली. हे प्रमाण१३.२७ प्रतिशत एवढे आहे. मेट्रो शहरांमध्ये अधिकोष कार्यालयांची संख्या २००७ च्या तुलनेत २०१२ मध्ये ७४७

नी वाढली. वाढीतील हे प्रमाण २७.४३ प्रतिशत आहे.

३.महाराष्ट्रातील अनुसूचित अधिकोषांचा लोकसंख्या व भौगोलीक शाखा विस्तार:

२००७ ते २०१२ महाराष्ट्रातील भौगोलीक शाखा विस्तार वाढलेला दिसतो. २००७ मध्ये प्रती १००० चौ. कि. मी. क्षेत्रफळामध्ये अनुसूचित अधिकोषाच्या २२.६३ शाखा उपलब्ध होत्या. मार्च २०१३ मध्ये ही संख्या २९.८३ शाखा एवढी झाली. म्हणजेच प्रती हजार चौ. कि. मी. क्षेत्रात ७ शाखांची वाढ झालेली दिसते. याचा अर्थ ग्रामीण व दुर्गमभागामध्ये शाखाविस्तार हा चांगला आहे. लोकसंख्ये संदर्भात अनुसूचित अधिकोषांचा शाखा विस्ताराचा विचार करता महाराष्ट्रामध्ये जून २००७ मध्ये दर लाख लोकसंख्येमागे ६.३ अधिकोष शाखा होत्या जून २०१३ हे प्रमाण ८.१० एवढे झाले. म्हणजेच २००७ ते २०१३ या काळात दर लाख लोकांमागे १.८ शाखांची भर पडली.

२.२ अधिकोषण सेवा-सुविधेचा विस्तार: वित्तीय सेवा सुविधेची उपलब्धता हा वित्तीय समावेशनाचा महत्वाचा निर्धारक घटक आहे. महाराष्ट्रातील वित्तीय समावेशनाच्या कार्यामुळे अनुसूचित व्यापारी अधिकोषांच्या वित्तीय सेवा सुविधेचा विस्तार कशा प्रकारे वाढत आहे याचे विश्लेषण करणे गरजेचे आहे. अनुसूचित व्यापारी अधिकोषांची ठेव व कर्ज खाते सुविधेचा विस्तार ग्रामीण भागातील ठेव व कर्ज खात्यांचा विस्तार, प्रती शाखा व प्रती माणसी कर्ज व ठेव रक्कम स्थिती, प्राधान्य क्षेत्रातील कर्ज पुरवठा प्रमाण, अधिकोष संलग्नित बचत गटांचा विस्तार इत्यादी निकषाच्या आधारे अधिकोष सेवा सुविधेच्या विस्ताराचे विश्लेषण पुढीलप्रमाणे करता येते.

१.महाराष्ट्रातील अनुसूचित अधिकोषांची ठेव व कर्ज खात्याची स्थिती:

ठेवसुविधा ही वित्तीय समावेशनाची प्राथमिक अट आहे. २००७ ते २०१२ या काळामध्ये ठेव खात्यांची संख्या ही ५ कोटीने वाढली आहेत. मार्च २००७ मध्ये महाराष्ट्रातील अनुसूचित अधिकोषांमध्ये ५.६७ कोटी ठेव खाती होती व त्यातील रक्कम ही ६.५५ लाख कोटी होती. मार्च २०१२ मध्ये ठेव खात्याची संख्या ही १०.०३ कोटी झाली व त्यामधील रक्कम ही १७.८५ कोटी एवढी झाली. २००७ ते २०१२ या काळाचा विचार करता महाराष्ट्रातील ठेव खात्याच्या संख्येतील वाढ ७४ प्रतिशत व कर्जरकमेतील वाढ ही १०० प्रतिशत आहे.

महाराष्ट्रातील अनुसूचित अधिकोषाच्या कर्ज खाते सुविधेचा विचार करता मार्च, २००७ मध्ये कर्ज खाते संख्या ही १.३९ कोटी व कर्ज रक्कम ही रु.६.३४ लाख कोटी एवढी होती. मार्च २०१२ मध्ये कर्जखाते संख्या ही २.४२ कोटी तर कर्ज रक्कम ही रु.१३.८८ लाख कोटी एवढी झाली. सदर काळामध्ये कर्ज खाते संख्या व कर्ज रक्कमेतील वाढ ही दुप्पट झाली आहे.

मार्च २०१२ मध्ये महाराष्ट्रातील सर्व प्रकारच्या ठेव खात्यांची संख्या व रक्कम वाढलेली दिसते. चालू खात्यांची संख्या ३.७ लाख एवढी होती व ठेव रक्कम ही १.७५ लाख कोटी रुपये होती. बचत खात्यांची संख्या ७.४४ कोटी व ठेव रक्कम २.०५ लाख कोटी रुपये, मुदत खात्यातील संख्या ही २.२ कोटी तर ठेव रक्कम ही ११.४८ लाख कोटी रुपये होती. महाराष्ट्रातील

अनुसूचित व्यापारी अधिकोषांचा ठेव व कर्ज खात्यांचा विचार लोकसंख्यागटासंदर्भात केल्यास महाराष्ट्रातील ग्रामीण, शहरी व मेट्रो गटांमध्ये ठेव रक्कमेत वाढ झाली आहे पण ग्रामीण लोकसंख्या गटापेक्षा मोठ्या शहरातील वाढ ही प्रचंड आहे. हीच प्रवृत्ती कर्ज खात्याबाबतही दिसते.

मार्च २००७ मध्ये महाराष्ट्रातील अनुसूचित व्यापारी अधिकोषांनी ग्रामीण भागामध्ये ३२.९९ हजार कोटी रुपयांची ठेव रक्कम जमा केली होती. मार्च २०१२ मध्ये ग्रामीण भागातील ठेव रक्कम ९३.०४ हजार कोटी होती. ग्रामीण भागातील ठेव रकमेत वाढ झाली आहे. महाराष्ट्रातील मोठया शहरी भागांमध्ये ठेव रक्कम ही प्रचंड प्रमाणात वाढली आहे. मार्च २००७ मध्ये शहरी भागामध्ये ५.९१ लाख कोटी रक्कम ठेव खात्यांमध्ये होती. मार्च २०१२ मध्ये १४.१८ लाख कोटी रुपये ठेव रक्कम होती. शहरी भागातील ठेव रक्कमेत प्रचंड वाढ झाली आहे. ही वाढ ग्रामीण भागातील वाढीपेक्षा खूप अधिक आहे.

महाराष्ट्रातील अनुसूचित व्यापारी अधिकोषांनी मार्च २००७ मध्ये ग्रामीण भागामध्ये २५.०७ हजार कोटी रुपयांचे कर्ज वितरित केले. मार्च २०१२ मध्ये कर्जखाते रक्कमेत ७१.३० हजार कोटी रुपये एवढी वाढ झाली आहे. मागील सहा वर्षातील कर्ज खात्यांचा विस्तार महाराष्ट्रातील ग्रामीण भागामध्ये मोठ्या प्रमाणात झाला आहे. परंतु मोठया शहरी भागाचा कर्जखाते विस्तार खूप जास्त आहे. मार्च २००७ मध्ये ५.९२ लाख कोटी रक्कम कर्ज खात्यामध्ये वितरित करण्यात आली. मार्च २०१२ मध्ये ११.३५ लाख कोटी रुपये हे कर्जखात्यामध्ये वितरित करण्यात आले.

२.महाराष्ट्रातील अनुसूचित अधिकोषांची प्रतिशाखा व प्रतिमाणसी ठेव व कर्ज रक्कमः

महाराष्ट्रातील अनुसूचित व्यापारी अधिकोषांची प्रतीशाखा ठेव रक्कम मार्च २००७ मध्ये ९४ कोटी रुपये होती. मार्च २०१२ मध्ये यात मोठी सुधारणा झाली व ही रक्कम प्रतीशाखा १७६ कोटी रुपये एवढी झाली. प्रतीशाखा कर्ज रक्कम ही मार्च २००७ मध्ये ९१ कोटी रुपये होती. मार्च २०१२ मध्ये प्रतीशाखा कर्ज रक्कम ही १३९ कोटी रुपये एवढी झाली.

महाराष्ट्रातील अनुसूचित व्यापारी अधिकोषांची प्रती माणसी ठेव रक्कमभार्च २००७ मध्ये ६४११७ रुपये होती. मार्च २०१२ मध्ये ही रक्कम १३९५७२ रुपये एवढी झाली. प्रती माणसी कर्ज रक्कमेचा विचार करता मार्च २००७ मध्ये ५९,२१७ रुपये प्रतीमाणसी कर्ज रक्कम होती. मार्च २०१२ मध्ये यात सुधारणा झाली व ही रक्कम प्रतीमाणसी १२१५४३ रुपये एवढी झाली.

३. महाराष्ट्रातील अनुसूचित अधिकोष संलग्नीत बचत गटांची ठेव व कर्ज खाते स्थिती:

महाराष्ट्रामध्ये चालणाऱ्या वित्तीय समावेशन प्रक्रीयेमध्ये अधिकोष संलग्नित बचत गट प्रारुपाची भूमिका महत्वाची आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील बचत गटांच्या माध्यमातून अनुसूचित व्यापारी अधिकोषांनी आपल्या अधिकोष सेवा सुविधेचा विस्तार कशा प्रकारे केला आहे ते बघणे आवश्यक आहे. त्यासाठी मार्च २००८ ते मार्च २०१२ या काळातील अधिकोष संलग्नित बचत गटांची कर्ज व ठेव खात्याची स्थिती समजून घेणे महत्वाचे ठरेल.

मार्च २००८ मध्ये अधिकोष संलग्नित

बचत गट ठेव खाते संख्या ३.८ लाख होती व त्यामध्ये २६७ कोटी रुपयांच्या ठेवी शिल्लक होत्या. मार्च २०१२ मध्ये बचत गट ठेव खात्यामध्ये नगण्य वाढ झाली पण ठेव रक्कम मात्र ७२४ कोटी रुपये एवढी झाली.

मार्च २००८ मध्ये अधिकोष संलग्नित बचत गट कर्ज खाते संख्या ४.०९ लाख होती व त्यावर १०२१ कोटी रुपयांचे कर्ज देण्यात आले होते. मार्च २०१२ मध्ये बचत गट कर्ज खात्याची संख्या २.१४ लाख झाली म्हणजे बचत गट कर्ज खात्याची संख्या सदर काळामध्ये घटली आहे. परंतु कर्ज रक्कमेत मात्र वाढ झाली आहे. मार्च २०१२ मध्ये बचत गटांना ११६३ कोटी रुपयांचे कर्ज देण्यात आले.

**निष्कर्ष व उपाययोजना:**

१. महाराष्ट्रातील अधिकोष केंद्रीत वित्तीय समावेशाची स्थिती वरुन असे स्पष्ट होते की, अधिकोषांमध्ये अधिकोष खाते काढून फारसा फायदा नाही तर त्या खात्यावर विविध कर्ज सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

२. कर्ज वितरण व ठेव खात्याची स्थिती बघता ग्रामीण भागापेक्षा मोठी शहरे व मुंबई शहरामध्ये मोठया प्रमाणावर अधिकोष व्यवस्थेचा व अधिकोष सेवा सुविधेचा विस्तार झालेला दिसून येतो. वित्तीय समावेशनामधील ही विषम प्रवृत्ती दूर करणे गरजेचे आहे.

३. महाराष्ट्रात अधिकोष संलग्नित बचत गट प्रारुप व माहिती तंत्रज्ञान आधारित व्यावसायिक मध्यस्थ प्रारुपाचा विकास ग्रामीण भागामध्ये होणे गरजेच आहे.

४. वित्तीय समावेशन कार्याचा नकारात्मक परीणाम हा अधिकोषांच्या व्यावसायिक कार्यक्षमतेवर होत आहे. हे टाळण्यासाठी कमी खर्चीक वित्तीय उत्पादने, तंत्रज्ञानाचा वापर इत्यादी उपायांचा अवलंब करणे गरजेचे आहे.

५. वित्तीय साक्षरता ही वित्तीय समावेशनाची प्राथमिक अट आहे. ग्रामीण भागातील निरक्षर जनतेमध्ये वित्तीय जागरुकता निर्माण करणे आवश्यक आहे. महाराष्ट्रातील ग्रामीण जनतेला वित्तीय सेवा सुविधेची माहिती करुन देण्यामध्ये अनुसूचित अधिकोषांची भूमिका महत्वाची आहे. परंतु याबाबत अधिकोषांची प्रगती संथ गतीने चालू आहे.

६. महाराष्ट्रातील वित्तीय समावेशन प्रक्रियेमध्ये महाराष्ट्रातील सहकारी अधिकोषांची भुमिका नगण्य आहे. वित्तीय दृष्ट्या अपवर्जीत गावांपैकी एकाही गावाची जबाबदारी सहकारी अधिकोषांवर टाकण्यात आलेली नाही. वित्तीय समावेशनाच्या या प्रक्रियेत सहकारी अधिकोषांची भूमिका निश्चित करणे गरजेचे आहे.

७. महाराष्ट्रातील शहरी भागामध्येही वित्तीय दृष्ट्या अपवर्जीत लोक आहेत. २०११ च्या जनगणेनुसार २८ टक्के शहरी कुटुंबाजवळ अधिकोष खाते सुविधा नव्हती. अशा शहरी लोकसंख्येसाठी वित्तीय सेवा सुविधा उपलब्ध करण्याचे प्रयत्न अधिकोषांमार्फत होणे गरजेचे आहे.

संदर्भ सूची:

1. *Annual Report -2006-07 & 2011-*

12] RBI

2. *Maharashtra Bank-Convener' State Level Banker's Committee'*
3. *Report of the Committee on Financial Inclusion*. [Dr. C. Rangarajan Commitee], 2008
4. *Census of India, 2001 and 2011*, H -Series
5. Basic Statistical Return of Scheduled Commercial Bank in India, RBI.
6. *महाराष्ट्राची आर्थिक पाहणी*, २००७ ते २०१२-१३ पृष्ठ क्रमांक ७९.
7. Dr. chakrabarty, RBI, *"Financial Inclusion - Issues in measurement and Analysis Keynote Address at the Bis-BNM workshop on Financial Inclusion Indicators at Kualalumpur on November 2012.*
8. Dr. Chakrabarty K.C. [2011] *"Financial Inclusion and Banks : Issues and Perspectives"* RBI Bulletin, November, 2011.
9. Dr. Deepali pant Joshi, [2013 ] Executive Director, RBI,. *" Financial Inclusion "* Speech delivered at the $V^{th}$ Dun and Bradstreet Conclave on Fincancial Inclusion, Kolkata, RBI Monthly Bulletin, November, 2013.


---


**मराठी अर्थशास्त्र परिषद**

**अर्थसंवादसाठी अनुदान**

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या विनंतीला प्रतिसाद देऊन भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, दिल्ली यांचेकडून २०१३-१४ या वर्षात अर्थसंवादसाठी रु.१,५०,०००/- चे अनुदान प्राप्त झालेले आहे. त्याबद्दल मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने मी त्यांचा ऋणी आहे.

- डॉ. अनिल सूर्यवंशी, कार्यवाह-खजिनदार,
मराठी अर्थशास्त्र परिषद

# अर्थव्यवस्थेतील परिणामकारक घटक: काळापैसा

वंदना कटारे, औरंगाबाद,
संग्रामनगर, नवीन सातारा परिसर,
भ्रमणध्वनी: ९७६४८४३११५
Email ID- vandanaakataare2@gmail.com

भारतीय अर्थव्यवस्था ही जगातील ११ व्या क्रमांकाची अर्थव्यवस्था समजण्यात येते. भारतीय अर्थव्यवस्था जगातील सर्वात मोठ्या अर्थव्यवस्थांपैकी एक आहे. अर्थव्यवस्थेवर अनेक घटकांचा चांगला-वाईट परिणाम होत असतो, जसे की सरकारची धोरणे लोकसंख्या, बेरोजगारी, परकीयांचा हस्तक्षेप, मंदी, गरिबी, काळा पैसा, भ्रष्टाचार इ. भारतीय अर्थव्यवस्था प्रचंड मोठी असल्याने बऱ्याच वेळेला काही घटकांच्या वाईट परिणामांना रोखणे / आळा घालणे शक्य होत नाही. अशा समस्या दीर्घकाळपर्यंत अर्थव्यवस्थेत असल्या तर त्या विकृत रुप धारण करतात व अर्थव्यवस्थेला पोखरून खिळखिळी बनवतात.

**काळा पैसा - व्याख्या:**

काळ्या पैशाची सर्वसामान्य एकच अशी व्याख्या नाही. काळ्या पैशाला अनेक समानार्थी शब्द वापरण्यात येतात जसे काळे उत्पन्न, काळी संपत्ती, भूमिगत पैसा, काळी अर्थव्यवस्था, समांतर अर्थव्यवस्था, Shadow Economy, Unofficial Economy, दोन नंबरचा पैसा इ.

जो पैसा बेकायदेशीर मार्गाने मिळवला जातो आणि ज्याची कुठेही नोंद केलेली नसते तो पैसा काळा पैसा म्हणुन समजण्यात येतो. ÷÷आयकर खात्याचा कर बुडवुन लपवुन ठेवलेला पैसा'' अशी काळ्या पैशाची व्याख्या केली जाते. भारतातल्या लोकांनी परदेशी बँकांत अनधिकृतपणे ठेवलेला पैसा म्हणजे काळा पैसा होय.

**काळ्या पैशाची निर्मिती:**

काळा पैसा दोन मार्गांनी निर्माण होत असतो.

१.बेकायदेशीर कामे:

काळ्या पैशाचा हा एक अतिशय मोठा प्रमुख स्त्रोत आहे. अनेक

प्रकारच्या बेकायदेशीर कामातुन काळा पैसा प्रचंड प्रमाणात निर्माण केला जातो. जसे किडनॅपिंग, स्मगलिंग, दारू व्यवसाय, फसवणूक, घोटाळे, भ्रष्टाचार, आतंकवाद इ. मार्गाचा अवलंब करून काळा पैसा निर्माण केला जातो. तसेच लाच घेणे-देणे, खंडणी, कॉपीराईट वस्तूंची विक्री करणे उदा. सॉफ्टवेअर, म्युझीक रेकॉर्डींग, शस्त्रे इ.

२.उत्पन्न लपवणे:

टॅक्स भरण्यायोग्य उत्पन्न सरकारपासुन लपवुन काळा पैसा निर्माण केला जातो. मोठ्या कंपन्याना काही प्रमाणात सरकार कर माफी देते. तेव्हा हजारो रुपयांचा काळा पैसा निर्माण होऊन तो परदेशी बँकात जमा केला जातो. मोठ्या कंपन्याना बंधनकारक असलेल्या आयकरातून सरकार जी सूट देते त्यातुन २४० कोटी रु. चा प्रतिदिनी केंद्र सरकारच्या खजिन्याला फटका बसतो तेवढीच रक्कम बेकायदेशीर काळ्या पैशाच्या रूपाने भारताबाहेर परदेशी बँकेत जमा होते.

करभरणा करणाऱ्या काही निवडक उद्योग-उद्योजकांना ÷करातून सूट' या नावाखाली २०११ च्या अर्थसंकल्पात ८८,२६३ कोटी रु. एवढी प्रचंड रक्कम ठेवली होती. दरवर्षी अशा सोयी, सुट, सवलती, देण्याने देशाच्या खजिन्यामध्ये मोठे नुकसान होते व दरवर्षी हे नुकसान वाढत जात आहे. २००६-०७ मध्ये असे नुकसान २.४ कोटी रु. होते. वाढत जाऊन २०१० मध्ये ते ५.७ लाख कोटी रु. झाले महसुल माफीचे महसुल वसुलीशी असलेले प्रमाण वाढत चाललेले आहे. २००६-०७ मध्ये ते ५० टक्के होते तर २०१० मध्ये ते ८० टक्के झाले. (स्त्रोतः ÷÷भ्रष्टाचारच्या वणव्यात भारत'', मेधा थत्ते पृ. ८)

काळ्या पैशाची निर्मिती अनेक क्षेत्रातुन केली जाते. जसे खाण उद्योग, टेलीकॉम उद्योग, सेझ, जमीन, घराची खरेदी-विक्री. तसेच आता तर शिक्षण क्षेत्रातुन देखील काळा पैसा निर्माण केला जातो. बालवाडीपासून ते उच्च शिक्षणापर्यंत खासगीकरण व बाजारीकरण झालेले आहे. शिक्षण संस्थाना प्रचंड देणग्या, कॅपिटेशन फी द्यावी लागते. शिक्षण संस्था प्रचंड प्रमाणात शिक्षण फी आकारतात विद्यार्थ्यांना ॲडमिशन घेण्याआधी प्रचंड डोनेशन भरावे लागते. त्या डोनेशनची कुठेही नोंद केली जात नाही. शिक्षण क्षेत्रात असा काळा पैसा डी.एड्., बी.एड्., वैद्यकीय आणि अभियांत्रिकी शिक्षण संस्थेत प्रचंड प्रमाणात निर्माण होत असतो.

जमीन, घर, खरेदी विक्रीच्या व्यवहारात प्रचंड काळा पैसा निर्माण केला जातो हे पुढील उदाहरणावरून स्पष्ट करता येईल. उदा. घराचे/जमिनीची नोंदणी करतांना त्यात दोन व्हॅल्युज असतात. १.सरकारचा रेट २.बिल्डरचा रेट. बिल्डरचा रेट हा सरकारच्या रेट पेक्षा जास्त असतो. भारतात सर्वात जास्त भ्रष्टाचार याच क्षेत्रात केला जातो. समजा बिल्डर ६० लाखाच्या घराची / जमिनीच्या खरेदी विक्रीचा व्यवहार करतांना त्या घरांची मूळ किंमत न दाखवता कमी दाखवेल. कारण ६० लाख रु. वर त्याला ६ ते ७ टक्के व्याज म्हणजेच ३ लाख ६० हजार रु. सरकारच्या तिजोरीत कर स्वरूपात जमा करावे लागतील, एवढी मोठी रक्कम तो टॅक्स स्वरुपात भरण्यास कधीही तयार होत

नाही म्हणुन घरमालक व बिल्डर मिळुन त्या घराची किंमत कमी दाखवतात जेणेकरून कमीत कमी टॅक्स भरावा लागेल उरलेल्या रक्कमेचे व्यवहार कॅशने करतात. त्याच घरांची किंमत बिल्डर ३० ते ३५ लाख रु. दाखवेल व त्यावर लागणारा कमी टॅक्स तो सरकारला देईल व उरलेली रक्कम म्हणजे जवळपास एक ते दिड लाख रु. तो स्वत: घेतो अशा प्रकरणात शेवटपर्यंत सरकारला घराची खरी किंमत कळतच नाही व सरकारी तिजोरीत पुर्णपणे टॅक्स जमा होत नाही.

नोंदणी कार्यालयातील नोंदणी करणाऱ्या अधिकाऱ्याला त्या घराची मूळ किंमत माहित असते पण त्याने आपल्या व्यवहारात हस्तक्षेप करू नये, आपला व्यवहार थांबू नये म्हणुन त्याला गप्प करण्यासाठी बिल्डर त्याला काही रक्कम लाच स्वरूपात देतो. अशाप्रकारे भ्रष्टाचाराचे दुष्टचक्र चालते व काळा पैसा निर्माण करण्याची सायकल पूर्ण होते.

विदेशी व्यापार क्षेत्रात डॉलर सारखी करन्सी महत्त्वाची असते. आयात-निर्यात व्यवहारात वस्तूची मूळ किंमत न दाखवता खोटी किंमत दाखवण्यात येते. निर्यातीमध्ये इन्व्हॉइसमध्ये वस्तूची कमी किंमत दाखवली जाते व उरलेले पैसे परदेशी बँकेत जमा केले जातात. तसेच परदेशातून माल आयात करतांना जेवढ्या किंमतीचा माल असेल त्यापेक्षा अधिक किंमतीचे बिल बनवून जास्तीचे पैसे परदेशात पाठवणे शक्य असते.

शास्त्रज्ञ, सल्लागार, तंत्रज्ञ, उद्योजक, विचारवंत विविध कामासाठी परदेशात जातात व त्यांचा मोबदला त्यांना तेथे मिळतो ते तो मोबदला भारतात न आणता तेथील बँकेत जमा करतात.

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत तीव्र स्पर्धेच्या वातावरणात भ्रष्टाचार हा अपवाद व गुन्हा न ठरता तो अलिखित शिष्टाचार बनला आहे. काळ्या पैशाने भारतात समांतर अर्थव्यवस्था निर्माण केलेली आहे. काळ्या पैशाचा प्रचंड ओघ देशाबाहेरील बँकेत जातो. GFI (ग्लोबल फायनान्सियल इंटेग्रीटी) च्या अभ्यासानुसार ७२% बेकायदेशीर संपत्ती देशाबाहेर हलविली जाते तर २८% देशात ठेवलेली आहे. नवीन आर्थिक धोरणांच्या कालावधीत काळा पैसा प्रचंड वेगाने वाढला आहे. १९९१ पूर्वी तो GDP च्या २७.४% होता तर १९९१ नंतर काळ्या पैशाचे प्रमाण वाढून ते ४२.८% झाला आहे. १९९१ पूर्वी त्याच्या वाढीचा वेग ९.१% होता तोच १९९१ नंतर १६.४ झाला आहे. वास्तवात काळ्या पैशाचे प्रमाण जेवढे आहे त्यापेक्षा कमी दिसेल असे निष्कर्ष तज्ज्ञ व्यक्तीकडून काढले जात असले तरी त्याचे चित्र फार विदारक आहे. पण हा माफक अंदाज सुध्दा भारताच्या एकूण परकीय कर्जाच्या दुप्पट येतो. (स्त्रोत - भ्रष्टाचाराच्या वणव्यात, मेधा थत्ते पृ.१३) २००८ साली भारतावर जो परकीय कर्जाचा बोजा होता (२०३.६ अब्ज डॉलर - म्हणजेच १०,१०८ अब्ज रु.) त्यापेक्षा परदेशी ठेवलेल्या काळ्या पैशांची साठवणूक दुप्पट होती.

भारतातून परदेशी बँकेत हा पैसा पाठवण्यासाठी बऱ्याच वेळेला ÷हवाला' पद्धतीचा उपयोग करण्यात येतो कारण ही हवाला पद्धत कमीतकमी पेपरवर्क, जबरदस्त विश्वसनीयता,

अत्यंत गुप्तता आणि अतिशय चलाखी व तत्परतेने चालवला जातो. साधारणतः हा काळा पैसा स्वित्झर्लंड मधील बँकेत/स्वीस् बँकेत तसेच अनेक छोट्या-मोठ्या बेटांवरील बँकामध्ये ठेवला जातो. या बँका त्यावर कसलेही व्याज देत नाही परंतु प्रचंड गुप्तता पाळली जाते.

थोडक्यात, अतिश्रीमंत होण्याचा हव्यास, कायद्यातील त्रूटी, कायद्यातील पळवाटा, अपुरी शिक्षा, सत्तांचे केंद्रीकरण आणि सरकारचे अभय या सर्व कारणांमुळे काळा पैसा निर्माण होतो.

**काळ्या पैशाची साठवण:**

विविध गैरमार्गांनी मिळवलेला काळा पैसा उघडपणे उद्योग व्यवसायात न आणता परकिय बँकेत जमा केला जातो यासाठी स्वित्झर्लंड मधील बँकांचा / स्वीस बँकांचा उपयोग केला जातो. स्वदेशात देखील काळा पैसा वेगवेगळ्या शहरांमध्ये वेगवेगळी रक्कम ठेवली जाते. स्वदेशात काळा पैसा विविध बाबींवर खर्च केला जातो. जसे सोने / मौल्यवान वस्तूंची खरेदी करणे, शेतीच्या उत्पन्नावर कर नसल्याने शेती/जमिनीवर गुंतवणूक करणे, परदेशी प्रवास करणे इ. याशिवाय दहशतवाद अंमली पदार्थांचा अवैध वापर, मानवी तस्करी व विविध प्रकारची हौस भागवण्यावर हा पैसा खर्च केला जातो.

**परिणाम:**

आज काळ्या पैशाने पांढऱ्या पैशावर आपले वर्चस्व प्रस्थापित केलेले आहे. काळ्या पैशाचा भारतीय अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम होतो ते परिणाम पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. राष्ट्रीय विश्वासाला तडाः

एखाद्या देशात काळा पैसा असणे हे सरकार व देशातील नागरिकांची वृत्ती दर्शवते उदा. आपल्या देशात कर चुकवण्याची वृत्ती प्रबळ आहे. हे लगेच समजते याशिवाय आपले सरकार दुबळे आहे. भ्रष्टाचार व काळा पैसा निर्मितीवर त्यांचे नियत्रंण नाही, सरकारी अधिकारी, मंत्री लाचखोर आहेत. देशात माफिया व इतर गुन्हेगारांचे राज्य प्रबळ आहे असा आरोप होत असल्याने हा संदेश अतिभ्रष्टाचारामुळे इतर देशात पोहचतो. पूर्वी काही जणांना वाटायचे सरकार आणि नोकरशाही यंत्रणा भ्रष्ट आहे. न्याययंत्रणा, लष्कर या क्षेत्रात देखील भ्रष्टाचाराने प्रवेश करून काळा पैसा निर्माण केलेला आहे. भारतातील प्रचंड भ्रष्टाचाराने हीच मलीन प्रतिमा जगासमोर उभी केली आहे. न्युझीलंड हा देश स्वच्छ प्रतिमेसाठी सातत्याने प्रयत्न करत आहे तर आपला देश जास्तीत जास्त खराब प्रतिमा तयार करण्यासाठी प्रयत्नशील आहे हे ट्रान्सपरन्सी इंटरनॅशनलच्या अभ्यासावरून दिसून येते. खालील तक्त्यावरून आपल्याला दिसून येईल की जागतिक स्तरावर भारत हा भ्रष्टाचार व काळ्या पैशाच्या निर्मितीत किती खालच्या स्तरावर आहे. १९५५ च्या पासून ट्रान्सपरन्सी इंटरनॅशनल भ्रष्टाचार निर्देशांक [Corruption Perceptions Index - (CPI)] दरवर्षी प्रकाशित करते. CPI नुसार भ्रष्टाचार म्हणजे वैयक्तिक फायद्यासाठी सार्वजनिक पैशाचा गैरवापर करणे होय. सन २०१० या वर्षी CPI ने १७८ देशाचा निर्देशांक जाहीर केला. त्यात प्रत्येक देशाला शुन्य ते दहा अंकामध्ये गुण देण्यात आले. दहा अंक म्हणजे अतिशय स्वच्छ प्रतिमा तर शून्य म्हणजे अतिशय भ्रष्ट प्रतिमा होय.

| देश | वर्ल्डवाईड करप्शन पर्सेप्शन रँकींग ऑफ कन्ट्रीज् | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २०११ | २०१० | २००९ | २००८ | २००७ | २००६ | २००५ | २००४ | २००३ | २००२ |
| उच्च मानवी विकास असणारे देश | | | | | | | | | | |
| न्युझीलंड | ९.५ | ९.३ | ९.४ | ९.३ | ९.४ | ९.६ | ९.६ | ९.५ | ९.५ | ९.४ |
| स्वीडन | ९.३ | ९.२ | ९.२ | ९.३ | ९.३ | ९.२ | ९.२ | ९.३ | ९.३ | ९.० |
| सिंगापूर | ९.२ | ९.३ | ९.२ | ९.२ | ९.३ | ९.२ | ९.३ | ९.४ | ९.४ | ९.४ |
| नॉर्वे | ९.० | ८.६ | ८.६ | ७.९ | ८.७ | ८.९ | ८.९ | ८.८ | ८.५ | ८.६ |
| स्वीट्झर्लंड | ८.८ | ८.७ | ९.० | ९.० | ९.० | ९.१ | ९.१ | ८.८ | ८.५ | ८.४ |
| मध्यम मानवी विकास असणारे देश | | | | | | | | | | |
| बोस्तवाना | ६.१ | ५.८ | ५.६ | ५.८ | ५.४ | ५.६ | ५.९ | ६.० | ५.७ | ६.४ |
| सौदीअरब | ४.७ | ४.७ | ४.३ | ३.५ | ३.४ | ३.३ | ३.४ | ३.५ | ४.५ | |
| क्युबा | ४.२ | ३.७ | ४.४ | ४.३ | २.४ | ३.५ | ३.८ | ३.७ | ४.६ | ४.२ |
| साऊथ आफ्रिका | ४.१ | ४.५ | ४.७ | ४.९ | ५.१ | ४.५ | ४.५ | ४.६ | ४.४ | ४.८ |
| चीन | ३.६ | ३.५ | ३.६ | ३.६ | ३.५ | ३.३ | ३.२ | ३.४ | ३.४ | ३.५ |
| कमी मानवी विकास असणारे देश | | | | | | | | | | |
| भुतान | ५.७ | ५.७ | ५.० | ५.४ | ५.० | ५.७ | ५.७ | ५.० | ५.४ | ५.० |
| रवांडा | ५.० | ४.० | ३.३ | ३.० | २.८ | २.५ | ३.१ | - | ५.० | ४.० |
| भारत | ३.१ | ३.३ | ३.४ | ३.७ | ३.५ | ३.३ | २.९ | २.८ | २.८ | २.७ |
| माली | २.८ | २.७ | ३.१ | २.७ | २.८ | २.९ | ३.२ | ३.० | २.८ | २.७ |
| पाकिस्तान | २.५ | २.३ | २.५ | २.४ | २.२ | २.१ | २.१ | २.५ | २.६ | - |

*Source - Published by Transparency International*

जगात भारताचा काळ्या पैशाच्या बाबतीत पहिल्या दहा देशात नंबर लागतो.

२.असुरक्षित राष्ट्रः

जागतिक स्तरावर राष्ट्राची प्रतिष्ठा मलिन झाल्याने राष्ट्राची सुरक्षितता धोक्यात येते. कोणताही देश भारतात काळ्या पैशाच्या साहाय्याने अतिरेकी कारवाया करून देशाच्या सुरक्षिततेस हानी पोहोचवू शकतो.

३.धनदांडग्याच्या हातात सत्तेचे केंद्रीकरण -

भ्रष्टाचार आणि काळ्या पैशाच्या निर्मितीमुळे देशात अब्जाधिश/लक्ष्मीपुत्रांची संख्या वाढली आहे आणि या अब्जधिशांच्या हातात सत्तेचे केंद्रिकरण झाल्याचे दिसते. मोठमोठे उद्योगपती आपल्या फायद्यासाठी आपल्या मर्जीतील व्यक्तीची निवड उच्च व अतिमहत्त्वाच्या सरकारी पदावर निवड करतात जेणे करून जास्तीत जास्त नफा मिळवण्यासाठी त्यांचा उपयोग होईल. देशात पराकोटिची आर्थिक विषमता दिसून येते. भारतात लक्ष्मीपुत्रांच्या संख्येतील वाढ पुढीलप्रमाणे आहे.

अब्जाधीश / लक्ष्मीपुत्र

| वर्ष | संख्या |
|---|---|
| २००६ | १,००,००० |
| २००९ | १,२७,००० |

अनेक उद्योगपतींचे लागेबांधे हे कोणत्या न कोणत्या राजकीय पक्षाशी असतात.

४.अकार्यक्षम सरकारी व्यवस्था:

देशात सत्तेचे केंद्रीकरण, प्रचंड काळा पैसा यामुळे सरकार हे उद्योगपतीच्या हातातील बाहुले बनते. सरकारची ध्येय - धोरणे ही सामान्य जनतेला फायद्याची असतील असे न ठरवता ती मोठ्या उद्योजकांना भरमसाठ नफा मिळवून देईल अशी व्यवस्था निर्माण केली जाते. यामुळे सरकारी व्यवस्था अकार्यक्षम बनल्यामुळे सामान्य जनतेचे नुकसान होते.

५. बुद्धीमत्तेला कमी वाव:

पैसा आणि सत्ता असलेल्या व्यक्ती देशाची ध्येय-धोरणे ठरवतात व त्यामुळे सामान्य जनतेप्रमाणे बुद्धीमान व्यक्तीला देखील योग्य न्याय मिळत नाही. देशात चाललेल्या भ्रष्ट कामकाजामुळे बुद्धिमान व्यक्ती ज्या राष्ट्राची संपत्ती म्हणून समजण्यात येतात त्या देश सोडून दुसऱ्या देशात स्थलांतरीत होतात याचा अर्थव्यवस्थेवर विपरित परिणाम होतो.

६. भ्रष्टाचाराचा कर्करोग पसरतो:

सरकारचे भ्रष्टाचारावर कमी नियंत्रण, अपुरी शिक्षा, सत्तेचे केंद्रीकरण, न्याय्य प्रवृत्तीपेक्षा नफा प्रवृत्ती वाढल्याने भारतात प्रत्येक क्षेत्रात भ्रष्टाचाराचा कर्करोग पसरलेला आहे. या भ्रष्टाचाराने न्याय यंत्रणा, लष्कर, शिक्षण क्षेत्रासारखे पवित्र क्षेत्र देखील सोडले नाही. भ्रष्टाचाराचा ऑक्टोपस आपले हजारो पाय अर्थव्यवस्थेतील प्रत्येक क्षेत्रात वेगाने पसरवुन भारतीय अर्थव्यवस्था खिळखिळी बनवित आहे.

७. जी.डी.पी. वरील परिणाम:

सार्वजनिक क्षेत्रातील असलेले उद्योग जोमाने चालावा, काही नवीन उद्योग सुरू करण्यासाठी सरकारकडे पुरेसा पैसा, भांडवल नसल्याने देशाचा जी.डी.पी. चा दर सातत्याने कमी होतो.

८. सरकारी करात कपात:

काळ्या पैशाची कुठेही नोंद केलेली नसल्याने सरकारला त्यावर टॅक्स लावता येत नाही. अनेक उद्योजक आपले करयोग्य उत्पन्न सरकारपासुन लपवून ठेवतात त्यामुळे सरकारला त्यावर कर लावता येत नसल्याने पाहिजे तेवढा कर सरकारच्या तिजोरीत जमा होत नाही म्हणून सरकारला विकास कामे करण्यात अडथळे येतात.

९. आर्थिक वृद्धीवर परिणाम:

काळा पैसा निर्माण करून तो देशाबाहेर पाठवल्या जातो. देशात असलेला काळा पैसा हा अनुत्पादक कामावर खर्च केल्याने आर्थिक

वृद्धी मंदावते.

१०. समांतर अर्थव्यवस्था निर्माण होते:

आज भारतात काळ्या पैशाने समांतर अर्थव्यवस्था निर्माण केलेली आहे जी भारतीय अर्थव्यवस्थेला घातक आहे. काळ्या पैशाची अर्थव्यवस्था प्रचंड वेगाने पुढे विस्तारली जात असल्याने प्रचंड पैसा विकास कामापासून दूर ठेवला जातो. काळया पैशाची समांतर अर्थव्यवस्था ही भ्रष्टाचार व आतंकवादास खतपाणी घालते.

११. अद्ययावत तंत्रज्ञानाचा अभाव आणि बेरोजगारीत वाढ:

काळ्या पैशामुळे कमी भांडवल व अद्ययावत तंत्रज्ञानामुळे उद्योग उभारणीत अडथळे येतात. उद्योग बंद पडल्याने बेरोजगारीत वाढ होते. पैशाअभावी नवीन उद्योगांची उभारणी न झाल्याने बेरोजगारीत भर पडून नवीन तंत्रज्ञानाचा वापर होत नसल्याने अर्थव्यवस्था मरगळलेल्या अवस्थेत जाते.

उपाय:

काळा पैसा देशात निर्माण होऊ नये म्हणून सरकारने अनेक प्रकारचे प्रयत्न केले आहेत. परंतु त्या उपायांनी काळ्या पैशाची निर्मिती थांबल्याचे दिसत नाही म्हणून सरकारने काही कठोर व प्रभावी धोरणे आखून त्याची कडक अंमलबजावणी देशात करणे आवश्यक आहे. पुढीलप्रमाणे उपाय सांगता येईल.

१) सरकारने तयार केलेल्या कायद्यात आणि अंमलबजावणीत अधिकाधिक पारदर्शकता आणावी.

२) सर्व व्यवहार ऑनलाईन करण्याची सक्ती करावी.

३) जास्त किचकट असणारे टॅक्स व त्याची भरणा करण्याची पद्धत सहज सुलभ करणे म्हणजेच टॅक्स भरण्यासाठी सर्वसामान्य लोकांना इतर व्यक्तीवर अवलंबून राहण्याची गरज पडू नये याची काळजी घ्यावी.

४) भ्रष्टाचार विरोधी आंदोलनाचा पाया व्यापक बनवुन सार्वजनिक नैसर्गिक संसाधनांचे खाजगीकरण करणाऱ्या कारकिर्दींचा शेवट करावा.

५) देशाबाहेर जाणारा काळा पैसा, बेकायदेशीररित्या लुटमार करून मिळवलेला पैसा परदेशी बँकातून परत देशात आणला जातो. या संपूर्ण व्यवहारावर बंदी घालणे तसेच देशातील मोठ्या उद्योग व उद्योजकांना करातून सुट व देणग्या देण्याचे बंद करणे.

६) नफ्यावर लक्ष न देता देशातील सर्वसामान्य जनतेच्या विकासावर लक्ष केंद्रित करणे.

७) काळा पैसा निर्माण होऊ नये यासाठी अर्थक्रांती प्रस्तावाचा स्वीकार करावा व त्यात सांगितलेल्या पाच गोष्टींचा कडकपणे अवलंब करावा.

अ) सध्या अस्तित्वात असलेली कर प्रणाली केंद्र सरकार, राज्य सरकार व स्थानिक प्रशासनाचे सर्व कर पूर्णतः रद्द करणे (आयात कर/कस्टम ड्युटी वगळता) कारण आज आपण भारतीय केंद्र, राज्य व पालिकांचे मिळुन सुमारे ३२ वेगवेगळ्या प्रकारचे कर भरतो.

आ) सरकारी महसुलासाठी फक्त ÷बँक व्यवहार कर' हा सिंगल पॉईंट डिडक्शन टॅक्स लागु करणे. बँकेद्वारे होणाऱ्या प्रत्येक व्यवहारावर एका निश्चित प्रमाणात वजावट करणे. उदा.

२ टक्के प्रति व्यवहार वजावट फक्त जमा खात्यावरच व्हावी. ही २ टक्के वजावट निश्चित प्रमाणात केंद्र, राज्य सरकार, स्थानिक प्रशासन व व्यवहार करणाऱ्या बँकेच्या खात्यावर जमा करण्यात यावी. उदा. ०.७० टक्के केंद्र सरकार, ०.६० टक्के, राज्य सरकार ०.३५ टक्के स्थानिक प्रशासन ०.३५ टक्के बँका यांना ही रक्कम वाटून देण्यात यावी.

इ) सध्या चलनात असलेल्या ५० रु. पेक्षा जास्त चलनी नोटा बंद कराव्यात. यामुळे लोकांना बँके मार्फत व्यवहार करणे सोयीचे होईल. त्यामुळे शासनाच्या महसुलात वाढ होण्यास मदत होईल. काळा पैसा निर्माण करण्यास मदत करणाऱ्या १००, ५००, १००० रु. च्या नोटा चलनातून काढुन टाकाव्यात. मोठ्या रक्कमेचे व्यवहार रोखीने करणे हे या मोठ्या नोटांमुळे शक्य होते व भ्रष्टाचार व काळा पैसा प्रचंड प्रमाणात विस्तारला जातो.

ई) शासनाची काही विशिष्ट आर्थिक मर्यादे पर्यंतच रोखीच्या व्यवहारांना कायदेशीर मान्यता आवश्यक वाटते. उदा.२००० रु. पर्यंतचे व्यवहार रोखीने करणे परंतु त्यापेक्षा जास्त रक्कमेच्या व्यवहारास कायदेशीर संरक्षण देऊ नये. मोठ्या रक्कमेचे व्यवहार बँकेद्वारे केल्याने शासकिय महसुलात वाढ होईल.

उ) रोखीने केलेल्या कुठल्याही व्यवहारावर बँक व्यवहार कर लागु असणार नाही.

**संदर्भ सूची:**


१. मेधा थत्ते (२०११) ÷÷*भ्रष्टाचाराच्या वणव्यात भारत''*, साठ्ये इंटरप्राइजेस पूणे.

२. Roshan Kumar M. Bhjgania *Research Paper on Black Money & its Impact on Indian Economy*, Vol.1, Issue XI/May 2012, P,P 1-4

३. Black Money White Paper, May 2012, *"Ministry of Finance Department of Revenue*, Centeal Board of Direct Taxes, New Delhi.

४. http//www.aygrt.net/publish/1516pdf

५. www.arthakranti.org

६. http//en.wijopedia.org/wiki/corruption_perceptions Index.

# महाराष्ट्रातील नागरीकरण

**सुभाष पाटील, पुणे,**
सहयोगी प्राध्यापक,
पदव्युत्तर अध्ययन व संशोधन विभाग,
श्री.ना.दा.ठाकरसी महिला विद्यापीठ,
भ्रमणध्वनी ९८५०४३४५८९,
ई-मेल: subhash.patil09@rediffmail.com

१ मे २०१० रोजी सुवर्णमहोत्सवी वाटचालीचा एक अभिमानास्पद टप्पा महाराष्ट्र राज्याने ओलांडला आहे. महाराष्ट्र निर्मितीनंतरच्या ५३ वर्षात महाराष्ट्रात नागरीकरणाची प्रक्रिया झपाट्याने घडली आहे. विशेषत: गेल्या दोन दशकांतला नागरीकरणाचा वेग अचंबित करणारा आहे. सर्वाधिक वेगाने नागरीकरण होणारे राज्य म्हणून महाराष्ट्र ओळखला जात आहे. मात्र ठराविकच शहरे व जिल्ह्यांत नागरीकरण वाढत आहे. नागरीकरणाची ही प्रक्रिया असंतुलनाकडेच वाटचाल करीत असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. शिवाय नागरीकरणातील हे असंतुलन आगामी काळात अधिकच विषम स्वरूप धारण करेल की काय याची भिती आहे. तेव्हा जलद आर्थिक विकासासाठी संतुलित नागरीकरण हे भावी काळातील आव्हान असणार आहे. त्यासाठी संतुलित नागरी विकासाला चालना देणाऱ्या धोरणाची नितांत गरज आहे. नुकतीच जनगणना २०११ ची प्राथमिक माहिती उपलब्ध झाली आहे. त्याअनुषंगाने प्रस्तुत लेखातुन केवळ महाराष्ट्रातील नागरीकरण कल चा आढावा घेतला आहे व तो पूर्णपणे दुय्यम आधारसामग्रीवर आधारीत आहे.

**नागरीकरण संकल्पना:**

शहरात वा नागरी क्षेत्रात लोकवस्ती सकेंद्रीत होण्याची प्रक्रिया म्हणजे नागरीकरण होय. नागरीकरणाची प्रक्रिया औद्योगीकरणाबरोबरच आर्थिक विकास आणि सामाजिक बदलांशी संबंधित असते. वाढते औद्योगीकरण व तांत्रिक प्रगती यामुळे शहरांचा सर्वांगीण विकास व भौगोलिक विस्तार अधिकाधिक गतिमान झाला आहे. नागरी केंद्रातील आधिकाधिक उत्पादकतेमुळे आर्थिक, औद्यागिक, व्यापारी व सेवा व्यवहारांचे केंद्रीकरण होते व अशा नागरी भागात

रोजगार उपलब्ध होऊन ग्रामीण भागातून नागरी भागाकडे श्रमिकांचे स्थलांतर होऊ लागते आणि नागरी लोकसंख्येत भर पडून नागरीकरणाचा दर वाढू लागतो.

'५००० पेक्षा जास्त लोकवस्ती, ४०० प्रति चौ.कि.मी. एवढी घनता आणि ७५ टक्के लोकसंख्या बिगर कृषी व्यवसायात कार्यरत असणे या तीन निकषांची पूर्तता करणाऱ्या भागास नागरी क्षेत्र असे संबोधिले जाते.'

नागरीकरण हे प्रामुख्याने लोकसंख्या वाढीचा नैसर्गिक दर, स्थलांतराचा दर आणि नागरी विभागांची भौगोलिक सीमा व तिचा विस्तार या प्रमुख घटकांवर अवलंबून असते. जिथे व्यापार, वाहतूक व दळणवळण साधने, औद्योगिकरण, शिक्षण, आरोग्य आणि प्रशासकीय सेवा, शेतमालांचे बाजार, पर्यटन आणि धार्मिक-सांस्कृतिक कारणांमुळे आर्थिक व्यवहार वाढतात तिथेच स्थलांतर वाढते. आर्थिक विकास आणि नागरीकरण प्रक्रिया यांचा परस्पर संबंध आहे. नागरीकरणामुळे औद्योगिकरण तसेच औद्योगिकरणामुळे नागरीकरण असा हा परस्परांवर प्रभाव टाकणारा संबंध आहे. नागरीकरणामुळे एकीकडे अधिक रोजगार संधी, जास्त वेतनदर, चांगले शिक्षण, आरोग्य व मनोरंजनविषयक सुविधा निर्माण होतात, पायाभुत सुविधांत वाढ होते, बाजारपेठा विस्तारतात, तांत्रिक क्षेत्रात बदल होतात आणि विकासाला गती मिळते, तर दुसरीकडे अनिर्बंधित नागरीकरणामुळे अनियंत्रित झोपडपट्टी, पायाभूत सुविधांचा अभाव, जमिनीच्या व घरांच्या वाढत्या किंमती, वाहतूक व पर्यावरणीय समस्या, सामाजिक गुन्हेगारी इत्यादी समस्या निर्माण होतात. त्यामुळे विकास मंदावतो. नागरीकरण प्रक्रियेतून सकारात्मक परिणाम वाढावयास हवेत व नकारात्मक परिणाम कमी व्हावयास हवेत, तरच आर्थिक विकास जलद गतीने साध्य होऊ शकतो.

**भारत व महाराष्ट्रातील नागरीकरण-तुलना:**

नागरीकरण संदर्भात (१) नागरीकरणाची पातळी (Level of Urbanisation) आणि (२) नागरीकरणाचा दर (Rate of Urbanisation) या दोन संकल्पना महत्त्वाच्या आहेत. यापैकी नागरीकरण पातळी म्हणजे नागरी लोकसंख्येचे एकूण लोकसंख्येशी असलेले गुणोत्तर होय, तर नागरीकरणाचा दर ही संकल्पना नागरी भागाची लोकसंख्येतील वृद्धी दर्शविते. २०११ मधील जगातील एकूण ६९०.८७ कोटी लोकसंख्येपैकी ५२ टक्के लोकसंख्या नागरी भागात वास्तव्य करते. नागरीकरणाची पातळी विकसित देशांत ७८ टक्के तर विकसनशील देशांत ४६.५ टक्के आहे. जगातील एकूण लोकसंख्येपैकी १७.५ टक्के लोकसंख्या भारतात आहे. १९६१ मध्ये भारतातील नागरी लोकसंख्येचे प्रमाण १८.३ टक्के इतके होते, तर २०११ मध्ये हे प्रमाण ३१.१६ टक्के इतके झाले. वाढत्या नागरीकरणामुळे कृषीप्रधान भारताची ओळख आता जलद नागरीकरण होणारा देश अशी होऊ लागली आहे. भारतातील नागरीकरण पातळीत उत्तरोत्तर वाढ होत असली तरी रशिया (७४ टक्के), आस्ट्रेलिया (८९ टक्के), अमेरिका (८२ टक्के), जपान (९० टक्के) व इंग्लड (७९ टक्के) या विकसित देशांशी तुलना करता भारतातील नागरीकरणाचे प्रमाण आजही खूप कमी आहे.

तक्ता क्र. १ मध्ये महाराष्ट्र व भारतातील नागरी संकुले, नागरी लोकसंख्या

आणि दशवार्षिक वृद्धी दर दर्शविला आहे. १९६१ मध्ये भारतातील २६५७ शहरांमध्ये ७८.३ दशलक्ष लोकसंख्या वास्तव्य करीत होती, तर २०११ मध्ये ७९३५ शहरांमध्ये ३७७.१० दशलक्ष लोकसंख्या वास्तव्य करीत होती. नियोजनकाळातील औद्योगिकरण आणि वेळोवेळी नागरी विभागाविषयी स्विकारण्यात आलेली उदार व्याख्या याचा एकत्रित परिणाम म्हणून नागरी लोकसंख्या वाढली. १९७१ ते १९८१ या दशकात नागरी लोकसंख्या वृद्धी दर सर्वात जास्त म्हणजे ४६.०७ इतका होता तो २००१-२०११ या दशकात तो ३२.१३ पर्यंत कमी झाला.

१९५१ ते १९९१ पर्यंत भारतातील अधिक नागरीकृत १६ राज्यात महाराष्ट्राचा पहिला

तक्ता क्र.१

भारत व महाराष्ट्रातील नागरी लोकसंख्या (१९६१ ते २०११)

| वर्ष | महाराष्ट्र नागरी संकुलांची संख्या | महाराष्ट्र नागरी लोकसंख्या (दशलक्ष) | नागरीकरण पातळी | भारत नागरी संकुलांची संख्या | भारत नागरी लोकसंख्या (दशलक्ष) | नागरीकरण पातळी |
|---|---|---|---|---|---|---|
| १९६१ | २६६ | ११.२ | २८.२ | २६५७ | ७८.३ | १७.२१ |
| १९७१ | २८९ | १५.७ | ३१.२ | ३०८१ | १०८.३ | १९.११ |
| १९८१ | ३०७ | २२ | ३५ | ३९७१ | १५८.२ | २३.०८ |
| १९९१ | ३३६ | ३०.५ | ३८.७ | ४६१५ | २१५.७ | २५.४९ |
| २००१ | ३७८ | ४१ | ४२.४ | ५१६१ | २८५.४ | २७.८१ |
| २०११ | ५३५ | ५०.८ | ४५.२३ | ७९३५ | ३७७.१ | ३१.१६ |
| दशवार्षिक वृध्दी दर | | | | | | |
| १९६१-७१ | १.०८ | ४०.१७ | - | १५.९५ | ३८.३१ | - |
| १९७१.८१ | ६.२२ | ४०.१२ | - | २८.८८ | ४६.०७ | - |
| १९८१-९१ | ९.४४ | ३८.६३ | - | १६.२१ | ३६.३४ | - |
| १९९१-०१ | १२.५ | ३४.४२ | - | ११.८३ | ३२.३१ | - |
| २००१-११ | ४१.५३ | २३.९५ | - | ५३.७४ | ३२.१३ | - |

*स्रोत: महाराष्ट्र विकास अहवाल २००५ व जनगणना २०११*

क्रमांक होता. परंतु २००१ पासून तामिळनाडू राज्याने महाराष्ट्राला मागे टाकले आहे. २०११ च्या जनगणनेनुसार भारतातील एकूण नागरी लोकसंख्येपैकी (३७७.११ कोटी) महाराष्ट्रात नागरी लोकसंख्येची टक्केवारी १३.४७, उत्तरप्रदेशात ११.८० टक्के तर तामिळनाडूत ९.२६ टक्के इतकी आहे. मात्र नागरी लोकसंख्येचा संख्यात्मक आकारमानाचा विचार करता आजही महाराष्ट्र प्रथम क्रमांकावर आहे. विकासाचा एक निर्देशांक म्हणून नागरीकरणाकडे पाहिल्यास महाराष्ट्र हे एक विकसित राज्य आहे. जनगणना २०११ नुसार, भारतातील एकूण लोकसंख्येपैकी ९.२८ टक्के आणि एकूण नागरी लोकसंख्येपैकी १४ टक्के लोकसंख्या महाराष्ट्रात आहे. १९६१ मध्ये महाराष्ट्रातील २६६ शहरांमध्ये ११.२ दशलक्ष लोकसंख्या वास्तव्यास होती, तर २०११ मध्ये ५३५ शहरांमध्ये ५०.८२ दशलक्ष लोकसंख्या वास्तव्यास आहे. १९६१ ते २०११ या काळात महाराष्ट्रातील नागरीकरणाची पातळी २८.२ टक्केवरून ४५.२३ टक्क्यांपर्यंत वाढली. १९६१-७१ आणि १९७१-८१ या दशकात नागरी लोकसंख्या वार्षिक वृद्धीदर ४०.१७ व ४०.१२ इतका होता. तो २००१-११ या दशकात २३.९५ पर्यंत कमी झाला. भारत व महाराष्ट्र यांची तुलना करता १९६१ ते २००१ या कालावधीतील नागरी क्षेत्र वृद्धी दर भारताच्या मानाने महाराष्ट्रात कमी आहे तर नागरी लोकसंख्या वृद्धी दर भारताच्या मानाने महाराष्ट्रात जास्त आहे. मात्र २००१-११ या दशकांत कमी आहे. (पहा तक्ता क्र. १)

भारतातील नागरीकरणाच्या बाबतीत तामिळनाडू (४८.२५%), महाराष्ट्र (४५.२३%), गुजरात (४२.७८%) आणि कर्नाटक (३८.५७%) ही राज्ये आघाडीवर आहेत तर बिहार (११.३०%), आसाम (१४.०८%), हिमाचल प्रदेश (१०.०४%) या राज्यातील नागरीकरणाची प्रक्रिया अत्यंत संथ गतीने होत आहे. संयुक्त राष्ट्र संघाच्या मते, जगातील एकूण लोकसंख्येपैकी ५२ टक्के लोकसंख्या शहरात वास्तव्य करते. तामिळनाडू आणि महाराष्ट्र या दोन राज्यातील नागरीकरण पातळी याच्या जवळपास आहे. थोडक्यात, गेल्या ५० वर्षाचा विचार करता (१९६१ ते २०११) भारतातील नागरीकरणाच्या तुलनेत महाराष्ट्रातील नागरीकरणाचा वेग जास्त आहे.

**महाराष्ट्रातील नागरीकरण:**

१९६१ ते २०११ या कालावधीत महाराष्ट्रातील एकूण लोकसंख्या ३,९५,५३,७१८ वरून ११,२३,७२,९७२ पर्यंत म्हणजे जवळजवळ २.८४ पटीने वाढली. १९६१ मध्ये २६६ शहरांमध्ये १,११,६२,५६९ लोकसंख्या वास्तव्यास होती. म्हणजे नागरीकरणाची पातळी २८.२ टक्के इतकी होती. २०११ मध्ये ५३५ शहरांमध्ये ५,०८,२७,५३१ लोकसंख्या वास्तव्यास होती म्हणजे नागरीकरणाची पातळी ४५.२३ टक्के इतकी होती. १९६१ ते २०११ या कालावधीत महाराष्ट्रातील शहरांची संख्या दोन पटीने व नागरी लोकसंख्या ४.५५ पटीने वाढली, तर नागरीकरण पातळी २८.२ टक्के वरून ४५.२३ टक्के पर्यंत वाढली. २०२१ पर्यंत ते ५५ टक्के पर्यंत होईल असा अंदाज आहे. नागरीकरणाच्या लाटेत महानगरांचाही विचार होणे महत्त्वाचे आहे. सध्या भारतात मुंबई (१८.४ दशलक्ष), दिल्ली (१६.३ दशलक्ष), कोलकत्ता (१४.१ दशलक्ष)आणि चेन्नई (८.७ दशलक्ष) ही चार

महानगरे असून यात नागरी लोकसंख्येपैकी जवळपास १५ टक्के लोकसंख्या वास्तव्य करते. मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी व भारताची आर्थिक राजधानी म्हणून ओळखले जाणारे महत्त्वपूर्ण महानगर आहे. १९८१ मध्ये महाराष्ट्रातील एकूण नागरी लोकसंख्येपैकी ३७.४ टक्के नागरी लोकसंख्या एकट्या मुंबईमध्ये होती तर २०११ मध्ये हे प्रमाण ३६.२० टक्के आहे. महानगरच्या विकासासाठी करोडो रूपयांचा निधी उपलब्ध करून दिला जात असल्याने लोकसंख्या केंद्रिकरण होऊ लागते. मात्र जमिनीच्या व घरांच्या वाढत्या किंमती, मोठे उद्योगांचे इतरत्र होणारे स्थलांतरण या महत्वपूर्ण कारणांमुळे मुंबई महानगर विकासाचा दर कमी झाला आहे.

**महाराष्ट्रातील जिल्हानिहाय नागरीकरण:**

महाराष्ट्रात १९८१ पर्यंत २६ जिल्हे अस्तित्वात होते. १९९१ पर्यंत जिल्ह्यांची संख्या ३० तर २००१ मध्ये ३५ इतकी होती. सद्यस्थितीत महाराष्ट्रात ३५ जिल्हे असून २०११ च्या जनगणनेनुसार, बृहन्मुंबई आणि मुंबई उपनगर हे दोन जिल्हे १०० टक्के नागरीकृत आहेत. ५० टक्के पेक्षा जास्त नागरीकरण असलेल्या जिल्ह्यांची संख्या तीन, २० ते ५० टक्के दरम्यान १८ जिल्हे तर २० टक्केपेक्षा कमी नागरीकरण असलेल्या जिल्ह्यांची संख्या १२ इतकी आहे. नागरी लोकसंख्या प्रमाणानुसार, १९६१ मध्ये मुंबई या एका जिल्ह्यात १० टक्के लोकसंख्या, ठाणे, पुणे, नागपूर आणि नाशिक या चार जिल्ह्यात १९ टक्के लोकसंख्या तर ऊर्वरित २१ जिल्ह्यात ७१ टक्के नागरी लोकसंख्या वास्तव्यास होती. १९६१ मध्ये महाराष्ट्रातील नागरीकरणाची पातळी २८.२ टक्के इतकी होती. या सरासरीपेक्षा जास्त नागरीकृत जिल्ह्यांची संख्या चार इतकी होती. तर २०११ मध्ये बृहनमुंबई व मुंबई उपनगर या दोन जिल्ह्यात ३६ टक्के लोकसंख्या, नागपूर, ठाणे, पुणे, औरंगाबाद व नाशिक या पाच जिल्ह्यात ३९ टक्के लोकसंख्या तर उर्वरित २८ जिल्ह्यात २५ टक्के लोकसंख्या वास्तव्यास आहे. सरासरीपेक्षा (४५.२३) जास्त नागरीकृत जिल्ह्यांची संख्या केवळ पाच इतकी आहे. याचा अर्थ ठरावीकच जिल्ह्यांत नागरीकरण वाढत आहे.

महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यातील नागरीकरण प्रवृत्ती भिन्न भिन्न आहे. महाराष्ट्रात नागरीकरणाचे अधिकप्रमाणावर केंद्रिकरण झालेले मुंबई, ठाणे, नागपूर, पुणे, औरंगाबाद आणि नाशिक ही जिल्हे आहेत. मुंबई ही भारताची आर्थिक राजधानी असून जागतिक वित्त व्यवहारामुळे मुंबई शहराचे महत्त्व वाढले आहे. मुंबईच्या प्रभावामुळे मुंबई-पुणे-नाशिक हा आर्थिक महत्त्वाचा नागरी त्रिकोण महाराष्ट्रात गेल्या ५० वर्षांत निर्माण झाला आहे. तर गडचिरोली, सिंधुदुर्ग, गोंदिया, हिंगोली, भंडारा, नंदूरबार, सातारा, उस्मानाबाद, जालना, बीड, वाशिम, बुलढाणा हे जिल्हे नागरीकरण विस्ताराच्या बाबतीत मागे आहेत. अर्थात हे जिल्हे औद्योगिकरणातही मागे आहेत. महाराष्ट्रात मुंबई, ठाणे, नागपूर, पुणे, औरंगाबाद आणि नाशिक ही ठराविकच शहरे वाढताहेत. याला केवळ ग्रामीण भागातून होणारे स्थलांतर कारणीभूत नसून लहान शहरातून मोठ्या शहरात होणारे स्थलांतरही कारणीभूत आहे. नागरीकरण प्रक्रियेतील असंतुलनाची ही प्रवृत्ती १९६१ पासून २०११ पर्यंत कायम राहिली आहे. जिल्हानिहाय नागरीकरणाच्या दरातील वैविध्य लक्षात घेता नागरीकरणाच्या संदर्भात जिल्ह्याचे

समानीकरणाची प्रवृत्ती उदारीकरणानंतरच्या १९९१ ते २००१, २००१ ते २०११ या दोन दशकात मंदावली आहे. अर्थात नागरीकरणाची प्रवृत्ती भिन्न असण्यामागील कारणांचा अभ्यास करणे हा स्वतंत्र अभ्यास विषय आहे.

## संतुलित नागरीकरण अत्यावश्यक:

संयुक्त राष्ट्रसंघाच्या जागतिक लोकसंख्या अहवालानुसार, आर्थिक विकास प्रक्रियेत शहरांची संख्या व त्या शहरांतील लोकसंख्या वाढत जाणे स्वाभाविक आहे, परंतू ते सकारात्मकपणे व्हायला हवे. मोठ्या शहरामध्ये उद्योग, व्यवसाय, रोजगार, भांडवल यांचे केंद्रिकरण वेगाने होते. सार्वजनिक कार्यालये, शैक्षणिक संस्था, सार्वजनिक सेवा आणि पायाभूत सुविधा मोठ्या शहरात केंद्रित होण्याची प्रवृत्ती असते परिणामी मोठी शहरे अधिक मोठी होतात. रोजगाराची संधी उपलब्ध होत असल्याने लोक शहरांकडे आकर्षित होतात. त्यामुळे शहरातून साहजिकच गर्दी वाढत जाणार आहे. काही मोजकीच मोठी शहरे जेव्हा वेगाने वाढतात तेव्हा जलद व वाढत्या लोकसंख्या केंद्रिकरणामुळे पायाभूत सुविधा पुरविताना तेथील प्रशासकीय यंत्रणेवर ताण पडतो. पक्के रस्ते, पिण्याचे स्वच्छ व पुरेसे पाणी, वाहतूक व दळणवळणाची साधने, विजेचा प्रश्न, मलनिस्सारण, कचरा आणि पर्यावरणासंबंधी अनेक प्रश्न निर्माण होतात. यामुळे शहरांतील नागरी जीवनाचा गुणवत्तेचा ऱ्हास होतो. शेती, उद्योग व सेवा क्षेत्र या तीनही क्षेत्रांचे परस्परालंबी असा व्यूहरचनात्मक आणि क्रियात्मक विचार महाराष्ट्राने गेल्या काही वर्षांत निटपणे केलेला नाही. परिणामी मुंबई, ठाणे, पुणे, औरंगाबाद, नाशिक या ठाविकच शहरांत मोठ्या प्रमाणात औद्योगीकरण झाल्याने नागरीकरणाची प्रक्रिया या शहरांतच केंद्रीत झाल्याचे दिसते. महाराष्ट्राच्या संतुलित विकासासाठी कोकण, विदर्भ, मराठवाडा या भौगोलिक विभागातील औद्योगिक मागासलेपणावर मात करावी लागेल.

संतुलित नागरीकरणासाठी नागरी भागाबरोबरच मागास ग्रामीण भागात आर्थिक औद्यागिक, व्यापारी सेवा व शैक्षणिक व्यवहारांचे विकेंद्रीकरण झाले पाहिजे. राज्यातील निरनिराळया भागांचा विकास, उद्योगांचे विकेंद्रीकरण, पाणीपुरवठा योजना, वाहतूक व दळणवळण व्यवस्था इत्यादी बाबींचा समन्वय साधला पाहिजे. जागतिकीकरणातून नवीन भारतीय उद्योग व बहुराष्ट्रीय महामंडळांना ग्रामीण भागात गुंतवणुकीसाठी प्रोत्साहित केले पाहिजे. त्यासाठी पायाभूत सुविधा उपलब्ध केल्या पाहिजेत जेणे करून ग्रामीण औद्यागीकरणाला चालना मिळेल. अर्थात औद्योगिकरणाच्या माध्यमातून ग्रामीण भागात रोजगारनिर्मिती होऊन रोजगारनिमित्त शहरी भागाकडे होणाऱ्या स्थलांतरास आळा बसेल आणि संतुलित नागरीकरण होण्यास मदत होईल. थोडक्यात, ग्रामीण आणि नागरी या दोन्ही विभागांचे संतुलन राखणे विकासासाठी अत्यावश्यक आहे. ग्रामीण आणि नागरी विकासाचा एकाच वेळी विचार करावा लागेल. अन्यथा विशिष्ट शहरांत वा प्रदेशात होणाऱ्या लोकसंख्या केंद्रीकरणामुळे अतिनागरीकरण होऊन नागरीकरणाचे फायदे मिळण्याऐवजी तोटेच जास्त जाणवतील.

## सारांश:

ग्रामीण भागातील लोक रोजगाराच्या शोधार्थ शहरी भागात स्थलांतर करीत असल्याने

देशाच्या बहुतेक भागात नागरीकरणाच्या प्रक्रियेने वेग घेतला आहे. या बाबतीत तामिळनाडू, महाराष्ट्र, गुजरात आणि कर्नाटक ही राज्ये आघाडीवर आहेत तर बिहार, आसाम, हिमाचल प्रदेश या राज्यातील नागरीकरणाची प्रक्रिया अत्यंत संथ गतीने होत आहे. महाराष्ट्राच्या संदर्भात १९६१ ते २०११ या कालावधीत नागरीकरणाची पातळी २८.२ टक्के वरून ४५.२३ टक्के पर्यंत वाढली आहे. मात्र नागरीकरणाची ही प्रक्रिया असंतुलनाकडेच वाटचाल करीत असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. जिल्हानिहाय नागरीकरण प्रवृत्ती भिन्न असून मुंबई, ठाणे, नागपूर, पुणे आणि नाशिक ही अधिक नागरीकृत जिल्हे तर गडचिरोली, सिंधुदुर्ग, गोंदिया, हिंगोली, भंडारा, नंदुरबार, सातारा, उस्मानाबाद, जालना, बीड, वाशिम, बुलढाणा ही जिल्हे नागरीकरण विस्तारात मागे आहेत. ही प्रवृत्ती १९६१ पासून २०११ पर्यंत कायम राहिली आहे. महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांची नागरीकरणाच्या संदर्भातील समानीकरणाची प्रवृत्ती उदारी- करणानंतरच्या दोन दशकात मंदावली आहे. राज्याच्या संतुलित नागरीकरणासाठी नागरी भागाबरोबर मागास ग्रामीण भागात आर्थिक, औद्योगिक, व्यापारी सेवा व शैक्षणिक व्यवहारांचे विकेंद्रीकरण झाले पाहिजे. त्यासाठी संतुलित नागरी विकासाला चालना देणाऱ्या धोरणाची नितांत गरज आहे.

**संदर्भ सूची :**


1) Census of India-2011, *'Provisional Population Totals'.*
2) Census of India-2001, *'Provisional Population Totals'.*
3) Human Development Report – Maharashtra, 2002.
4) India Statistical Abstract – 1961, 1971, 1981, 1991 & 2001.
6) Maharasthra Development Report 2005.
7) World Urbanisation Prospects, The 2011 revision, United Nations, New York.
८) *अर्थबोधपत्रिका*, भारतीय अर्थविज्ञान वर्धिनी, खंड ५, अंक ६, सप्टेंबर २००६.
९) टिळक अभय, (२०११), *'आख्यान नागरीकरणाचे'*, साप्ताहिक साधना, नोव्हेंबर २०११.
१०) मुळ्ये संजीवनी, *'वाढते नागरीकरण ठरतेय धोक्याचे'*, दैनिक सकाळ, २८ मार्च २००७.
११) जाधव तुकाराम (संपादक) (२०१०), *'महाराष्ट्र वार्षिकी २०१०'*, द युनिक ॲकॅडमी, पुणे.
१२) पाटील सुभाष, (१९९९), *'भारतातील नागरीकरण प्रवाह (१९०१-१९९१)'*, योजना, वर्ष २७, अंक ३, ऑक्टोबर.

# शिराळा तालुक्यातील मका प्रक्रिया उद्योग

**रमजान फत्तुखान मुजावर**, कोल्हापूर,
संशोधक विद्यार्थी (पीएच्.डी.)
अर्थशास्त्र विभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
भ्रमणध्वनी: ९९२१८०३६३३

आर्थिक विकासात कृषी क्षेत्राला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. शेतकऱ्यांचा विकास हा अशा उद्योगांवर अवलंबून असतो जे उद्योग कृषी मालावर प्रक्रिया करतात. म्हणजेच जास्तीत जास्त नफा आणि वस्तूंची योग्य किंमत मिळवायची असेल तर प्रक्रिया उद्योगांचा विकास करणे गरजेचे आहे. विकसित देशामध्ये कृषी आधारित उद्योगांची संख्या जास्त असते, कारण कृषी क्षेत्रातून त्यांना कच्चा माल पुरवला जातो म्हणून कृषी क्षेत्रातून सातत्याने पुरवल्या जाणाऱ्या कच्च्या मालामुळे प्रक्रिया उद्योगांचा विस्तार होत जातो. परिणामी कृषी विकासामुळे भांडवलनिर्मिती होण्यास मदत होते आणि आर्थिक विकास गतीने होतो. त्यामुळे कृषी प्रक्रिया उद्योग महत्त्वाची भूमिका बजावतात.

मका हे इतर पिकापेक्षा अत्यंत महत्त्वाचे पीक समजले जाते. मक्याच्या उत्पादनात अमेरीकेचा जगात पहिला क्रमांक लागतो, तर भारताचा चौथा क्रमांक आहे. देशाचा विचार करता महाराष्ट्राचा मका लागवडीमध्ये १०वा क्रमांक लागतो. मका हे पीक इतर नगदी पिकापेक्षा प्रक्रियेस अत्यंत सुलभ आहे. अलिकडच्या काळात दुग्ध व कुक्कूटपालन व्यवसाय वाढत असल्यामुळे जनावरास आवश्यक असणारी पशुखाद्ये तसेच कुक्कूटपालनास आवश्यक असणारी पशुखाद्ये ही मका पिकापासुन तयार केली जातात. सध्या मक्यावर प्रक्रिया करणारे अनेक प्रकल्प आपल्या देशात कार्यान्वित झाले आहेत. त्यापैकीच शिराळा तालुक्यातील यशवंत सहकारी ग्लुकोज कारखाना हा मका पिकावर प्रक्रिया करून विविध प्रकारचे उत्पादन घेणारा एक अत्यंत महत्वाचा प्रकल्प आहे. म्हणूनच मका हे पीक गहू, ज्वारी, तांदूळ, डाळी, साखर, तेलबिया या पिकांपेक्षा जास्तीत जास्त नफा देणारे महत्त्वाचे पिक आहे.

## यशवंत सहकारी ग्लुकोज प्रकल्पः

यशवंत सहकारी ग्लुकोज प्रकल्पांमध्ये मक्यावर प्रक्रिया करून लिक्विड ग्लुकोज, विविध स्टॉर्च, डेक्स्ट्रिन, ग्लुटेन, जर्म आणि पशुखाद्य इ. चे उत्पादन घेतले जाते. हा प्रकल्प ज्या क्षेत्रात उभारला गेला आहे ते क्षेत्र महाराष्ट्रातील औद्योगिक विकास झोन म्हणून घोषित करण्यात आले आहे. कृष्णा, वारणा आणि मोरणा नद्याच्या सुपीक खोऱ्यात या प्रकल्पाची उभारणी करण्यात आली आहे. हे क्षेत्र मका पिकांसाठी अत्यंत उपयुक्त असल्याने शिराळा तालुक्यातील शेतकऱ्यांचे मका हे पीक पारंपरिक समजले जाते. या क्षेत्रात पाण्याची उपलब्धता, पूरक जलसिंचन सुविधा आणि अनुकूल हवामानामुळे मका उत्पादनासाठी अत्यंत योग्य असे समजले जाते. परिणामी मका पिकाचे महत्त्व लक्षात घेता शिराळा तालुक्यातील शेतकरी मका पिकांचे जास्तीत जास्त उत्पादन घेताना दिसून येतात.

## संशोधनाची अभ्यासपद्धती:

सदरचा संशोधन लेख हा दुय्यम माहितीवर आधारित आहे. दुय्यम माहिती ही प्रकल्पाने प्रकाशित केलेल्या वार्षिक अहवालातुन घेण्यात आली आहे. तसेच इतर माहिती प्रकल्पामध्ये काम करीत असलेल्या संबंधित लोकांकडून घेण्यात आली आहे.

## शिराळा तालुक्यातील कृषी विकासात ग्लुकोज प्रकल्पाचे योगदान :

यशवंत सहकारी ग्लुकोज प्रकल्पामार्फत दरवर्षी खरीप आणि रब्बी हंगामामध्ये मका विकास आणि मशागतीसाठी विविध कार्यक्रम राबविले जातात. या कार्यक्रमांतर्गत प्रकल्पाच्या कार्यक्षेत्रात वाढ व्हावी व शेतकऱ्यांना प्रोत्साहन मिळावे यासाठी मका लागवडीसाठी सबसिडीवर संकरित बियाणे पुरविली जातात. तसेच शेतीसाठी लागणारी खते व बियाणे क्रेडीटवर देण्याचे धोरण अवलंबले जाते. प्रकल्पामार्फत दिले जाणारे अनुदान ६०% एवढे आहे. तसेच ग्रामीण भागात आणि शेतीमध्ये शेतकऱ्यांना प्रत्यक्षात मका उत्पादनासाठी प्रोत्साहन दिले जाते. शेतकऱ्यांना विविध चर्चासत्रे, व्याख्याने, प्रदर्शने, स्लाईड-शो, आणि व्हिडीओ - ऑडीओच्या माध्यमाने मार्गदर्शन केले जाते की ज्यामुळे शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त मका उत्पादन घ्यावे.

## ग्लुकोज प्रकल्पाची आर्थिक कार्यक्षमताः

१) उत्पादन :

शिराळा तालुक्यात मक्यावर प्रक्रिया करणारा हा एकमेव प्रकल्प आहे. मक्यावर प्रक्रिया करून विविध उत्पादन घेणारा एक प्रसिद्ध प्रकल्प म्हणून ओळखला जातो. उत्पादनामध्ये विविध स्टार्च, लिक्विड ग्लुकोज, डेक्स्ट्रिन, ग्लुटेन, जर्म, पशुखाद्य इ. चा समावेश केला जातो. या प्रक्रियेपूर्वी शेतकऱ्यांकडून मका आणला जातो, जे मका पिकाचे उत्पादन घेतात. जेव्हा प्रकल्पाला मक्याचा तुटवडा जाणवतो त्यावेळी भारतातील इतर राज्यातुन मक्याची आयात केली जाते. प्रकल्पात मका साठवल्यानंतर ज्या विविध प्रक्रिया आहेत त्यात मका क्लिनींग, स्टीपींग वॅट, ग्राईडिंग, सायक्लोन, फायबर वॉश, मर्को मशिन, स्टॉर्च हायड्रोसायक्लॉन, पॅकींग इ. प्रक्रियेनंतर स्टार्च तयार केले जातात आणि अनेक कंपन्यांना उत्पादने बनवण्यासाठी पाठविली जातात. त्यात स्टार्च, ग्लुकोज व डेक्स्ट्रिन चा समावेश होतो. खालील तक्त्यात स्टार्च, ग्लुकोज व डेक्स्ट्रिनपासून विविध उत्पादने दर्शविली आहेत.

तक्ता क्र. १

| स्टॉर्च (पिष्टमय पदार्थ) | ग्लुकोज | डेक्स्ट्रिन |
|---|---|---|
| १) इंन्स्टंट स्टॉर्च (कपडे धुण्यासाठी) | १) बिस्किटे | १) डिंक |
| २) आईस्क्रिम | २) ग्लुकोज पावडर | २) फटाके |
| ३) डिटर्जंट केक (साबण) | ३) चिक्की | ३) बॅटरी सेल |
| ४) कस्टर्ड पावडर (कपडे धुण्यासाठी) | ४) मिठाई | ४) टेक्सो टेप |
| ५) रंगद्रव्ये (रांगोळी बनविण्यासाठी) | ५) न्युट्रिएंडस (बोर्नविटा) | ५) पेपर बॉक्स |
| ६) औषधी गोळ्या | ६) सलाईन वॉटर | |
| ७) टाल्कम पावडर | ७) ओ.आर.एस. पावडर | |
| ८) दंतमंजन | ८) ॲन्टीॲसिडीक औषधे | |
| ९) शु-पॉलिश | ९) खाद्यतेल | |
| १०) कापड पेपर | १०) सिरप (टॉनिक) | |
| | ११) चॉकलेटस् | |

**पशुखाद्य :**

प्रकल्पाच्या पशुखाद्य विभागात यशवंत यशोधन पॅलेट, यशवंत बायोमिल्क पॅलेट, यशवंत सुपर पॅलेट, यशवंत स्पेशल पॅलेट, यशवंत पोशक, यशवंत सुप्रिम मॅश यासारखी पशुखाद्ये बनविली जातात. त्याचबरोबर मेझ ग्लुटेन, मेझ फाईन फायबर, मेझ हस्क, मेझ जर्म केक्स इत्यादींचा सुद्धा पशुखाद्य म्हणून समावेश केला जातो.

**२) विपणन :**

ग्लुकोज प्रकल्पातील उत्पादने देशातील विविध राज्यातील तसेच परदेशातील बाजारामध्ये निर्यात केली जातात. परदेशी बाजारामध्ये सौदी अरेबिया आणि युगांडा या देशामध्ये या प्रकल्पातील उत्पादनाची निर्यात होते. तर भारतात तक्ता क्र.२ मध्ये दर्शविलेल्या राज्यामध्ये उत्पादनाची निर्यात केली जाते.

तक्ता क्र. २

ग्लुकोज प्रकल्प राज्यनिहाय विपणन केंद्रे

| राज्य | केंद्रे |
|---|---|
| महाराष्ट्र | मुंबई, ठाणे, नाशिक |
| गुजरात | गांधीनगर, सिल्वासा |
| केरळ | तिरूअनंतपूरम |
| तमिळनाडू | पाँडेचरी, चेन्नई |
| आंध्रप्रदेश | हैद्राबाद |
| छत्तिसगड | रायपूर |
| बिहार | पटना |
| राजस्थान | जयपूर |
| कर्नाटक | बेंगलोर |
| मध्यप्रदेश | भोपाळ |
| उत्तरप्रदेश | लखनऊ |
| उत्तरांचल | दिल्ली, हरियाणा |

*स्त्रोत : यशवंत सहकारी ग्लुकोज प्रकल्प.*

तक्ता क्र. ३

ग्लुकोज प्रकल्पातील एकूण रोजगार

| कामगार संख्या | क्लार्क | मॅनेजर | एकूण |
|---|---|---|---|
| ४९४ (८२.३४%) | ९८ (१६.३३%) | ०८ (१.३३%) | ६०० (१००%) |

*स्त्रोत - यशवंत सहकारी ग्लुकोज प्रकल्प*

वरील तक्ता क्र.३ प्रकल्पातील एकूण रोजगार दर्शवितो. प्रकल्पाने ६०० लोकांना (कामगारांना) रोजगार पुरवला आहे. जे प्रकल्पाच्या विविध विभागात काम करीत आहेत. उदा. स्टॉर्च विभाग, ग्लुकोज विभाग, पशुखाद्य विभाग इ. म्हणजेच ८२.३४% कामगार प्रकल्पात काम करीत आहेत. तसेच ९८ (१६.३३%) कामगार कार्यालयीन काम करीत असल्याचे दिसुन येतात तर ८ (१.३३%) मॅनेजर व्यवस्थापनाची जबाबदारी पार पाडत आहेत.

**३)ग्लुकोज प्रकल्पामार्फत शेतकऱ्यांना पुरवल्या जाण्याच्या सुविधा :**

१) मका विकास अभियान
२) बियाणे खरेदीवर अनुदान
३) पाणीपुरवठा योजना
४) बायोगॅस निर्मिती
५) खाद्यतेल पुरवठा
६) मोफत मका मळणी मशीन
७) कामगार कल्याण योजना
८) शेतकऱ्यांना प्रोत्साहन/मार्गदर्शन
९) सुधारित बियाण्यांचा पुरवठा

**निष्कर्ष:**

१) यशवंत सहकारी ग्लुकोज प्रकल्प हा भारतातील सहकारी क्षेत्रातील पहिला प्रकल्प असुन ग्लुकोज, स्टॉर्च, डेक्स्ट्रिन, ग्लुटेन जर्म खाद्यतेल इ. चे विविध उत्पादन घेत आहे.

२) यशवंत सहकारी ग्लुकोज प्रकल्पातील उत्पादन आणि विक्रीचे वृद्धीदर हे हवामान, बाजारातील किंमत, कच्च्या मालाचा पुरवठा इ.मुळे एकमेकांशी संबंधित आहेत.

३) शिराळा तालुक्यातील मका हे महत्त्वाचे पिक असुन इतर पिकांपेक्षा (गहू, ज्वारी, तांदूळ, ऊस, सोयाबीन, भुईमूग) जास्तीत जास्त प्रमाणात (५०%) घेतले जाते.

४) मका पिकाच्या मशागतीसाठी व विकासासाठी प्रकल्पामार्फत विविध चर्चासत्रे, व्याख्याने, प्रदर्शने, स्लाईड शो, ऑडिओ-व्हिडीओ कॅसेट्स इ. च्या माध्यमातून शेती तज्ञांचे मार्गदर्शन केले जाते.

५) प्रकल्पातील उत्पादनाची निर्यात मुंबई, ठाणे, नाशिक, बेंगलोर, तिरूअनंतपुरम, पाँडेचरी, चेन्नई, हैद्राबाद, पटना, जयपूर इ. ठिकाणी केली जाते.

६) यशवंत सहकारी ग्लुकोज प्रकल्पाच्या चांगल्या सुविधामुळे शेतकऱ्यांचा मका उत्पादनाचा आणि खतांचा खर्च घटला आहे.

७) शिराळा तालुक्यातील रोजगारनिर्मितीत वृद्धी

करण्यामध्ये प्रकल्पाची मदत होत आहे.

८) ग्लुकोज प्रकल्प हा ना नफा ना तोटा या तत्त्वावर स्थापन झालेला आहे, पण प्रकल्पाची वित्तीय स्थिती ही नफ्यात असल्याची दर्शविते.

शिफारसी:

१) यशवंत सहकारी ग्लुकोज प्रकल्पाने ज्या ठिकाणी शहरामध्ये मका उत्पादनाची खरेदी करणारे ग्राहक आहेत त्याठिकाणी बाजारयंत्रणा राबवावी.

२) मका शेतीच्या विकासासाठी / विस्तारासाठी यशवंत सहकारी ग्लुकोज प्रकल्पाने शेतकऱ्यांना (मका उत्पादकासाठी) उत्पादनाची जास्तीत जास्त किंमत ठरवावी.

३) यशवंत सहकारी ग्लुकोज प्रकल्पाने बँकांच्या आणि वित्तीय संस्थांच्या माध्यमातून मका उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांना कमी व्याजदरात कर्ज पुरवावे.

४) यशवंत सहकारी ग्लुकोज प्रकल्पाने दर्जात्मक वस्तु निर्माण करून आपल्या प्रकल्पाच्या ब्रँडचा नावलौकीक वाढवावा.

५) यशवंत सहकारी ग्लुकोज प्रकल्पाने उत्पादनाची निर्यात वृद्धी होण्यासाठी निर्यात सुविधांमध्ये वाढ करावी.

६) सरकारने मका शेतीच्या संशोधनासाठी रिसर्च संस्था स्थापन करावी, सहकारी संघटनांनी देखील मका शेतीसाठी संशोधन कार्य करावे.

संदर्भ सूची:


१) *यशवंत सहकारी ग्लुकोज प्रकल्पाचे वार्षिक अहवाल* (२००४ ते २०११)

२) *मेझ आऊटलूक रिपोर्ट (Maize Outlook Report)* २०१०, कार्वी कॉमट्रेड लि.इंडिया.

३) Kumar R. and Singh N. P. (2003) *"Maize Production in India : Golden Grain in Transition"*. Division of Agricultural Economics, IARI, New Delhi.

४) www.yashwantglucose.com

# ऊर्जा संसाधन स्थितीचे अध्ययन

**शिवाजी भ. यादव, पैठण,**
अर्थशास्त्र विभागप्रमुख,
शिवछत्रपती कला महाविद्यालय,
पाचोड, जि.औरंगाबाद.
भ्रमणध्वनी : ९४२१३१४६९८.

ऊर्जा संसाधनाच्या उपलब्धतेवरच त्या राज्याचा विकास ठरतो. ऊर्जा संसाधने महाराष्ट्रात विपुल प्रमाणात नाहीत. मानवाच्या विकासाने नैसर्गिक साधनसामुग्रीचा वापर अतिरिक्त होत आहे. नैसर्गिक साधनाच्या वापरावर निर्बंध घातले नाही तर मानवाच्या अस्तित्वाला धोका निर्माण होऊ शकतो. याचा विचार करुन पर्यायी संसाधनाचा ऊर्जा निर्मितीसाठी वापर वाढविण्याची गरज काळाच्या ओघात सिध्द ठरत आहे. राज्यात पारंपरिक व अपारंपारिक ऊर्जा अशी संसाधनाची विभागणी केली जाते. पारंपरिक ऊर्जा संसाधनामध्ये दगडी कोळसा, जलविद्युत, औष्णिक विद्युत, खनिज तेल व नैसर्गिक वायु, अणू ऊर्जा यांचा समावेश होतो तर अपारंपरिक ऊर्जा संसाधनामध्ये सौर ऊर्जा, पवन ऊर्जा, तरंग ऊर्जा व भरती ऊर्जा, गोबरगॅस यांचा समावेश होतो. राज्यात ऊर्जा संसाधनावर सतत ऊहापोह चालू असतो. भविष्यात पारंपरिक संसाधने फार काळ टिकणार नाहीत यावर शास्त्रज्ञांचे व विचारवंतांचे एकमत झालेले आहे. राज्यात दगडी कोळसाचे वैनगंगा खोऱ्यातील कामठी, उमरेड, पाटणसावगी, वर्धा खोऱ्यातील बांदर, वरोडा, बल्लारपूर, दुर्गापूर, वणी, बून या ठिकाणी, घुगूस येथील तेलवासा, सस्ती-राजुरा येथे साठे आहेत. ऊर्जा संसाधनातील जलविद्युत संसाधन महत्वाचे आहे. कोयना धरण, धोम, कव्हेर, मिरा, टाटा मिरा, टाटा खोपोली, टाटा भिवपूरी, वैतरणा, वैतरणा धरण, भातसा, तिलारी, राधानगरी, भाटघर, वीर, पवना, पानशेत, वरसगाव, येलदरी, पैठण, पेच, भंडारदरा, उजनी व यवतेश्वर या सर्व ठिकाणी जलविद्युतची निर्मिती केली जाते. त्याचबरोबर अण्विक, अणु व खनिज तेल, नैसर्गिक या स्रोतांद्वारे ऊर्जेची निर्मिती राज्यात केली जाते.

राज्यात पारंपरिक साधनाबरोबर ऊर्जा निर्मितीच्या अपारंपरिक सौर ऊर्जा, पवन ऊर्जा, तरंग ऊर्जा व भरती ऊर्जा, गोबरगॅस संसाधनाचे महत्त्व वाढत आहे. २०११-१२ साली राज्यात दगडी कोळसा, जलविद्युत, औष्णिक विद्युत, अणु विद्युत, खनिज तेल व नैसर्गिक वायु, सौर ऊर्जा, पवन ऊर्जा, तरंग ऊर्जा, भरती ऊर्जा व गोबर गॅस या सर्वांमधून १३६७७ मेगावॅट ऊर्जेचे उत्पादन झाले होते. विजेची मागणी व पुरवठा विचारात घेतला तर विजेची मागणी पुरवठ्यापेक्षा ४४६८ मेगावॅट तुटीची होती. राज्यात विजेचा वापर औद्योगिक ३५%, घरगुती २३%, कृषी १९%, वाणिज्य ८%, सार्वजनिक ४% व रेल्वे ३% असा होतो. यावरुन राज्यात मानवी जीवनाचा आधार ऊर्जा क्षेत्र आहे हे सिध्द होते. राज्याच्या ऊर्जा संसाधनाच्या उपलब्धतेचा विकासावर परिणाम होतो. म्हणून राज्यात ऊर्जा संसाधनाची उपलब्धता पाहणे महत्त्वाचे ठरते.

**ऊर्जा संसाधने:**

राज्यातील ऊर्जा संसाधनाची विभागणी पारंपरिक व अपारंपरिक ऊर्जा साधने अशी केली जाते.

१)पारंपरिक ऊर्जा संसाधने :

राज्यात दगडी कोळसा, पाणी, औष्णिक, खनिज तेल, नैसर्गिक वायु व अणु या संसाधनाचा वापर करुन ऊर्जेचे उत्पादन केले जाते.

अ)दगडी कोळसा संसाधने :

जगामध्ये दगडी कोळशाच्या उत्पादनात चीन व अमेरिकेनंतर भारताचा तिसरा क्रमांक लागतो. भारताच्या दगडी कोळशाच्या एकूण साठ्यापैकी ४% साठा राज्यात आहे. महाराष्ट्रात सँडस्टोन व रोल, दगडी कोळसा माती यांचे थर सापडत आहेत. अंदाजे राज्यात कोळशाचा साधारणत: ५,००० दशलक्ष टन साठा आहे. दगडी कोळशाचे साठे पूर्व विदर्भात नागपूर, चंद्रपूर व यवतमाळ या जिल्हयात आढळतात. सर्व दगडी कोळसा अकोकक्षम आहे. नागपूर जिल्हयातील कामठी व उमरेड क्षेत्रात अंदाजे दगडी कोळशाचा साठा अनुक्रमे ७५ दशलक्ष टन व ७० दशलक्ष टन आहेत. वर्धा खोऱ्यातील बांदरमध्ये १०० दशलक्ष टन, वरोडामध्ये ६० दशलक्ष टन, बल्लारपूर मध्ये २००० दशलक्ष टन, दुर्गापूर वणी मध्ये २४० दशलक्ष टन दगडी कोळशाचे साठे राज्यात आहेत.

महाराष्ट्रात दगडी कोळशाच्या २२ खाणी आहेत. या २२ खाणीतून १९९४ साली दगडी कोळशाचे उत्पादन १५० लाख टन होते. ते २००० साली २.७६ कोटी टनाने वाढले. दगडी कोळशाचा उपयोग राज्यातील औष्णिक केंद्रे खापरखेडा, बल्लारपूर, पारस याचप्रमाणे उद्योगधंदे व रेल्वेसाठी केला जातो. राज्यात दगडी कोळशापासून एकूण ऊर्जेच्या ६७ टक्के ऊर्जेचे उत्पादन केले जाते. यावरुन राज्यातील ऊर्जा संसाधनापैकी दगडी कोळसा या संसाधनाचे महत्व लक्षात येते.

आ) जलऊर्जा संसाधने :

राज्यात पर्वतांच्या रांगा फार मोठया प्रमाणात नाहीत. पर्वताच्या उतारावरुन वेगाने पाणी खाली येते. या पाण्याच्या गतिशील प्रवाहावर विजेची निर्मिती केली जाते. विजेच्या निर्मितीत जलऊर्जा संसाधने महत्वाची आहेत. पाणचक्क्या, धरणे स्त्रोतांतून विजेची निर्मिती केली जाते. कोयना जलविद्युत केंद्रातून ऊर्जेची निर्मिती केली जाते. +अर्वाचिन महाराष्ट्राची भाग्यरेषा' असे या केंद्रास

म्हणतात. कोयनाच्या पहिल्या टप्प्यातून २.४० लाख किलोवॅट, दुसऱ्या टप्प्यातून ५.४ लाख किलोवॅट व तिसऱ्या टप्प्यातून ३.२ लाख किलोवॅट ऊर्जेची निर्मिती केली जाते. महाराष्ट्रात बारमाही वाहणाऱ्या नद्यांची संख्या कमी आहे. यामुळे धरणाची संख्या ही कमी आहे. जलऊर्जा प्रकल्पाची एकूण ऊर्जा निर्मिती क्षमता १९२० मेगावॅट आहे. यामध्ये पोफळीमधून ५६० मेगावॅट, अलोरे ३२० मेगावॅट, धरणाच्या पायथ्याशी ४० मेगावॅट, तांबडवाडी १००० मेगावॅट विद्युत क्षमता आहे. रायगड जिल्हयात टाटा वीज मंडळाचा भिरा, खोपोली व भिवपूरी येथे जलविद्युत केंद्रे आहेत. यांची क्षमता सुमारे ३६५ मेगावॅट आहे.

जायकवाडी-पैठण धरणाच्या पायथ्याशी ÷रिव्हर्सेबल टर्बाईल्स'द्वारे १२ मेगावॅट विजेची निर्मिती केली जाते. येलदरी-परभणी वीज केंद्राद्वारे ५ मेगावॅट, पेच-नागपूर ५३ मेगावॅट, भाटघर, वीर, पवना, पानशेत आणि वरसगाव-पुणे विद्युत प्रकल्पाची क्षमता ५१ मेगावॅट आहे. जलविद्युत प्रकल्पाची क्षमता पाऊसावर अवलंबून आहे.

इ)औष्णिक ऊर्जा संसाधने:

राज्यात औष्णिक विद्युतच्या उत्पादनासाठी बाष्पजनित्रचा वापर केला जातो. कोळसा व खनिज तेल वापरुन बॉयलरमध्ये उच्च तापमानाची व उच्च दाबाची वाफ निर्माण करुन त्याद्वारे बाष्पजनित्र (गॅस टर्बाईन) चालविले जाते. भूगर्भ वायूच्या ज्वलनातून वायूजनित्र चालवून विद्युत निर्मिती केली जाते. यालाच ÷ओपन सायकल गॅस टर्बाईन' म्हणतात. राज्यात प्रामुख्याने दगडी कोळशाच्या आधारे औष्णिक विद्युत निर्माण करतात. कोकणातील (ठाणे) औष्णिक विद्युतक्षमता ११८ मेगावॅट, तुर्भे टाटा (मुंबई) ११३० मेगावॅट, पश्चिम महाराष्ट्रातील एकलहरे (नाशिक) ९१० मेगावॅट, खान्देशातील फेकरी ४८२.५ मेगावॅट, मराठवाडयातील परळी (बीड) ६९० मेगावॅट, विदर्भातील पारस (अकोला) ६२.५ मेगावॅट, कोराडी ११०० मेगावॅट, दुर्गापूर, खापरखेडा ४२० मेगावॅट व बल्लारपूर १८४० मेगावॅट औष्णिक विद्युतची क्षमता आहे. महाराष्ट्रात औष्णिक ऊर्जा संसाधनाद्वारे ८१७५ मेगावॅट एवढी औष्णिक विद्युतची निर्मिती केली जाते.

इ) खनिज तेल व नैसर्गिक वायू ऊर्जा संसाधने :

महाराष्ट्रात ३ फेब्रुवारी १९७४ रोजी अरबी समुद्रात पहिली विहीर खोदली ते मुंबई जवळ पश्चिमेला १७६ कि.मी. अंतरावर असून या तेलक्षेत्राला ÷बॉम्बे हाय' या नावाने ओळखले जाते. या परिसरात २००० चौ.कि.मी. क्षेत्रात ५.५ कोटी टन तेल असण्याची शक्यता आहे. बॉम्बे हाय मधून खनिज तेल व नैसर्गिक वायू उपलब्ध होतो. देशातील खनिज तेल व नैसर्गिक वायूच्या ५०% उत्पादन बॉम्बे हाय मधून होते. महाराष्ट्रात १९८५-८६ साली नैसर्गिक वायूचे उत्पादन ५,१८० दशलक्ष घनमीटर होते. १९९३-९४ साली १३,३५६ दशलक्ष घनमीटर पर्यंत वाढले. महाराष्ट्रातील ऊर्जा संसाधनात खनिज तेल व नैसर्गिक वायु ऊर्जा संसाधन महत्वाचे आहे.

उ)अणुऊर्जा संसाधने :

युरेनियम, थेरिनियम, लिथिअम, प्लॅटिनम यासारख्या आण्विक इंधनांचा वापर अणुऊर्जा निर्माण करण्यासाठी केला जातो. १० ऑगस्ट १९४८ रोजी भारतीय अणुशक्ती मंडळाची स्थापना करण्यात आली. महाराष्ट्रातील मुंबई व

नागपूर येथे अणू शक्तीची केंद्रे आहेत. अप्सरा अणुभट्टी, सायरस अणुभट्टी, झार्लिना अणुभट्टी, पुर्णिमा व ध्रुव अणुभट्टी या ठिकाणी अणु ऊर्जाची निर्मिती होते. तारापूर अणुकेंद्रातून ४२० मेगावॅट विद्युत निर्मिती होते.

२) अपारंपरिक ऊर्जा संसाधने :

महाराष्ट्रात पारंपरिक ऊर्जा संसाधनाबरोबर अपारंपरिक संसाधनाचा उपयोग केला जातो. दगडी कोळसा, पेट्रोलियम पदार्थ व नैसर्गिक वायु ही संसाधन विपुल प्रमाणात नाहीत. यांची साठे राज्यात मर्यादित असून ही फार काळ टिकणारी नाहीत. म्हणून ऊर्जेच्या उत्पादनात वाढ करण्यासाठी पर्यायी अपारंपरिक संसाधने वापरणे गरजेचे झाले आहे. अपारंपरिक ऊर्जा संसाधनाचे नवीनीकरण सहज करता येते. सौर ऊर्जा, पवन ऊर्जा, भरती-ओहोटी ऊर्जा व गोबरगॅस यांचा समावेश अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांमध्ये होतो. ही स्त्रोत पुढीलप्रमाणे:

अ) सौर ऊर्जा संसाधने:

राज्यात विज्ञान व तंत्रज्ञानाच्या प्रगतीतून फोटोसेलच्या साहय्याने सौर ऊर्जेचे उत्पादन होते. फोटोसेलद्वारे सौर ऊर्जेची साठवणूक करुन तिचा उपयोग पाणी तापविणे, वाहने, दिवे, पंप, रेफ्रिजरेटर्स यासाठी करता येवू शकतो. राज्यात सौर कूकरचा वापर अन्न शिजविण्यासाठी केला जातो. सौर कूकरचा राज्यात वापर वाढत राहावा म्हणून त्याचे महत्व लोकांना पटवून दिले पाहिजे. फोटोसेल्सची किंमत जास्त आणि कार्यक्षमता कमी असल्याने त्याच्या वापरात वाढ होत नाही. म्हणून त्याची कार्यक्षमता वाढून त्याच्या किंमती कमी केल्या पाहिजे. राज्यात सौर संग्राहक यामध्ये दगड, विटा, काचा अशा नैसर्गिक साधनसामुग्रीचा वापर करुन ऊर्जेचे उत्पादन केले जाते. या दिवसात उष्णता शोषली जाते व रात्री तिचे उत्सर्जन केले जाते. सिलीकॉन व गॅलियम या पदार्थापासून फोटोसेल्सचे उत्पादन केले जाते.

आ) पवन ऊर्जा संसाधने :

महाराष्ट्रात वाऱ्याचा स्त्रोत वर्षभर चांगला असतो. वाऱ्याच्या स्त्रोताचा उपयोग करुन पवन ऊर्जेचे उत्पादन केले जाते. वाऱ्याचा प्रवाह नेहमीच जास्त दाबाकडून कमी दाबाकडे असतो. पवन ऊर्जेमुळे हवा, पाणी, ध्वनी, मृदा यांचे प्रदुषण होत नाही. हे तंत्रज्ञान पहिल्यांदा जगातील डेन्मार्क देशाने विकसित केले होते. पवन ऊर्जेच्या निर्मितीमध्ये तामिळनाडूनंतर महाराष्ट्राचा क्रमांक लागतो. देशातील एकूण पवन ऊर्जेच्या उत्पादनापैकी १७% उत्पादन महाराष्ट्रात होते. ऊर्जा निर्मितीमध्ये पवन ऊर्जा संसाधनाचा वापर इतर ऊर्जा संसाधनापेक्षा कमी जरी असला तरी त्याचे महत्व निश्चित आहे.

इ)भरती-ओहोटी ऊर्जा संसाधने :

नदीच्या मुखाशी ऊर्जेची निर्मिती केली जाते. याच बरोबर सागरातील लाटा व भरती यांचा ऊर्जा संसाधने म्हणून उपयोग केला जातो. सागरी तरंग व लाटावर चाके पॅडल बसून ऊर्जा निर्मिती केली जाते. राज्यात भरती-ओहोटी ऊर्जा संसाधने मोठ्या प्रमाणात नाहीत.

ई)गोबरगॅस ऊर्जा संसाधने :

गोबरगॅसचे उत्पादन जनावरांच्या आणि माणसांच्या मलमूत्रावर आधारलेले आहे. गोबरगॅस मिळविण्याचे तंत्रज्ञान आज सर्वसामान्य झाले आहे. गोबरगॅसचा उपयोग केवळ राज्यात स्वयंपाकासाठीच नसून त्यातून बाष्पनिर्मिती करता येते.

राज्यातील कृषी, उद्योग, बांधकाम क्षेत्राचा विकास ऊर्जेवरच आहे. तेंव्हा राज्यात पारंपरिक व अपारंपरिक ऊर्जा संसाधनाचे महत्व दिसुन येते.

**समस्या:**

महाराष्ट्रात २०११-१२ साली विजेची मागणी १८१४५ मेगावॅट होती व पुरवठा १३६७७ मेगावॅट होता. याचा अर्थ राज्यातील विजेच्या मागणीच्या तुलनेत विजेचा पुरवठा ४४६८ मेगावॅट तुटीचा असल्याने भारनियमनात वाढ करावी लागली. या भारनियमनामधून बाहेर पडण्यासाठी विजेच्या उत्पादनात वाढ होणे गरजेचे आहे. पण ऊर्जा संसाधनाच्या मर्यादेमुळे विजेच्या उत्पादनात अपेक्षित वाढ होतांना दिसत नाही.

राज्यात दगडी कोळसा आणि जल या संसाधनापासून मोठया प्रमाणात विजेचे उत्पादन केले जाते. औष्णिक, अणु, खनिजतेल व नैसर्गिक वायू संसाधनाच्या वाढीसाठी नविन तंत्रज्ञानाचा शोध लावला पाहिजे. पण राज्यात या ऊर्जा संसाधनाच्या विकासाकडे दुर्लक्ष केले जाते.

अपारंपरिक संसाधनात सौर ऊर्जा, पवन ऊर्जा, भरती-ओहोटी ऊर्जा, गोबरगॅस संसाधनाचा फारच मर्यादित वापर केला जातो. राज्यातील एकूण ऊर्जेच्या जवळपास १ टक्काच अपारंपरिक संसाधनापासून ऊर्जा उत्पादन होते.

**उपाय:**

राज्यात नैसर्गिक साधनसामुग्री मर्यादित आहे. दगडी कोळशाचे साठे साधारणत: ५००० दशलक्ष टन पर्यंत राज्यात आहे. विजेची मागणी पुर्ण करण्यासाठी दगडी कोळसा ऊर्जा संसाधनाचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. दगडी कोळसा ऊर्जा संसाधनाचा वापर असाच वाढत राहिला तर भविष्यात दगडी कोळशाचे साठे संपुष्टात येऊ शकतात. तेंव्हा त्याचा वापर व पुनर्वापर झाला पाहिजे व सौर ऊर्जा संसाधने विकसित करण्याकडे राज्याचा कल असणे आवश्यक आहे.

**संदर्भ सूची:**


१) Datt Rudra and K.P.M. Sunduram, *Indian Economy,* S. Chand Publications, New Delhi.
२) कुरुलकर र. पु., *महाराष्ट्राची अर्थव्यवस्था,* विद्या प्रकाशन, नागपूर, २००६.
३) *www.MaharashtraGovt.in*
४) कृष्णा भोगे, *भारतीय अर्थव्यवस्था,* भोगे करिअर डेव्हलपमेंट अकॅडमी, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.
५) जंगले मंगला, *महाराष्ट्राची अर्थव्यवस्था,* प्रशांत पब्लिकेशन्स, जळगांव, २००८.
६) *महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २००९-१०.*
७) *योजना* - सप्टेंबर २००८, जानेवारी २०१३.
८) *लोकराज्य*- सप्टेंबर, फेब्रुवारी २००८.


(दुरुस्ती:कृपया अर्थसंवाद,ऑक्टो.-डिसें.२०१३,खंड ३७,अंक-३ चे पृष्ठ क्र.२३० ते ३३७ असे वाचावे.)

# ठाणे जिल्ह्यातील वारली जमातीची व्यावसायिक रचना

आर. एस. सोळुंके, औरंगाबाद,
सदस्य नियोजन आयोग, महाराष्ट्र राज्य,
अर्थशास्त्र विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
भ्रमणध्वनी: ९०४९६२२९९८

एस. बी. करंडे, बोरीवली (प),
श्री.भाऊसाहेब वर्तक महाविद्यालय, मुंबई - ४०० ०९१
भ्रमणध्वनी : ९४२१०८७९८२

भारतीय अर्थव्यवस्था जगातील एक महासत्ता म्हणून उदयास येत आहे. विविध क्षेत्रात भारताने नेत्रदिपक विकास साध्य केला असून जागतिक पातळीवर जगातील वेगाने विकसित होणारी क्रमांक दोनची अर्थव्यवस्था म्हणून नामाभिदान मिळविले आहे. अशा सर्व सकारात्मक बाजू असतांना अर्थव्यवस्थेतील एक महत्त्वाचा समाज घटक असणारा आपला आदिवासी बांधव मात्र या सर्व प्रक्रियेपासून आणि विकासाच्या लाभापासून वंचित आणि दुर्लक्षित राहिल्याचे दिसून येते. विकास प्रक्रियेमध्ये सर्वच समाज घटकांचा समावेश झाला पाहिजे म्हणून विकासाच्या प्रक्रियेत समाजाच्या एखाद्या घटकाच्या समस्यांकडे दुर्लक्ष करता येणार नाही. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत सर्वत्र समाजाचा विकास घडवून आणणे अभिप्रेत असते परंतु नदीतील बेटाप्रमाणे हा समाज पुर्ण अलिप्त असल्याचे दिसून येते.

स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच आदिवासींच्या विकासाचे आणि उन्नतीचे प्रयत्न सुरु झाल्याची नोंद इतिहासात आढळते. ब्रिटिश राजवटीतच आदिवासींच्या विकासाचे प्रयत्न सुरु झाले होते. परंतु त्यांच्या या उद्देशामागे दयेसारख्या सात्विक भावना होत्या. त्याच प्रमाणे धर्मांतरासारखे काही राजस आणि समाजविच्छेदनासारखे तामस हेतूही होते. आज या कार्याचा वेग वाढविण्याची

गरज असून उद्दिष्टांचे स्वरुपही बदलण्याची नितांत आवश्यकता आहे. या कार्याचा फक्त एकच हेतू असला पाहिजे तो म्हणजे महत्तम सामाजिक कल्याण होय. लोकशाही समाज व्यवस्थेमध्ये समाजातील कोणताही समाजघटक आर्थिक विकास प्रक्रियेच्या लाभापासून वंचित राहता कामा नये.

महाराष्ट्रातील काही निवडक जिल्हे आदिवासी बहुल लोकसंख्येचे जिल्हे म्हणून ओळखले जातात. त्यात ठाणे, नाशिक, नंदुरबार, धुळे, गोंदिया, हिंगोली, नांदेड, चंद्रपूर, भंडारा आणि गडचिरोली इ. जिल्ह्यांचा उल्लेख करावा लागेल. २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्र राज्याची एकूण लोकसंख्या ९,६८,६९००० एवढी होती तर आदिवासी लोकसंख्या ८५७७००० एवढी होती. आदिवासी लोकसंख्येचे एकूण लोकसंख्येशी असणारे प्रमाण ८.८५ टक्के एवढे आहे. ठाणे जिल्ह्याची एकूण लोकसंख्या ८१,३१,८४५ एवढी असून यात आदिवासी लोकसंख्या ११,९९,२९० एवढी होती. आदिवासी लोकसंख्येचे ठाणे जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येशी असणारे प्रमाण १४.७५ टक्के एवढे येते. ठाणे जिल्ह्यात प्रामुख्याने वास्तव्यास असणाऱ्या आदिवासी जमातीमध्ये काथोडी, कातकरी,कोकणा, कोकणी, महादेव कोळी, मल्हार कोळी, वारली, ठाकर, दुबळा, कोळी ढोर व ठाकरे कोळी इत्यादींचा समावेश आहे. परंतु वारली जमातीची लोकसंख्या ही जवळपास एकूण आदिवासी लोकसंख्येच्या ४० ते ५० टक्के आहे. १९७१ च्या जनगणनेनुसार ठाणे जिल्ह्यातील एकूण आदिवासी लोकसंख्या ५,७९,५३८ एवढी होती. त्यापैकी २,६२,७८५३ एवढी वारली जमातीची लोकसंख्या असून हे प्रमाण ४५.१६ टक्के एवढे येते. तर २००१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यातील एकूण आदिवासी लोकसंख्या ११,९९,२९० एवढी असून त्यापैकी ५,५८,७८८ एवढी वारली जमातीची लोकसंख्या असून त्याचे आदिवासी लोकसंख्येशी प्रमाण ४६.५९ टक्के एवढे येते. महाराष्ट्रातील इतर आदिवासींच्या तुलनेत वारली ही जमात तुलनात्मक दृष्ट्या मागास असल्याचे दिसून आले म्हणून ठाणे जिल्ह्यातील वारली समाजाच्या व्यावसायिक रचनेचा अभ्यास करण्यासाठी या अध्ययन विषयाची निवड करण्यात आली.

### संशोधनाची गृहितके:

१) ठाणे जिल्ह्यातील वारल्यांचा मुख्य व्यवसाय शेती आहे.

२) वारली समाजाकडे असणारी शेती सिमांतिक स्वरुपाची आहे.

३) कुटूंबाच्या उत्पन्नात स्त्रियांची महत्त्वपुर्ण भुमिका आहे.

४) स्वयं रोजगाराचे अल्प प्रमाण आहे.

### संशोधनाची उद्दिष्टे :

ठाणे जिल्ह्यातील वारली समाजाच्या व्यावसायिक रचनेच्या अध्ययनासाठी पुढील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

१) वारली समाजाची व्यावसायिक रचना अभ्यासणे.

२) व्यवसायात स्त्रियांची भूमिका जाणून घेणे.

३) स्वयंरोजगाराचे प्रमाण अभ्यासणे.

४) वारली समाजाच्या स्वयंरोजगाराच्या प्रमाणात वाढ होण्यासाठी उपाय सूचविणे.

वरील चार उद्दिष्टांच्या चौकटीत राहूनच संशोधन पूर्ण करण्यात आले आहे.

## संशोधन पद्धती:

ठाणे जिल्ह्यातील वारली जमातीच्या व्यावसायिक रचनेच्या अभ्यासासाठी प्राथमिक साधन सामग्रीचा आधार घेण्यात आला आहे. त्या करिता मुलाखत अनुसूची हे साधन वापरुन शिक्षणविषयक माहिती मिळविण्यात आली आहे. ठाणे जिल्ह्यात एकूण पंधरा तालुके असून जव्हार, तलासरी आणि मोखाडा हे तीन तालुके आदिवासी बहुल असून या तिन्ही तालुक्यात एकूण लोकसंख्येच्या सरासरी ९० ते ९२ टक्के आदिवासी लोकसंख्या असून त्यात बहुसंख्येने वारली जमातीचे वास्तव्य आहे. या प्रत्येक तालुक्यात दहा गावे आणि प्रत्येक गावातून सहेतुक नमुना निवड पद्धतीने (Purposive Sampling Method) १० वारली कुटुंबाची निवड करण्यात आली. अशा प्रकारे समग्रातून एकूण ३०० नमुना कुटुंबे निवडून त्या आधारे ठाणे जिल्ह्यातील वारली समाजाच्या व्यावसायिक रचनेच्या अभ्यास करण्यात आला आहे.

## संदर्भ साहित्याचे सिंहावलोकन:

आदिवासींच्या एकंदरीत सर्वच पैलूंवर अनेक विचारवंतानी आणि संशोधकांनी अध्ययन केले आहे.

भारतीय संस्कृती कोष (२०००) महादेवशास्त्री जोशी यांनी या कोषामध्ये वारली समाजाच्या व्यवसायाविषयी विश्लेषण केले आहे. भारतीय संस्कृती कोषानुसार वारल्यांच्या मुख्य व्यवसाय हा शेतीचा आहे. पुर्वी बहुतेक सर्व वारल्यांच्या मालकीच्या जमिनी होत्या परंतु नंतरच्या काळात त्यांच्या जमिनी ब्राम्हण, प्रभु, गुजराथी, मारवाडी, मुसलमान, पारसी, इरानी वगैरे लोकांनी गिळंकृत केल्या. त्यामुळे वारली सध्या सावकाराकडे घरकाम, जंगलात लाकडे तोडणे, कोळशाच्या भट्ट्या लावणे, फुलबाग व फळबागात मजुरी व स्त्रिया जंगलात लाकडे तोडण्याचे काम करतात.

खंडेराव सावे (१९६६) ÷÷वारली'' या संशोधनपर पुस्तकात वारली लोकांचा प्रमुख व्यवसाय हा शेती असल्याचा उल्लेख केला आहे. परंतु वारली लोक कसत असलेल्या बहुतांश जमिनी त्यांच्या नावावर नसून जामिनदार व सावकार हे त्या जमिनीचे खरे मालक आहेत म्हणून वारली शेतकरी असला तरी तो कुळाने / खंडाने शेती करणारा आहे. डॉ. गोविंद गारे (२००७) ÷÷वारली चित्रसंस्कृती'' या पुस्तकात वारल्यांचा प्रमुख व्यवसाय शेती असल्याचा उल्लेख केला असून अतिशय उत्कृष्ट भातशेती वारली करत असल्याचा उल्लेख केला आहे. डॉ. शौनक कुळकर्णी (२००९) ÷÷महाराष्ट्रातील आदिवासी'' या आपल्या संशोधनपर पुस्तकात वारली समाजाच्या मुख्य व्यवसायाचा उल्लेख करतांना त्यांच्या उत्पत्ती विषयीच्या इतिहासात आधार घेतला. ते म्हणतात, वारली स्वत:च्या उत्पत्तीबद्दल सांगतात की, देवाने प्रत्येक माणसाला काही भेटी देण्याचे ठरविले, त्या प्रमाणे एका माणसाला देवाकडून पुस्तक मिळाले, तो ब्राम्हण झाला. एकाला कुदळ मिळाली तो माळी झाला. एकाला बांबू मिळाला तो धेड म्हणजे बुरुड झाला. एकाला भाता मिळाला तो लोहार झाला आणि आम्हांला नांगर मिळाला म्हणून आम्ही शेतकरी झालो.

नदीम हसन (१९८२) ÷÷ट्राईबल इंडिया टुडे'' या पुस्तकात भारतातील ८० टक्के आदिवासी शेती व्यवसाय करत असून त्यांची जमीन

करण्याची पद्धती अगदी परंपरागत स्वरुपाची असल्याचा उल्लेख केला आहे.

गुरुनाथ नागगोंडे (२००३) ÷÷भारतीय आदिवासी'' या पुस्तकात वारली समाजाचे व्यवसायिक विश्लेषण केले आहे. ते म्हणतात वारली हा जातीचा शेतकरीच आहे. शेती हा त्यांचा मुख्य व्यवसाय आहे पण शेती करण्याची पद्धत अगदीच जुनाट आहे. शेतीतून मिळणारे उत्पन्न अत्यंत तोकडे असल्यामुळे त्यांना जंगलतोडीचा धंदा, गवत कापणीचा धंदा, बागांमध्ये मजुरी तसेच इतर स्वरुपाचे काम उदा. पुल बांधणे, गवंडीकाम, लाकडे गोळा करणे इत्यादी स्वरुपाची मजुरी वारली लोक करीत आहेत.

अशा प्रकारे विविध विचारवंत आणि संशोधकांच्या अभ्यासावरुन शेती हा वारल्यांचा मुख्य व्यवसाय असल्याचा निष्कर्ष निघतो.

**वारली समाज-व्यावसायिक स्थिती:**

ठाणे जिल्हयातील जव्हार, तलासरी आणि मोखाडा या तालुक्यात जवळ जवळ ४० टक्के जमीन ही जंगल डोंगरांनी व्यापलेली दिसून येते. ठाणे जिल्हयातील एकूण ९४६० चौ.कि.मी. भौगोलिक क्षेत्रापैकी ३८७९ चौ.कि.मी. क्षेत्रावर जंगल, वने असून हे प्रमाण जिल्हयाच्या एकूण भौगोलिक क्षेत्राच्या ४१ टक्के एवढे येते. याचाच अर्थ फक्त ५९ टक्के भौगोलिक क्षेत्र शेती करण्यायोग्य असले तरी बरीच जमीन खारी प्रकारची असून उपजावू नाही. त्यामुळे येथील बहुतांशी आदिवासी समाज मोलमजुरी करून आपला उदरनिर्वाह करत असल्याचे दिसून आले.

**वारली समाज: शेती व्यवसाय-**

ठाणे जिल्ह्यातील वारली आदिवासी समाज हा प्रामुख्याने मजुरी करणारा समाज असल्याचे दिसून आले. परंतु वारली समाजाकडे असणारी जमीन अतिशय सिमांतिक स्वरूपाची असून २३९ कुटुंबे शेतीबरोबरच मजुरीही करीत असल्याचे दिसून आले. भुधारणेनुसार आदिवासी कुटुंबाचे वर्गीकरण तक्ता १ मध्ये दर्शविण्यात आले आहे.

एकूण आधारभूत कुटुंबापैकी (३००) फक्त २७५ कुटुंबांकडे स्वत:ची थोडीफार जमीन असून ते शेती व्यवसाय करत असल्याचे दिसून आले. तसेच यापैकी २७१ शेतकऱ्यांकडे १ किंवा १ हेक्टर पेक्षा कमी जमीन असल्याचे दिसून आले आणि हे प्रमाण ९८.५४ टक्के एवढे येते. यांना

तक्ता क्रमांक १

आधारभूत कुटुंबाची जमीनधारणा स्थिती

| अ.क्र. | व्यवसाय | कुटुंब संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | सिमांत शेतकरी (१ हेक्टरी पर्यंत) | २७१ | ९८.५४ |
| २. | अल्पभूधारक (१ ते २ हेक्टर) | ४ | १.४६ |
| ३. | कनिष्ठ मध्यम भुधारक (४ ते १० हेक्टर) | -- | -- |
| ४. | मोठे भुधारक (१० हे. पेक्षा जास्त) | -- | -- |
| | एकूण शेतकरी | ६० | १०० |

*आधार - प्रत्यक्ष नमुना पाहणी*

अर्थशास्त्रीय परिभाषेत सिमांतिक शेतकरी असे संबोधले जाते. फक्त चार कुटुंबाकडे १ ते २ हेक्टर म्हणजेच ५ एकर पर्यंत जमीन असल्याचे दिसून आले. याचे प्रमाण १.४६ टक्के एवढे येते. तर कनिष्ठ मध्यम भूधारक व मोठे भूधारक एकही आदिवासी बांधव असल्याचे दिसून आले नाही.

ठाणे जिल्ह्यातील ३०० नमुना कुटुंबापैकी फक्त २७५ कुटुंबाकडे जमीन ही सिमांतिक स्वरूपाची आहे. परंतु बहुतांश आदिवासींची शेती ही पावसावरच अवलंबून असल्याचे दिसून आले. एकंदरीत परिस्थितीचा आढावा घेता आदिवासी बांधवांकडे असणारी सिंचनाची साधने अतिशय त्रोटक असल्याचे दिसून आले. बहुतांश आदिवासी कुटुंबे दारिद्र्यात जीवन जगत असल्यामुळे त्यांना अशा बाबींवर खर्च करणे अशक्य असल्याचे दिसून आले. समग्रातील नमुना आदिवासी कुटुंबाच्या जमीन विषयक स्थितीचे अध्ययन करत असतांना पिक रचनेचे ही अध्ययन करण्यात आले. ठाणे जिल्हा हा कोकण किनारपट्टीचा भाग असल्यामुळे जिल्ह्यात सर्वत्र भाताचे पिक मोठ्या प्रमाणात घेतले जाते. ज्या शेतकऱ्यांकडे बारमाही व हंगामी सिंचन व्यवस्था आहे असे शेतकरी भाजीपाल्याचे पिक घेत असल्याचे दिसून आले. पावसाळ्याच्या हंगामात होणाऱ्या खूप पावसामुळे येथे भाताशिवाय दुसरे पिक घेण्यास अनुकूल वातावरण नसल्यामुळे बाकी पिकांचे प्रमाण कमी असल्याचे दिसून आले.

### कुटुंबाच्या उत्पन्नात स्त्रियांची भूमिका:

ठाणे जिल्ह्यातील जव्हार, तलासरी आणि मोखाडा या तीन तालुक्यातील वारली समाजाचे आर्थिक आणि सामाजिक अध्ययन करत असतांना स्त्रियांच्या भूमिकेवर प्रकाश टाकण्यात आला. आदिवासी कुटुंबात असणारी आर्थिक विपन्नावस्था आणि अठराविश्व दारिद्र्य, निरक्षरता, कुटुंब नियोजनाबद्दलचे अज्ञान यामुळे कुटुंबातील सदस्य संख्या जास्त असल्याचे दिसून आले. ३०० नमुना कुटुंबातील एकूण सदस्य संख्या २५६३ असून सरासरी सदस्य संख्या ८.५४ असल्याचे दिसून आले. एवढ्या सदस्यांचे पालन पोषण करण्यासाठी पुरूषाचे उत्पन्न तोकडे पडते त्यामुळे उत्पन्नात स्त्रिया हातभार लावत असल्याचे दिसून आले. ३०० नमुना कुटुंबापैकी २१० कुटुंबात स्त्रिया आणि लहान मुले मोलमजुरी करत असल्याचे दिसून आले. थोडक्यात वारली कुटुंबाच्या उत्पन्नामध्ये स्त्रियांची भूमिका महत्त्वाची असल्याचे दिसून आले.

### आदिवासी समाज आणि स्वयं-रोजगार:

भारत सरकार आणि राज्य सरकारने स्वयंरोजगाराला प्रोत्साहन देण्यासाठी विविध उपक्रम आणि योजना तयार केल्या आहेत. परंतु शिक्षणाच्या कमी प्रमाणामुळे आदिवासी बांधवांपर्यंत त्या पोहोचू शकल्या नाही. कोणताही व्यवसाय सुरू करण्यासाठी प्राधान्यक्रमाने विचार केला जातो तो प्रथम भांडवलाचा परंतु आदिवासी बांधव जगत असल्याचे हलाखीचे जीवन, दारिद्र्य, बेकारी, अज्ञान इ.मुळे गरिबीचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून आले. ३०० नमुना कुटुंबापैकी फक्त २२ कुटुंबातील एक-एक व्यक्ती स्वयंरोजगार करत असल्याचे दिसून आले. परंतु या कुटुंबांनी निवडलेला व्यवसाय हे खूप कमी भांडवल असल्याचे दिसून आले. स्वयंरोजगार करणाऱ्या कुटुंबाचे व्यावसायिक वर्गीकरण तक्ता क्रमांक २ मध्ये दर्शविण्यात आले आहे.

तक्ता क्रमांक २

स्वयंरोजगाराचे वर्गीकरण

| अ.क्र. | तपशिल | कुटुंब संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | किराणा दुकान | ११ | ५०.०० |
| २. | चिकन विक्री दुकान | ०३ | १३.६४ |
| ३. | चहा-नाश्ता हॉटेल | ०३ | १३.६४ |
| ४. | केश कर्तनालय | ०१ | ४.५४ |
| ५. | रेती-उपसा व्यवसाय | ०२ | ९.०९ |
| ६. | सुतारकी/ फर्निचर | ०२ | ९.०९ |
| | एकूण | २२ | १००.०० |

*आधार - प्रत्यक्ष नमुना पाहणी*

एकूण ३०० नमुना कुटुंबापैकी २२ व्यक्ती स्वयंरोजगार करत असल्याचे दिसून आले. याचे प्रमाण फक्त ७.३३ टक्के एवढे येते. या २२ कुटूंबापैकी ११ व्यक्ती किराणा दुकान चालवत असून यांचे प्रमाण ५०.०० एवढे आहे. प्रत्यक्ष पाहणीत असे आढळून आले की, ११ किराणा दुकानांपैकी बहुतांश दुकाने अतिशय छोटी आणि आपल्या घरातच चालवत असल्याचे दिसून आले. तीन कुटुंबे कोंबड्यांचे चिकन विक्रीचा व्यवसाय करत असून हे प्रमाण १३.६४ टक्के एवढे येते. तसेच छोटी चहा-नाश्ताची हॉटेल चालवणारी तीन कुटुंबे असून याचे प्रमाण १३.६४ टक्के येते. त्याच प्रमाणे केशकर्तनालय, रेती-उपसा आणि सुतारकीचा व्यवसाय करणारी अनुक्रमे एक, दोन आणि दोन कुटुंबे असून याचे प्रमाण ५.५४ टक्के, ९.०९ टक्के आणि ९.०९ टक्के एवढे येते.

एकंदरीत परिस्थितीचे अध्ययन केल्या नंतर काही गोष्टींचा उल्लेख आवर्जुन करावा लागेल. तो म्हणजे भारतीय अर्थव्यवस्था ही उगवती जागतिक महासत्ता म्हणून ओळखली जात असतांना तसेच जगातील दोन क्रमांकाची वेगवान अर्थव्यवस्था असतांना, माहिती आणि तंत्रज्ञान क्षेत्रात जगात क्रमांक एकची असतांना, उत्कृष्ट दर्जाचे मानवसंसाधनाच्या दृष्टीने क्रमांक एकची गणना होत असतांना, आपला आदिवासी बांधव एवढा विपन्नावस्थेत जीवन जगत आहे. यावर कोणाचा विश्वास बसेल × तर नक्कीच उत्तर हो असेल.

**निष्कर्ष:**

१. वारल्यांचा मुख्य व्यवसाय शेती आहे.
२. वारल्यांच्या स्वत:च्या मालकीच्या जमिनी नसल्याचे दिसून आले.
३. एकूण ३०० नमुना कुटुंबापेकी २७५ कुटुंबाकडे शेती असून सर्व वारली शेतीचा हंगाम संपल्यास मजुरी करत असल्याचे दिसून आले.
४. ३०० नमुना कुटुंबापैकी २३९ शेती व मजुरी करत असून हे प्रमाण ७९.६७ टक्के येते, फक्त मजुरी करणारे २४ कुटुंबे असून याचे प्रमाण ८.०० टक्के आहे तर स्वत:चा छोटा-मोठा व्यवसाय असणारे २२ कुटुंबे असून हे प्रमाण ७.३३ टक्के एवढे येते. सरकारी,

निमसरकारी आणि खाजगी स्वरूपाची नोकरी करणारे १५ व्यक्ती असल्याचे दिसून आले.

५. कुटुंबाच्या उत्पन्नात आणि व्यवसायात स्त्रियांची महत्त्वपुर्ण भूमिका असून एकूण ३०० नमुना कुटुंबापैकी २१० कुटुंबातील स्त्रिया आणि लहान मुले (बालमजुर) मजुरी व्यवसाय करत असल्याचे दिसून आले. हे प्रमाण ७० टक्के एवढे येते.

६. स्वयंरोजगार अर्थात स्वत:चा व्यवसाय असणारी २२ कुटुंबे असून याचे प्रमाण ७.३३ टक्के एवढे आहे.

७. वारली समाज करत असलेला व्यवसाय अतिशय कमी भांडवलावर चालणारा व्यवसाय असल्याचे दिसून आले.

**शिफारशी / उपाय योजना:**

१. वारली समाजात स्वयंरोजगाराचे प्रमाण वाढविण्यासाठी व्यवसाय प्रशिक्षण संस्थांची उभारणी आदिवासी भागात करण्यात यावी.

२. आदिवासी मुलांना मोफत व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध करावी.

३. वारली बांधवांना आत्मविश्वासाने आणि हमखास शेती व्यवसायासाठी त्यांच्या नावावर जमिनी कराव्या.

४. कुळ-कायद्याची अंमलबजावणी परिणामकारक रित्या करावी.

५. आदिवासी बहुल भागात अन्नप्रक्रिया उद्योगाची निर्मिती करावी.

६. जंगलक्षेत्राशी निगडीत असणाऱ्या सरकारी नोकऱ्यांमध्ये आदिवासींना प्राधान्य द्यावे.

७. स्त्री सक्षमीकरणाची मोहिम आदिवासी बहुल भागात प्रभावीपणे राबवावी.

**सारांश:**

अशा प्रकारे वारली बांधवांच्या व्यावसायिक रचनेत अमुलाग्र परिवर्तन घडवून आणण्यासाठी सरकारी पातळीवर प्रयत्नांची गरज असून प्रभावी योजनांची आवश्यकता आहे. फक्त योजना तयार करून प्रश्न सुटणार नाहीत. तर त्या योजनांची काटेकोरपणे अंमलबजावणी कर्तव्य निष्ठेने जेव्हा होईल तेव्हा आदिवासी बांधवामध्ये नक्कीच परिवर्तन झाल्याचे दिसून येईल. जगात वैज्ञानिक प्रगतीने विकासाची उत्तुंग शिखरे पादाक्रांत केली. मानवाने ४० वर्षापुर्वी चंद्रावरती पाय ठेवले आणि आता चंद्र (पृथ्वीचा उपग्रह) आणि मंगळ ग्रहावरती वस्ती निर्माण करण्याचा विचार होत असतांना याच समाज व्यवस्थेतील एक घटक असणारा आदिवासी समाज मात्र दोन वेळची भाकर मिळविण्यासाठी झगडत असल्याचे चित्र समोर आले. म्हणून सरकारने खरा विकास साध्य करण्यासाठी गुणात्मक विकास ही संकल्पना आत्मसात करून नियोजन आखावयास हवे, जेणे करून विकासाची फळे सर्वसामान्य आणि तळागाळातील समाजापर्यंत पोहोचतील यालाच आपण सर्वसमावेशक वृद्धी (Inclusive Growth) आणि चिरंतन विकास (Sustainable Development) असे म्हणतो.

**संदर्भ सूची :-**

१. *भारतीय जनगणना अहवाल* - १९७१ ते २००१

२. अनमोल प्रकाशन, पुणे, पृष्ठ क्र. ६१०-६११

३. खंडेराव सावे (१९९६) ÷÷वारली'' कॉन्टिनेंटल प्रकाशन, विजयानगर, पुणे, पृष्ठ क्र. ०७-०८

४. डॉ. एस.जी. देवगावकर (२००९) ÷÷महाराष्ट्रातील निवडक जाती-जमाती'' श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, पृष्ठ क्र. ४१६

५. डॉ. गोविंद गारे (२००७) ÷÷वारली चित्रसंस्कृती'' विद्या प्रकाशन, पुणे, पृष्ठ क्र. ६-७

६. डॉ. शौनक कुलकर्णी (२००९) ÷÷महाराष्ट्रातील आदिवासी'' डायमन्ड पब्लिकेशन, पुणे, पृष्ठ क्र. ३९

७. नदीम हसन (१९८२) ÷÷ट्राईबल इंडिया टुडे'' हरनाम पब्लिकेशन, नवी दिल्ली, पृष्ठ क्र. ४७-५१

८. गुरूनाथ नाडगोंडे (२००३) ÷÷भारतीय आदिवासी'' कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे पृष्ठ क्र. ३२९, ३३०.

९. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन (२०११), ठाणे जिल्हा भाग दोन, पृष्ठ क्र. ५२

---

## मराठी अर्थशास्त्र परिषद

### निवेदन

मराठी अर्थशास्त्र परिषदेची विविध कार्यालयीन कामे, आजीव सदस्य नोंदणी, इमारतनिधी, अर्थसंवाद जाहिरात, पत्ता बदल याबाबत आजीव सदस्य व संबंधितांनी नवनियुक्त कार्यवाह-खजिनदार डॉ.आर.बी.भांडवलकर, गजानन नगर, पिंपळगावरोड, यवतमाळ-४४५ ००१ (भ्रमणध्वनी: ९४२३१३४८८६) यांच्याशी संपर्क साधावा. आजीव सदस्यांनी पत्र व्यवहार करताना प्रत्येक वेळी आपला आजीव सदस्य क्रमांक जरूर लिहावा.

- प्रा. चारुदत्त गोखले, कार्याध्यक्ष,
मराठी अर्थशास्त्र परिषद.

## 'अर्थसंवाद' चे लेखक व्हा ×

### जुलै-सप्टेंबर २०१४ अंकासाठी लेख पाठवा

*सारं जगच पैशामागं धावतयं..... अर्थव्यवस्थेचं यश -अपयश पैशाच्या मोजपट्टीनं मोजलं जातयं... अर्थव्यवस्थेच्या विकासदराचा आकडा कसा आहे? सिंगल आहे की डबल? हे कायमच महत्त्वाचं असतं. राष्ट्रीय उत्पन्न अन् राष्ट्रीय कर्ज खूप काही सांगून जातं... तसे आर्थिक विषय बरेच आहेत, अनेक वेळा मनाच्या पातळीवर लिहिण्याचा विचार झालेला.... आर्थिक, सैध्दान्तिक, नवीन संकल्पना, नवं संशोधन.... असं काही ना काही अनेकांपर्यंत पोचावं असं वाटतं ना? तर मग उचला लेखणी अन् व्यक्त करा आपले विचार.... 'अर्थसंवाद' च्या माध्यमातून.... तुमच्या लेखनाचं इथं स्वागत आहे....*

**फक्त एवढंच् करा....**

- लेखकांनी आपला शोधनिबंध Shree-Dev7-2336 या फॉन्टमध्ये PageMaker 6.5 अथवा PageMaker 7 सॉफ्टवेअरमध्ये टाईप करावा. फॉन्ट साईझ 14 व लिडींग 17 असावी. गरज असल्यास एखादा टेबल घ्यावा. लेखातील टेबलचा आकार सामान्यपणे अर्धा कागद इतका असावा.
- PageMaker 6.5 किंवा 7 या सॉफ्टवेअरमध्येच टाईप करावा. MS-Word मध्ये टाईप करून लेख पाठवू नयेत. आवश्यक असेल तरच इंग्रजी प्रति-शब्द द्यावा.
- दोन हार्ड कॉपीज् व एक सॉफ्ट कॉपी (सीडी) प्रमुख संपादकाकडे पाठविणे अत्यावश्यक आहे.
- एक सॉफ्ट कॉपी ई-मेल द्वारे प्रमुख संपादकाकडे awinashnikam@gmail.com या ई-मेल अॅड्रेसवर पाठवावी.
- शोधनिबंध पूर्वमुद्रित नसावा. त्यामध्ये कॉपीराईटचा भंग न करता संदर्भाचा उल्लेख करावा. आजीव सदस्य क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक लिहिणे आवश्यक आहे.
- लेखाच्या शीर्षकाखाली लेखकांनी स्वत:चे संपूर्ण नाव देवनागरीतूनच लिहावे.
- शोध निबंध खास अर्थसंवादसाठीच लिहिलेला असावा. माहिती व आकडेवारी अद्ययावत असावी. **लेखांची गुणवत्ता पाहून प्रसिध्दीसाठी निवड केली जाईल.**
- भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या अर्थशास्त्र परिभाषा कोश यातील परिभाषेचा शक्यतो उपयोग करावा. लेखनाची एक प्रत स्वत:जवळ अवश्य ठेवावी.
- लेखकांनी कृपया शोधनिबंध टाईप केल्यानंतर प्रूफ शुध्दलेखन आणि व्याकरण अचुक तपासून नंतरच अंतिम प्रिन्ट काढून पाठवावी.
- **संदर्भ सूची देताना पुढील पध्दतीने देणे आवश्यक आहे:** कुरुलकर र. पु., २००६, *महाराष्ट्राची अर्थव्यवस्था*, प्रथमावृत्ती, विद्या प्रकाशन, नागपूर, पृ.१०.

- प्रमुख संपादक, अर्थसंवाद.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भारताच्या विकासासाठी आर्थिक तत्वज्ञान

सुरेश बी. गोलाईत, शिरपूर,
एस.पी.डी.एम. महाविद्यालय, जि. धुळे.
भ्रमणध्वनी: ९८२२४१३९४४.

जगातील सर्व प्रगती आणि विकास हा राजकारण्यांमुळे होतो असा एक गोड गैरसमज आहे. समाज आणि राष्ट्राला सर्वार्थाने संपन्न करण्यात राजकारण्यांबरोबरच तत्वज्ञानी व्यक्तींचाही मोठा सहभाग असतो हे विसरून चालणार नाही. सर्व तत्त्वज्ञानी आणि नामवंतांनी आपआपल्या क्षेत्रात अजरामर अशी कामगिरी बजावलेली आहे. त्यातील डॉ. बाबासाहेब एक तत्वनेते होते. धर्म, इतिहास, राज्यशास्त्र इ. विषयाचे व्यासंगी अभ्यासक आणि विश्लेषक व कायदेपंडीत होते. त्याच बरोबर ते अर्थशास्त्राचे विद्यार्थी - प्राध्यापक आणि अभ्यासकही होते. भारताच्या व जगाच्या अर्थव्यवस्थेची संशोधनात्मक निर्भिड व तर्कशुद्ध मांडणी त्यांनी केली. समाजाच्या कल्याणासाठी आणि देशाच्या विकासासाठी कोणते आर्थिक धोरण व आर्थिक संरचना स्विकारली पाहिजे याचे बाबासाहेबांनी अभ्यासपूर्ण विश्लेषण केले आहे. परंतु तत्कालीन समाज व्यवस्थेने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना एक थोर अर्थतज्ज्ञ म्हणून मान्यता दिलेली नव्हती. परंतू आधुनिक काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक आर्थिक विचारवंत किंवा अर्थतज्ज्ञ म्हणून उदयास आलेत.

बाबासाहेबांच्या कारकिर्दीची सुरुवातच मुळात अर्थशास्त्रापासून झाली आहे. कारण बाबासाहेब आंबेडकर अर्थशास्त्राचे गाढे अभ्यासक होते. त्यांनी १९१५ मध्ये एम.ए. ची पदवी कोलंबिया विद्यापीठातून ÷÷प्राचीन भारतीय व्यापार'' या प्रबंधावर मिळविली. पी.एच.डी. ÷÷नॅशनल डिव्हीडंड ऑफ इंडिया एवं हिस्टारीक ॲण्ड ॲनालिटीकल स्टडी'' नावाचा प्रबंध सादर करुन मिळविली. तसेच लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स मध्ये डी.एस.सी. साठी त्यांनी ÷÷रुपयाचा प्रश्न'' हा प्रबंध लिहला. या वरुन डॉ. बाबासाहेबांच्या आर्थिक विचारांची पायाभरणी कशी होती हे लक्षात येते. तसेच बाबासाहेबांनी त्यांच्या लिखाणातून, भाषणातून आर्थिक प्रश्नासंबंधी विचार व्यक्त केले

आहेत. मुकनायक, बहिष्कृत भारत, जनता व प्रबुद्ध भारत या पत्रांना त्यांनीच जन्म दिला आहे. देशाच्या विकासासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेल्या आर्थिक विचारांची पुर्नमांडणी करणे हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून संबंधीत पेपर तयार केलेला आहे.

**विकासाबाबत आर्थिक तत्वज्ञान:** तत्कालीन भारतीय अर्थव्यवस्था ही अत्यंत मागासलेली होती त्याचे महत्वाचे कारण म्हणजे ग्रामीण अर्थव्यवस्थेशी संलग्न असलेली जमीन कसण्याची परंपरागत पद्धत आणि भारतातील जातीव्यवस्था म्हणजे जाती जातीत भेद करणे हेच मागासले पणाचे कारण सांगितले आहे. भारतात सरंजाम शाहीतील जाती व्यवस्था, उत्पादन साधने व साधन संपत्तीची विभागणी जातीच्या आधारावर झालेली होती. सर्व जमीनदार उच्च जातीचे व कुळ कनिष्ठ जातीचे, अस्पृश्य तर शेतमजुर म्हणून काम करीत. आज ही भारतातील शेती उच्च व मध्यम जातीच्या लोकांच्या मालकीची आहे. असे असले तरी भारतीय शेती मागासलेली आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेचा विकास नाही. भूमिहीन शेतमजूरांचा प्रश्न बिकट होत आहे. औद्योगिकरण नाही. खाजगी मालमत्तेचा अधिकार, कराचे असंतुलन, बँका व विमा इ. क्षेत्राचा विकास झाल्याशिवाय देशाचा विकास होऊ शकत नाही. म्हणून डॉ. बाबासाहेबांनी आपल्या आर्थिक तत्वज्ञानात याच प्रश्नांची चर्चा केली आहे की, जेणे करुन देशाचा विकास होईल त्यासाठी त्यांनी खालील मुद्द्यांवर भर दिला आहे.

**शेती विकासावर विचार:** भारत हा शेती प्रधान देश असल्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शेती विकासावर भर दिला पाहिजे असे प्रतिपादन केले आहे. शेतीचे राष्ट्रीयीकरण करुन शेती राज्याचा प्रमुख व्यवसाय मानला जावा त्यासाठी काही तरतूदी सुचविल्या आहेत. उदा. जमिनीचे योग्य वाटप झाले पाहिजे, जमीन सामुदायिक पद्धतीने कसावी, अर्थपुरवठा सरकारने करावा, शेतीच्या उत्पन्नातून शेतसाऱ्याच्या स्वरुपात सरकारने उत्पन्न वसुल करावे असे केले तर आर्थिक व सामाजिक शोषण थांबेल व शेतीची उत्पादकता वाढेल परिणामी देशाचा विकास होईल. थोडक्यात शेतीकडे उत्पादनाचे एक साधन, एक व्यवसाय म्हणून पाहिले पाहिजे. जमीनदार पद्धती नष्ट झाली पाहिजे. तुकड्यांचे एकत्रीकरण झाल्यास उत्पादन वाढेल म्हणजे सामुदायिक शेती हाच एक महत्वाचा उपाय आहे.

**पायाभूत उद्योग धंद्याचे राष्ट्रीयीकरण:**

शेती प्रमाणेच उद्योग धंद्याचे राष्ट्रीयकरण व्हावे या मताचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. परंतु संपूर्ण उद्योग धंद्याचे राष्ट्रीयीकरण न करता राष्ट्रहिताच्या दृष्टीने आवश्यक अशा मूलभूत व पायाभूत उद्योग धंद्याचे राष्ट्रीयीकरण व्हावे व इतर सर्व उद्योग धंदे खाजगी क्षेत्रावर सोपवावे असे प्रतिपादन बाबासाहेबांनी केले होते.

भारतात औद्योगिकरण आवश्यक आहे असे बऱ्याचवेळा सांगितले होते. पण त्याच बरोबर राज्याकडून व्यवस्था व राज्याची मालकी हे तत्वे स्विकारावयास पाहिजेत यावर त्यांनी जोर दिला. सामाजिक विमा व कामाची शाश्वती ही उद्योग धंद्याच्या वाढीसाठी आहेत. पण त्याच्याबरोबर गरीब मध्यम वर्गाचेही रक्षण केले पाहिजे असे त्यांना वाटत होते. परंतु

राष्ट्रीयीकरणासाठी योजना आखल्या पाहिजे. निश्चित योजना आखल्याशिवाय राष्ट्रीयीकरण म्हणजे ÷÷फाशीची शिक्षा'' पण कार्यवाहीची तहकुबी असाच अर्थ ते करीत. आयुर्विम्याचे राष्ट्रीयीकरण, मोटार वाहतुकीचे राष्ट्रीयीकरणच्या बाबतही त्यांनी निश्चित दिग्दर्शन केले होते. भारताच्या जलद औद्योगिकरणासाठी राज्य समाजवाद आवश्यक असल्याने त्यांनी प्रतिपादन केले होते.

### विमा व बँक व्यवसायाचे राष्ट्रीयीकरण:

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विमा आणि बँक व्यवसायाचे राष्ट्रीयीकरण करावे असे ही सुचविले होते. कारण आर्थिक नियोजनासाठी वित्त पुरवठ्याची आवश्यकता असते. त्यासाठी सरकारला वित्तीय साधने उपलब्ध झाली पाहिजे म्हणूनच या व्यवसायाचे राष्ट्रीयीकरणाचे प्रतिपादन केले आहे.

### खाजगी मालमत्तेचे उच्चाटन:

स्वत:च्या मालकीची मालमत्ता जवळ बाळगण्याचा हक्काला डॉ. आंबेडकरांनी कधीच मुलभूत हक्क मानले नाही. याला त्यांनी विरोध दर्शविला आहे. कारण त्यांच्या मते मालमत्तेच्या अधिकारामुळे व्यक्ती स्वतंत्र व नि:पक्षपाती विचार करु शकत नाही. तसेच स्वतंत्र विचार मांडू शकत नाही. म्हणून बाबासाहेब हे खाजगी मालमत्तेच्या उच्चाटनाशी सहमत होते. परंतु मर्यादित खाजगी मालमत्तेचे समर्थन ही केले आहे. विशेष म्हणजे सर्व सामान्य जनतेत न्याय रितीने संपत्तीचे किंवा मालमत्तेचे विभाजन करणे हा उदात्त हेतू त्यांच्या विचारामागे होता या बाबतीत सिस्मॉंडी, रिकार्डो, माल्थस या अर्थशास्त्रांशी ते सहमत होते. कारण या अर्थशास्त्रज्ञांना अर्थशास्त्रातील कोणत्याही इतर प्रश्नापेक्षा संपत्तीच्या विभाजनाचा प्रश्न महत्त्वाचा वाटत होता.

मालमत्तेवर कर बसविण्यास बाबासाहेबांनी सतत पाठिंबा दिलेला आहे. त्यावेळी ४४ देशात मालमत्तेवर कर असल्याचा उल्लेख त्यांनी केलेला आहे. बाबासाहेब म्हणाले होते. ÷÷आपण भांडवलदारांचा द्वेष करतो, मी ही करतो, पण भांडवलदार व भांडवल यात फरक केला पाहिजे'' तुम्हांला त्यांचे भांडवल पाहिजे असेल तर रशियन पद्धतीचा अवलंब करुन आगेकुच करा. लोकांची स्थिती सुधारावी ही गोष्ट चांगलीच आहे, पण आपण त्यासाठी जी साधने अवलंबिली त्या बाबत काळजी घेतली पाहिजे.

### चलन विषयक विचार:

ब्रिटीश काळात चलना संबंधी व्यापक अभ्यास करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे पहिले अर्थतज्ज्ञ होते. आंबेडकरांनी डी.एस.सी. पदवीसाठी लिहिलेला ÷÷द प्रॉब्लम ऑफ द रुपी (१९२३)'' हा प्रबंध आणि त्यांची हिल्टन यंग कमीशन पुढील साक्ष यात चलन विषयक प्रश्नावरील त्यांचे विचार किती प्रगल्भ आणि देशाच्या विकासासाठी आवश्यक होते याची प्रचिती येते.

बाबासाहेबांनी त्याकाळी भारतात चालू असलेल्या सुवर्ण चलन पद्धतीचा विरोध केला होता. सुवर्ण चलन पद्धती ऐवजी सुवर्ण चलन विनिमय दर पद्धतीचा वापर व्हावा असे त्यांचे मत होते. कारण तो पर्यंत आपण रुपयाची क्रयशक्ती स्थिर ठेवू शकत नाही. तो पर्यंत रुपया स्थिर राहू शकत नाही. चलन संकट दूर करण्यासाठी विनिमय माध्यम (सुवर्ण) मानक

ठरु शकत नाही. विनिमय माध्यम किंवा परिणाम रोगाच्या मुळाशी जाऊ शकत नाही. उलट ते रोग वाढविण्याचे साधन आहे. चलनाच्या बाह्य मुल्याबाबत देखील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपले मत व्यक्त केले आहे. ते म्हणतात चलनाचा विनिमय दर चलनाच्या खरेदी शक्ती क्षमता सिद्धांतानुसार ठरतो. चलनाची खरेदी शक्ती कमी जास्त झाल्यास चलनदर बदलतो. त्यानुसार विनिमय दर ठरतो.

भारताच्या चलनविषयक प्रश्नांचा विचार करण्यासाठी १९२५ मध्ये हिल्टन यंग यांच्या अध्यक्षतेखाली एक कमीशन नेमण्यात आले होते. अर्थशास्त्रज्ञ म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना त्या कमीशनपुढे साक्ष देण्यासाठी पाचारण करण्यात आले होते. बाबासाहेबांनी देशाच्या विकासात चलनाचे किती महत्त्व आहे पटवून देण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यासाठी भारतीय चलनात सुधारणा सुचविल्या होत्या.

उदा. रुपया नाणे पद्धती बंद करावी, सुवर्ण परिमाण निधी रद्द करावा. कारण व्यवहारात चलनाची स्थिरता राखण्यासाठी त्याचा उपयोग नसतो असे त्यांचे मत होते. विनिमय परिमाण आणि सुवर्ण परिमाण निधी ही दोन्ही ज्यात नाहीत अशी चलन पद्धती सुरु करणे हे अधिक चांगले आहे. याचा अर्थ रुपयाचे परिवर्तन सोन्यात किंवा सोन्याचे परिवर्तन रुपयात करु नये. परंतु कायद्याने ठरवून दिलेल्या प्रमाणानुसार दोन्हींचे ही अमर्यादित कायदेशीर चलन म्हणून वापर व्हावा असे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे होते.

## सार्वजनिक आयव्यया वरील विचारः

सार्वजनिक आयव्यया संबंधी देखील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विचार व्यक्त केलेले आहेत. वित्त आयोगाला यांनी महत्त्वाचे स्थान दिले आहे. वित्त आयोगाच्या शिफारशी मार्गदर्शक स्वरुपाच्या असतात. राष्ट्राध्यक्ष आणि घटक राज्ये यातील दुवा असेच त्या आयोगाचे स्वरुप असते असे आंबेडकरांनी म्हटले आहे.

स्वतंत्र मजूर पक्षाच्या निवडणूक जाहीर नाम्यात (१९३६) आंबेडकरांनी कर विषयक प्रश्नाच्या बाबत मार्गदर्शन केले आहे. त्यावेळची कर पद्धती अन्यायाची असल्यामुळे गरीबांवरच कराचा बोजा पडत होता म्हणून त्यांनी विरोध केला होता. कर पुरोगामी असावा म्हणजे गरीबांवर कर कमी व श्रीमंतावर जास्त असावा. उत्पन्नापेक्षा कर पात्रतेवर कर आकारण्यात यावा अशी त्यांची विचारसरणी होती. त्यांच्या मते कर पद्धती दोन गोष्टींवर आधारित पाहिजे.

१) निरनिराळ्या वर्गात कर प्रश्नांबाबत समानता पाहिजे.

२) लोकांचे राहणीमान कमी होईल अशी कर पद्धती असता कामा नये.

त्यांनी अर्थ रचनेचा एक दोष ही सांगितला होता. तो दोष म्हणजे केंद्रावर पैशा करिता अवलंबून राहणे. विक्रीकरण हा प्रांताच्या हातात द्यायला पाहिजे. त्यामुळे प्रांताच्या खजिन्यात चांगलीच भर पडेल अशी त्यांची धारणा होती. जर केंद्राने त्यात हस्तक्षेप केला तर विक्री कराच्या कार्यवाहीत व्यत्यय येईल.

आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या संदर्भात देखील बाबासाहेबांनी आपले विचार व्यक्त केले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ रिकार्डो यांच्या मताशी सहमत होते

म्हणजे आंतरराष्ट्रीय व्यापार हा तुलनात्मक खर्चाचे तत्व डोळ्यासमोर ठेवून केला पाहिजे की, ज्यामुळे दोन्ही देशांचा विकास होईल. तसेच राज्य समाजवादाचे ते पुरस्कर्ते होते. राज्य समाजवाद कसा आणता येईल याचा मार्ग देखील सुचविला होता. तो म्हणजे सामुदायिक शेतीचा वापर आधारभूत उद्योगांचे राष्ट्रीयीकरण किंवा विमा व्यवसायाचे राष्ट्रीयीकरण इ. करुन आपल्याला राज्य समाजवाद आणून देशाचा आर्थिक विकास साधता येईल असे बाबासाहेबांचे मत होते.

### दारिद्रय निर्मुलनावरील विचार:

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भारतातील दारिद्र्याबद्दल चिंता होती. दारिद्र्यामुळे अनेक बाबींचा शिरकाव होतो. म्हणून देशाचा विकास होत नाही. याचा अर्थ दारिद्र्य हेच देशाच्या विकासाला घातक आहे. म्हणूनच त्यांनी दारिद्र्य कमी करण्यासाठी अनेक योजना मांडल्या म्हणजे तांत्रिक शिक्षणाचे धंदे आणि शासनाच्या मालकीचे उद्योगधंदे चालू करावेत. तसेच भूमिहीनांना जमिनी द्याव्यात इ. बाबासाहेब पुढे म्हणतात, *++विमा योजनाही सरकारच्या अधिकाराखाली व्हायला पाहिजे. जमीन सरकारच्या मालकीची होईल आणि ती ग्रामस्थांना जात पात निरपेक्षतेने दिली जाईल तर कुणीही भूमीहीन राहणार नाही म्हणजे दारिद्र्य नष्ट होईल.''*

### वाढती लोकसंख्या:

वाढती लोकसंख्या देशाच्या विकासाला घातक आहे. हे बाबासाहेब ओळखून होते. म्हणूनच त्यांनी संतती नियमन विधेयकाची अर्थशास्त्रीय मिमांसा केली. देशाच्या बेकारीचे मूळ कारण वाढती लोकसंख्याच आहे. हे जाणून बेकारी वरील प्रतिबंधक उपाय म्हणून संतती नियमनाचा पुरस्कार करण्याचे आवाहन त्यांनी केले होते. अवास्तव कुटूंब वाढीच्या परिणामाची खुद्द डॉ. आंबेडकरांना चांगल्या प्रकारे कल्पना होती. डॉ. बाबासाहेबांनी हे विदारक दु:ख अनुभवले होते. १७ डिसेंबर १९३७ रोजी अस्पृश्य संमेलनाच्या अध्यक्ष पदावरुन भाषण करतांना ही व्यथा त्यांनी स्पष्ट केली ते म्हणतात, *++मला पाच मुले झाली, त्यापैकी चार मेली या बद्दल मला वाईट वाटत नाही, तर उलट आनंदच वाटतो ही जर वाढली असती तर त्यांचे शिक्षण, खाणे, राहणे याचा बोजा माझ्यावर पडला असता व ते मला फार त्रासाचे झाले असते. मला एकच मुलगा आहे. माझ्यावर त्याची फार जबाबदारी आहे, त्याच्या एक शतांश जरी जबाबदारी तुम्ही आपल्या मुलाबद्दल दाखविलीस तरी फार उत्तम ही समाजाच्या कल्याणाची गोष्ट आहे. तुम्हाला पाच-सहा मुले झाली तर त्यांना शिक्षण कसे देणार, त्यांची काळजी कशी घेणार ? मला वाटते चढती भाजणीच्या ऐवजी ही उतरती भाजणी आहे. तेव्हा स्त्री पुरुषांचे पशुप्रमाणे जीवन घालविणे माणुसकीला सोडून आहे. या गोष्टीचा तुम्ही अवश्य विचार करा.* याचा अर्थ बाबासाहेबांचे विचार किती मुलगामी होते हे दिसून येते.

### दारुबंदी वरील विचार:

संपुर्ण दारुबंदीच्या विरुद्ध डॉ.बाबासाहेब आंबेडकर होते. याचा अर्थ अल्कोहोलचे परिणाम त्यांना माहित नव्हते असे नाही. तर दैनंदिन जीवनातून दारु पिणे टाळणे आवश्यक होते. बंदी घातल्यामुळे बेकायदेशीर दारु उत्पादनाला खिळ बसेल, त्यामुळे सरकारचा

महसुल बुडेल असे त्यांचे मत होते. दारुच्या उत्पादनावर सरकारने बंदी घालावी परंतु त्यासाठी त्यांनी परवाना पद्धत व शिधा वाटप पद्धत दारु पिण्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी सुचविले. तसेच दारु पासून सरकारला जो महसुल मिळेल त्याचा वापर शेतकऱ्यांच्या कर्जासाठी आणि शिक्षणासाठी करावा. किती हा दुरगामी विचार होता बाबासाहेबांचा? म्हणजे देशाच्या आर्थिक विकासासाठी बाबासाहेबांनी दारुबंदीला विरोध केल्याचे स्पष्ट होते.

**मूल्यमापन:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक विकासासाठी आर्थिक तत्वज्ञानाचे मूल्यमापन करणे सोपे नाही. आंबेडकरांचे आर्थिक लिखाण जरी स्वातंत्र्यपूर्व काळाशी संबंधित असले तरी ते नवीन विचार करण्यास भाग पाडते. कारण आंबेडकरांच्या आर्थिक विचारांना एक नैतिक आधार होता. मानवी कल्याणावर पर्यायाने देशाच्या विकासावर त्याचा कोणता परिणाम होईल या दृष्टीकोनातून त्यांनी अभ्यास केला होता. उद्योगधंदे व आयुर्विमा यांच्या राष्ट्रीयीकरणा बाबतचे त्यांचे विचार भारतीय आर्थिक प्रश्नासंबंधीचा त्यांचा व्यासंग किती खोल होता हेच दाखवतात. त्यांचे दारुबंदीचे विचारही ते काळाच्या बरोबर व्यवहारी जगात होते असे दाखवतात. राज्य समाजवाद, बेकारीचे निर्मुलन, सामुदायिक शेती ही पुरोगामी अशीच जाणले होते. यावरुन आर्थिक प्रश्नांना किती गांभीर्याने व खोलवर जाऊन विचार केला होता ते दिसून येते त्यांचे बरेच आर्थिक विचार व विश्लेषण आजच्या काळाशी ही सुसंगत वाटते.

भारतीय घटनेचे शिल्पकार म्हणूनच सपुर्ण भारत नव्हे तर जग आंबेडकरांना ओळखतो, कायदामंत्री म्हणूनही ते ख्यातनाम झालेत. पण त्यांचा अर्थशास्त्राचा व्यासंग गाढा होता हे फारच थोड्यांना कळले. बहुजन समाजाला ते घटनाकार व दलित जनतेचे पुढारी आणि भारत रत्न म्हणून ज्ञात आहेत. परंतु ते एक थोर अर्थशास्त्रज्ञ म्हणून ज्ञात नाहीत हे भारताचे दुर्देव×

**संदर्भ सूची:**


1] Dr. B. R. Ambedkar, *Small Holding in India and their remedies*, Government of Maharashtrâ Publication, Dr. Babasahed Ambedkar writings and speeches Vol. I, 1989.

2] Dr. B. R. Ambedkar, *State and Minorities*, Govt. of Maharashtra Publication, Dr. Babasahed Ambedkar writings and speeches vol. I, 1989.

3] Ambedkar B.R., *Problem of the rupee : It origin and its solution*, Landon P.S. Kind & Sons Ltd., 1923

4] Dhananjay Keer, *Dr. Ambedkar : Man and Mission*, Popular Prakashan, Mumbai, 1961

5] W. N. Kuber, *Dr. Ambedkar : A Critical Study*, Peoples Publising House, New Delhi, 1973

6] P. Ramiah & Reddy, *Dr. B.R. Ambedkar's Economic Philosophy*, Delta Publishing House, Delhi, 1994

7] डॉ. वा. ना. कुबेर, *डॉ. आंबेडकर : विचार मंथन*, लोकवाड्.मय गृह (प्रा.) लि. मुंबई- १९८२

8] धनंजय किर : *डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र*, मुंबई.

9] व्ही.चंद्रमोली (अनु.गोडबोले) *डॉ. बाबासाहेब आंबेडकर : एक व्यक्ती एक दृष्टी*, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे-१९९३

10] अरविंद पोळ, *डॉ. आंबेडकरांचे लोकसंख्या विचार*, सुगावा प्रकाशन, पुणे-१९८६

## मराठी अर्थशास्त्र परिषद

### मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम महिला ग्रंथ पारितोषिक

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने महिला लेखिकेने लिहिलेल्या सर्वोत्कृष्ट अर्थशास्त्रीय संदर्भग्रंथास रु.११,०००/- व शाल, श्रीफळ, साडी, सन्मान चिन्ह, मानचिन्ह देण्यात येते. १ जानेवारी २०१३ ते ३१ डिसेंबर २०१३ या कालावधीत प्रसिध्द झालेल्या मराठीतील अर्थशास्त्रीय संदर्भग्रंथाच्या महिला लेखिका यांना स्पर्धेत सहभागी होता येईल. नमुन्यातील अर्ज, संबंधित ग्रंथाच्या चार प्रती कार्यवाहांकडे त्वरीत पाठवाव्यात.

### डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ग्रंथ पारितोषिक

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने मराठी भाषेत प्रसिध्द झालेल्या सर्वोत्कृष्ट अर्थशास्त्रीय ग्रंथास रु.१,०००/- चे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ग्रंथ पारितोषिक प्रतिवर्षी देण्यात येते. १/१/२०१३ ते ३१/१२/२०१३ या कालावधीतील मराठीतील अर्थशास्त्रीय ग्रंथाच्या लेखकांना स्पर्धेत सहभागी होता येईल. नमुन्यातील अर्ज, संबंधित ग्रंथाच्या चार प्रती कार्यवाहांकडे ३१ ऑगस्ट २०१४ पर्यंत पाठवाव्यात.

### डॉ. सौ. अरुणा रारावीकर स्मृती आर्थिक लेख पुरस्कार

मराठी अर्थशास्त्र परिषदेतर्फे २०११ पासून हा पुरस्कार सुरू केला आहे. परिषदेच्या आजीव सदस्यांनी आर्थिक विषयांवर सतत वाचन-मनन करून त्यावर जिल्हा व राज्य पातळीवरील मराठी दैनिक वृत्तपत्रांसाठी वैचारिक व प्रबोधनात्मक लेख लिहिण्यास उद्युक्त व्हावे हा त्यामागील हेतू आहे. त्यांच्या अशा प्रसिध्द झालेल्या व निवड समितीने शिफारस केलेल्या लेखांना दोन पुरस्कार दिले जातील. प्रथम पुरस्कार रु.१०००/- चा व द्वितीय पुरस्कार रु.५००/- याप्रमाणे आहे. या पुरस्कारासाठी १ जानेवारी २०१३ ते ३१ डिसेंबर २०१३ या कालावधीतील लेख विचारात घेतले जातील. एक सदस्य जास्तीत जास्त तीन लेख पाठवू शकतील. त्यासाठी प्रसिध्द झालेले लेख, वृत्तपत्राचे नाव व दिनांकासह झेरॉक्स करुन ३१ ऑगस्ट २०१४ पूर्वी नवनियुक्त कार्यवाह, म.अ.प., गजानन नगर, पिंपळगावरोड, यवतमाळ - ४४५ ००१ (भ्रमणध्वनी: ९४२३१३४६८६) यांच्याकडे पाठवावेत. २०१४ च्या परिषदेच्या अधिवेशनात हे पुरस्कार दिले जातील.

- डॉ. आर.बी.भांडवलकर, नवनियुक्त कार्यवाह-खजिनदार,
मराठी अर्थशास्त्र परिषद

# मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ३७ वे राष्ट्रीय अधिवेशन

## सूत्रसंचालकाचा अहवाल - चर्चासत्र पहिले

## मुक्त आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या संदर्भात विषमता व दारिद्र्य याबाबत सैद्धांतिक विवेचन

**दि.व्यं.जहागिरदार, अमरावती,**
माजी अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद,
भ्रमणध्वनी: ९६५७७०१७४८

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ३७ व्या वार्षिक अधिवेशनाच्या या पहिल्या चर्चासत्रात सूत्रसंचालकांनी प्रथमतः सर्वांचे स्वागत करून सांगितले की या चर्चासत्राचे नियोजित सूत्रसंचालक अवधूत नाडकर्णी हे काही खासगी कारणास्तव उपस्थित राहू शकत नसल्याने ऐनवेळी त्यांनी सूत्रसंचालन करावे असे अध्यक्ष जगन्नाथ पाटील यांनी त्यांना विनंती केली. या चर्चासत्रासाठी एकूण १४ निबंध प्राप्त झाले असून त्यापैकी सात निबंध पूर्ण स्वरूपात छापले असून उर्वरित सात निबंधांचा गोषवारा प्रसिद्ध केला आहे. त्यापैकी ९ निबंधकारांनी आपले निबंध अधिवेशनात प्रत्यक्ष सादर केलेत. गेल्या ३०-३५ वर्षांपासून जागतिक स्तरावर मुक्त व्यापाराचे धोरण विकसित देशांसोबत अनेक विकसनशील देश अंमलात आणताना दिसून येत आहे. वस्तू व सेवांसोबत भांडवली प्रवाहांचे आदान-प्रदान विविध देशांमध्ये होत आहे. अशा मुक्त व्यापाराच्या स्थितीचे देशपातळीवर विविध परिणाम घडून येत आहेत. त्यादृष्टीने त्याचे देशाच्या दारिद्र्यावर आणि आर्थिक विषमतेवर कोणते परिणाम झालेत वा होतील याचे सैद्धांतिक विवेचन येथे अपेक्षित आहे. खुल्या वा मुक्त व्यापाराचे दारिद्र्य व विषमतेवर जे परिणाम होतील वा होतील त्याचे यांत्र (Mechanism) स्पष्ट केले तर याबाबतचे सैद्धांतिक विवेचन आपोआप लक्षात येईल. यासाठी वेतन, किंमत पातळी, मक्तेदारीकडे जाण्याची प्रवृत्ती, नैसर्गिक साधनांचा वापर इत्यादींच्या माध्यमातून दारिद्र्य व विषमतेवार बाजार यंत्रणेच्या सहाय्याने कसा परिणाम घडून येतो याचे प्रास्ताविक केल्यावर निबंध वाचन सुरू झाले.

गजानन गं.भारती यांनी ÷मुक्त अर्थव्यवस्था : जागतिक व्यापार, दारिद्र्य व विषमता' हा निबंध प्रथमतः सादर केला. त्यांनी प्रामुख्याने शेती क्षेत्रावरील

परिणाम शेतकऱ्यांची गरिबी आणि आत्महत्यांवर झालेला प्रभाव स्पष्ट केला. प्रशांत हरमकरांनी ÷÷विवाद्ता : आंतरराष्ट्रीय व्यापार आणि कल्याणाच्या अनुभवनिष्ठ प्रमाणतेची'' या निबंधात मुक्त व्यापारापासून फायदे मिळविण्यासाठी व्यापारी धोरण ठरविण्याची गरज प्रतिपादन केली. मृणालिनी तापस यांनी आपल्या निबंधात आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या बाबत विषमता वा दारिद्र्य यांची चर्चा अमर्त्य सेन यांच्या दृष्टिकोनातून केली आहे. राहूल म्होपरे यांनी अभिमतपंथीय व्यापार सिद्धांतांचा आढावा घेऊन हेक्चर-ओहलीन सिद्धांताचा उल्लेख केला आहे. मात्र दारिद्र्य व विषमता या मुद्यांचा विचार केला नाही. मंजुषा मुसमाडे यांनी आपल्या निबंधातून लर्नर, लिओन्तिफ्, कुझनेटस्, स्टिगलिट्झ इ. महत्त्वपूर्ण अर्थशास्त्रज्ञांच्या विचारांमधून दारिद्र्य व विषमतेबाबत व्यक्त झालेले मुद्दे सांगितले. त्यांच्या मते खुल्या व्यापारामुळे अनेक देशांमध्ये विषमता मोठ्या प्रमाणात वाढली आहे. नामदेव एम्. पाटील यांनी आपल्या निबंधात हे दाखविले आहे की मुक्त व्यापाराचे स्थितीत विकसनशील देश अधिक गरीब बनतात. मुरलीधर गायकवाड यांनी विविध आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या सिद्धांतांचा थोडक्यात उहापोह केला आहे. युगंधरा देशपांडे-टोपरे यांनी विकसनशील देशात आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे विषमता वाढते हे दर्शवून त्यांच्या कारणांवर प्रकाश टाकला आहे. माधुरी प्रदीप लेले यांनी आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे होणाऱ्या प्रतिकूल परिणामांवर मात करण्यासाठी कोणते उपाय करावेत हे स्पष्ट केले. सुहास आव्हाड व नितीन मुटकुळे, शकुंतला पाटील, अपर्णा कुळकर्णी, माधव शिंदे व जीवन सोळुंके तसेच दिगंबर भोसले यांचे निबंध या चर्चासत्रासाठी स्वीकारले होते. पण लेखक अनुपस्थित राहिल्याने ते सादर झाले नाहीत.

तीन निबंधांचे वाचन झाल्यावर राम देशपांडे आणि श्रीनिवास खांदेवाले यांना सूत्रसंचालकांनी संबंधित विषयावर विवेचन करण्याची विनंती केली. खांदेवाले यांनी जागतिकीकरणामुळे विषमता वाढली असे स्पष्ट करून आंतरराष्ट्रीय व्यापार आणि देशाचे विकास धोरण यांच्यात एकवाक्यता नसल्याने दारिद्र्य व विषमता वाढते असे म्हटले. सर्व निबंध सादर झाल्यानंतर अंजली कुळकर्णी यांनी चर्चेत सहभागी होताना विण्डसर प्रतिमानाचा उल्लेख केला. मुक्ता जहागिरदार यांनी नवप्रवर्तन सिद्धांताच्या स्पष्टीकरणातून विकसनशील देशांना विकासाबाबत पराधीनता स्वीकारावी लागते. प्रदुषणकारी उत्पादनही सुरू ठेवावे लागते. परिणामत: संसाधन दारिद्र्याच्या समस्येला तोंड द्यावे लागते हे विषद केले. धीरज कदम यांनी आंतरराष्ट्रीय व्यापाराचे विषमतेवर परिणाम होतात हे विकसनशील देशांच्या संदर्भात स्पष्ट केले. एच्.एम्.देसरडा यांनी मुक्त व्यापार व्यवस्थेमुळे विकसनशील देश परावलंबी झाल्याचे सांगून ह्या देशांना दारिद्र्य, विषमता सारखे प्रश्नही सोडविता आले नसल्याचे सांगितले.

अखेरीस सूत्रसंचालक जहागिरदारांनी निबंध सादर करणाऱ्यांच्या व चर्चेत सहभागी होणाऱ्यांच्या विचारांचा थोडक्यात परामर्श घेऊन त्यावर आपले विचार सांगितले. विषय अवघड असूनही त्याला चांगला प्रतिसाद मिळाला ही समाधानाची बाब आहे. अखेरीस लेखकांचे व सहभागी वक्त्यांचे त्यांनी आभार मानले.

# मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ३७ वे राष्ट्रीय अधिवेशन

## सूत्रसंचालकाचा अहवाल - चर्चासत्र दुसरे

## प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम

**श्रीराम देविदास जोशी, जळगाव,**
अर्थशास्त्र विभागप्रमुख,
मु. जे. महाविद्यालय,
भ्रमणध्वनी: ९४२१००८७७६.

अमरावती येथील ३७ व्या राष्ट्रीय अधिवेशनात प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम या चर्चासत्राचे सूत्रसंचालन करण्याची जबाबदारी व संधी दिल्याबद्दल मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या सर्व कार्यकारिणी सदस्यांचे मी आभार मानतो. या चर्चासत्रासाठी एकूण ३७ शोधनिबंध आले होते. त्यापैकी १५ शोधनिबंधांचे सादरीकरण झाले. सादर करण्यात आलेल्या बहुतेक शोधनिबंधात प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीचे भारतीय अर्थव्यवस्थेतील स्थूल राष्ट्रीय उत्पन्न, किरकोळ व्यापार क्षेत्र, आर्थिक विकासावरील परिणाम विशद करणारे आहेत. एका निबंधात ब्रिक्स् देशांतील गुंतवणुकीच्या परिणामांची तुलना भारतातील गुंतवणुकीच्या परिणामांशी केली आहे.

सर्वप्रथम मारुती सूर्यवंशी यांनी भारतातील रिटेल क्षेत्रातील थेट विदेशी गुंतवणूक - एक सिंहावलोकन हा शोधनिबंध सादर करताना या गुंतवणुकीच्या सकारात्मक व नकारात्मक बाजू मांडण्याचा प्रयत्न केला. नकारात्मक परिणामापेक्षा सकारात्मक परिणाम महत्त्वपूर्ण ठरतील असे मत त्यांनी मांडले. डॉ.चंद्रकांत कोकाटे यांनी भारतातील कृषिक्षेत्रातील प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीचे परिणाम विशद करताना भारतीय पिकांचे वाण कायम ठेवावे असे नमूद केले. डॉ.वनिता चौरे यांनी मोठ्या शहरांबरोबरच लहान शहरात देखील थेट विदेशी गुंतवणूक झाली पाहिजे असे मत मांडले. रमझान मुजावर यांनी थेट विदेशी गुंतवणुकीमुळे भारतात भांडवल तंत्रज्ञान, यंत्रसामग्री, व्यवस्थापन इत्यादींचे आगमन होऊन

विकास होत आहे असे विचार व्यक्त केले. डॉ.श्रीहरी मिसाळ यांनी १९९१ नंतरच्या आर्थिक धोरणामुळे भारतात थेट विदेशी गुंतवणूक प्रामुख्याने कारखानदारी, बांधकाम, वित्तीय सेवा, उर्जा, दळणवळण व संगणक क्षेत्रात जास्तच होत असल्याचे स्पष्ट केले. विदेशी गुंतवणुकीत वाढ झाली असली तरी २०११-१२ नंतर भारताचा आर्थिक वृध्दी दर घटल्याचे त्यांनी सांगितले. बी.जे.कदम यांनी स्पष्ट केले की, प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीत वाढ झाली असली तरी मान्यताप्राप्त गुंतवणुकीच्या तुलनेत प्रत्यक्ष झालेली गुंतवणूक अतिशय कमी आहे. संजय इंगळे यांनी परकीय चलन कायदा शिथील केल्यामुळे डॉलरमधील गुंतवणूक वाढल्याचे विचार स्पष्ट केले. जी. के. सानप यांनी थेट विदेशी गुंतवणूकीच्या संभाव्य धोक्यांची मांडणी केली आहे. डॉ.एन.एल.चव्हाण यांनी स्थूल देशांतर्गत आर्थिक वृध्दी व विदेशी गुंतवणूक यात धनात्मक संबंध असल्याचे स्पष्ट केले. श्रीमती स्वाती आदक यांच्या मते शासनाने बहुराष्ट्रीय कंपन्यांवर योग्य नियंत्रण ठेवल्यास भारतात होणारी विदेशी गुंतवणूक विकासात्मक असेल. डॉ. एस. व्ही. ढमढेरे यांनी शेती क्षेत्रात गुंतवणूक झाल्यास सिंचन क्षेत्रात वाढ होऊन रोजगार निर्मिती होईल, पायाभूत सुविधांमध्ये वाढ झाल्यास सरकारचे सेवाकर उत्पन्न वाढेल असे विचार व्यक्त केले. डॉ. पी. ई. विभुते यांच्या मते भारतात विविध देशांनी गुंतवणूक केली आहे त्याचे चांगले-वाईट परिणाम आहेत.

प्रा. वर्षा नेहेते यांच्या मते भारत थेट विदेशी गुंतवणुकीसाठी महत्त्वाचे केन्द्र बनला आहे. दक्षिण पूर्व आशिया खंडामध्ये होणाऱ्या परकीय थेट गुंतवणुकीत भारताचा तिसरा क्रमांक आहे. थेट विदेशी गुंतवणुकीत वाढ झाली असली तरी राज्यनिहाय गुंतवणुकीत असमतोल आहे. किशोर कदम यांच्या मते किरकोळ व्यापार क्षेत्रात बहुसंख्य लोकांना रोजगार पुरविणारे क्षेत्र आहे. योग्य ती खबरदारी घेतल्यास थेट विदेशी गुंतवणुकीमध्ये देशाचा आर्थिक विकास होण्यास अल्प प्रमाणात का होईना दारिद्र्य कमी होण्यास मदत होईल. डॉ. तानाजी गिते यांनी आपले विचार मांडताना विदेशी गुंतवणुकीमुळे आर्थिक विकासाला मदत होते. तसेच व्यापारातील तूट कमी होण्यास देखील मदत होईल असे मत मांडले.

या चर्चासत्रामध्ये अनेक नवीन लेखकांनी आपले शोधनिबंध सादर केले. चर्चासत्राच्या निमित्ताने अनेक ज्येष्ठ अर्थतज्ज्ञांचे विचार ऐकायला मिळाले. खुल्या चर्चेदरम्यान झालेल्या चर्चेत सहभागी अभ्यासू, चौकस आणि प्रचलित विषयांवर अभ्यासपूर्ण मांडणी करणाऱ्या अनेक अर्थतज्ज्ञांचे हे व्यासपीठ असल्याचा अनुभव आला. वार्षिक अधिवेशनाच्या चर्चासत्रात शोध निबंध पाठविणाऱ्यांची संख्या वाढत आहे. मात्र प्रत्यक्ष सादरीकरणासाठी फारच थोडे निबंध लेखक हजर असतात. शोध निबंध सादर करणाऱ्यांची व चर्चेत सहभागी होणाऱ्यांची संख्या वाढल्यास एखाद्या विषयाची चर्चा अधिक चांगली व सांगोपांग होईल असे वाटते.

# मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ३७ वे राष्ट्रीय अधिवेशन

## सूत्रसंचालकाचा अहवाल - चर्चासत्र तिसरे

## महाराष्ट्रातील सहकारी चळवळ: सद्यस्थिती व भवितव्य


लालासाहेब ना. घाटगे, सातारा,
भ्रमणध्वनी: ९८५०११०७४६.


मराठी अर्थशास्त्र परिषदेचे अमरावती येथील ३७ वे वार्षिक राष्ट्रीय अधिवेशन शासकीय विदर्भ महाविद्यालयात दि.२२ ते २४ नोव्हेंबर २०१३ या कालावधीत उत्तम रितीने आयोजित केले. या अधिवेशनात शनिवार दि.२३ नोव्हेंबर २०१३ रोजी सकाळी ९.३० वाजता अधिवेशनाच्या तिसऱ्या सत्राचा विषय महाराष्ट्रातील सहकारी चळवळ - सद्यस्थिती व भवितव्य चर्चिला गेला. या चर्चासत्राचे उद्घाटन अध्यक्ष प्राचार्य डॉ. जे. एस. पाटील यांनी केले. या चर्चासत्रात सत्राध्यक्ष यांनी विषयाची रूपरेषा स्पष्ट करून शोध निबंधकारांना आपले निबंध सादर करण्याचे आवाहन केले.

या चर्चासत्रासाठी महाराष्ट्राच्या विविध भागातील २५ शोधनिबंधकारांनी शोध निबंध पाठविले. त्यापैकी १५ शोधनिबंधकारांनी आपले शोधनिबंध सादर केले.

शोधनिबंधकारांनी मांडलेल्या शोधनिबंधाचे प्रमुख आशय -

१. डॉ. प्र. ब. कुलकर्णी, इस्लामपूर: १९६१ च्या सहकारी कायद्यात ९७ व्या घटना दुरुस्ती नुसार होणाऱ्या बदलांची सविस्तर माहिती सभागृहाला दिली.
२. प्रा.सुमित्रा विजय पवार, भुसावळ: महाराष्ट्रातील साखर उद्योगाची सद्यस्थिती व भवितव्याबाबत सविस्तर विवेचन केले.
३. डॉ.वाय.एस.गायकवाड, सांगली: महाराष्ट्राच्या सहकारी चळवळीच्या विकासात गेल्या साठ वर्षात सहकारी नेतृत्वाने बजावलेल्या भूमिकेचा सविस्तर आढावा घेतला.
४. डॉ. सुरेश ढाके व डॉ. अशोक खाचणे, जळगाव: महाराष्ट्राच्या सहकारी

चळवळीच्या विकासाचा तौलनिक अभ्यास आकडेवारीसह स्पष्ट केला.

५. डॉ. अविनाश निकम, शहादा: महाराष्ट्राच्या सहकारी बँकांची सद्यस्थिती विशद करून राष्ट्रीयीकृत व्यापारी बँकांच्या कार्याची तुलना करून सहकारी बँक व्यवसायाच्या भवितव्याबाबत विवेचन केले.

६. डॉ.विजयकुमार पाटील, आटपाडी: महाराष्ट्रातील सहकारी साखर उद्योगाच्या प्रगतीचा आढावा घेऊन समस्यांची सोडवणूक करण्यासाठी उपाय योजनांबाबतचे विश्लेषण केले.

७. डॉ. टी. एम. बारबोले, तुळजापूर: राज्यातील साखर उद्योगाची सद्यस्थिती व समस्यांबाबत २००५-०६ व २०१०-११ ची आकडेवारी देऊन विश्लेषण केले.

८. डॉ.मोहन किसन चौधरी, पुणे: महाराष्ट्रातील साखर उद्योगाची सद्यस्थिती व समस्यांचे विवेचन करून शिवाजीराव देशमुख समितीने केलेल्या शिफारशींचे विवेचन केले.

९. डॉ. सुनिता राठोड, कोल्हापूर: कोल्हापूर जिल्ह्यातील शेती सहकारी संस्थांची ग्रामीण विकासातील भूमिका विशद केली.

१०. डॉ. हनुमंत रणवरे, अकलूज: महाराष्ट्राच्या आर्थिक विकासासाठी सहकारी चळवळ यशस्वी करण्याबाबतची भूमिका स्पष्ट केली.

११. कुमुदिनी जोगी: ९७ व्या घटना दुरुस्तीमुळे महाराष्ट्राच्या सहकारी चळवळीत होणाऱ्या संभाव्य बदलांची माहिती करून दिली.

१२. जे. व्ही. गायकवाड: महाराष्ट्रातील सहकारी चळवळीपुढील आव्हाने विषद केली.

१३. प्रतिभा काळमेघ/चौधरी, यवतमाळ: जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांपुढील प्रश्नांबाबत विवेचन केले.

१४. प्रा. सुभाष दगडे, सांगली: महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची सद्यस्थिती विषद करून सहकारी चळवळीच्या शाश्वत विकासासाठी प्रभावी उपाय योजनांची मांडणी केली.

१५. प्रा. सोनवणे: महाराष्ट्रातील सहकारी चळवळीच्या उज्वल भवितव्यासाठी विविध प्रकारच्या सहकारी संस्थांमध्ये आवश्यक सुधारणा सूचविल्या.

अशा प्रकारे वरील पंधरा शोधनिबंधकारांनी आपले शोध निबंध नियोजित वेळेत सादर केले. त्यानंतर डॉ. कैलास पाटील, डॉ.सुहास आव्हाड, डॉ.हनुमंत रणवरे यांनी शोध निबंधांवर भाष्य केले. शेवटी डॉ. लालासाहेब घाटगे व डॉ.मारुती तेगमपुरे यांनी आभार मानले.

# ३७ वे वार्षिक अधिवेशन २०१३-१४

## कार्यवाहांचा अहवाल

अनिल बाबूराव सूर्यवंशी

कार्यवाह - खजिनदार

मराठी अर्थशास्त्र परिषद.

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ३७ वे वार्षिक राष्ट्रीय अधिवेशन शुक्रवार दिनांक २२ नोव्हेंबर ते २४ नोव्हेंबर २०१३ या तीन दिवसांच्या कालावधीत पिपल्स वेलफेअर सोसायटी, अमरावती द्वारा संचलित कै. नारायणराव अमृतराव देशमुख महाविद्यालय, चांदूरबाजार यांच्या वतीने संगीतसूर्य केशवराव भोसले सभागृह, अमरावती येथे यशस्वीरित्या संपन्न झाले. प्राचार्य डॉ. जगन्नाथ शामराव पाटील, सातारा हे अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी होते.

### अधिवेशन उद्घाटन सोहळा:

शुक्रवार दिनांक २३ रोजी सकाळी उद्घाटन सोहळ्याचा प्रारंभ स्वागतगीत व दीप प्रज्वलनाने झाला. स्थानिक कार्यवाह प्रा. डॉ. वनिता चोरे यांनी प्रास्ताविक केले. स्थानिक कार्याध्यक्ष व महाविद्यालयाचे प्राचार्य सु. ना. देशमुख यांनी स्वागतपर मनोगत व्यक्त करून पाहुण्यांचा सत्कार केला. परिषदेचे कार्यवाह-खजिनदार प्रा. डॉ. अनिल सुर्यवंशी यांनी परिषदेचा वार्षिक अहवाल व परिषदेच्या प्रगतीचा संक्षिप्त आढावा घेतला. परिषदेच्या ३७ व्या वार्षिक अधिवेशनाचे उद्घाटन विधानसभेचे माजी सभापती अरूण गुजराथी यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी मिळालेली संधी स्वीकारली पाहिजे, हा अर्थशास्त्राचा पहिला सिध्दांत आहे. देशाला शिक्षण, पायाभूत विकास सुविधा मिळाल्याशिवाय नागरीकांचे दारिद्रय नष्ट होणार नाही. त्यासाठी अर्थतज्ज्ञांनी काम करावे, असे आवाहन उद्घाटक अरूण गुजराथी यांनी केले. कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी माजी मंत्री वसुधाताई देशमुख म्हणाल्या, अर्थ व नियोजनाचा परस्परसंबंध आहे. योग्य पध्दतीने नियोजन झाले तर विकासाची दिशाही ठरते. प्रमुख उपस्थिती माजी पालकमंत्री सुनिल देशमुख, डॉ. जयकिरण तिडके, कुलगुरू, अमरावती विद्यापीठ, अर्थतज्ज्ञ डॉ. श्रीनिवास खांदेवाले यांनीही शुभेच्छापर विचार व्यक्त केले.

अधिवेशनाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. जगन्नाथ पाटील, सातारा यांचे ÷महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना : एक चिकित्सा' या

विषयावर अभ्यासपूर्ण अध्यक्षीय भाषण झाले. डॉ. पाटील यांनी मनरेगा योजनेची ठळक वैशिष्ट्ये, योजनेअंतर्गत येणारी कामे, योजनेतील उणीवा/आव्हाने आदि पैलूंवर प्रकाश टाकला. उद्‌घाटन प्रसंगी व्यासपीठावर माजी महापौर मिलिंद चिमोटे, डॉ. व्ही. एच. सिंग, डॉ. संतोष ठाकरे, म.अ. परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. जगन्नाथ पाटील, कार्याध्यक्ष प्रा. चारूदत्त गोखले, कार्यवाह, खजिनदार डॉ.अनिल सूर्यवंशी, प्रमुख संपादक डॉ. अविनाश निकम, माजी अध्यक्ष डॉ. के. के. पाटील, डॉ. श्रीनिवास खांदेवाले, डॉ. दि.व्यं. जहागिरदार, प्राचार्य सु. ना. देशमुख, डॉ. वनिता चोरे आदि उपस्थित होते. यावेळी ÷अर्थनाद' स्मरणिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन वैशाली देशमुख व विनय वसुले आणि आभार प्रदर्शन स्थानिक कार्यवाह डॉ. वनिता चोरे यांनी केले.

**चर्चासत्रे :**

अधिवेशन कालावधीत प्रतिवर्षाप्रमाणे एकुण चार चर्चासत्रे संपन्न झाली. शुक्रवार दिनांक २२ नोव्हेंबर रोजी दुपारी ÷मुक्त आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या संदर्भात विषमता व दारिद्र्य याबाबत सैध्दांतिक विवेचन' या पहिल्या चर्चासत्राचे सूत्रसंचालन डॉ. दि.व्यं. जहागिरदार आणि वृत्तसंकलन डॉ. एस. एम. भोसले, विटा, सांगली यांनी यशस्वीरित्या केले. शनिवार दिनांक २३ नोव्हेंबर रोजी ÷विदेशी गुंतवणूकीचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम' आणि ÷महाराष्ट्रातील सहकारी चळवळ : सद्यस्थिती व भवितव्य' या दोन समांतर चर्चासत्राचे सूत्रसंचालन अनुक्रमे डॉ. श्रीराम जोशी, जळगाव व डॉ. लालासाहेब घाटगे, सातारा यांनी यशस्वीरित्या पूर्ण केले. या दोन चर्चासत्रांचे वृत्तसंकलन अनुक्रमे डॉ. तानाजी गीते, पुणे व डॉ. मारूती तेगमपुरे, औरंगाबाद यांनी केले. रविवार दि. २४ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ ते ११ या दरम्यान ÷ऊर्जेचे अर्थशास्त्र' या आयत्या वेळच्या विषयावर चौथे चर्चासत्र संपन्न झाले. प्रमुख वक्ते प्रा. सुभाष दगडे यांनी ऊर्जा समस्येची गंभीरता, प्रश्नाचे स्वरूप व उपाय या विविध पैलूंवर अभ्यासपूर्ण विवेचन केले. या चर्चासत्राचे सूत्रसंचालक डॉ. सिंधुताई कोरे व वृत्तसंकलन डॉ. वैशाली देशमुख यांनी केले.

**प्रा. नी. वी. सोवनी स्मृती व्याख्यान:**

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. नी. वी. सोवनी स्मृती व्याख्यान हा एक नाविन्यपूर्ण उपक्रम २०१० च्या बदलापूर अधिवेशनापासून सुरू केलेला आहे. विधानसभेचे माजी सभापती मा. अरूणभाई गुजराथी यांनी ÷शिक्षणाचे अर्थशास्त्र' या विषयावर चौथे पुष्प गुंफले. शिक्षणातून ज्ञान, कौशल्य, संस्कार इ. गुण विकसित झाले पाहिजेत. शिक्षणातून नितीमूल्यांची रूजवण झाली पाहिजे. प्रचंड शिक्षण, शुल्क, शिक्षणातील गळती, मुलींचे घटते प्रमाण इ. विविध मुद्यांचा सोदाहरण व विनोदी शैलीत परामर्श घेतला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. अनिल सूर्यवंशी, अतिथींचा परिचय डॉ.अविनाश निकम, आभार प्रदर्शन प्रा. चारुदत्त गोखले तर अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. जगन्नाथ पाटील यांनी केला.

**वार्षिक सर्वसाधारण सभा:**

शनिवार दिनांक २३ नोव्हेंबर २०१३ रोजी सायंकाळी ०६.०० वाजता प्राचार्य डॉ. जगन्नाथ पाटील यांच्या अध्यक्षतेखाली ३७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा अत्यंत खेळीमेळीच्या

वातावरणात व शिस्तबध्द पध्दतीने पार पडली. सभेच्या प्रारंभी दिवंगत माजी अध्यक्ष डॉ. र. पु. कुरुलकर, प्रा. सु. रा. ओझरकर, प्रा. के. एच. ठक्कर व दिवंगत आजीव सदस्य यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. वार्षिक सर्वसाधारण सभेतील काही महत्त्वाचे निर्णय पुढीलप्रमाणे -

### ३८ वे वार्षिक अधिवेशन:

ऑक्टोबर/नोव्हेंबर २०१४ मध्ये होणाऱ्या ३८ व्या वार्षिक अधिवेशनाचे यजमानपद स्वीकारण्यासाठी एकूण दोन निमंत्रणे प्राप्त झाली होती. १) ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे. २) श्री. शिवाजी कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स, अकोला. कार्यकारी मंडळाच्या शिफारशीनुसार सर्वसाधारण सभेने ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे यांचे निमंत्रण एकमताने स्वीकारले. तसेच श्री. शिवाजी महाविद्यालय, अकोला यांचे निमंत्रण पुढील वर्षासाठी स्वीकारण्याचे ठरले.

३८ व्या अधिवेशनासाठी पुढील तीन विषय निश्चित करण्यात आले.

१) मौद्रिक क्षेत्र व वास्तव क्षेत्र या दोहोतील विसंगतीचे सैध्दांतिक विवेचन.
२) जैवतंत्रज्ञान, पर्यावरण आणि भारतीय शेतीची वाटचाल.
३) महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल: सद्यस्थिती व आव्हाने.

### निवडणुका:

३८ व्या वार्षिक अधिवेशनाच्या अध्यक्षपदी प्रा. डॉ. श्रीराम जोशी, जळगांव यांची बहुमताने निवड झाली. सन २०१४-१७ या तीन वर्षासाठी डॉ.अविनाश निकम, शहादा यांची अर्थसंवादच्या प्रमुख संपादकपदी बहुमताने निवड करण्यात आली. सन २०१४-१७ या तीन वर्षासाठी डॉ. अर्जुनराव महाडीक, सांगली यांची विश्वस्त म्हणून एकमताने निवड झाली.

२०१४-१७ या तीन वर्षासाठी प्रा. डॉ. रामदास भांडवलकर यांची कार्यवाह - खजिनदार पदावर बहुमताने निवड झाली. कार्यकारी मंडळावर डॉ.अशोक खाचणे, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांची बहुमताने व प्रा.सुभाष गुर्जर, अमरावती विद्यापीठ, अमरावती, डॉ. हनुमंत ननवरे, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर डॉ. राजेंद्र शिंदे एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई यांची अविरोध निवड झाली.

### डॉ. श्री. आ. देशपांडे स्मृती जीवनगौरव पुरस्कार:

परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीधर आत्माराम देशपांडे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ हा पुरस्कार गतवर्षी सुरू करण्यात आला. शनिवार दिनांक २३ नोव्हेंबर रोजी सायंकाळी पुरस्कार सोहळा अत्यंत भावपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पुरस्काराचा हेतू प्रा डॉ. अनिल सूर्यवंशी यांनी कथन केला. स्व. डॉ. श्री. आ. देशपांडे यांच्या जीवनकार्याबाबत डॉ. दि. व्यं. जहागिरदार व डॉ. संतोष दास्ताने आपले मनोगत व आठवणी व्यक्त केल्या. डॉ. श्री. आ. देशपांडे स्मृती जीवनगौरव पुरस्काराचे व्दितीय मानकरी व सत्कारमूर्ती डॉ. ज. फा. पाटील यांचा परिचय डॉ. कैलास पाटील यांनी प्रभावीपणे करून दिला. डॉ. विनायक देशपांडे यांनी मानपत्राचे वाचन केले. यानंतर डॉ. ज. फा. पाटील यांचा सपत्नीक शाल, श्रीफळ, मानपत्र, सन्मानचिन्ह, हारगुच्छ आदि सन्मानपूर्वक प्रदान करून यथोचित सत्कार प्रमुख अतिथी डॉ. राम देशपांडे, बंगलोर

यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे डॉ. राम देशपांडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यानंतर सत्कारमूर्ति डॉ. ज. फा. पाटील यांनी आपल्या खडतर जीवन वाटचालीचा अत्यंत वेधक शब्दात आढावा घेतला. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. जगन्नाथ पाटील आणि आभारप्रदर्शन प्रा. धीरज कदम यांनी पार पाडले. कार्यक्रमाचे संयोजन डॉ. मंजुषा मुसमाडे यांनी यशस्वीरित्या केले.

**समारोप सोहळा:**

रविवार दिनांक २४ नोव्हेंबर रोजी सकाळी ११.०० वाजता समारोप सोहळ्यास प्रारंभ झाला. प्रमुख अतिथी विधानसभेचे उपाध्यक्ष मा. वसंतराव पुरके होते. व्यासपीठावर माजी राज्यमंत्री वसुधाताई देशमुख, वसंतराव घुईखेडकर, मिलिंदभाऊ चिमोटे, डॉ. शैलेंद्र देवळणकर, डॉ. मुक्ता जहागिरदार, प्राचार्य सु. ना. देशमुख आणि म. अ. परिषदेचे अध्यक्ष डॉ. जगन्नाथ पाटील, कार्याध्यक्ष प्रा. चारूदत्त गोखले, कार्यवाह-खजिनदार डॉ. अनिल सूर्यवंशी, अर्थसंवादचे प्रमुख संपादक डॉ. अविनाश निकम, नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ. श्रीराम जोशी स्थानिक कार्यवाह डॉ. वनिता चोरे, सर्व कार्यकारिणी सदस्य, विश्वस्त डॉ. एम. एन. शिंदे, डॉ. सूर्यकांत जगदाळे आदि उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य सु. ना. देशमुख यांनी केले. स्थानिक कार्यवाह डॉ. वनिता चोरे यांनी अधिवेशनाचा अहवाल सादर केला. कार्यवाह-खजिनदार डॉ. अनिल सूर्यवंशी यांनी यजमान महाविद्यालयाचे अधिवेशन यशस्वीरित्या संपन्न केल्याबद्दल आभार व्यक्त केले. प्रा. चारूदत्त गोखले, मिलींदभाऊ चिमोटे, डॉ. मुक्ता जहागिरदार, डॉ. शैलेंद्र देवळणकर, वसंतरावजी घुईखेडकर आदिंनी विचार व्यक्त केले. यानंतर प्रतिनिधींच्या वतीने डॉ. मंजुषा मुसमाडे व डॉ. बी. जी. कोरे यांनी मनोगत व्यक्त केले.

प्रमुख अतिथी ना. प्रा. वसंतराव पुरके, उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी समन्याय पध्दतीने विकास साध्य करावा. लोकांनी मतांचे राजकारण न करता मूल्यांचे राजकारण करावे असे मत व्यक्त केले. श्रीमती वसुधाताई देशमुख माजी राज्यमंत्री यांनी शेतकऱ्यांना न्याय मिळाला पाहिजे. असे विचार व्यक्त केले. नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ. श्रीराम जोशी, कार्यवाह-खजिनदार डॉ. रामदास भांडवलकर, कार्यकारिणी सदस्य डॉ. अशोक खाचणे, डॉ. राजेंद्र शिंदे, डॉ. हनुमंत ननवरे, प्रा. सुभाष गुर्जर, प्रमुख संपादक डॉ. अविनाश निकम व विश्वस्त डॉ. अर्जुन महाडिक यांचा सत्कार करण्यात आला. समारोप कार्यक्रमाची सांगता डॉ. वनिता चोरे यांच्या आभार प्रदर्शनाने झाला.

**परिषदेच्या वतीने विविध पारितोषिकांचे वितरण:**

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने दिल्या जाणाऱ्या विविध पारितोषिकांचे वितरण प्रमुख पाहुणे व संस्था पदाधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले.

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उत्कृष्ठ ग्रंथ पारितोषिक (रु.५०१/-):
प्रा. डॉ. जे. व्ही. गायकवाड, अमरावती यांच्या ÷÷अमरावती जिल्ह्यातील नागरीकरणाचे स्वरूप व समस्यांचे विश्लेषण'' या ग्रंथास देण्यात आले.

२) प्रा.मो.स.भावे पारितोषिक (रु.२५१/-):
अर्थसंवाद मधील सर्वोत्कृष्ठ लेख ÷÷पुणे

जिल्ह्यातील आदिवासी महिला-बाल कुपोषण" या डॉ. तानाजी गीते, पुणे यांच्या लेखास देण्यात आले.

३) मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम महिला ग्रंथ पारितोषिक: (रु.११,०००/-) प्रा. डॉ. सौ. विभा जयंत सावरकर, अमरावती यांच्या ÷÷आधारवड कुष्ठरुग्णांचा- विदर्भातील कुष्ठरोगी सेवा संस्थांचे अध्ययन" ग्रंथास दिले.

४) प्रा. सौ. अरूणा रारावीकर स्मृती आर्थिक लेख पुरस्कार : प्रथम पारितोषिक रु.१०००/- प्रा. सुभाष दिगंबर दगडे, सांगली यांच्या ÷÷ग्रामीण विकासासाठी शिक्षण महत्त्वाचे" या लेखास देण्यात आले.

द्वितीय पारितोषिक रु. ५००/- प्रा. डॉ. कृष्णा शंकर शहाणे, नाशिक यांच्या ÷÷चलनी नोटांची टंचाई-एक राष्ट्रीय समस्या" या लेखास देण्यात आले.

अधिवेशनात सादरीकरण झालेल्या सर्वोत्कृष्ट शोधनिबंधास पारितोषिके :

१) कै. ग. प्र. पिंपरकर पारितोषिक रु.५०१/- प्रा.डॉ.प्रशांत हरमकर, अमरावती. (हे पारितोषिक या वर्षापासून स्वतंत्रपणे देण्यात येत आहे. यासाठी प्रा. डॉ. मुक्ता जहागिरदार यांनी त्यांना मिळालेली पारितोषिकाची रक्कम रू.११,०००/- परिषदेस देणगी दिली. परिषदेच्या वतीने त्यांचे मनपूर्वक आभार)

२) प्रा. कांतीभाई ठक्कर ऋणमुक्ती प्रतिष्ठानचे डॉ. अमर्त्य सेन पारितोषिक रू. ४००/-प्रा. डॉ. वाय. एस. गायकवाड, सांगली.

३) डॉ.ज.फा. पाटील पारितोषिक रु.१,१११/- रमजान मुजावर, कोल्हापूर.

४) पद्मजा गंधे पारिताषिकप्रा. डॉ. वनिता चोरे, अमरावती.

ऋणनिर्देश :

१) तज्ज्ञ परिक्षक : प्रा. डॉ. सुधा मोकाशी, मुंबई, प्रा. डॉ. अंजली कुलकर्णी, नागपूर, प्रा. डॉ. संतोष यादव, कोल्हापूर, प्रा. डॉ. एस. डब्ल्यू. मिसाळ, पुणे, प्रा. डॉ. शिला सहस्त्रबुध्दे, मिरज, प्राचार्य डॉ. रामकृष्ण टाले, नागपूर, प्रा. डॉ. अर्जुने दिलीप सोपानराव, जालना, प्रा. डॉ. सुहास आव्हाड, संगमनेर, प्रा. डॉ. टी. एम. भोसले, कवठे महंकाळ, प्रा.डॉ. मुलाणी एम. यु. बारामती, प्रा. डॉ. आर. के. शिंदे, धुळे, प्रा. कोरे बी.जी. सातारा, प्रा. डॉ. एन. एल. चव्हाण, जळगांव, प्रा. डॉ. ए. बी. देवगिरीकर, औरंगाबाद.

२) सूत्रसंचालक व वृत्तसंकलक: प्रा. डॉ. दि. व्यं. जहागिरदार, प्रा. डॉ. एस. एम. भोसले, प्रा. डॉ. श्रीराम जोशी, प्रा. डॉ. टी. जी. गिते, प्रा. डॉ. लालासाहेब घाटगे, प्रा. डॉ. मारूती तेगमपुरे, प्रा. सुभाष दगडे, डॉ. सिंधुताई कोरे.

३) निवडणूक अधिकारी व सहकारी: प्राचार्य डॉ. पी.बी. कुलकर्णी, प्रा. डॉ. एस. डब्ल्यू. मिसाळ, प्रा. डॉ. संजय तुपे, प्रा. डॉ. संजय धनवटे. या सर्वांनी मानद सेवा देऊन अधिवेशनाच्या यशस्वीतेत मोलाचे योगदान दिले. या सर्वांचे मी परिषदेच्या वतीने मन:पूर्वक आभार व्यक्त करतो. अशाप्रकारे परिषदेचे ३७ वे राष्ट्रीय अधिवेशन अमरावती येथे सर्वार्थाने यशस्वीरित्या संपन्न झाले.

# अर्थसंवाद वार्षिक अहवाल
# २०१३-१४ (खंड ३७, अंक १ ते ४)

अविनाश रामलाल निकम
प्रमुख संपादक, अर्थसंवाद
मराठी अर्थशास्त्र परिषद.

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ÷अर्थसंवाद' त्रैमासिकाचा २०१३-१४ या वर्षाचा ३७ व्या खंडाचा वार्षिक अहवाल परिषदेच्या सर्व सन्माननीय सदस्यांसमोर सादर करतांना मला अत्यंत आनंद होत आहे. माझ्या संपादकीय कारकिर्दीतला हा तृतीय अहवाल. अर्थसंवादचे ३७ खंड अखंडपणे प्रकाशित झाले. सन २०१३-१४ या वर्षात अर्थसंवादचे चार अंक प्रकाशित झाले. अर्थसंवाद ISSN व Registration Number प्राप्त जागतिक पातळीवरील नियतकालिकांच्या यादीतील प्रतिष्ठाप्राप्त नियतकालिक ठरले आहे. मराठी अर्थशास्त्र परिषदेचे सर्व सन्माननीय सदस्य, अर्थसंवादचे लेखक, जाहिरातदार, वर्गणीदार यांच्या सहकार्यामुळेच परिषदेला हे त्रैमासिक चालू ठेवणे शक्य झाले आहे. इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्च, दिल्ली आणि महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई या संस्थांनी अनुदान मंजूर करुन मोलाचे सहकार्य दिले आहे, त्याबद्दल मी या संस्थांचा परिषदेच्या वतीने अत्यंत कृतज्ञ आहे.

सन २०१३-१४ च्या सदतीसाव्या खंडात स्वतंत्र लेख, ग्रंथ परीक्षण, परिषदेच्या ३७ व्या राष्ट्रीय अधिवेशनाचा वृत्तांत, प्रत्येक अंकात संपादकीय, अर्थ शब्दांची वाट पाहे, अध्यक्षीय भाषण, अर्थसंवाद २०१३-१४ चा अहवाल, ३७ व्या राष्ट्रीय अधिवेनातील सत्रांचा अहवाल अशा विविधांगी मजकुराचा समावेश करण्यात आला आहे. सन २०१३-१४ या वर्षात प्रकाशित झालेल्या चारही अंकांची मिळून अनुक्रमणिकेसह एकूण ४६२ पाने झाली. वर्षभरात ज्या ज्या लेखकांचे योगदान अर्थसंवादला मिळाले त्या सर्व लेखकांचा मी परिषदेच्या वतीने आभारी आहे. प्रमुख संपादकपदी माझी एकमताने पुनर्नियुक्ती करून विश्वास दाखविल्याबद्दल संपूर्ण कार्यकारी मंडळाचा मी आभारी आहे. संपादक पदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर सर्व माजी प्रमुख संपादकांनी आपल्या

कार्यातून निर्माण केलेल्या आदर्श परंपरा कायम राखून बदलत्या काळानुसार विचारपूर्वक काही निर्णय घेतले. त्यानंतर बदल आणण्याचा प्रयत्न केला आहे.

१) कोणत्याही लेखकाचे एकापेक्षा जास्त लेख गेल्या दोन वर्षांप्रमाणेच या वर्षातसुध्दा अर्थसंवादमध्ये समाविष्ट केले नाहीत. त्यामुळे अर्थसंवादच्या इतिहासात सर्वाधिक लेखकांचा समावेश ३६ व्या खंडात होता आता ३७ व्या खंडात हा नवीन उच्चांक आपण गाठू शकलो आहोत. जास्तीत जास्त सभासदांना अर्थसंवादचे लेखक होण्याची संधी प्राप्त होण्यासाठी हा निर्णय घेतला. त्यासह शोधनिबंधाच्या पृष्ठसंख्येवर नियंत्रण आणल्याने लेखांच्या संख्येने नवीन उच्चांक प्रस्थापित करून अंकाची गुणवत्ता वाढवण्याचा प्रयत्न देखील केला आहे.

२) शहरी भागातील लेखकांबरोबरच ग्रामीण भागातील गुणवत्तापूर्ण लिहिणाऱ्या लेखकांना तितकीच संधी अर्थसंवादच्या माध्यमातून देण्याचा प्रयत्न केला आहे.

३) प्रस्थापित लेखकांबरोबरच नवीन लेखकांना अधिक संधी देण्याचा प्रयत्न करताना महाराष्ट्राच्या सर्व भागातील, अगदी काना-कोपऱ्यातील लेखकांना अर्थसंवादच्या लेखकसूचीमध्ये आणण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे.

४) अर्थसंवादच्या माध्यमातून अर्थशास्त्रीय लेखन करणाऱ्या नवीन लेखकांची एक पिढी महाराष्ट्रातील इतर दैनिके, मासिके, साप्ताहिके, जर्नल्स यामध्ये लिहिण्यासाठी मराठी अर्थशास्त्र परिषदेने द्यावी यासाठी प्रयत्न केला.

५) अर्थसंवादचा प्रत्येक अंक उत्तरोत्तर उत्तम यावा, सुबक यावा यासाठी सातत्याने गुणवत्तावाढीचे प्रयत्न केले, प्रयत्न करणे सुरूच आहे.

६) गेल्या वर्षाप्रमाणे या वर्षीसुध्दा प्रत्येक अंकाचे मुखपृष्ठ, मलपृष्ठ, मुखपृष्ठ व मलपृष्ठाच्या आतील पृष्ठे असे एकूण चार पृष्ठ रंगीत दिले आहेत.

७) मुखपृष्ठ व आतील पृष्ठांचा किफायतशीर खर्चात अधिकाधिक उत्तम दर्जा उपलब्ध करून देता यावा यासाठी प्रयत्न केले आहेत.

८) ज्या ज्या सन्माननीय आजीव सदस्यांना अर्थसंवादमध्ये शोधनिबंध प्रकाशित करण्याची इच्छा आहे, ज्यांनी योग्य त्या फॉण्टमध्ये गुणवत्तापूर्ण शोधनिबंध पाठविला त्यांना अर्थसंवादमध्ये संधी देण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे गेल्या ३६ वर्षांच्या तुलनेत सर्वाधिक शोधनिबंध या ३७ व्या खंडात प्रकाशित झाले आहेत.

९) ३७ व्या खंडात अर्थसंवादचा एक विशेषांक प्रकाशित झाला. हा विशेषांक जागतिकीकरणावर आधारित होता. लेखकांनी या विशेषांकाला उत्तम प्रतिसाद दिला.

१०) अंकाचे पाकीट पूर्वी परंपरेने खाकी रंगाच्या कागदाचे होते. सन्माननीय सभासदांपर्यंत पोहोचेपर्यंत बऱ्याच वेळा ते फाटत असे. अंक सर्वांपर्यंत सुरक्षित पोहोचावा यासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाच्या नियतकालिकाप्रमाणे दर्जेदार प्लॅस्टिकचे पाकीट गेल्या वर्षाप्रमाणे याही वर्षातील चारही अंकांसाठी आपण

वापरले.

११) कागदाच्या किमती गेल्या दोन-तीन वर्षात खूपच वाढल्या आहेत. अशा महागाईच्या काळात देखील जळगाव येथील सातपुडा ऑफसेट लाठी परिवाराच्या सहकार्याने किफायतशीर किमतीत अंक तयार केले आहेत.

१२) मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मी महाविद्यालय व ग्रंथालयाच्या वर्गणी वाढीचा प्रस्ताव सादर केला होता. *अर्थसंवादची वार्षिक वर्गणी आधीच्या रु.६००/- वरून रु.१०००/- करावी, पंचवार्षिक वर्गणी आधीच्या रु.१०००/- यात वाढ करून रु.१५००/- करावी, तसेच वार्षिक वर्गणी स्वीकारणे बंद करावे* या प्रस्तावाला आजीव सदस्यांनी गेल्या वर्षापूर्वी एकमताने मंजुरी दिली. त्यामुळे अर्थसंवादच्या चालू वर्षातील उत्पन्नात गेल्या वर्षाप्रमाणे भरीव वाढ झाली आहे.

१३) अर्थसंवादच्या पृष्ठ संख्येने या वर्षी नवीन उच्चांक गाठला आहे. पृष्ठ संख्येचे नियोजन केल्याने सलग तिसऱ्या वर्षीदेखील सर्व अंकांमध्ये एकही पृष्ठ कोरे सोडलेले नाही.

अर्थसंवादची तूट भरुन काढण्यासाठी त्रैवार्षिक वर्गणीदार म्हणून महाविद्यालयांची संख्या वाढविणे आवश्यक आहे. अर्थसंवाद आपापल्या महाविद्यालयात घेतला जाईल याकडे परिषदेच्या सर्व सदस्यांनी लक्ष दिल्यास वर्गणीदार महाविद्यालयांच्या संख्येत वाढ होऊन अर्थसंवादचे उत्पन्न वाढण्यास मदत होईल.

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे सर्व पदाधिकारी कार्यकारिणी सदस्य व सन्माननीय सभासदांनी आपापल्या परिसरातील एखादी पूर्ण पानाची जाहिरात उपलब्ध करुन दिल्यास अर्थसंवादची तूट कमी होण्यास निश्चितच मदत होईल. अर्थसंवाद त्रैमासिकाच्या प्रत्येक अंकाच्या सामान्यपणे १८०० प्रती छापल्या जात आहेत. आजीव सदस्य व वर्गणीदार यांच्या संख्येत सातत्याने वाढ होणे ही अर्थसंवादची जमेची बाजू आहे. चारही अंकांची अनुक्रमणिकेसह एकूण पृष्ठसंख्या ४६२ इतकी ठेवण्यात आली असून प्रत्येक अंक सामान्यपणे १०८ पृष्ठांच्या जवळपास ठेवण्याची परंपरा कायम राखली आहे. अर्थसंवादच्या ३७ व्या खंडात जाहिरातीपासून एकूण उत्पन्न रु. ५५०००/- मिळाले आहे. हे उत्पन्न मिळविण्यासाठी कार्याध्यक्ष प्रा.चारुदत्त गोखले, प्राचार्य सुरेश देशमुख, डॉ. वनिता चौरे यांनी विशेष प्रयत्न केले. या सर्वांचा परिषदेच्या वतीने मी अत्यंत आभारी आहे. परिषदेच्या कार्यकारी मंडळात विविध विद्यापीठांचे प्रतिनिधी निवडले जातात. या प्रतिनिधींना जाहिरात पाठविण्याविषयी विनंती केली आहे. सन्माननीय सदस्य पुढील वर्षी प्रत्येकी एक जाहिरात देऊन सहकार्य करतील अशी अपेक्षा बाळगू या. ३७ व्या खंडातील चारही अंकांचा एकूण खर्च रु.२९८५००/- इतका झाला. गेल्या दोन-तीन वर्षात कागदाच्या किमती खूपच वाढल्या आहेत. तरी देखील अर्थसंवादचा खर्च काटकसरीने केला आहे ही उल्लेखनीय बाब सभासदांच्या निदर्शनास आणू इच्छितो. अर्थसंवादच्या खर्चात या वर्षी थोडी वाढ झाली आहे. त्याची कारणे- १) आजीव सदस्य संख्या वाढली आहे. त्यामुळे अंकांची

## अर्थसंवादची महत्त्वपूर्ण तौलनिक माहिती

| तपशिल | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ |
|---|---|---|---|---|
| चार अंकातील एकूण लेख | २८ | ३९ | ६३ | ६५ |
| चार अंकातील एकूण लेखक | ३५ | ५० | ७५ | ७७ |
| चार अंकाच्या एकूण प्रती | ६८०० | ६८६० | ७१४० | ७२२० |
| चार अंकाची एकूण पृष्ठे | ४३६ | ४२२ | ४४२ | ४६२ |
| चार अंकातील रंगीत अंकसंख्या | ०१ | ०३ | ०४ | ०४ |
| चार अंकाचा एकूण खर्च (रु.) | २०९६९६ | २२५७७३ | २५९११८ | २९८५०० |
| दर नगाचा सरासरी खर्च (रु.) (टपालखर्चासह) | ३०.८३ | ३२.९१ | ३६.३० | ४१.३४ |
| दर पानाचा सरासरी खर्च (रु.) (टपालखर्चासह) | ०.२८ | ०.३१ | ०.३२ | ०.३५ |
| जाहिराती पासून उत्पन्न (रु.) | ४१००० | ४३००० | ५५००० | ५५००० |

संख्या वाढली. २)या वर्षी सर्व अंक रंगीत आहेत. ३) सर्व अंकांच्या मुखपृष्ठास लॅमिनेशन केले आहे. ४) या वर्षी चार अंकांची एकूण पृष्ठसंख्येत भरीव वाढ झाली. ५) जागतिकीकरण विशेषांक अधिक चांगला करण्याचा प्रयत्न केला. ६) अंक संख्या वाढल्याने पाकीट व पोस्टेज खर्चात वाढ झाली. ७) या वर्षीदेखिल चारही अंकांसाठी आंतरराष्ट्रीय नियतकालिकांप्रमाणेच प्लॅस्टीकचे पाकीट वापरले आहे. ८)अंकबिलामध्ये या वर्षातील व्हॅट(VAT)चा एकूण खर्च रु.१२४५०/- सभाविष्ट आहे.

अर्थसंवादची तूट भरून काढण्यासाठी भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, दिल्ली आणि महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई यांचे योगदान मोलाचे आहे. भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषदेने २०१३-१४ मध्ये अर्थसंवाद प्रकाशनास रु.१,५०,०००/- भरीव अनुदान दिले आहे. तर महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने २०१३-१४ साठी रु.४५०००/- अनुदान दिले आहे. दरवर्षी या दोन्ही संस्था अनुदान देतात. या दोन्ही संस्थांचा परिषदेच्या वतीने मी अत्यंत आभारी आहे. हे अनुदान प्राप्त करण्यासाठी माझ्यासह कार्यवाह डॉ.अनिल सुर्यवंशी यांनी प्रयत्न केले. अर्थसंवाद येत्या वर्षात अधिक दर्जेदार व अधिक पृष्ठांसह येण्यासाठी अधिक रकमेची तरतूद करणे अत्यंत गरजेचे आहे.

भारतीय अर्थव्यवस्था व जागतिक अर्थव्यवस्थेत घडणाऱ्या विशेष महत्त्वाच्या घटनांविषयी चालू घडामोडींवर आधारित लेख देण्याची परंपरा कायम राखली. स्वतंत्र लेख, सैद्धांतिक लेख, तसेच शेती क्षेत्र, उद्योग क्षेत्र,

जागतिकीकरण, सेवा क्षेत्र, बँकिंग क्षेत्र, सहकार क्षेत्र, रोजगार क्षेत्र, आदिवासी विकास या विषयावरील लेख अर्थसंवादमध्ये प्रकाशित करण्यात आले.

बऱ्याच वेळी ठरलेल्या फॉण्टमध्ये व पेजमेकरमध्ये टाईप करून लेख न येणे, पाकीटात सीडी तडा पडून प्राप्त होणे किंवा आलेली सीडी ओपन न होणे व सर्वात महत्त्वाचे म्हणजे विजेचे भारनियमन अशा कारणांनी अर्थसंवादचा अंक पूर्ण करताना समस्या आल्यात. आपण अर्थसंवादच्या प्रत्येक अंकात जाहिरात देतो त्या वेळेवर उपलब्ध होत नाहीत. त्या करिता कार्यकारिणी सदस्य, सल्लागार मंडळ, आजीव सदस्य यांनी अर्थसंवादला सहकार्य करण्याची गरज आहे. अमरावती येथे संपन्न झालेल्या सदतीसाव्या वार्षिक अधिवेशनात २१ नोव्हेंबर २०१३ रोजी अर्थसंवादच्या सल्लागार मंडळाची बैठक संपन्न झाली. या प्रसंगी पदाधिकारी व सदस्यांनी अर्थसंवादचा दर्जा वाढविण्यासाठी मार्गदर्शनपर सूचना केल्या.

अर्थसंवादच्या ३७ व्या खंडाची जडण घडण करण्यासाठी अनेकांनी मला मोलाची मदत केली. आदरणीय कार्याध्यक्ष प्रा. चारुदत्त गोखले यांनी बहुमोल मार्गदर्शन केले. अर्थसंवाद प्रकाशित करताना येणाऱ्या अडचणी दूर करीत असताना माझे गुरूवर्य प्रा.चारुदत्त गोखले यांनी वेळोवेळी सहकार्य केले. लेखक, जाहिरातदार, कार्यकारी मंडळ सदस्य, माजी अध्यक्ष डॉ. ज. फा. पाटील, डॉ. विनायक भिसे, डॉ. विनायक देशपांडे, डॉ. दि. व्यं. जहागीरदार, डॉ. मुक्ता जहागीरदार, डॉ.संतोष दास्ताने, डॉ. के.के. पाटील, कार्यवाह खजिनदार डॉ.अनिल सुर्यवंशी, अध्यक्ष डॉ. जगन्नाथ पाटील, विश्वस्त डॉ. मधुकर शिंदे, विश्वस्त डॉ. सूर्यकांत जगदाळे यांचे मार्गदर्शन व योगदान महत्त्वाचे ठरले. डॉ. श्रीराम जोशी (जळगाव), डॉ.बालाजी शिंदे (परभणी), डॉ.रामकृष्ण टाले (नागपूर), डॉ.हरिहर तिवारी (वाशीम), डॉ.तुकाराम मुंडे (मानवत), डॉ. सुरेश ढाके (डोंगरकठोरे), डॉ. बालाजी सुरवसे (फोंडा), वामन सावंत (रत्नागिरी), डॉ.वनिता चौरे (चांदूरबाजार) व डॉ.तुकाराम बारबोले (उस्मानाबाद) या कार्यकारी मंडळ सदस्यांचे सहकार्य लाभले. डॉ.आर. बी. भांडवलकर, डॉ.रावसाहेब जाधव, डॉ.संजय धनवटे, डॉ.मोहन चौधरी, डॉ.तानाजी गिते, डॉ.विजय भोपाळे, डॉ. संतोष कदम, डॉ. सुरेश जगताप, डॉ.राजू शिंदे, प्रा. एस. एल. भालेराव यांचे सहकार्य लाभले. सर्व अंकांची कॉम्प्युटरमध्ये जडण घडण करण्यासह प्रूफ रीडींग करणारे सुनील भांडारकर व सातपुडा ऑफसेटचे निलेश लाठी या मित्रांच्या सहकार्याशिवाय मी अंक आणू शकलो नसतो. या सर्वांचा मी अत्यंत ऋणी आहे. अर्थसंवादचे सहाय्यक संपादक शंकर पवार, सल्लागार मंडळ सदस्य डॉ. प्रशांत काटोले, डॉ. अशोक खाचणे, डॉ. राहूल म्होपरे यांचा मी परिषदेच्या वतीने आभारी आहे. अर्थसंवाद पाकीटात टाकणे, पोस्टाची तिकिटे चिकटवणे या संदर्भात कु.ईशा लाठी व कु.नेहा लाठी यांनी उत्स्फूर्त सहकार्य दिल्याबद्दल मी त्यांचा देखील आभारी आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवरील त्रैमासिक अर्थसंवाद अधिक दर्जेदार बनविण्यासाठी आपण सर्व जण यथाशक्ती प्रयत्न करु या ×

# सी. पं. खेर यांना विनम्र श्रद्धांजली

दि.व्यं.जहागिरदार, अमरावती,
माजी अध्यक्ष,
मराठी अर्थशास्त्र परिषद,
भ्रमणध्वनी: ९६५७७०१७४८

अर्थशास्त्रातील वेगवेगळ्या विषयांवर पुस्तके लिहणाऱ्या ‘हाडाच्या लेखकाचे’ - सी.पं. खेर यांचे निधन दि. २८ फेब्रुवारी २०१४ रोजी पुणे येथे उतारवयामुळे झाले. मृत्युसमयी ते ८८ वर्षांचे होते. ३ वर्षापूर्वीच त्याच्या पत्नी दिवंगत झाल्या होत्या. सी.पं. खेर यांचा जन्म १९२५ मध्ये झाला. त्यांनी आपले महाविद्यालयीन शिक्षण पुण्याच्या बृहन्महाराष्ट्र कॉमर्स कॉलेजातून पूर्ण केले. तेथून बी.कॉम.ची पदवी प्राप्त केल्यावर ते आकाशवाणीच्या लेखा विभागात धारवाड येथे रुजू झालेत व सेवानिवृत्तीपर्यंत ते धारवाडलाच होते. त्यांची व माझी ओळख गेल्या ३०-३५ वर्षातली. पुण्याच्या गोखले अर्थशास्त्र संस्थेच्या ग्रंथालयात आमच्या भेटी होत. रेंज हिल्स मधील त्यांच्या सदनिकेत मी गेलो होतो तसेच माझ्या घरीही ते आले होते. माझ्यापेक्षा ते वयाने १७-१८ वर्षांनी मोठे असले तरी वयाची अडचण आमच्या मैत्रीत कधी आली नाही. मुद्रा, मौद्रिक धोरण, राजकोषीय धोरण, केंद्र-राज्य संबंध, दारिद्र्य, आर्थिक सुधारणा, जागतिक अर्थकारण, वित्तीय आरिष्टे हे त्यांचे आवडीचे विषय होते. तसेच केन्स, शुम्पेटर, ग्रॅलब्रेथ हे त्यांचे आवडते लेखक. ते कोणत्याही वादात अडकले नाही. त्यांनी कोणत्याही वादाचा पुरस्कार केला नसला तरी मुक्त अर्थव्यवस्थेचे त्यांना आकर्षण होते.

स्वतः प्राध्यापक नसूनही त्यांचा अर्थशास्त्राचा अभ्यास दांडगा होता. विषयावर घट्ट पकड होती आणि विशेष म्हणजे सोप्या मराठीतून विषय उलगडण्याचे त्यांचे कसब वाखाणण्याजोगे होते. वयाची तिशी ओलांडण्यापूर्वीच क्रौथरच्या *An outline of Money* ह्या ग्रंथाच्या आधारे त्यांनी ‘पैसा’ हे पुस्तक १९५३ मध्ये प्रसिद्ध केले. पुढे सतत ६० वर्षे विविध विषयांचे अध्ययन करून अद्यावत पुस्तके लिहण्याचा त्यांनी सपाटा सुरू केला. केन्स व शुम्पेटरचे *अर्थशास्त्र*, द्रव्यनीती ही पुस्तके त्यांनी नौकरी सांभाळतच लिहलीत. *फायनान्सेस ऑफ कर्नाटक* हे त्यांचे राजस्वावरील इंग्रजीत लिहिलेले पुस्तक. सेवानिवृत्त

झाल्यावर त्यांना एक प्रकारची मानसिक शांती प्राप्त झाली व १९८७ नंतर आजतागत त्यांनी विविध विषयांवर १३-१४ पुस्तके लिहिलीत. त्यातील बऱ्याच पुस्तकांचा परिचय अर्थसंवादच्या ÷ग्रंथपरिचय' या सदरातून मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या सदस्यांना झाला आहे. सुदैवाने त्याची बहुतेक सर्व पुस्तके मला वाचण्याचा योग आला. अर्थसंवाद, अन्तर्नाद सारख्या संशोधनपर पत्रिकांमधून महत्त्वपूर्ण विषयांवर त्यांनी लेख लिहले होते. मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ते आजीव सदस्य होते व काही वार्षिक अधिवेशनांना ते उपस्थित राहिल्याचे अनेकांच्या स्मरणात आहे.

मुद्राविषयक प्रश्नांचा अभ्यास करणाऱ्यांना त्यांनी लिहिलेले ÷पैसावाद की केन्सवाद' हे पुस्तक निश्चित आवडेल. केन्स व मिल्टन फ्रिडमन यांच्या विचारांचा व त्यातून निष्पन्न धोरणांचा त्यांनी अत्यंत शास्त्रीय पद्धतीने आढावा घेतला. आर्थिक सुधारणांचे नवे पर्व हे पुस्तक म्हणजे नवीन आर्थिक धोरणावर भाष्य करणारे मराठीतील पहिलेच पुस्तक. या पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार प्राप्त झाला होता. त्यांच्या *÷÷नवप्रवर्तन सूत्र आर्थिक विकासाचे''* आणि अन्य तीन पुस्तकांना शासनाचा उत्कृष्ट ग्रंथ पुरस्कार प्राप्त झाला होता. इ.स.२०११ मधील वित्तीय आरिष्टचे स्वरूप व समस्या हे देखील पुस्तक चांगलेच गाजले. केन्स, शुम्पेटर आणि ग्रॅलग्रेथ या तीन अर्थशास्त्रज्ञांवर त्यांनी मराठीतून स्वतंत्रपणे तीन पुस्तके लिहली. या तिघांवर मराठीत बहुधा प्रथमच लिहिलेली ही पुस्तके होती. त्यांच्या अनेक पुस्तकांना अन्य संस्थांकडूनही पुरस्कार प्राप्त झालेत. आपल्या मराठी अर्थशास्त्र परिषदेतर्फे देण्यात येणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ पुरस्कारही त्यांनी अनेक वेळा प्राप्त केला होता.

सी.पं. खेर यांची राहणी अत्यंत साधी होती. ते बरेचशे मितभाषी होते पण घरी आलेल्यांचे मनःपूर्वक व स्मित हास्याने ते स्वागत करीत. सेवानिवृत्ती नंतर सतत अध्ययन व लिखाणास वाहून घेतलेल्या सी.पं. खेरांविषयी प्रत्येकालाच अभिमान वाटेल असे त्यांचे कर्तृत्व आहे. त्यांच्या निधनामुळे आपण सर्व एका आदर्शवत लेखकास मुकलो आहोत. त्यांचे जाणे दुःख देणारे आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास सद्‌गती देवो× परिषद व माझ्या वतीने त्यांना विनम्र श्रद्धांजली.

# अर्थ शब्दांची वाट पाहे
# हरित विपणन
# (Green Marketing)

**ज. फा. पाटील, कोल्हापूर**
माजी अध्यक्ष,
मराठी अर्थशास्त्र परिषद
भ्रमणध्वनी: ९४२२०४६३८२

**हरित विपणन (Green Marketing):**

अमेरिकेत मार्केटिंग असोसिएशनने १९७५ मध्ये टेक्सास राज्यातील ऑस्टीन या शहरात केलेल्या एका कार्यशाळेत ग्रीन मार्केटिंग तथा एनव्हायरनमेंटल मार्केटिंग अशा शब्दांचा समानार्थी विचार करून ग्रीन मार्केटिंग या शब्द गटाची व्याख्या थोडक्यात-

"Marketing of products that are presumed to be environmentally free" अशी केली. अधिक विचारांती ग्रीन मार्केटिंग या शब्दाची अधिक संपूर्णवादी व्याख्या पुढीलप्रमाणे करण्यात आली. 'Holistic marketing concept wherein the production, marketing, consumption and disposal of products happen in a manner that is less detrimental to environment with growing awareness about implications of global warming, non-bio-degradable solid waste and harmful impact of pollutants.' म्हणजेच हरित विपणन या शब्द गटामुळे वस्तू व सेवांच्या उत्पादन, विक्री, उपभोग व विल्हेवाट यांचा पर्यावरणावर किमान प्रतिकुल परिणाम होईल व उत्पादक व उपभोक्ता या दोन्ही बाबतीत, वैश्विक उष्मावृध्दी, जैविक पध्दतीने नष्ट न करता येणाऱ्या कचरा किंवा घाण तसेच प्रदुषकांच्या नुकसानकारक परिणामांची जाणीव होईल अशा प्रक्रियेचा अर्थ व्यक्त होतो. हरित विपणन (Green Marketing) हा मराठी जाणीव होईल अशा प्रक्रियेचा अर्थ व्यक्त होतो. हरित विपणन (Green Marketing) हा मराठी शब्द त्या अर्थाने घेतला आहे.

## मराठी अर्थशास्त्र परिषद

## सन २०१३-१४ या वर्षात झालेले आजीव सभासद

| अ.क्र. | सभासदाचे नाव | क्रमांक |
|---|---|---|
| १ | सावंत हनुमंत शहाजी | १६०१ |
| २ | सौ.कुणकेरकर केशर सखाराम | १६०२ |
| ३ | सौ.धुरी निलम देवेंद्र | १६०३ |
| ४ | वालावलकर मिनल नरहर | १६०४ |
| ५ | देशमुख प्रशांत नारायण | १६०५ |
| ६ | वडवळे आनंदा पांडुरंग | १६०६ |
| ७ | पेंढारी जिनल मिलींद | १६०७ |
| ८ | रूपे एस. एस. | १६०८ |
| ९ | ननवरे मोरेश्वर कुंडलिक | १६०९ |
| १० | जांभुळे ज्ञानेश्वर बाबुराव | १६१० |
| ११ | वायकोळे निखिलकुमार हेमचंद | १६११ |
| १२ | पवार पंढरीनाथ राजाराम | १६१२ |
| १३ | पुरकर प्रकाश निंबा | १६१३ |
| १४ | पाटील शोभा रविंद्र | १६१४ |
| १५ | कटारे वंदना उत्तम | १६१५ |
| १६ | फरांदे संतोष शंकरराव | १६१६ |
| १७ | जवंजाळ प्रकाश उत्तमराव | १६१७ |
| १८ | कापसे विजय दलपतराव | १६१८ |
| १९ | गावंडे महेंद्र पांडुरंग | १६१९ |
| २० | इचे रविंद्र दामोदरराव | १६२० |
| २१ | मायी गिरीष मधुकर | १६२१ |
| २२ | साहू ममता राममिलन | १६२२ |
| २३ | महालिंगे युवराज विठ्ठलराव | १६२३ |
| २४ | कुटे विष्णू पांडुरंग | १६२४ |
| २५ | यादव दिपाली हनुमंत | १६२५ |
| २६ | दळवी संतोष खंडेराव | १६२६ |
| २७ | कोल्हापुरे संदिपान माणिकराव | १६२७ |
| २८ | खरपुरीये लिलाधर धनसिंग | १६२८ |
| २९ | रोटे विजय रमाकांतराव | १६२९ |
| ३० | हुंडेकरी/शेटे संगिता बाळासाहेब | १६३० |
| ३१ | देशपांडे रोहिणी गिरीष | १६३१ |
| ३२ | कदम पराग प्रमोद | १६३२ |

हे त्रैमासिक प्रकाशक डॉ. अनिल सूर्यवंशी (प्रमुख संपादक डॉ.अविनाश निकम) यांनी मराठी अर्थशास्त्र परिषद या संस्थेकरिता सातपुडा ऑफसेट, एम.आय.डी.सी. एरिया, अजिंठा रोड, जळगाव येथे छापून मराठी अर्थशास्त्र परिषद, गोदाई, शिवशक्ती मैदानाजवळ, शिवाजी नगर, बार्शी- ४१३ ४११, जिल्हा सोलापूर येथे प्रसिध्द केले.

# अर्थसंवाद (खंड ३७, २०१३-१४)

## (अ) लेख सूची:


| क्र. | स्वतंत्र लेख | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | डॉ.र.पु.कुरुलकर: अर्थशास्त्राचे कृतिशील अभ्यासक | ३-५ |
| २ | भारतीय बँकिंग : एक दृष्टिक्षेप | ६-२४ |
| ३ | नियोजन काळातील भारताचे जलधोरण | २५-३३ |
| ४ | सहकारी तत्त्वातील संक्रमण | ३४-३७ |
| ५ | भारतातील भाववाढ व चलन धोरण | ३८-५० |
| ६ | केन्द्रीय अर्थसंकल्प २०१३-१४: एक दृष्टिक्षेप | ५१-५४ |
| ७ | एकात्मिक बाल विकास सेवा योजना | ५५-६५ |
| ८ | भारतातील भाववाढीची चिकित्सा | ६६-७२ |
| ९ | सहकारी चळवळ: नवी दिशा | ७३-७८ |
| १० | कृषि विकासासाठी करार शेती | ७९-८६ |
| ११ | कोल्हापूर जिल्ह्यातील सहकारी चळवळ | ८७-९५ |
| १२ | अपंगांचे समावेशन: एक दृष्टिक्षेप | ९६-९९ |
| १३ | आर्थिक सुधारणा-शहरीकरण | ११०-११३ |
| १४ | जागतिकीकरणानंतर शहरीकरण- दशा व दिशा | ११४-११७ |
| १५ | जागतिकीकरणाचा बँकिंग क्षेत्रावर परिणाम | ११८-१२१ |
| १६ | किरकोळ व्यापार क्षेत्रातील गुंतवणुकीचा परिणाम | १२२-१२६ |
| १७ | अन्नप्रक्रिया उद्योग आणि परकीय गुंतवणूक | १२७-१३० |
| १८ | विदेशी गुंतवणुकीचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम | १३१-१३४ |
| १९ | जागतिकीकरणाचा ग्रामीण विकासावर परिणाम | १३५-१३८ |
| २० | जागतिकीकरणाचे कृषि व ग्रामीण विकासावर परिणाम | १३९-१४२ |
| २१ | किरकोळ व्यापार क्षेत्रात थेट विदेशी गुंतवणूक | १४३-१४७ |
| २२ | प्रत्यक्ष परकीय गुंतवणूक: भारतीय किरकोळ क्षेत्र | १४८-१५१ |
| २३ | रुपयाचे अवमूल्यन-कारणे, परिणाम व उपाय | १५२-१५५ |
| २४ | जागतिकीकरण व ग्रामीण विकास | १५६-१५९ |
| २५ | जागतिकीकरणाचा पर्यटन क्षेत्रावर परिणाम | १६०-१६३ |
| २६ | संगणक आज्ञावली उद्योग-निर्यात कामगिरी | १६४-१६७ |
| २७ | किरकोळ क्षेत्रातील विदेशी गुंतवणूक धोरण | १६८-१७१ |
| २८ | जागतिकीकरणाचा अर्थव्यवस्थेवर परिणाम | १७२-१७५ |

| क्र. | स्वतंत्र लेख | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| २९ | शेतमालाचा हमीभाव आणि मुक्त अर्थव्यवस्था | १७६-१७९ |
| ३० | आर्थिक सुधारणांचा केंद्र सरकारच्या खर्चावरील परिणाम | १८०-१८३ |
| ३१ | जागतिकीकरणाचे परिणाम | १८४-१८७ |
| ३२ | जागतिकीकरण आणि भारतातील सेवाक्षेत्र | १८८-१९१ |
| ३३ | भारतातील किंमतवाढीचे चिकित्सक अध्ययन | १९२-१९५ |
| ३४ | जागतिकीकरण व शहरीकरणातील भारताचे स्थान | १९६-२०० |
| ३५ | जागतिकीकरण व भारतीय महिला | २०१-२०४ |
| ३६ | परकिय गुंतवणुकीचा किरकोळ विक्री क्षेत्रावर परिणाम | २०५-२०८ |
| ३७ | आजचे जागतिकीकरण-वित्तीय जागतिकीकरण | २०९-२१२ |
| ३८ | विदेशी गुंतवणुकीमुळे आर्थिक सुधारणा | २१३-२१६ |
| ३९ | जागतिकीकरणाचा बाह्यक्षेत्रावर परिणाम | २१७-२२० |
| ४० | ब्रिक्स संघटना आणि विकास | २२१-२२४ |
| ४१ | भारतातील भूमी सुधारणा: एक दृष्टिक्षेप | २३२-२३९ |
| ४२ | थेट परकीय गुंतवणुकीचा किरकोळ व्यापार क्षेत्रावर परिणाम | २४०-२४४ |
| ४३ | आदिवासी जागल्यांची आर्थिक व सामाजिक स्थिती | २४५-२५१ |
| ४४ | जागतिक अर्थव्यवस्थेत विकासासाठी सहकार | २५२-२५५ |
| ४५ | बांबू-प्रक्रिया एक महाउद्योग | २५६-२६४ |
| ४६ | दुग्ध व्यवसाय-एक शेतीवर आधारित उद्योग | २६५-२७० |
| ४७ | भारतीय शेती क्षेत्रात काळा पैसा: एक आव्हान | २७१-२७७ |
| ४८ | वित्तीय समावेशन: प्रगती व आव्हाने | २७९-२८५ |
| ४९ | जागतिकीकरणाचा बँकिंग क्षेत्रावरील परिणाम | २८६-२९६ |
| ५० | महाराष्ट्रातील दुष्काळाचे स्वरूप व उपाय योजना | २९७-३०१ |
| ५१ | ग्रामीण महाराष्ट्रातील आधारभूत संरचना | ३०२-३०६ |
| ५२ | असंघटित क्षेत्र व कामगार कल्याण | ३०७-३१६ |
| ५३ | स्थूल देशांतर्गत उत्पादन:शेती क्षेत्राचा हिस्सा | ३१७-३२० |
| ५४ | महाराष्ट्रातील साखर उद्योग:समस्या व उपाय | ३२५-३२८ |
| ५५ | करार शेती: कृषि विकासाचे माध्यम | ३२९-३३४ |
| ५६ | महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना | ३४०-३५९ |
| ५७ | पुणे शहरातील घरेलू कामगार - अभ्यास | ३६०-३७० |
| ५८ | ब्रिक्स संघटना व भारताचा विकास | ३७१-३७५ |

| क्र. | स्वतंत्र लेख | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| ५९ | वित्तीय समावेशन:अधिकोषण क्षेत्राची भूमिका | ३७६-३८४ |
| ६० | अर्थव्यवस्थेतील परिणामकारक घटक: काळा पैसा | ३८५-३९२ |
| ६१ | महाराष्ट्रातील नागरीकरण | ३९३-३९९ |
| ६२ | शिराळा तालुक्यातील मका प्रक्रिया उद्योग | ४००-४०४ |
| ६३ | उर्जा संसाधन स्थितीचे अध्ययन | ४०५-४०९ |
| ६४ | आर.एम.सोळुंके,औरंगाबाद, एस.बी.करंडे,बोरावली | ४१०-४१८ |
| ६५ | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे भारताच्या विकासातील आर्थिक तत्त्वज्ञान | ४१९-४२५ |
| | **अर्थ शब्दांची वाट पाहे** | |
| १ | वर्तनार्थशास्त्र | २२५-२२५ |
| २ | मज्जार्थशास्त्र | ३३५-३३५ |
| ३ | हरित विपणन | ४४४-४४४ |
| | **ग्रंथ परीक्षण** | |
| १ | फ्रँकलिन रुझवेल्ट: अमेरिकेचा तारणहार ठरलेल्या जिद्दी नेत्याची यशोगाथा | ३२१-३२४ |
| | **श्रध्दांजली** | |
| १ | सी. पं. खेर यांना विनम्र श्रध्दांजली | ४४२-४४३ |
| | **३७ व्या अधिवेशनाचा वृत्तांत** | |
| १ | मुक्त आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या संदर्भात विषमता व दारिद्र्य याबाबत सैद्धांतिक विवेचन | ४२६-४२७ |
| २ | प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम | ४२८-४२९ |
| ३ | महाराष्ट्रातील सहकारी चळवळ - सद्यस्थिती व भवितव्य | ४३०-४३१ |
| ४ | सदतीसावे वार्षिक अधिवेशन | ४३२-४३६ |
| ५ | अर्थसंवाद वार्षिक अहवाल | ४३७-४४१ |

# अर्थसंवाद (खंड ३७, २०१३-१४)

## (ब) लेखक सूचीः


| क्र. | स्वतंत्र लेखक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | धनश्री महाजन, औरंगाबाद | ३-५ |
| २ | कैलास पाटील, परभणी | ६-२४ |
| ३ | प्रकाश तितरे,भद्रावती | २५-३३ |
| ४ | महादेव पाटील, मिरज | ३४-३७ |
| ५ | मधुकर शिंदे, उरण-इस्लामपूर | ३८-५० |
| ६ | संजय तुपे, नाशिक | ५१-५४ |
| ७ | साबळे एस.एन., संगमनेर, सापनर बी.एन., नाशिक | ५५-६५ |
| ८ | युगंधरा देशपांडे-टोपरे, औरंगाबाद | ६६-७२ |
| ९ | नारायण टाक, जेजुरी | ७३-७८ |
| १० | चंद्रकांत कोकाटे, आनंदा वडवळे, औरंगाबाद | ७९-८६ |
| ११ | वाय. एस. गायकवाड, सांगली | ८७-९५ |
| १२ | बी.आर.सोनवणे, सिल्लोड | ९६-९९ |
| १३ | श्रीराम जोशी, जळगाव; तुषार महाजन, अमेरिका | ११०-११३ |
| १४ | राहूल म्होपरे, अर्जुननगर | ११४-११७ |
| १५ | तानाजी गिते, पुणे | ११८-१२१ |
| १६ | तेजस्विनी मुडेकर, कोल्हापूर | १२२-१२६ |
| १७ | साधना पाटील, ओझर(मिग) | १२७-१३० |
| १८ | पी. ई. विभुते, नांदेड | १३१-१३४ |
| १९ | प्रज्ञा बागडे, नागपूर | १३५-१३८ |
| २० | सुरेश जगताप, अमरावती | १३९-१४२ |
| २१ | आर.बी.भांडवलकर, यवतमाळ | १४३-१४७ |
| २२ | भागचंद्र खुरुद, राहूरी | १४८-१५१ |
| २३ | मोहन चौधरी, पुणे | १५२-१५५ |
| २४ | ए. के. पाटील, कराड | १५६-१५९ |
| २५ | राजू शिंदे, देवपूर | १६०-१६३ |
| २६ | शिवाजी काकडे, गढी, दिनकर टकले, परतूर | १६४-१६७ |
| २७ | माधुरी लेले, नागपूर | १६८-१७१ |
| २८ | विजयकुमार पाटील, आटपाडी | १७२-१७५ |

| क्र. | स्वतंत्र लेखक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| २९ | एस.बी.कटमुसरे, कुही | १७६-१७९ |
| ३० | निता यादव, संतोष यादव, कोल्हापूर | १८०-१८३ |
| ३१ | हिरालाल चव्हाण, जळगाव; राजेंद्रकुमार गव्हाळे, खामगाव | १८४-१८७ |
| ३२ | पी.बी.शिंदे, सिध्देश्वर भोसले, कुर्डूवाडी | १८८-१९१ |
| ३३ | आर.जी.टाले, खापरखेडा | १९२-१९५ |
| ३४ | विकास सुकाळे, नांदेड; सागर कोंडेकर, लातूर | १९६-२०० |
| ३५ | राजकुमार वाइंगडे, अर्जुननगर, विद्या म्होपरे, कोल्हापूर | २०१-२०४ |
| ३६ | भगवान महाजन, मुक्ताईनगर | २०५-२०८ |
| ३७ | बाजीराव इंगवले, वैभववाडी | २०९-२१२ |
| ३८ | धेडे डी. आर., वारणानगर | २१३-२१६ |
| ३९ | एन.एल.चव्हाण, फैजपूर | २१७-२२० |
| ४० | डी.आर.बच्छाव, नाशिक | २२१-२२४ |
| ४१ | राजकिशोर गुप्ता, सुदाम कोरडे, जळगाव | २३२-२३९ |
| ४२ | संभाजी शिंदे, पुणे | २४०-२४४ |
| ४३ | दिलीप जगताप, नंदुरबार | २४५-२५१ |
| ४४ | पी. आर. पवार, कुंडल | २५२-२५५ |
| ४५ | एस.एस. कावळे, तळोधी (बाळापूर) | २५६-२६४ |
| ४६ | निमसे शितल, अहमदनगर | २६५-२७० |
| ४७ | नितिन जाधव, अमळनेर | २७१-२७७ |
| ४८ | निरगुडे आय. ए., श्रीरामपूर | २७९-२८५ |
| ४९ | कुलकर्णी अविनाश, पुणे | २८६-२९६ |
| ५० | गवारे एन. बी., पाटोदा | २९७-३०१ |
| ५१ | खाचणे अशोक, जळगाव | ३०२-३०६ |
| ५२ | कडूकर पी. एम., मुंबई | ३०७-३१६ |
| ५३ | शेसभरे सुधीर, पलूस | ३१७-३२० |
| ५४ | सूर्यवंशी नागेश, मुंबई | ३२५-३२८ |
| ५५ | गोरे ज्ञानेश्वर, देऊळगावराजा | ३२९-३३४ |
| ५६ | जगन्नाथ शामराव पाटील, कराड | ३४०-३५९ |
| ५७ | उत्तम वाकोडकर, अंबाजोगाई | ३६०-३७० |
| ५८ | सुषमा उध्दव मंडले, लातूर | ३७१-३७५ |

| क्र. | स्वतंत्र लेखक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| ५९ | विजय रोटे, दिग्रस, करमसिंग राजपूत, वणी | ३७६-३८४ |
| ६० | वंदना कटारे, औरंगाबाद | ३८५-३९२ |
| ६१ | सुभाष पाटील, पुणे | ३९३-३९९ |
| ६२ | रमजान मुजावर, कोल्हापूर | ४००-४०४ |
| ६३ | शिवाजी ग. यादव, पैठण | ४०५-४०९ |
| ६४ | आर.एस.सोळुंके, औरंगाबाद, एस.बी.करंडे, बोरावली | ४१०-४१८ |
| ६५ | सुरेश गोलाईत, शिरपूर | ४१९-४२५ |
| | **अर्थ शब्दांची वाट पाहे** | |
| | ज. फा. पाटील | |
| १ | वर्तनार्थशास्त्र | २२५-२२५ |
| २ | मज्जार्थशास्त्र | ३३५-३३५ |
| ३ | हरित विपणन | ४४४-४४४ |
| | **ग्रंथ परीक्षण** | |
| १ | मंजुषा मुसमाडे, पुणे | ३२१-३२४ |
| | **श्रध्दांजली** | |
| १ | दि. व्यं. जहागिरदार | ४४२-४४३ |
| | **३७ व्या अधिवेशनाचा वृत्तांत** | |
| १ | दि.व्यं.जहागिरदार, अमरावती | ४२६-४२७ |
| २ | श्रीराम देविदास जोशी, जळगाव | ४२८-४२९ |
| ३ | लालासाहेब ना. घाटगे, सातारा | ४३०-४३१ |
| ४ | सदतीसावे वार्षिक अधिवेशन | ३९६-४०० |
| ५ | अर्थसंवाद वार्षिक अहवाल | ४०१-४०४ |
| | **अंकांचा तपशील खंडः ३७** | **पृष्ठ संख्या** |
| १ | एप्रिल-जून २०१३ | १०८ |
| २ | जुलै-सप्टेंबर २०१३ | १२१ |
| ३ | ऑक्टोबर-डिसेंबर २०१३ | १०८ |
| ४ | जानेवारी-मार्च २०१४ | ११६ |

International Research Journal

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद


मनुष्याणाम् वृत्तीरर्थः।

## जाहिरातीचे दर

| | कृष्णधवल(B/W) | रंगीत |
|---|---|---|
| १) समोरचे आतील पृष्ठ | रु.४,०००/- | रु.११,०००/- |
| २) मागील(आतील) पृष्ठ | रु.४,०००/- | रु.११,०००/- |
| ३) मागील शेवटचे पृष्ठ | रु.५,०००/- | रु.१५,०००/- |

आपल्या जाहिरातीचा मजकूर-डिझाईन (1/5=150X210 mm) आणि सोबत वरील रकमेचा ड्राफ्ट खालील पत्त्यावर पाठवावा. ड्राफ्ट मराठी अर्थशास्त्र परिषद या नावानेच काढावा. जाहिरात प्रसिध्द होताच अर्थसंवादचा अंक आपणास मिळेल. आपल्या सहकार्याबद्दल धन्यवाद ×


डॉ. श्रीराम जोशी,
अध्यक्ष
सार्थक, प्लॉट नं.२०, विवेकानंदनगर,
रामानंदनगर जवळ,
जळगाव-४२५ ००१,
भ्रमणध्वनी:९४२१००८७७६

प्रा. चारुदत्त गोखले,
कार्याध्यक्ष
प्लॉट नं.१०, प्रोफेसर कॉलनी,
जिल्हा उद्योग केंद्राच्या मागे,
जळगाव, जिल्हा-जळगाव-४२५००१,
भ्रमणध्वनी: ९४२२६१८४१०

डॉ. आर. बी. भांडवलकर,
कार्यवाह खजिनदार
गजानन नगर,
पिंपळगावरोड,
यवतमाळ-४४५ ००१
भ्रमणध्वनी: ९४२३१३४८८६

डॉ.अविनाश निकम,
प्रमुख संपादक
मातृपितृ कृपा,प्लॉट नं.३०,
परिमल कॉलनी,
यशवंत क्लासेसच्या मागे,
शहादा-४२५४०९,
जिल्हा नंदुरबार,
भ्रमणध्वनी:९८२२६६५१४१

## 'अर्थसंवाद' या त्रैमासिकाच्या स्वामित्व व इतर बाबींविषयी निवेदन

(फॉर्म ४, नियम ८ नुसार)

| | | |
|---|---|---|
| १. प्रकाशन स्थळ | : | मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा/डॉ.अनिल सूर्यवंशी, गोदाई, शिवशक्ती मैदानाजवळ, शिवाजीनगर, बार्शी-४१३ ४११, जिल्हा-सोलापूर. |
| २. नियतकाल | : | त्रैमासिक. |
| ३. मुद्रकाचे नाव | : | डॉ.अनिल सूर्यवंशी |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | गोदाई, शिवशक्ती मैदानाजवळ, शिवाजीनगर, बार्शी-४१३ ४११, जिल्हा-सोलापूर. |
| ४. मुद्रण स्थळ | : | सातपुडा ऑफसेट, एमआयडीसी एरिया, जळगाव |
| ५. प्रकाशकाचे नाव | : | बाब क्र.३ प्रमाणे |
| ६. संपादकाचे नाव | : | डॉ.अविनाश रामलाल निकम |
| ७. राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | मातृपितृ कृपा, प्लॉट नं.३०, परिमल कॉलनी, यशवंत क्लासेसच्या मागे, शहादा-४२५ ४०९, जिल्हा - नंदुरबार. |
| ८. मालकाचे नाव | : | मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा:सेंटर फॉर दी स्टडी ऑफ सोशल चेन्ज, एम्.एन्.रॉय ह्यूमन डेव्हलपमेन्ट कॅम्पस, प्लॉट क्र.६, एफ् ब्लॉक, कार्डिनल ग्रेशियस स्कूल जवळ, सरकारी वसाहत इमारत क्र.३२३ समोर, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१. |

मी अनिल सूर्यवंशी असे जाहीर करतो की वर दिलेला तपशील माझ्या माहिती आणि समजुतीनुसार खरा आहे.

डॉ.अनिल सूर्यवंशी,
मुद्रक व प्रकाशक